महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळाच्या भाषांतर योजनेखालील प्रकाशने

(१) **'मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष'** (कै. न्या. म. गो. रानडे लिखित 'Rise of the Maratha Power 'चा अनुवाद), प्रा. न. र. फाटक, पृष्ठे २७+१४६, मूल्य रु. ३.००.

(२) **'बुद्धी, प्रेरणा व क्रान्ती'**—भाग १ (डॉ. एम. एन. रॉय लिखित 'Reason, Romanticism and Revolution'—Part Iचा अनुवाद), श्री. बा. रं. सुंठणकर, पृष्ठे १४+२९८+१८, मूल्य रु. ५.००.

(३) **'बुद्धी, प्रेरणा व क्रान्ती'**—भाग २ (डॉ. एम. एन. रॉय लिखित 'Reason, Romanticism and Revolution'—Part IIचा अनुवाद), श्री. बा. रं. सुंठणकर, पृष्ठे ५+२८६+८.

(४) **'धर्मशास्त्राचा इतिहास'**—पूर्वार्ध आणि उत्तरार्ध (भारतरत्न डॉ. पां. वा. काणे लिखित 'History of Dharmashastra'चा अनुवाद), श्री. य. आ. भट, पूर्वार्ध—पृष्ठे १६+६००, मूल्य रु. २०.००.

(५) **'मराठ्यांच्या इतिहासाची साधने'**—पोर्तुगीज दप्तर—खंड ३ (मराठ्यांच्या इतिहासाशी संबंधित पोर्तुगीज कागदपत्रांचा अनुवाद), श्री. स. शं. देसाई, पृष्ठे ५९६, मूल्य रु. २०.००.

आर्थिक सिद्धान्त व अर्धविकसित प्रदेश

भाषांतरमाला क्र. १२.

आर्थिक सिद्धान्त व अर्धविकसित प्रदेश

Economic Theory and Under-Developed Regions

By

GUNNAR MYRDAL

formerly Lars Hierta Professor of Political Economy and Public Finance at the University of Stockholm

लेखक :

गन्नर मिर्दाल

अनुवादिका :

सौ. सरला कारखानीस

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृती मंडळ

मुंबई, १९७२

प्रथमावृत्ति : १९७२ (शके १८९४)

प्रकाशक :

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळ,
सचिवालय, मुंबई ३२.

मूळ प्रकाशक :

जेराल्ड डक्वर्थ अँन्ड कं. लि. लंडन
कॉपीराईट १९५७ गन्नर मिर्दाल

मुद्रक :

दी बुक सेंटर (प्रा.) लि.,
शीव, मुंबई २२.

किंमत, रु ७

निवेदन

मराठी भाषेला व साहित्याला ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रात पश्चिमी भाषांचा दर्जा प्राप्त व्हावा, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, रशियन इत्यादी भाषांना जसे विद्यापीठीय स्तरावर स्वयंपूर्ण महत्त्व प्राप्त झाले आहे तसे मराठी भाषेला व साहित्याला प्राप्त व्हावे, इंग्रजी भाषेला व साहित्याला आज भारतीय विद्यापीठांमध्ये जसे मुख्य स्थान आहे तसे स्थान, महाराष्ट्रामधील विद्यापीठांत मराठी भाषेला व साहित्याला प्राप्त व्हावे या उद्देशाने साहित्य आणि संस्कृती मंडळाने वाङमय निर्मितीचा विविध कार्यक्रम हाती घेतला आहे. विश्वकोश, मराठी महाकोश, वाङमयकोश, विज्ञानमाला, भाषांतरमाला इत्यादी योजना या कार्यक्रमात अंतर्भूत आहेत.

संस्कृत व अन्य भारतीय भाषा आणि त्याचप्रमाणे इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, इटालियन, रशियन, ग्रीक, लॅटीन इत्यादी पश्चिमी भाषांतील अभिजात व उच्च साहित्यामधील विशेष निवडक पुस्तकांचे भाषांतर किंवा सारांश–अनुवाद अथवा विशिष्ट विस्तृत ग्रंथांचा परिचय करून देणे हा भाषांतरमालेचा उद्देश आहे.

भाषांतर-योजनेतील पहिला कार्यक्रम मंडळाने आखून, ज्यांना अग्रक्रम दिला पाहिजे अशी पाश्चात्य व भारतीय भाषांतील सुमारे २०० पुस्तके निवडली आहेत. होमर, व्हर्जिल्, एस्किलस, ॲरिस्टोफेनीस, युरिपिडिस, प्लेटो, ॲरिस्टॉटल, थॉमस ॲक्वाइनस, न्यूटन, डार्विन, रूसो, कांट, हेगेल, जॉन स्टुअर्ट मिल, गटे, शेक्सपीअर, टॉल्स्टॉय्, दोस्तोव्हस्की, स्तानिस्लावस्की, बर्ट्रांड रसेल, रुथ बेनेडिक्ट, राय्शेनवास, व्हाइटहेड, क्रोचे, मालिनावस्की, कॅसिरेर, गॉर्डन व्ही. चाइल्ड इत्यादिकांचा या भाषांतरमालेत समावेश केला आहे. संस्कृतमधील वेद, उपनिषदे, महाभारत, रामायण, भरताचे 'नाटचशास्त्र', 'संगीतरत्नाकर', 'ध्वन्यालोक', प्राकृतातील 'गाथासप्तशती', त्रिपीटकातील निवडक भाग इत्यादिकांचाही या भाषांतरमालेत समावेश केला आहे.

१९५५ मध्ये कैरो येथे वार्षिक महोत्सवी व्याख्यानमालेत गन्नर मिर्दाल यांनी विद्यार्थ्यांसमोर दिलेली व्याख्याने सुधारित स्वरुपात "Economic Theory and Under-Developed Regions" या पुस्तकात प्रसिद्ध केली आहेत.

या पुस्तकाचा मराठी अनुवाद मुंबई येथील सौ. सरला कारखानीस यांनी ग्रंथ-विषयाची माहिती मूळ ग्रंथकाराप्रमाणेच पण मराठी भाषेच्या प्रकृतीशी मेळ बसेल अशा रीतीने देऊन केला आहे. मंडळाच्या भाषांतर योजनेखाली वरील पुस्तकाचा "आर्थिक सिद्धान्त व अर्धविकसित प्रदेश" या शीर्षकाने केलेला हा मराठी अनुवाद प्रकाशित करण्यास मंडळास आनंद होत आहे.

या पुस्तकाचा मराठी अनुवाद प्रकाशित करण्यास मंडळास परवानगी दिल्या-बद्दल मूळ इंग्रजी पुस्तकाचे प्रकाशक जेराल्ड डक्वर्थ अँन्ड् कं. लि., लंडन यांचे मंडळाच्यावतीने मी मनःपूर्वक आभार मानतो.

वाई :
भाद्र २ शके १८९४
नारळी पोर्णिमा,
२४ ऑगस्ट १९७२

तर्कतीर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी,
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि
संस्कृती मंडळ, सचिवालय.

प्रस्तावना

इजिप्तच्या नॅशनल बँकेच्या आमंत्रणावरून, १९५५च्या ऑक्टोबरमध्ये, कैरो येथे मी वार्षिक महोत्सवी व्याख्यानमाला गुंफली. 'विकास व अर्धविकास : राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय आर्थिक विषमतेच्या कार्यतंत्रासंबंधी एक टिपण (कैरो १९५६)', या नावाने ती व्याख्याने बँकेने नंतर प्रसिद्ध केली. मला पाहुणा व्याख्याता म्हणून आमंत्रणाचा मान दिल्याबद्दल, माझी व्याख्याने प्रसिद्ध केल्याबद्दल, आणि सुधारलेल्या स्वरूपात आता त्यांच्या पुनर्मुद्रणास अनुमती दिल्याबद्दल मी बँकेचा ऋणी आहे.

ह्या पुस्तकाची मुद्रणप्रत तयार करताना मूळ हस्तलिखिताचा आकार फारसा वाढू न देता, शक्य तितकी परिपूर्ण फेरतपासणी मी केली आहे. मात्र, समस्यांची चर्चा तांत्रिक पद्धतीने न करण्याची, आणि अनौपचारिक व क्वचित वैयक्तिक स्वरूपात अभिव्यक्ती करण्याची, मूळ व्याख्यानातील पद्धत मी कायम ठेवली आहे.

पुस्तकातील मजकुरासंबंधी मी थोडक्यात सांगू शकतो. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात आंतरराष्ट्रीय राजकीय परिस्थितीत झालेल्या मूलभूत बदलाचे प्रतिबिंब, अर्धविकसित देशांच्या आर्थिक समस्यासंबंधीच्या लेखनात झपाट्याने झालेल्या वाढीत दिसते, असे मी गृहीत धरतो. जगातील नव्या राजकीय परिस्थितीबरोबर समाजशास्त्रांनी जुळते घेण्याचा जो सर्वसाधारण प्रवाह आहे त्याच्या केवळ ओघाबरोबरच मी रहात होतो, याची वर उल्लेखिलेला विषय व्याख्यानांसाठी निवडताना मला जाणीव होती.

मात्र अर्धविकसित देशांसमोरील समस्यांच्या समुच्चयांकडे निरनिराळ्या अनेक दृष्टिकोनांतून पहाता येईल, निरनिराळे प्रश्न विचारता येतील आणि ते सोडविण्यासाठी निरनिराळे मार्ग स्वीकारता येतील. अनेक अभ्यासकांनी, एकाच वेळी, पुष्कळ निरनिराळ्या मार्गांनी, समस्या सोडविण्यासाठी आपापल्या परीने विचार करावा, हे शास्त्रीय ज्ञानाच्या समतोल विकासाला खरोखरीच हितावह आहे. मानव्यनिआंच्या महान बुद्धिवादी परंपरेला अनुसरून, इतर सर्व मानवी प्रयत्नांच्या क्षेत्रांप्रमाणेच, समाजशास्त्राच्या क्षेत्रातसुद्धा चर्चेमुळे, व प्रसंगी वादामुळेही प्रगती होईल, असा

आम्हाला विश्वास वाटतो.

आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या एका विशिष्ट बाजूवर येथे लक्ष केंद्रित करण्याचा मी निर्णय घेतला आहे; विकसित व अर्धविकसित देशांमध्ये पुष्कळ मोठ्या प्रमाणावर असलेल्या व सतत वाढत जाणाऱ्या आर्थिक विषमता, ही ती बाजू होय. ह्या विषमता व त्यांची सतत वाढत जाण्याची प्रवृत्ती ही ढळढळीत सत्ये आहेत. आणि आजच्या जगातील आंतरराष्ट्रीय तणातणीच्या निर्मितीचे ते एक मूलभूत कारण असले तरी, विकास व अर्धविकासासंबंधीच्या साहित्यात मध्यवर्ती समस्या म्हणून त्यांचा बहुधा विचार केला जात नाही.

परंतु मी मात्र नेमके हेच करू इच्छितो. ह्या विषमता का व कशा अस्तित्वात आल्या, त्या का टिकून राहतात आणि त्यांची प्रवृत्ती वाढत जाण्याकडे का आहे ह्या प्रश्नांची चर्चा करण्याचा माझा हेतू आहे. ७व्या प्रकरणात मी आणखी एका प्रश्नाला हात घालणार आहे: ह्या प्रवृत्ती परावर्तित कशा करता येतील ?—ह्या तो प्रश्न. ह्या शेवटच्या प्रश्नाचे बुद्धिवादी उत्तर धोरणाशी निगडीत आहे. धोरणासंबंधी विचार हा कार्यकारण विचार असण्याऐवजी साध्यसाधनविचार असावा लागेल. तथापि, विषमता कमी करण्याचे प्रयत्न, कार्यकारणभावाच्या ज्या यंत्रणेमुळे त्या निर्माण होतात तिच्या ज्ञानावर आधारावे लागतील. आर्थिक विषमता, सार्वजनिक सद्सद्विवेकबुद्धी व आर्थिक सिद्धांत, हा दुसरा भाग, पूर्वीच्या माझ्या व्याख्यानमालेतील पहिल्या व्याख्यानाला धरून आहे. तो भाग आता आहे त्या स्वरूपात पुस्तकाचा समालोचनात्मक उपोद्घात म्हणून मी लिहिला होता. परंतु मुद्रणप्रत तयार करताना मी ती प्रकरणे सध्याच्या जागी घालण्याचे ठरविले. आर्थिक प्रश्नांवरील आमच्या विचारांच्या तात्त्विक बैठकीसंबंधी व पारंपारिक पूर्वानुकूल ग्रहांसंबंधी ज्या वाचकांना खास गोडी नाही त्यांना मी उपस्थित केलेल्या मुख्य प्रश्नासंबंधी ठामपणे मला काय सांगावयाचे आहे त्याचा मुख्यार्थ विनाविलंब समजून घेण्याचा हक्क आहे, असे मला वाटले, म्हणून हा बदल केला.

मला असेही वाटले की, ज्या काही वाचकांना टीकात्मक भागातील माझी मते पटणार नाहीत त्यांच्या भावना तो भाग वाचल्यामुळे दुखावल्या जाण्यापूर्वी जर त्यांनी प्रतिपादनाचा विधायक भाग वाचला, तर त्यातील मुद्यांचा ते अधिक चांगल्या प्रकारे विचार करतील. खरोखरीच मला अशीही आशा वाटली की, आपल्या पारंपारिक आर्थिक सिद्धांताबद्दल मी सतत टीकात्मक वृत्ती का कायम ठेवली आहे याचे अधिक चांगले आकलन त्यांना त्यांनी प्रतिपादनातील विधायक आशय वाचल्यामुळे होईल.

परंतु, विचार मांडण्याचा क्रम कोणताही असला तरी हे एका अर्थशास्त्रज्ञाचे पुस्तक आहे आणि त्यात त्याने अर्थशास्त्रावरील सिद्धांतासंबंधीचा स्वतःचा दृष्टिकोन मांडला आहे. लेखकाचा हा दृष्टिकोन त्याच्या पूर्व काळातील शास्त्रीय संशोधना-पासूनचा आहे, म्हणून मागील लेखनाचे संदर्भ देणे क्षम्य समजले जावे. विविध व्यापक

विचार-रचनांच्या समुच्चयांची गुंतागुंत उकलण्याच्या प्रयत्नांतून सिद्धांतचर्चा निघाल्यामुळे विषयाचे प्रतिपादन सर्वसाधारण स्वरूपाचे व पद्धती मीमांसेच्या पातळीवरची आहे. समस्यांची मांडणी करण्यासाठी आवश्यक वाटली तेव्हाच, किंवा वस्तुस्थितीचे स्पष्टीकरण करण्यासाठी सिद्धांत लागू करण्याच्या मर्यादा घालण्यासाठीच केवळ मी खास माहिती वापरली आहे, आणि आकडे संपूर्णपणे वगळले आहेत.

राजकीय लोकशाही व समान संधी यांची स्पृहा, या मूल्यांकित गृहीततत्त्वांनी माझा दृष्टिकोन निश्चित केलेला आहे. अशा प्रकारे स्पष्ट गृहीततत्त्वांच्या आधारावर विचार करण्याच्या पद्धतीला मी किती मोठे महत्त्व देतो हे स्पष्ट होण्यासाठी आणि या व्याख्यानात प्रत्यक्षपणे वापरलेल्या तशा तत्त्वांच्या अधिक काटेकोर व्याख्येसाठी, "आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था" (ॲन इंटरनॅशनल एकॉनॉमि–रूटलेज, लंडन १९५६), या माझ्या ग्रंथाकडे, आणि विशेषत: त्याची प्रस्तावना, दुसरे प्रकरण व पुरवणी यांकडे, तसेच त्या पुरवणीतील क्रमांक १ च्या तळटीपेत निर्देश केलेल्या माझ्या त्यापूर्वीच्या प्रकाशनाकडे मी वाचकांचे लक्ष वेधू इच्छितो.

विषयविवेचन सर्वसाधारण पद्धतीने केले असले तरी सिद्धांत अधिक वास्तव स्वरुपाचे होण्यास त्याची मदत व्हावी असा माझा हेतू आहे. वर उल्लेख केलेल्या ज्या मोठ्या ग्रंथाला ही व्याख्याने पूरक आहेत, त्यात मी आर्थिक विकासाच्या व अर्धविकासाच्या समस्यांची अधिक सविस्तर व भरीव चर्चा केली आहे. परंतु, समता व विषमता यांच्या कार्यतंत्रासंबंधीच्या सध्याच्या प्रश्नाचा त्या पुस्तकात मी फक्त ओझरता उल्लेख केला आहे.

विषयाचे हे विवरण फक्त सोविएतेतर जगालाच लागू आहे. सोविएत-कक्षेतील जगात भिन्न अर्थव्यवस्था अस्तित्वात आहे: त्यातील प्रत्येक देशात मध्यवर्ती सरकारी नियोजन तर आहेच, पण उत्पादन साधनांची सार्वजनिक मालकीही आहे; तेथे आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंध सरकारी मक्तेदारीकरवी निश्चित होतात.

दोन अर्थव्यवस्थांमधील ही विभिन्नता आर्थिक प्रश्नांच्या विश्लेषणासाठी समर्पक असली तरी मला तिच्याबद्दल अतिशयोक्ती करावयाची नाही. विकासाच्या प्रवृत्तींचे स्पष्टीकरण करण्यासाठी, त्याचप्रमाणे धोरण ठरविण्यासाठी चक्राकार व संचयी कार्यकारणभावाचे तत्त्व सोविएत जगालाही लागू करता येईल, अशी मला खात्री वाटते. आणि सोविएत अर्थव्यवस्थेच्या क्षेत्रात माझा अभ्यास पुढे चालू ठेवण्यात मला व्यक्तीश: फार गोडी वाटेल.

शिवाय, माझे असे मत आहे की, जागतिक अर्थव्यवस्थेची "दोन समांतर जागतिक बाजारपेठांत" झालेली कठोर विभागणी अबाधित रहाणार आहे, असे गृहीत धरण्यास कोणतेच समर्पक कारण नाही. ही विभागणी स्तालिनने घोषित केली आणि तिच्या निर्मितीला मुख्यत: तोच जबाबदार होता. सोविएत कक्षेतील राष्ट्रांत सरकारी धोरणात विविधता अभावाने तळपत राहील असे, इतर गोष्टींबरोबरच, या विभागणीत

अभिप्रेत होते. परंतु, गेल्या अर्धशतकातील जागतिक घडामोडींनी आपल्याला जाणीव करून दिली आहे की, कोणतीच गोष्ट कायम टिकणारी नाही—विशेषत: निरनिराळ्या देशांतील राजकीय घडामोडी आणि विचारप्रणालीनुसार भिन्न गोटांत केला जाणारा देशांचा समावेश मुळीच कायम टिकणारा नाही; अनपेक्षित घटना घडत रहातील आणि त्यापासून आपण सतत चकित होत राहू, ही एकच गोष्ट निश्चित आहे.

परंतु, व्यावहारिक दृष्टीने, आणि संक्षिप्त रुपरेखेसारख्या असलेल्या ह्या छोटया पुस्तकातील विचारांची मांडणी साधी व स्पष्ट रहावी म्हणून, सोविएतेतर जगापुरताच माझा दृष्टिक्षेप मर्यादित ठेवण्याचे मी ठरविले आहे.

जिनिवा, १४ ऑगस्ट १९५६. **गन्नर मिर्दाल**

भारतीय (किंवा आशियाई) आवृत्तीची प्रस्तावना

ज्या व्याख्यानांच्या आधारावर हे पुस्तक तयार करण्यात आले आहे, ती व्याख्याने १९५५ मध्ये कैरो येथे विद्यार्थ्यांसमोर देण्यात आली होती; आणि ज्यांची मिळकत अनेक परदेशी पुस्तके विकत घेण्याची उधळपट्टी सहसा करू देत नाही असे अर्धविकसित देशांतील तरुण पिढीचे वाचक व्याख्यानांचे पुनर्लेखन करतानाही नजरेसमोर होते. म्हणूनच माझ्या या लहानशा पुस्तकाची ही जी स्वस्त आवृत्ती निघत आहे तिचे लेखक या नात्याने, मी अत्यंत समाधानपूर्वक स्वागत करतो.

नवी दिल्ली, एप्रिल १९५८. **ग. मि.**

अनुक्रमणिका

प्रस्तावना :

भाग १ ला

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विषमतेचे कार्यतंत्र

भाग २ रा

आर्थिक विषमता, सार्वजनिक सदसद्विवेकबुद्धी आणि आर्थिक सिद्धांत

भाग १ ला

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय आर्थिक विषमतेचे कार्यतंत्र

प्रकरण १ ले

सामाजिक वस्तुस्थितीचें एक सर्वसामान्य अस्पष्ट वैशिष्ट्य

आंतरराष्ट्रीय आर्थिक विषमता

आजच्या जगातील आंतरराष्ट्रीय आर्थिक विषमतांबद्दल शक्य तितक्या व्यापक दृष्टिकोनातून विचार केला, तर एक निश्चित स्वरूपाचा व सरळ बंध नजरेस येतो.[१]

काही थोडे देश आर्थिक दृष्टीने अतिशय विकसित आहेत आणि त्यांचे दर माणशी सरासरी वास्तविक उत्पन्न उच्च पातळीवर आहे. समशीतोष्ण कटिबंधात असलेल्या व मुख्यतः युरोपियन लोकांनी वसविलेल्या भूतपूर्व ब्रिटिश वसाहती सर्वांत अधिक श्रीमंत आहेत; अमेरिका व कॅनडा, ऑस्ट्रेलिया व न्यूझिलंड हे ते देश होत. वायव्य युरोपातील व पश्चिम-मध्य युरोपातील देशांचाही याच गटात समावेश होतो. सोविएत-पद्धतीचे देश सोडून, राहिलेल्या जगातील लोकसंख्येपैकी १/६ लोक ह्या थोड्या देशांत रहातात.

ही राष्ट्रे जागतिक समाजामधील आर्थिकदृष्ट्या वरिष्ठ गटातील होत. कनिष्ठ राष्ट्रांचा गट त्यामानाने फार मोठा आहे. सोविएत राष्ट्रे सोडून बाकीच्या जगातील लोकसंख्येपैकी २/३ पेक्षा अधिक लोक ह्या देशांत रहातात; त्यांचे दरमाणशी, वास्तविक उत्पन्न विकसित देशांतील लोकांच्या उत्पन्नाच्या केवळ अंशमात्र आहे, आणि एका शतकापूर्वी किंवा त्याच्या आधी, आजच्या विकसित राष्ट्रांनी जलद विकासाला आरंभ केला, तेव्हा तेथे जे दर माणसी उत्पन्न होते, त्यापेक्षा ह्या अर्ध-विकसित देशांपैकी बहुतेक देशांचे उत्पन्न आजदेखील पुष्कळच कमी आहे.[२]

अति-गरीब राष्ट्रांच्या ह्या बहुसंख्यांकांच्या गटात आफ्रिका खंडातील सर्व देशांचा समावेश होतो ; वंशभेदाच्या कायद्यांच्या संरक्षणाखाली रहाणारे दक्षिण आफ्रिकेतील गोरे वसाहतकार, आणि पश्चिम युरोपियन राष्ट्रांच्या मालकी-प्रदेशात विभागल्या गेलेल्या त्या खंडातील गोऱ्या वस्त्याच याला अपवाद आहेत. सोविएत आशिया वगळल्यास, मध्यपूर्व व नजिकपूर्वेकडील सर्व देशांसह, संपूर्ण आशिया खंड याच अति-गरीब देशांच्या गटात समाविष्ट आहेत. याशिवाय, लॅटिन अमेरिकेतील

अर्जेंतैन किंवा उरुग्वेसारखे "मध्यम" स्थितीला पोहोचलेले फारच थोडे देश सोडल्यास, लॅटिन अमेरिकेचा मोठा विभागही याच गटात येतो.

भरपूर विकास झालेल्या देशांतील सर्व निर्देशांक सातत्याने ऊर्ध्वगामी असतात. सरासरीचा व दीर्घ मुदतीचा विचार केला तर त्या देशांतील आर्थिक विकासाच्या वेगात मंदावण्याचे चिन्ह दिसत नाही. मागील इतिहास पाहिला तर, व्यापारमंदी व मंदीची प्रचंड लाट, किंबहुना युद्धजन्य प्रचंड नुकसानसुद्धा, निश्चितपणे चढत्या असलेल्या दीर्घकालीन प्रवृत्तीमधील अल्पकालीन चढउतारासारखी वाटतात. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात, ह्या देशांतील सर्व कामगार व इतर उत्पादक घटक सतत, पूर्ण क्षमतेने कामात गुंतलेले राहिले आहेत. आर्थिक विकास सातत्याने व जलद गतीने होत राहिला पाहिजे अशी सार्वत्रिक अपेक्षा या देशांतून दिसते—ती त्यांच्या सर्वमान्य गृहीततत्त्वाचा भाग आहे ; आणि तिच्या आधारावरच, लोकशाही व राष्ट्रीय एकात्मता अधिक मोठ्या प्रमाणात साकार करण्यासाठी, तेथील राष्ट्रीय जीवन उत्क्रांत होत आहे.

एकंदरीत, औद्योगीकरण झालेले देशच अधिक औद्योगीकरण करीत आहेत. या देशांतील उत्पन्न फार मोठे आहे आणि सोविएतेतर जगाच्या एकूण बचतीपैकी फार मोठा हिस्सा, जगाच्या ह्या लहानशा भागात तयार होतो. नव्या शोधांमुळे भांडवलाला सतत वाढती मागणी असते आणि बहुतेक उपलब्ध भांडवल तेथेच गुंतविले जाते. गरीब देशांतील तेल व खनिजे काढण्यासाठी तेथे खर्च करण्यात येणारे भांडवल या देशांची स्वगृहातील गुंतवणूक या सदरात घातल्यास, वरील विधान पूर्णांशाने बरोबर असल्याचे दिसेल.

याच्या उलट, जेथील उत्पन्न फारच कमी आहे अशा अर्ध-विकसित देशांत भांडवल-निर्मिती व गुंतवणूक फारच कमी असतात ; त्यांच्या कमी उत्पन्नाच्या मानानेही कमी असतात. त्याऐवजी, विकासाच्या प्रमाणात समता येण्यासाठी तौलनिक दृष्टीने त्या अधिक असावयास पाहिजेत, कारण गरीब देशांतील लोकसंख्येची नैसर्गिक वाढ अधिक जलद गतीने होत असते. जेथे जन्म व मृत्यू दोन्ही मोठ्या संख्येने होतात तेथे जन्म-मृत्यूच्या प्रमाणातील विशिष्ट संबंधातून लोकसंख्येची अधिक झपाट्याने वाढ होते ; आणि त्यामुळे त्यांच्या लोकसंख्येचे वयोमानाप्रमाणे होणारे गट तुलनेने कमी उपयुक्त ठरतात. ह्या सगळ्यांचा परिणाम म्हणून—आणि या अविकसित देशांच्या संस्कृतीत दृढमूल झालेल्या गतिहीनतेच्या परंपरेमुळे—त्यांचा आर्थिक विकास बहुधा अधिकच संथ होतो. या देशांपैकी अनेक देश सरासरी उत्पन्नाच्या दृष्टीने गेल्या काही दशकांत मागे गेले आहेत.

ह्या अति-गरीब देशांतील दरमाणशी उत्पन्नाची पातळी भिन्नभिन्न आहे. दक्षिण व पूर्व आशियातील शेजारी राष्ट्रांतही हा फरक फार मोठा आहे, आणि अर्ध-विकसित देशांचा समावेश असलेल्या प्रदेशातही अशीच परिस्थिती आहे.

आणि जेथे आर्थिक विकास झपाट्याने होत आहे असे देश किंवा अनेक देशांचे

मिळून बनलेले भूप्रदेश जगाच्या सर्व अर्धविकसित भागांत आहेत. आफ्रिकेतही असे काही प्रदेश आहेत की जेथे मोठ्या प्रमाणावर भांडवलाची गुंतवणूक व वाढते उत्पादन होत आहे. आणि नैसर्गिक साधनसामुग्रीचा आर्थिक उपयोग करण्याच्या देशाबाहेरील प्रयत्नांशी त्यांचा संबंध असल्याचे नेहमी आढळते.

वास्तविक पॅलेस्तिनमधील निर्वासितांना छावण्यामध्ये दाटीवाटीने कोंबण्यात आलेले आहे;—आणि पॅलेस्तिनमध्ये परत जाण्याच्या हक्कावर गदा येऊ नये म्हणून ही परिस्थिती सुधारण्यास ते स्वतः विरोध करतात;—संयुक्त राष्ट्रसंघाकडून मिळणाऱ्या दरमाणशी, वार्षिक ४० डॉलर्सच्या अनुदानावरच मुख्यतः त्यांचा उदर-निर्वाह चालतो. असे असूनही, मध्यपूर्वेतील दारिद्र्य इतके तीव्र आहे की, पॅलेस्तिनच्या या निर्वासितांचे जीवनमान त्यांच्या सभोवतालच्या देशांतील गरीब अरब जनतेपेक्षा, निर्वासित होण्यापूर्वी पॅलेस्तिनमध्ये त्यांचे स्वतःचे जे रहाणीमान होते त्यापेक्षा, कितीतरी अधिक उच्च आहे, असे समजले जाते.

परंतु ह्याच प्रदेशाच्या पूर्वेकडील भागातील तेल-उत्पादक देश—म्हणजे त्यांचे राज्यकर्ते—मालकीहक्कांबद्दलचे व इतर तेल-करांचे मिळून सध्या वर्षाला जवळजवळ १०० कोटी डॉलर्स मिळवितात असे म्हणतात आणि येत्या दहा वर्षांत ही रक्कम वार्षिक ३०० कोटी डॉलर्सपर्यंत जाईल अशी अपेक्षा आहे. भूमध्य समुद्रावरील छोटे इस्रेल राष्ट्र नैसर्गिक संपत्तीने फारसे समृद्ध नाही, आणि सभोवतालच्या वैरभावी अरब राष्ट्रांकडून त्याला सतत भीती आहे. पण ते जगातील ज्यू-जमातीच्या आर्थिक मदतीमुळे तणावाच्या परिस्थितीत झपाट्याने प्रगती करीत आहे. तसेच लेबॉनॉन-मध्ये बैरुत हे प्राचीन व श्रीमंत व्यापारी केंद्र आहे.

लॅटिन अमेरिकेत, वर उल्लेखिलेल्या मध्यम स्थितीला पोहोचलेल्या देशां-व्यतिरिक्त इतरही अनेक देशांनी, गेल्या काही दशकांत, पुष्कळच आर्थिक विकास साधला आहे; मात्र तो पुष्कळदा अस्थिर व अ-समान असतो. तसेच तो बंदरांपुरता व शहरांपुरता मर्यादित असतो आणि तेथील ग्रामीण जनता मात्र गतिहीन व दरिद्रीच राहिली आहे.

अति-विकसित व अर्धविकसित ह्या दोन्ही गटांत, वास्तविक आर्थिक पातळी, सध्याचा विकासाचा वेग व नजिकच्या भूतकाळातील निरनिराळ्या कालखंडातील विकासाचा वेग या दृष्टीने देशादेशांत फरक असला तरी त्यामुळे खालील सर्वसामान्य विधाने चुकीची ठरत नाहीत :

(१) अतिशय समृद्ध देशांचा एक लहानसा गट आहे, आणि अत्यंत दरिद्री देशांचा दुसरा एक फार मोठा गट आहे.

(२) पहिल्या गटातील देश, एकंदरीत, सतत विकास पावणाऱ्या आर्थिक विकासाच्या बंधात स्थिरावलेले आहेत; दुसऱ्या गटात मात्र सरासरी प्रगती मंद आहे; कारण त्यांच्यापैकी अनेक देश गतिहीन अवस्थेतून

बाहेर पडण्यास असमर्थ आहेत, आणि काही देश तर, सरासरी उत्पन्नाची पातळी पहाता, अधिकच मागे जाण्याच्या संकटात सापडलेले आहेत.

(३) आणि म्हणून, एकंदरीने पहाता, गेल्या काही दशकांत, विकसित व अर्ध-विकसित देशांमधील आर्थिक विषमता वाढत आहेत.

आंतरराष्ट्रीय आर्थिक विषमतेच्या वाढीची ही प्रवृत्ती प्रत्येक श्रीमंत देशात घडत असलेल्या घडामोडींच्या अगदी विरुद्ध आहे. तेथे अलिकडील पिढ्यांत अधिक समान संधीची प्रवृत्ती वाढली आहे, आणि हा विकास गतिमान असून त्याचा वेग अद्यापही वाढत आहे. याच्या विरुद्ध एकूण जगात ज्या घडामोडी घडत आहेत, त्यांचा संबंध, श्रीमंत देशांप्रमाणे एकेकट्या गरीब देशांत समानतेकडे जाण्याची प्रक्रिया अद्याप खऱ्या अर्थाने सुरू झालेली नाही या वस्तुस्थितीशी लावला पाहिजे. व्यक्ती, वर्ग व प्रदेश यांच्यातील महान अंतर्गत विषमता, बहुतेक गरीब देशांतून पूर्वीइतक्याच आजदेखील कायम आहेत; त्यांच्यापैकी अनेकांत त्या अजूनही वाढत आहेत.

अति-विकसित देशांमध्ये नेत्रदीपक प्रगती झाली आहे आणि तेथे रहाणाऱ्या आपणा सर्वांना तशी तीव्र जाणीव आहे. गरीब, अर्धविकसित देशांचा सरासरीने अति-मंद विकास होत आहे. परंतु जगाचा मोठा हिस्सा त्यांनीच व्यापलेला आहे; शिवाय त्यांच्या लोकसंख्येची वाढ श्रीमंत देशांपेक्षा सरासरीने अधिक झपाट्याने झाली आहे. ह्या दोन्ही गोष्टी लक्षात घेता, अलिकडील दशकांत संपूर्ण मानवजातीची थोडीतरी आर्थिक प्रगती झाली आहे असे समजणे बरोबर आहे का व कोणत्या अर्थाने, या प्रश्नाचे उत्तर फार अनिश्चित रहाते.

वाढती जागृती

आपल्या समस्येसंबंधीचे इतर मूलभूत प्रश्न राजकीय आहेत; ते असे :

(१) या प्रचंड आंतरराष्ट्रीय विषमतांबद्दल आणि त्या वाढत जाण्याच्या धोक्याबद्दल अर्ध-विकसित प्रदेशातील राष्ट्रे वाढत्या प्रमाणावर जागृत होत आहेत.

(२) ही राष्ट्रे व त्यांचे प्रवक्ते त्यांच्या दारिद्र्याबद्दल उर्वरित जगाला व विशेषत: अधिक समृद्ध देशांना दोष देण्याकडे झुकलेले दिसतात— किंवा, इतर राष्ट्रे श्रीमान असताना व अधिक श्रीमंत होत असताना ज्या जागतिक आर्थिक पद्धतीमुळे ते इतके गरीब राहिले आहेत त्या पद्धतीला ते या विषमतांबद्दल दोषी धरतात.

दुसऱ्या महायुद्धाने जगातील प्रस्थापित सत्ता-व्यवस्थेला टिकवून धरणारी दडपणे व नियंत्रणे दूर करण्यास मदत केली आणि त्याचा एक परिणाम परतंत्र राष्ट्रांची वसाहती राजवटीतून मोठ्या प्रमाणावर मुक्तता होण्यात झाला. परंतु, ह्या प्रक्रियेतून

जन्माला आलेल्या राष्ट्रवादाचे एक प्रमुख वैशिष्टच हे आहे की, ही राष्ट्रे इतर राष्ट्रांच्या बरोबरीने समान संधीची व स्वातंत्र्याची मागणी करीत आहेत. महान जागृती मंत्राच्या स्पर्शामुळे ही अत्यंत गरीब राष्ट्रे आता आर्थिक विकासासाठी, त्याचप्रमाणे राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी आतूर झाली आहेत.

ह्या अत्यंत गरीब बहुसंख्यांक राष्ट्रांचा आपण हल्ली 'अर्ध-विकसित देश' या नावाने उल्लेख करतो ही गोष्ट मनोवेधक आहे. ह्या गतिमान शब्दप्रयोगाला सध्या प्राप्त झालेले महत्त्व दुसऱ्या महायुद्धानंतरच आले आहे आणि मी वर उल्लेख केलेल्या जागतिक राजकीय परिस्थितीतील बदलाचेच ते निदर्शक आहे. अगदी अलिकडील काळापर्यंत ह्या शब्दप्रयोगाऐवजी 'मागासलेले देश' हा गतिहीन शब्दप्रयोगच सर्वत्र वापरण्यात येत असे.

समाजशास्त्रातील सर्व मूलभूत विचारांप्रमाणे हे दोन्ही शब्दप्रयोग मूल्ययुक्त[3] आहेत, आणि याची आपल्याला जाणीव असणे हे आपल्या वैचारिक स्पष्टतेला सहाय्य-कारी ठरणारे आहे. "अर्ध-विकसित देश" ह्या शब्दप्रयोगात असा मौलिक निर्वाळा अंतर्भूत आहे की, या नावाने निर्देष्टित होणाऱ्या देशांचा आर्थिक विकास व्हावा असे सार्वजनिक धोरणाचे संमत ध्येय आहे. याच अर्थाने गरीब देशांतील लोक हा शब्द-समुच्चय वापरतात आणि श्रीमंत देशांतील लोकांनीही ह्याच अर्थाने वापरावा असा आग्रह धरतात. आणि तेदेखील जेव्हा "मागासलेले देश" हा जुना शब्दप्रयोग टाकून प्रचलित नवा वापरतात तेव्हा ते त्याचा अंतर्भूत अर्थदेखील मान्य करतात.

तेव्हा, स्थितिशील विचारांकडून गतिमान विचारांकडे झालेला हा बदल, गरीब देशांतील महान जागृतीची श्रीमंत देशांनी विधायक दृष्टीने नोंद घेतल्याचा सूचक आहे. गरीब देश अधिक उच्च उत्पन्नाची पातळी, जीवनातील चांगल्या गोष्टीत अधिक मोठा हिस्सा व अधिक प्रमाणावर समान-संधीचा लाभ मिळण्याचा हक्क मागतात, हे योग्यच आहे, अशी श्रीमंत देशांनी दिलेली ती कबुली आहे. अर्थातच ती फार सर्वसाधारण स्वरूपात व त्यामुळे अस्पष्टपणे दिलेली आहे.

ह्याच वैचारिक पुनर्रचनेचा भाग म्हणून, वर उल्लेखिलेली आंतरराष्ट्रीय आर्थिक विषमतांबद्दलची वस्तुस्थिती मोठ्या प्रमाणावर सर्वत्र ज्ञात होऊ लागली आहे; अर्ध-विकसित देशांत तर, मी ज्याला 'महान जागृती' म्हणतो त्या राजकीय प्रक्रियेची ती चैतन्यशक्तीच आहे—पण विकसित देशांतसुद्धा हे ज्ञान प्रसार पावत आहे.

आपल्या विकसित देशातील सर्वसामान्य लोकांना जेव्हा ह्या कठोर सत्याची प्रथमच जाणीव करून दिली जाते तेव्हा त्यांना एक नवा साक्षात्कारच घडतो; आणि आपल्याला असेही आढळून येते की हे ज्ञान त्यांना पुष्कळदा गैरसोईचे वाटते. जग कसे आहे व कसे असावे याबद्धलचे त्यांचे सर्वसाधारण विचार आणि मोठ्या जगातील ह्या भीषण दारिद्र्याची व आंतरराष्ट्रीय विषमतांची वाढत जाण्याची प्रवृत्ती यांची जाणीव, या दोन गोष्टींचा मेळ त्यांना सहजासहजी घालता येत नाही.

आर्थिक विषमतांबद्दल सार्वजनिक विवेकबुद्धीची ही जी प्रतिक्रिया आहे तिची अधिक चर्चा मी या पुस्तकाच्या दुसऱ्या भागात केली आहे.

परंपरागत सैद्धांतिक दृष्टिकोनाचा अपुरेपणा

आर्थिक विषमतांच्या प्रश्नावर पकड मिळविण्याच्या दृष्टीने आपल्या परंपरागत सैद्धांतिक दृष्टिकोनात जो उघडउघड अपुरेपणा आहे त्याची चर्चा मी पुस्तकाच्या दुसऱ्या भागात केली आहे—मी प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे हा दुसरा भाग म्हणजे ह्या पुस्तकाची खरी परिचय-पत्रिकाच आहे. त्यात मी मुख्यत: ही गोष्ट निदर्शनास आणली आहे की, आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांताचा अभ्यास कितीही व्यासंग-पूर्ण केला तरी, आंतरराष्ट्रीय आर्थिक विषमता का निर्माण झाल्या आणि त्या वाढण्याची प्रवृत्ती का आहे याच्या कार्यकारणसंबंधाचे स्पष्टीकरण त्यात मिळू शकत नाही. आंतर-राष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत, इतकेच नव्हे तर एकूण आर्थिक सिद्धांतही, आर्थिक विकास व अर्ध-विकास यांच्या वस्तुथितीची कार्यकारणमीमांसा करण्याच्या हेतूने कधीच मांडण्यात आलेले नाहीत.

आर्थिक सिद्धांत अशा रीतीने का तयार झाले याचे आकलन होण्यासाठी त्यांच्या पारंपारिक पूर्वानुकूल ग्रहांचा खोलवर परामर्ष घेतला पाहिजे. तो घेण्याचा प्रयत्न दुसऱ्या भागात केला आहे. केवळ वरवर तर्कशास्त्राच्या दृष्टीने पाहिले तर स्पष्टी-करण असे आहे की, सिद्धांतासाठी अवास्तविक गृहीततत्त्वांचा स्वीकार केल्यामुळे तसे झाले आहे.

स्थिर समतोल हे असेच एक अवास्तविक गृहीततत्त्व आहे. त्याचा सरळ गर्भि-तार्थ असा असतो की, प्रत्येक हालचालीमुळे प्रस्थापित व्यवस्थेत प्रतिक्रिया निर्माण होते, तिचा रोख नवा समतोल साधण्याकडे असतो, आणि क्रिया व प्रतिक्रिया स्थळ-काळाच्या एकाच बिंदूत मिळतात. म्हणून, स्थिर नसलेली प्रत्येक आर्थिक व्यवस्था समतोलाकडे जात असते; अर्थात तिचा मार्ग नेहमीच सरळ असतो, असे नाही. याच बरोबर असेही समजले जाते की, आर्थिक पद्धती सतत समतोलात रहात नाही, ही वस्तुस्थिती जमेस धरून ती ज्या नव्या समतोलाकडे जात असेल त्याच्या स्थितीत प्रत्येक प्राथमिक बदल फरक घडवून आणतो. स्थिर समतोलाच्या कल्पनेत अंतर्भूत असलेला आणि तिच्या अत्यंत सापेक्ष स्वरूपातही टिकवून धरण्यात आलेला आणखी एक विचार हा असतो की, एखाद्या बदलामुळे प्रतिक्रिया म्हणून जे दुसरे बदल घडून येतात ते दुय्यम बदल प्राथमिक बदलांच्या विरुद्ध दिशांना जाणारे असतात.

ह्या गृहीततत्त्वाचा सर्वांत मोठा गुण हा की, आर्थिक पद्धतीतील सर्व घटकांचे सर्वव्यापी परस्परावलंबन सोप्या मार्गाने समजण्याचे व दाखवून देण्याचे सहजसाध्य सैद्धांतिक साधन त्यायोगाने प्राप्त होते. शिवाय अनेक अर्थशास्त्रीय चर्चांमध्ये अ-परिहार्य व तर्कशुद्ध मुद्दा म्हणूनही त्याचा आधार घेतला जातो.

आपल्या परंपरेत स्थिर समतोलाच्या गृहीततत्त्वाला सर्वसाधारण व्यापक विचार-सरणीचेच रूप प्राप्त झाले आहे : आर्थिक सिद्धांत एकच व मध्यवर्ती आहे ह्या कल्पनेशी संलग्न झालेल्या दृष्टिकोनाचा तो गाभा बनला आहे. स्थिर समतोलाच्या कल्पनेवर टीका करणाऱ्या अर्थशास्त्रज्ञांपैकीसुद्धा फारच थोडयांना ह्या तत्त्वाच्या प्रभावापासून स्वतःच्या विचारांना अलिप्त ठेवता आले आहे. मी १० व्या प्रकरणात दाखविल्या-प्रमाणे, हा सिद्धांत अंतिम हेतुवादाच्या श्रद्धेने भारलेला आहे आणि बलिष्ठ पूर्वानुकूल ग्रहांशी तो जोडलेला आहे; आर्थिक सिद्धांताच्या प्रारंभापासूनच्या परंपरेत आणि प्रारंभापासून सतत आतापर्यंत त्या सिद्धांताचा तर्कनिष्ठ आधार असलेल्या तत्त्वज्ञानात हे ग्रह दृढमूल झालेले आहेत.

सामाजिक वस्तुस्थितीच्या काही भागांना "आर्थिक घटक" हे नाव देता येते आणि ह्या घटकांच्या अंतर्गत क्रियांपुरते सैद्धांतिक विश्लेषण सयुक्तिकपणे मर्यादित ठेवता येते, हे दुसरे अवास्तविक गृहीततत्त्व. त्याचा स्थिर समतोलाच्या गृहीततत्त्वाशी जवळचा संबंध आहे. कारण, "आर्थिक नसलेले घटक" या नावाने आर्थिक विश्लेषणांतून वगळण्यात आलेल्या सामाजिक वस्तुस्थितीच्या व्यापक क्षेत्रातच स्थिर समतोलाचे गृहीततत्त्व जमीनदोस्त होते. हे बिन-आर्थिक घटक कायम व स्थितिशील नसतात आणि जेव्हा त्यांची प्रतिक्रिया होते तेव्हा ते बहुधा समतोल बिघडवून टाकतात.

सामाजिक शास्त्रांची अलग अलग शाखांत जी परंपरागत, पांडित्यपूर्ण विभागणी करण्यात आली आहे तिला जुळणारे विभिन्न घटक अर्थातच वास्तव जगात नसतात. प्रश्नांचे वास्तववादी विश्लेषण अशा विभागणी-रेषांजवळ कधीच थांबू शकत नाही. सामाजिक घटकांची "आर्थिक" व "बिन आर्थिक" अशी विभागणी तर्कशास्त्राच्या दृष्टीने निरुपयोगी व वेडगळपणाची आहे. तिच्याऐवजी "संबद्ध" व "असंबद्ध" घटक, किंवा "अधिक संबद्ध" व "कमी संबद्ध" घटक अशी विभागणी केली पाहिजे; आणि ही विभाजन-रेषा निरनिराळ्या समस्यांसाठी एकच असेल अशी अपेक्षा असता कामा नये.

देशांतर्गत प्रादेशिक विषमतांपेक्षा आंतरराष्ट्रीय विषमता अर्थातच भिन्न स्वरू-पाच्या नसतात. त्या दोघींत निकटचा कार्यकारणभाव असतो, असेही आपल्याला दिसून येईल. म्हणून, तिसरे व चवथे, ही दोन्ही प्रकरणे मी देशांतर्गत प्रादेशिक विषमतां-संबंधी लिहिली आहेत.

संदर्भ टिपा

१. ह्या भागात वापरलेल्या, आंतरराष्ट्रीय आर्थिक विषमतांच्या व्यापक आढाव्याच्या पडताळयासाठी, वाचकांनी संयुक्त राष्ट्रसंघाची व तीन प्रादेशिक मंडळांची अगदी अलिकडील प्रकाशने पहावीत.

२. पहा—सायमन कुझ्नेत् यांचा "अर्ध-विकसित देश आणि विकसित देशांतील औद्योगिक-प्रगतीपूर्व अवस्था: एक तुलनात्मक अभ्यास." १९५४ मध्ये रोमला भरलेल्या जागतिक लोकसंख्या परिषदेत वाचला गेलेला प्रबंध. (अंडर-डेव्हलपड् कंट्रीज अँड द प्री-इंडस्ट्रिअल फेज इन द अॅडव्हान्सड कंट्रीज).

३. हा शब्द टीकात्मक अर्थाने वापरलेला नाही. "इंटरनॅशनल एकॉनॉमी" ("आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था")–पुरवणी पहा. (मेथॉडॉलॉजिकल नोट ऑन द कॉन्सेप्ट अँड द व्हॅलू प्रिमायसेस) 'मूल्यदर्शक प्रमेयासंबंधी पद्धतशीर टीपण'–वरील पुस्तक, पा. ३३६ व पुढे, आणि ३६५ पानावर पुरवणीला दिलेली तळटीप १ पहा.

प्रकरण २ रे

चक्राकार व संचयी कार्यकारणभावाचे तत्त्व

दुष्ट चक्राची संदिग्ध कल्पना

अर्ध-विकास व विकास या विषयांशी संबंधित असलेल्या प्रश्नांचे बहुतेक सर्व अभ्यासक, कोणत्या ना कोणत्या संदर्भात, 'दुष्ट चक्रा'चा उल्लेख करताना आढळतात. उदाहरणार्थ, प्राध्यापक सी. इ. ए. विन्स्लो 'आरोग्याचे अर्थशास्त्र' या विषयावरील पुस्तकात म्हणतात[१] :

> "असे स्पष्ट दिसून आले की ....दारिद्र्य व रोग यांचे दुष्ट चक्र तयार झाले होते. स्त्रिया व पुरुष गरीब असल्यामुळे आजारी होते, व आजारी असल्यामुळे ते अधिक गरीब झाले; आणि ते अधिक आजारी झाले कारण ते अधिक गरीब झाले होते."

अशा रीतीने, विन्स्लो यांनी चक्राकार व संचयी प्रक्रियेचा उल्लेख केला आहे. ह्या प्रक्रियेमुळे प्रश्नांची पातळी सतत खालावत असते आणि तिच्यातील एक अभावात्मक घटक दुसऱ्या अभावात्मक घटकाचा कारण व परिणाम दोन्ही एकाच वेळी असतो.

याच अर्थाने प्राध्यापक रॅग्नर नर्कसे यांनी १९५२ साली कैरोमधील महोत्सवी व्याख्यानातून 'दारिद्र्याच्या दुष्ट चक्रा'चा उल्लेख केला आणि पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण केले[२]:

"ह्या कल्पनेत, अर्थातच, एकमेकीवर अशा प्रकारच्या क्रिया-प्रक्रिया करणाऱ्या शक्तींच्या चक्राकार फेरीचा अंतर्भाव आहे की त्या गरीब देशाला दारिद्र्याच्या अवस्थेत ठेवतात. अशा प्रकारच्या चक्राकार फेऱ्यांची विशिष्ट उदाहरणे कल्पिणे कठीण नाही. उदाहरणार्थ, गरीब माणसाला पुरेसे खावयाला मिळत नसेल; पुरेशा अन्नाभावी तो दुर्बळ होत असेल; शारीरिक दुर्बळतेमुळे त्याची काम करण्याची कुवत कमी होत असेल, म्हणजेच तो गरीब असेल. आणि मग गरिबीमुळे त्याला पुरेसे खावयाला मिळत नाही, इत्यादी, इत्यादी. अशी परिस्थिती एखाद्या संपूर्ण देशात असेल तर तिचा निष्कर्ष पुढील त्रोटक विधानाने करता येईल : "एखादा देश गरीब असतो, कारण तो गरीब

असतो".

कमी गरिबी, अधिक अन्न, सुधारलेली प्रकृती व काम करण्याची अधिक ताकद यांच्यातील चक्राकार संबंधातून, अधोगतीच्या क्रियेऐवजी, ऊर्ध्वगतीची संचयी प्रक्रिया निर्माण होईल, हे स्पष्टच आहे.

लोकांना 'बँड-गाडी'वर उडी मारून चढावेसे वाटण्यासंबंधीच्या प्रवृत्तीबद्दल अमेरिकेत, ऊर्ध्वगामी प्रक्रियेभोवती गुंफलेल्या विपुल दंतकथा आहेत. त्याचप्रमाणे, "यशाइतके यशस्वी दुसरे काहीच नसते" हा अमेरिकेत रूढ असलेला वाक्प्रचार त्यांच्या प्रयत्नशील आशावादी संस्कृतीचे अत्यंत वैशिष्टचपूर्ण प्रतीक आहे. अगदी सत्य असलेल्या ह्या उद्‌गाराच्या जोडीला, समतोल राखण्यासाठी, परंपरागत, अधोगतीच्या 'दुष्ट चक्रा'च्या विचारातील सत्याची आठवण म्हणून "अपयशासारखे अयशस्वी काहीच नसते" हे वाक्य घातले पाहिजे.

ह्या प्राचीन लोक-समंजसतेला, इतर अनेक बाबतींप्रमाणे, बायबलने परिपूर्ण अभिव्यक्ती खालील शब्दांत दिली आहे :

> "ज्याच्याजवळ आहे त्या प्रत्येकाला अधिक दिले जाईल आणि त्याच्याजवळ भरपूर होईल. परंतु ज्याच्याजवळ नाही त्याच्याजवळून जे थोडे असेल तेही काढून घेतले जाईल."[३]

संचयी प्रक्रिया दोन्ही दिशांनी चालू असते, हे सत्य वरील प्रशंसनीय विधानात सांगितलेले आहे. तसेच, संचयी प्रक्रिया नियंत्रित केल्या नाहीत तर विषमता वाढत जातात ह्या सत्याचे आकलनही त्यात दिसून येते, ह्या सत्याला आपल्या विश्लेषणात बरेच महत्त्व देण्यात येणार आहे.

स्थिर समतोल-चुकीचा दृष्टांत

संचयी प्रक्रियेच्या चक्राकार कार्यकारणभावाच्या ह्या संदिग्ध कल्पनेची अधिक निश्चित स्वरूपाची मांडणी करण्याचा प्रयत्न मी ह्या पुस्तकात करणार आहे. माझी अशी खात्री आहे की, ह्या कल्पनेत सामाजिक बदलांच्या अधिक वास्तववादी विश्लेषणाच्या दृष्टिकोनाचे बीज आहे—खरे म्हणजे, ज्याची आपण उत्सुकतेने प्रतिक्षा करीत आहोत त्या अर्धविकास व विकास यासंबंधीच्या सामान्य सिद्धांताचे दर्शन त्यात आहे.

समाजव्यवस्थांतील बदलांच्या स्पष्टीकरणार्थ मांडावयाच्या सिद्धांताची उभारणी करतांना स्थिर समतोलाच्या कल्पनेशी त्याचे सादृश्य दर्शविणे चुकीचे आहे, हा माझा प्रारंभीचा मुद्दा आहे आणि मी तो प्रथम नकारार्थी शब्दांत व्यक्त करीत आहे. स्थिर समतोलाचे गृहीततत्त्व सामाजिक प्रक्रियेला लागू करणे चुकीचे होय ; कारण विविध शक्तींचा समतोल, असे या ना त्या अर्थाने म्हणता येईल, अशा एखाद्या स्थानाच्या दिशेने सामाजिक प्रक्रिया निश्चिपणे जात असते ही समजूत चूक आहे ; ती वेडीवाकडी

वळणे घेत अशा स्थानाकडे जाणे निराळे ! ह्या समजुतीच्या मागे दुसरे एक अधिक मूलगामी गृहीततत्त्व आहे; ते हे की, एखाद्या यंत्रणेत बदल घडून आला म्हणजे प्रतिक्रियांच्या रूपाने इतर बदल घडून येऊ लागतात आणि ते सामान्यत: पहिल्या बदलांच्या विरुद्ध दिशेकडे जातात.

याच्या उलट, ह्या पुस्तकात मला असा विचार सविस्तरपणे मांडावयाचा आहे की, सामान्यपणे सामाजिक यंत्रणेत वा पद्धतीत अशी आपोआप स्थिरावण्याची प्रवृत्ती नसते. समाजपद्धती स्वत:हून शक्तींचा समतोल साधण्याकडे हालचाल करीत नाही, तर उलट, ती सतत समतोलाच्या परिस्थितीपासून दूर जात असते. सामान्य परिस्थितीत एखाद्या बदलामुळे विरुद्ध स्वरूपाचे बदल घडून येत नाहीत, तर सहाय्यकारी बदल घडून येतात ; आणि ते त्या पद्धतीला पहिल्या बदलांच्या दिशेनेच, पण पुष्कळच पुढे नेतात. अशा प्रकारच्या चक्राकार कार्यकारणभावामुळे सामाजिक प्रक्रिया संचयी स्वरूप घेतात आणि त्यांना जोराने वेग प्राप्त होतो.

सामाजिक प्रक्रिया थांबविता येणे अर्थातच शक्य आहे. एक शक्यता अशी असते की, ज्यांच्यात समाजयंत्रणा स्थगित करण्याची दिशा व सामर्थ्य आहे असे बाह्य बदल घडून आल्यामुळे ही गोष्ट घडते. परंतु, अशा रीतीने संतुल्य शक्ती जी स्थिती प्रस्थापित करतात ती त्या यंत्रणेमधील शक्तींच्या हालचालीचा स्वाभाविक परिणाम नसते. शिवाय त्यांनी निर्माण केलेली स्थिती अस्थिर असते. कोणताही नवा बाहेरील बदल यंत्रणेतील प्रतिक्रियांमुळे, (समतोलाच्या) स्थितीपासून दूर व नव्या बदलांच्या दिशेने संचयी प्रक्रिया पुन: सुरू करू शकतो.

किंवा पर्यायाने, हालचाल थांबविण्याच्या हेतूने नियोजित व लागू केलेल्या धोरणांच्या अधिक्षेपामुळे यंत्रणा स्थगित होऊ शकेल. अर्थातच, ही गोष्ट आणि यंत्रणेत अंतर्भूत, समतोल साधण्याची नैसर्गिक प्रवृत्ती असणे, ह्या पूर्णत: विरोधी आहेत.

सामाजिक बदलांच्या प्रक्रियेसंबंधीचे हे सर्वसाधारण निदान सामान्य परिस्थितीला लागू होते ; ज्यांच्यात विरोधी प्रवृत्ती कार्यक्षम असतात अशा अपवादांची चर्चा मी पुढील प्रकरणाच्या अखेरीस करणार आहे.

एक उदाहरण : अमेरिकेतील निग्रोंची समस्या

एकदा मी एका विशिष्ट गटाच्या, अमेरिकेतील निग्रो लोकांच्या, विकासाच्या प्रश्नाचा सविस्तर अभ्यास केला.[४] समतोलाच्या दृष्टिकोनाचा अपुरेपणा ह्या अभ्यासात मला समजून आला, आणि एकमेकात जोडलेल्या चक्राकार व संचयी बदलांची गुंतागुंत सामाजिक प्रश्नांत होते हे खरे सार मला समजले. क्रमाक्रमाने हा विचार हेच माझ्या अभ्यासाचे मुख्य प्रमेय बनले. त्या अध्ययनाचा थोडक्यात येथे उल्लेख करण्यातील माझा उद्देश, सामाजिक बदलांच्या संचयी प्रक्रियेत चक्राकार यंत्रणेच्या विचाराला अधिक स्पष्टता यावी हा आहे.

अमेरिकेतील निग्रो लोक भौगोलिकदृष्टचा एखाद्या विशिष्ट प्रांतात एकटेच रहात नाहीत. तरीसुद्धा इतर अमेरिकन लोकांपासून ते अलग पडलेले आहेत ; आणि समान चिंता व समान भवितव्य यांच्या पाशाने बद्ध असा त्यांचा एक भिन्न सामाजिक गट निर्माण झाला आहे. अमेरिकन पद्धतीच्या वर्ण-जातीय संस्थेने हा सापेक्ष अलगपणा अस्तित्वात आणला आहे.

ह्या वर्ण-रेषेच्या आत निग्रो लोक इतके विभक्त रहातात की जणू काही मुख्य भूमीशी अगदी मर्यादित संपर्क असलेल्या बेटावरच ते रहात असावेत. त्यांनी स्वतःची अशी एक खास वर्ग-रचना तयार केली आहे. खालच्या सामाजिक थरात निग्रो लोकांचे बव्हंशी केंद्रिकरण झाले आहे, आणि तौलनिक थरातील इतरांच्या मानाने सर्व आर्थिक व सामाजिक निर्देशांकांच्या खालच्या पातळीवर बहुसंख्य निग्रो असतात, यात त्यांच्या जातीच्या दुर्बलतेचे प्रतिबिंब दिसते. इतर कोणत्याही अर्धविकसित देशात अगर विभागात आढळणारे हितसंबंधांच्या व आशा आकांक्षांच्या बाबतीतील ऐक्य निग्रोंच्या ह्या सामाजिक गटातही आढळून येते.

यादवीनंतर व पुनर्रचनेनंतर १८७० च्या महान राष्ट्रीय तडजोडीपासून १९३७-१९४३च्या काळात मी जेव्हा पहाणी केली त्या काळापर्यंत अमेरिकेतील निग्रोंचा दर्जा सापेक्षतेने सुधारत गेला आहे, पण ही सुधारणा फारशा वेगाने झालेली नाही, आणि कधी कधी पिछेहाटही झालेली आढळते.

निग्रो प्रश्नासंबंधीची समाजशास्त्रज्ञांची प्रचलित मते बहुधा गतिहीन समतोलाच्या भाषेत व 'ज्याचे त्याने पाहून घ्यावे' ह्या वृत्तीने मांडली जात होती ; आणि अशा दृष्टिकोनात अंतर्भूत असलेला सामाजिक दैववाद त्यात पुरेपूर प्रत्ययास येत होता. गोऱ्या लोकांना व्यापक दृष्टिकोन देणे, न्यायमंदिरे व कायदे, 'चळवळी' व 'सुधारणा' या मोहिमांच्या द्वारे निग्रोंच्या दुःखांचे निवारण करणे अशा मार्गांनी सामाजिक प्रक्रियेत 'हस्तक्षेप' करण्याच्या उपक्रमाच्या क्षमतेविषयी अविश्वास हे ह्या दृष्टिकोनाचे वैशिष्टच होते ; आणि सद्भावनाशील व्यक्तींच्या भोळेपणाहून भिन्न असा, मुरब्बी शास्त्रीय वस्तुनिष्ठ दृष्टिकोनाचा त्यावर छाप असल्यासारखे वाटत होते.[५] व्यावहारिक निष्कर्ष असा काढला होता की, पिढचानपिढचा चालू होती त्याप्रमाणे निग्रोंच्या दर्जात वाढ होत राहील; ही प्रक्रिया संथ व अनिश्चित असून बुद्धिपुरस्सर धोरणात्मक उपायांच्या आटोक्याबाहेरची आहे; कारण "सरकारी मार्गांनी लोकांचे मार्ग बदलता येत नाहीत".[६]

माझ्या अभ्यासामधून मी असा निष्कर्ष काढला की, दीर्घ काळ अस्तित्वात असलेला राष्ट्रीय समझोता आता लवकरच संपुष्टात येणार आहे. "अमेरिकेच्या वंशांतर्गत इतिहासातील हा कालखंड, यानंतर दहा वर्षांनी, तात्पुरत्या मध्यंतराचा काळ म्हणून ओळखला जाईल. ही तडजोड म्हणजे शक्तींचा स्थिर समतोल नव्हता."[७] अधिक ठाम स्वरूपात माझा निष्कर्ष असा होता की, "रचनात्मक (म्हणजे धोरणाच्या जाहीर-

नाम्याच्या किंवा रीकन्स्ट्रक्शनच्या) काळापासूनच, अमेरिकन आदर्शांच्या दिशेने विकास होईल असे मूलभूत बदल अमेरिकेतील वंशसंबंधात घडून येतील, अशी अपेक्षा बाळगण्यास योग्य कारणे नव्हती."[८] अमेरिकन समाजाच्या विकासात ही मोठी नाटचपूर्ण फाटाफूट त्यानंतरच्या काळात खरोखरीच निर्माण झाली. भविष्याबद्दलचा ज्याचा अंदाज कधी कधी चुकला आहे अशा माझ्यासारख्या अभ्यासकाने ह्या अचूक ठरलेल्या बाबीचा उल्लेख करणे क्षम्य ठरावे.

चक्राकार कार्यकारणभाव

ह्या विशिष्ट अध्ययनात, जो सामाजिक सिद्धांत किंवा अनुमानाची जी पद्धत मी वापरली त्याची अत्यंत संक्षिप्त रूपरेखा आता देत आहे.

अगदी सोप्या रीतीने स्पष्टीकरणाची रचना पुढील दोन घटक मांडून देता येईल. निरनिराळ्या बाबतींत निग्रोंच्या विरुद्ध भेदभाव करणारा 'गोऱ्यांचा पूर्वग्रह' आणि निग्रो लोकांचे 'खालच्या पातळीवरील जीवनमान' हे दोन घटक परस्परांशी संबंधित असतात: गोऱ्यांच्या भेदभावामुळे निग्रोंचे खालच्या पातळीवरचे जीवनमान खालीच रहाते, आणि दुसऱ्या बाजूने, निग्रोंचे दारिद्रच, अज्ञान, अंधश्रद्धा, झोपडपट्टीतील रहाणी, शारीरिक दौर्बल्य, ओंगळपणा, दुर्गंधी, बेशिस्त वागणूक, अस्थिर कौटुंबिक संबंध व गुन्हेगारी यांमुळे गोऱ्यांची निग्रोंविषयीची अप्रीती वाढते व पोसली जाते.

अशा रीतीने, गोऱ्यांचा पूर्वग्रह व निग्रोंचे खालच्या पातळीवरील जीवनमान एकमेकांना 'कारणीभूत' होतात. जर एखाद्या वेळी परिस्थिती आहे तशीच राहिली तर दोन्ही घटक तुल्यबळ आहेत असा त्याचा अर्थ होतो : गोऱ्यांचा पूर्वग्रह व त्यातून निर्माण होणारा भेदभाव यांमुळे खालच्या पातळीवरचे रहाणीमान उंचावण्याच्या निग्रोंच्या प्रयत्नांत अडथळे येतात; उलट, असे प्रयत्न निग्रोंच्या विरुद्ध गोऱ्यांचा पूर्वग्रह तयार करणाऱ्या कारणांचा एक भाग बनतात आणि त्यातून त्यांची वागणूक भेदभावाची बनते.

परंतु वरील प्रकारची गतिशून्य 'व्यवस्था' पूर्णपणे अभावित असते ; व ती कधीही स्थिर समतोलाच्या अवस्थेत नसते. त्यातील एक घटक बदलला तरी तो दुसऱ्यातही बदल घडवून आणतो ; आणि त्यामुळे परस्पर क्रियांची संचयी प्रक्रिया सुरू होते ; तिच्यात एका घटकातील बदलाला दुसऱ्या घटकातील प्रतिक्रियेचा सतत पाठिंबा मिळतो आणि हे असे चक्राकार गतीने चालत रहाते. त्यामुळे संपूर्ण समाजयंत्रणा प्राथमिक बदलाच्या दिशेने जाऊ लागते व पुष्कळच पुढे जाते. जरी काही काळानंतर मुळच्या धक्क्याचा किंवा ओढीचा जोर कमी झाला तरी दोन्ही घटक कायमचे बदललेले रहातात, किंवा क्रिया-प्रतिक्रियात्मक बदलांची प्रक्रिया देखील चालू रहाते, दोन्ही बाजू समबल होण्याचे चिन्हदेखील दिसत नाही.

हे दोन्ही घटक संमिश्र स्वरूपाचे आहेत. एका बाजूला निग्रोंचे रहाणीमान हा

अनिश्चित विचार आहे ; नोकरी, वेतन, घरे, अन्न, कपडे, आरोग्य, शिक्षण, कौटुंबिक संबंधातील स्थैर्य, कायद्यांचे पालन, स्वच्छता, व्यवस्थितपणा, विश्वासूपणा, व्यापक समाजनिष्ठा इत्यादी इत्यादी त्याच्या निरनिराळ्या अंगांचे वर्णन करूनच त्याची व्याख्या देता येते. आणि ही अंगेदेखील चक्राकार कार्यकारणभावाने परस्पर संबंधित असतात. त्यांच्यातील एकाची जरी वाढ झाली तरी इतर सर्वांची वाढ होईल, आणि त्यामुळे प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्षपणे, गोऱ्यांचा पूर्वग्रह संचयीपणाने कमी होण्यात त्याची परिणती होईल ; त्याचे परत पुन्हा निग्रोंच्या रहाणीमानावर नवीन परिणाम घडतील.

गोऱ्यांचा पूर्वग्रह हा दुसरा घटकही तितकाच संमिश्र आहे ; मनः प्रवृत्ती नेहमीच तशा असतात ; खरेखोटे विश्वास व विविध प्रकारचे मूल्यमापन यांचे त्यांत मिश्रण असते. हा घटक तितकाच अस्थिरही आहे. कारण अनुभवावरून दिसून येते की, कोणत्या तरी कारणाने सामाजिक संपर्काच्या विशिष्ट क्षेत्रात भेदभाव वाढला किंवा कमी झाला तर त्यामागची मानसिक शक्ती, म्हणजे पूर्वग्रह अशा रीतीने बदलतो की त्यायोगे प्रत्यक्ष वागणुकीचे समर्थन व्हावे. ही प्रतिक्रियादेखील चक्राकार कार्यकारण-भावाच्या नमुन्याशी बरोबर जुळते.

मुद्दा एवढाच नाही की, "अनेक शक्ती एकाच दिशेने कार्यान्वित झालेल्या असतात." वास्तविक त्या तशा नसतातच. असे काही कालखंड असतात की जेव्हा परस्परविरोधी शक्ती एकमेकींचा समतोल राखतात आणि कोणत्यातरी बिंदूवर ओढाताण होईपर्यंत यंत्रणा स्थिर रहाते ; मात्र एखाद्या आकस्मित धक्क्यानंतर ती गतिशील झाली तर विविध शक्तींचे अंतर्गत बदल त्याच दिशेने होऊ लागतात. पण ती गोष्ट निराळी. तिचे कारण हे असते की, बदलणारे घटक एकमेकांत कार्यकारण-भावाने अशा रीतीने गुंतलेले असतात की एकात बदल झाला म्हणजे तो दुसऱ्या घटकाला पहिल्या बदलाला सहाय्यकारी होईल अशा रीतीने बदलावयाला लावतो ; आणि त्या बदलाचे पुन्हा तिसऱ्यांदा परिणाम पहिल्या बदललेल्या घटकावर होतात, व चक्र असेच पुढे चालू रहाते.

ज्याप्रमाणे किंमतीमधील आंतर-संबंध 'किंमतीची पातळी' या कल्पनेला अर्थ प्राप्त करून देतात, मुख्यतः त्याचप्रमाणे, अमेरिकेतील निग्रो लोकांच्या गटाच्या विकासातील सर्व घटकांमधील चक्राकार कार्यकारणभावाचे आंतर-संबंध, "त्या गटाचा दर्जा" या सामान्य कल्पनेला अर्थ प्राप्त करून देतात—आणि या स्थानाचा निर्देशांक तयार करता येतो व तो त्या समाजपद्धतीच्या विशिष्ट स्थलकालातील सामान्य प्रवृत्तींचे मोजमाप करू शकतो. परंतु, बाह्य ओढाताण व समाजपद्धतीच्या अंतर्गत प्रक्रियेचा संवेग यांच्या प्रभावाखाली तिची जी हालचाल चालू असते तिच्यातील कार्यकारणभावांच्या आंतर-संबंधांचे विश्लेषण करणे हे मुख्य शास्त्रीय कार्य होय.

वास्तव अभ्यासात मात्र समाजपद्धती कोणत्याही अमूर्त नमुन्यापेक्षा अधिक

गुंतागुंतीची ठरते ; उदाहरणार्थ, निग्रो प्रश्नाच्या बाबतीत, त्यातील जे दोन प्रमुख घटक--निग्रोंचे खालच्या पातळीवरील रहाणीमान व गोऱ्यांचा पूर्वग्रह--यांच्या प्रत्येक अंगाचा प्रदेश,सामाजिक वर्ग,वय,लिंग,इत्यादी सर्व संबंधित बदलत्या घटकांच्या संदर्भात सखोल अभ्यास करण्याची गरज आहे. प्रत्येक घटकाचे पृथक्करण करून त्यांची भिन्नभिन्न अंगे वेगळी काढून परत त्यांची वरीलप्रमाणे पुनर्रचना करणे एवढेच कार्य शास्त्रीय आदर्श नमुन्यासाठी पुरेसे होत नाही, तर, प्रत्येक अंगाचे दुसऱ्या प्रत्येक अंगावर प्रभाव पाडण्याचे, आणि इतर अंगांच्या अंतर्गत बदलांमुळे किंवा बाह्य शक्तींतील बदलांमुळे स्वत: प्रभावित होण्याचे एकंदर समाजपद्धतीत जे सामर्थ्य असते त्याला संख्यात्मक मापन देणे हे शास्त्रीय कार्य होय.

अभ्यासाधीन विषयात बाह्य शक्ती म्हणजे मुख्यत: सभोवतालची संपूर्ण राष्ट्रीय जमात आहे. त्यापैकी काही बाह्य घटक, उदाहरणार्थ धंद्याची स्थिती व कामाची संधी, यांच्यात अल्पकालीन प्रचंड बदल घडत असतात. बाकीचे काही घटक अधिक स्थिर असतात ; उदाहरणार्थ, माझ्या प्रबंधात मी ज्यास "अमेरिकन श्रद्धास्थाने" म्हटले आहे तो अमेरिकन आदर्शांचा संयुक्त वारसा आणि त्या आदर्शांनी प्रभावित व क्रियाशील होणारी संस्थासंघटनांची व राजकारणाची चौकट. ह्या बाह्य शक्ती समाजपद्धतीची सतत ओढाताण करीत असतात, आणि त्याचबरोबर तिच्यातील शक्तींची रचनाही बदलतात.

वेळेचा घटक प्रामुख्याने महत्त्वाचा असतो, कारण समाजपद्धतीच्या विभिन्न अस्थिर घटकांवर होणारे आघाताचे परिणाम कमीअधिक कालमानावर पसरतात, उदाहरणार्थ, रोजगारात वाढ झाली म्हणजे रहाणीमानाच्या काही पातळी ताबडतोब उंचावतात परंतु आरोग्य किंवा शिक्षण यांच्या पातळीत बदल घडून येण्यास अधिक वेळ लागतो, आणि इतर घटकांवर होणारे त्याचे परिणाम उशीरा होतात आणि त्यामुळे संचयीकरणाच्या एकूण प्रक्रियेत धिमेपणा येतो.

शास्त्रीय प्रश्न

निग्रोंच्या प्रश्नासारख्या प्रश्नाची आदर्श शास्त्रीय उकल परस्परावलंबी संख्यात्मक समीकरणांच्या रूपाने मांडली पाहिजे; कार्यप्रवण असलेल्या विभिन्न प्रभावांखाली समाजपद्धतीत आलेली गती व होणारे अंतर्गत बदल यांचे वर्णन त्यात असले पाहिजे. असे संपूर्ण, संख्यात्मक व खरे शास्त्रीय प्रतिपादन दृष्टिटप्प्याच्या फार पलीकडे आहे, हे मुद्दाम सांगण्याची आवश्यकता नाही; परंतु तत्त्वत: ते तसे मांडणे शक्य आहे ; आणि मी असे नम्रतापूर्वक सांगतो की, अशा संपूर्ण व संख्यात्मक उकलीसाठी कार्य करणे हे आपल्या संशोधनाचे ध्येय असावे, मग तसे करताना त्यांना आदर्शाप्रत पोहोचता आले नाही तरी हरकत नाही.

चक्राकार कार्यकारणभावाच्या प्रमेयाची वास्तवता मान्य केल्यास काही सामान्य

निष्कर्ष काढणे शक्य आहे, आणि ते ह्याच ठिकाणी मांडणे इष्ट ठरेल. पहिला निष्कर्ष असा की, एकच एक प्रमुख घटक, 'आर्थिक घटका'सारखा, 'मूलभूत घटक' शोधीत रहाणे, निरुपयोगी आहे.[१] ह्या प्रमेयाप्रमाणे, निग्रो प्रश्न किंवा दुसरा कोणताही सामाजिक प्रश्न अभ्यासित असताना इतर घटकांपेक्षा निराळा असा 'आर्थिक घटक' म्हणजे नेमके काय हे समजणे खरोखरीच कठीण जाते, आणि तो 'मूलभूत' कसा हे आकलन करणे तर अधिकच कठीण जाते, कारण परस्परात गुंतलेल्या चक्राकार पद्धतीने प्रत्येक गोष्ट दुसऱ्या सर्वांचे कारण असते.

अशाच कारणांसाठी, एखाद्या देशाचे अगर देशविभागाचे अर्धविकास व विकासासंबंधीचे वास्तववादी अध्ययन चक्राकार संचयी प्रक्रियेच्या अनुमानाचा वापर केल्यास परंपरागत आर्थिक सिद्धांताच्या सीमांच्या फार पलीकडे जाते. याचे कारण असे की, "उत्पादक-घटकांची गुणवत्ता" व "उत्पादनाची कुशलता" इत्यादी वैचारिक प्रमेयांची एकत्र मोट बांधून परंपरागत अर्थशास्त्रज्ञांनी ज्यांना "बिन-आर्थिक घटक" हे नाव दिले आणि त्यांना आर्थिक विश्लेषणांतून वगळले, त्या तथाकथित "बिन-आर्थिक घटकां"शी तो अभ्यास निगडीत होतो.

संचयी कार्यकारणभावाचे प्रमेय बरोबर असेल तर, समाजपद्धतीमधील अनेकांपैकी कोणत्याही एका स्थानावर उपाययोजना केल्यास संपूर्ण पद्धतीत ऊर्ध्वगामी हालचाल सुरू करता येईल, ही गोष्ट आपण लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे. पण याचा अर्थ निश्चितपणेच असा नाही की, विकासाचा प्रश्न कसा व कोठे हाताळला जातो ही बाब राजकीय अगर व्यावहारिकदृष्ट्या दुर्लक्ष करण्यासारखी आहे. भिन्न-भिन्न घटकांचे आंतर-संबंध आपल्याला जितके अधिक समजून येतील, प्रत्येक घटकातील प्राथमिक बदलांचे इतर सर्वांवर काय व कधी परिणाम होतील हे जितके आपल्याला अधिक समजेल, तितक्या प्रमाणात आपल्याला सामाजिक पद्धती गतिशील करण्याच्या व बदलण्याच्या हेतूंनी अंमलात आणलेल्या धोरणाचे अधिकतम परिणाम कसे घडवून आणता येतील, हे ठरविता येईल.

तरी सुद्धा, एकच घटक बदलून सयुक्तिक धोरण यशस्वी करता येईल हे शक्य दिसत नाही. अशा रीतीने, व्यावहारिक क्षेत्रात रामबाण उपाययोजना नसतात, असे अशा सैद्धांतिक दृष्टिकोनातून अपरिहार्यपणे सुचविले जात असले तरी त्यामुळे उलट सुधारकांना उत्तेजनच मिळेल. 'संचया'चे तत्त्व ज्या प्रमाणात अचूक आहे त्या प्रमाणात, ते अशी ग्वाही देते की, सुधारणा होण्यासाठी करावे लागणारे प्रयत्न व खर्च यांच्या मानाने, त्यांच्यामुळे होणारी फलप्राप्ती कितीतरी पटीने मोठी असते. उदाहरणार्थ, निग्रोंचे कमी दर्जाचे रहाणीमान सर्व दृष्टींनी प्रचंड व अखंड अपव्ययाचे आहे, शैक्षणिक पातळीच्या कमतरतेमुळे त्यांची उत्पादनक्षमता कमी होते, आरोग्य बिघडते व उत्पन्न कमी होते ; पुन्हा ह्या सर्व कमतरतांमुळे त्यांची शैक्षणिक पातळी खालावते, इ. इ.

योग्य घटकाला सूज्ञपणाने ऊर्ध्वगामी गती दिल्यामुळे वाढलेले संचयी अंतिम परिणाम, पूर्वकालातील "सामाजिक अपव्यया"चे, एका अर्थाने निदर्शक, व त्याचबरोबर मापकही असतात. निग्रोंच्या दर्जात वाढ करण्यासाठी करावा लागणारा खर्च अखेरीस "एकूण खरा खर्च" मुळीच होणार नाही; उलट, समाजासाठी त्यातून "सामाजिक फायदे"च होतील. स्पष्ट मूल्यांकित प्रमेयांवर आधारलेल्या ह्या राजकीय विचारांच्या व्याख्या, संचयी विकासाच्या चक्राकार कार्यकारणभावाच्या गतिमान शब्दप्रयोगांनीच केल्या पाहिजेत.

प्राध्यापक डब्ल्यू. डब्ल्यू. रोस्तोव ज्याला "सतत विकासाच्या अवस्थेसाठी करावयाच्या उड्डाणाचा प्रारंभ"[१०] म्हणतात तो साधता आला, आणि धोरणात्मक प्रयत्नांचे पूर्ण परिणाम दृष्टीस पडेपर्यंत वाट पहाताना करावा लागणारा त्याग करण्याचे सामर्थ्य असले तर वर निर्देशिलेल्या तत्त्वाप्रमाणेच अर्धविकसित देशांना "अगदी तळातून, कष्टाने वर निघता येईल."

व्यक्तिगत विचारविनिमय

"दुष्ट चक्रा"च्या तरल व संदिग्ध विचाराचा उल्लेख करून आणि दंतकथा व बायबल उद्‌धृत करून मी हे प्रकरण सुरू केले. सामाजिक प्रक्रियेच्या पृथक्करणासाठी स्थिर समतोलापेक्षा चक्राकार कार्यकारणभाव हे अधिक योग्य प्रमेय आहे, यावर जेव्हा मी भर देतो तेव्हा मी (वर उल्लेख केलेल्या ह्या) सर्वसाधारण व्यवहारज्ञानाला धरून बोलत आहे, असे मला वाटते.

सर्वसाधारण मते व्यक्त करताना, नकळतपणे, "व्यवहारी माणसे कोणत्यातरी गतकालीन लुप्त अर्थशास्त्रज्ञाची गुलाम असतात," असे जॉन मेनार्ड कीन्स यांनी म्हटल्याचे प्रसिद्ध आहे; त्यांच्या ह्या म्हणण्याला थोडा आधारही आहे. बोलताना माणसे आर्थिक सिद्धांताच्या तत्त्वाबद्दल पूर्वानुकूलग्रहाबद्दल जणू आध्यात्मिक भूमिकेतून विचार करताना दिसतात. परंतु आपापल्या प्रत्यक्ष कामाच्या क्षेत्रात मात्र ती अधिक चांगल्या गृहीतकृत्याचा आधार घेत असतात.

व्यापारधंद्यातील प्रत्येक यशस्वी माणूस व्यावहारिक प्रश्नांकडे पहाताना अंतर्भूत सिद्धांत म्हणून संचयी प्रक्रियेचे तत्त्व मानतो ; नाहीतर तो यशस्वीच होणार नाही. राजकारणी व्यक्तीने अंदाज बांधताना संचयी परिणाम विचारात घेतले नाहीत तर तो अयशस्वी ठरेल. पेशा म्हणून दानधर्म करणाऱ्यांचे संपूर्ण तत्त्वज्ञान याच प्रमेयावर आधारलेले असते.[११]

मला तर थोडे पुढे जाऊन असे म्हणावेसे वाटते की, कीन्सने (व्यवहारी) माणसांवर केलेला सनातनीपणाचा आरोप, अधिक यथार्थतेने, अर्थशास्त्रज्ञांवरच करता येईल; कारण आपली स्वतःचीच केवळ नव्हे तर एकूण समाजाच्या विचारांचीही मुक्तता करण्याचे कर्तव्य स्पष्टपणे आपलेच आहे.

अधिक स्पष्ट उदाहरण द्यावयाचे तर व्यवहारी माणसे आर्थिक व्यवहाराच्या बाबतीत सिद्धांतापेक्षा पुष्कळ पुढे गेली आहेत. नट विक्सेलनी मांडलेल्या नव्या व गतिमान दृष्टिकोनामुळे अल्पकालीन आर्थिक सिद्धांताच्या व आर्थिक धोरणाच्या फार मोठ्या भागाला नवे वळण मिळाले, ही गोष्ट अगदी खरी आहे; ह्याच सिद्धांताचा पुढे अनेकांनी पाठपुरावा केला आणि त्यांच्यापैकी कीन्स यांनी अर्थातच प्रामुख्याने त्याचा वापर केला. परंतु तो सिद्धांत फक्त सैद्धांतिकानाच संपूर्णपणे नवा होता, कारण जे. बी. से यांच्या एकूण मागणी व एकूण पुरवठा यांच्यातील समतोलाच्या नियमावर फक्त तेच निरपवाद श्रद्धा ठेवीत होते.

सामान्य माणसांनी त्या नियमावर, अर्थातच, कधीही विश्वास ठेवला नाही; पुरवठ्यापेक्षा मागणी कमी-अधिक होऊ शकते आणि त्यामुळे धंद्याला मंदी अगर तेजी येते, हे त्यांना माहीत होते. ज्या संदिग्ध कल्पनांच्या आधारावर बँक धंद्यातील लोक, उद्योगपती व राजकारणधुरंदर व्यवहार करीत असत त्यांना विक्सेलच्या नव्या दृष्टिकोनाने स्पष्ट स्वरूप दिले इतकेच – मात्र, सर्वसाधारणपणे बोलताना किंवा पूर्वग्रह व्यक्त करताना, ह्या मंडळींना, सैद्धांतिकांच्या चुकीच्या दृष्टिकोनाशी व पूर्वानुकूलग्रहांशी ते सहमत असल्याचे दाखविण्यात बहुधा आनंद वाटत असे.

संदर्भ टिपा

१. सी. इ. ए. विन्स्लो–दि कॉस्ट ऑफ सिकनेस अँड दि प्राइस ऑफ हेल्थ ("आजारपणाचा खर्च व आरोग्याची किंमत") निबंध माला क्र. ७, जिनिवा, १९५१, पा. ९. त्याचप्रमाणे, गन्नर मिरदाल–("आरोग्याचे आर्थिक स्वरूप") इकॉनॉमिक आस्पेक्टस् ऑफ हेल्थ–जागतिक आरोग्य संघटना, जिनिवा, १९५२, ६, क्र. ७-८.

२. रॅग्नर नर्क्से, 'अर्ध-विकसित देशांतील भांडवल संचयासंबंधीचे काही प्रश्न' (सम आस्पेक्टस् ऑफ कॅपिटल अक्युमिलेशन इन अंडरडेव्हलप्ड कंट्रीज), कैरो, १९५२, तसेच, रॅग्नर नर्क्से, 'अर्ध-विकसित देशांतील भांडवल-संचयाचे प्रश्न' (प्रॉब्लेम्स ऑफ कॅपिटल फॉर्मेशन इन अंडरडेव्हलप्ड कंट्रीज), ऑक्सफर्ड, १९३३, पा. ४ पासून पुढे.

३. सेंट मॅथ्यूज, २५ व्यातील २९. तसेच १३ व्यातील १२, शिवाय अमेरिकेतील पुढील म्हण: "ज्यांच्याजवळ असतं त्यांना मिळतं." दक्षिण पोर्तुगालमधील एका शेतकऱ्याचे उद्‌गार–"ज्यांच्याजवळ थोडसं असतं त्यांना इथे सर्व मिळतं; पण ज्यांच्या जवळ काहीच नसतं त्यांना मुळीच मिळत नाही."

४. ॲन अमेरिकन डायलेमा–द निग्रो प्रॉब्लेम अँड मॉडर्न डेमॉक्रसी ("अमेरिकेतील एक यक्षप्रश्न–निग्रोंची समस्या व आधुनिक लोकशाही") हार्पर्स, न्यूयॉर्क, १९४४.

५. त्या काळातील समाजशास्त्रज्ञ, अमेरिकेतील वंशांतर्गत संबंधांच्या विकासावर, आपल्या संशोधनाचा अगर शिकवणुकीचा फारसा परिणाम व्यवहारात

होणार नाही असे पुष्कळदा आग्रहपूर्वक सांगत असत, तरीसुद्धा ते, मूलगामी सामाजिक बदल घडवून आणण्याच्या बाजूचे बुद्धिनिष्ठ विचार एकत्र आणून त्यांची मांडणी करीत होते. त्यामुळे, वंशभिन्नता व वंशभेद यांवर आधारलेले ठोकळेबाज व संधीसाधूपणाचे विचार मान्य करीत रहाणे सुशिक्षित गोऱ्या लोकांना उत्तरोत्तर कठीण जाऊ लागले. माझी अशी खात्री आहे—आणि त्याची कारणे मी वर उल्लेख केलेल्या माझ्या पुस्तकात दिली आहेत—की, गेल्या दहा वर्षांपासून वेगवान होत असलेल्या वांशिक संबंधांच्या गतिमान विकासाची चैतन्यशक्ती निर्माण करण्याच्या कामात, युद्धपूर्वकाळात अमेरिकन समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या कामगिरीने फार मोठी मदत केली आहे.

६. 'ज्याचा तो' हा विलियम समनेर यांच्या परंपरेतील दृष्टिकोन—ज्याची पाळेमुळे अधिकच जुनाट नैसर्गिक नियमाच्या तत्त्वज्ञानात असून संशोधनाबद्दल बराच उत्साह असलेल्या अमेरिकेत ज्याचा बराच प्रभाव आहे तो—अनेकदा आर्थिक नियमनवादाच्या संदिग्ध तत्त्वज्ञानाशी संबंधित झालेला दिसतो. युद्धपूर्व काळात तो दोन निरनिराळ्या रूपांत व त्यांच्या अनेक मधल्या अवस्थांत प्रगट झाला. क्रांतिकारक मार्क्सवादाच्या रूपात व्यक्त झालेली विचारसरणी अशी अपेक्षा दर्शवित असे की, संपूर्ण बदल घडवून आणणारी व वांशिकपूर्वग्रहदेखील नष्ट करणारी आर्थिक क्रांती घडून येईल. दुसरी, अधिक मोठ्या प्रमाणावर आढळणारी, सनातनी उदारमतवादी विचारसरणी सांगत असे की, अशा प्रकारची क्रांती अपेक्षित नाही आणि म्हणून, आहे तशीच परिस्थिती जवळजवळ रहाणार आहे व फारसे काही बदलण्याची सुधारकांना संधी नाही—ह्या विचारसरणीतही गृहीततत्त्व हे होते की, 'मूलभूत घटक' म्हणजे आर्थिक पद्धती हाताळल्याशिवाय उल्लेखनीय बदल घडवून आणणे शक्य नाही. अशा प्रकारच्या एकच एक मूलभूत घटकावर आधारलेल्या सिद्धांतामुळे समतोलाच्या दृष्टिकोनाला व त्यात अंतर्भूत असलेल्या दैववादाच्या प्रवृत्तीला पुष्टी मिळाली. आणि संचयी गतिमान विकासातील विविध शक्तींचे परस्परावलंबित्व मान्य करणाऱ्या बुद्धिनिष्ठ मार्गात अडथळा निर्माण झाला. हेतुपुरस्सर घडवून आणलेल्या बदलांचे मोठे परिणाम घडून येण्याचा संभव या मार्गात अभिप्रेत होता.

७. अमेरिकेतील एक यक्षप्रश्न, (ॲन अमेरिकन डायलेमा), पान १०१४.

८. अमेरिकेतील एक यक्षप्रश्न, (ॲन अमेरिकन डायलेमा), पान १९.

९. ह्या संदर्भात आपण ह्या गोष्टीचा उल्लेख करू शकतो की, मार्क्सवादी आर्थिक नियमनवादाचा बराच वापर नकळत झालेला आहे, आणि तो विशेषतः अमेरिकन समाजशास्त्राच्या साहित्यात झालेला असून त्याचे स्वरूप कधीकधी ज्याचे वर्णन "विकृत ग्राम्य मार्क्सवाद" असे करण्याचा मोह मार्क्स व एंजल्स यांना झाला असता, असे आहे.

१०. डब्ल्यू. डब्ल्यू. रोस्तोव, "सतत विकासाच्या अवस्थेसाठी करावयाच्या उड्डाणाचा प्रारंभ" (टेक ऑफ इनटू सस्टेन्ड ग्रोथ), एकॉनॉमिक जर्नल, १९५६, पा. २५-४८.

११. निग्रो प्रश्नाच्या क्षेत्रात संचयी प्रक्रियेच्या कार्याचे सर्वोत्तम प्रतिपादन मला अमेरिकेच्या प्रतिष्ठानाचे एक अत्यंत सूज्ञ प्रमुख, ख्रिस्तवासी एडविन आय. एम्ब्री (रोझेन्वॉल्ड प्रतिष्ठान) यांनी सांगितलेले आढळले. ते म्हणतात, "जाती-

मध्ये एक दुष्ट चक्र असते. हीन ठरलेली जात, प्रारंभी, सत्ताधारी वर्गाने स्वीकृत केलेल्या काही बाबतीत, बहुधा खालच्या पातळीवर असते. खालच्या पातळीवर असल्यामुळे हीन वर्गाच्या सभासदांना, त्यांच्या इतर सोबत्यांना मिळणाऱ्या सवलती व संधी नाकारण्यात येतात; आणि त्यामुळे ते अधिक खाली ढकलले जातात. त्यानंतर त्यांना अधिकच अनादराने वागविले जाते; आणि त्यामुळे फारच जोराने सवलती नाकारण्यात येतात; व हे दुष्ट चक्र असेच गोल गोल फिरत रहाते. जेव्हा उलट गती सुरू होते–ती निग्रोंच्या बाबतीत नक्कीच सुरू झाली आहे–तेव्हा फार दीर्घ-कालीन उलगडा सुरू होतो. थोडी सद्‌भावना निर्माण झाली म्हणजे थोडी अधिक संधी मिळते, त्यामुळे त्यांची गुणसंपन्नता थोडी वाढते, मग ते अधिक आदरणीय होतात, आणि अशा रीतीने, हळूहळू समान संधी, मान व दर्जा यांकडे चढत जातात." (ब्राउन अमेरिका: एका नव्या वंशाची कथा) ब्राऊन अमेरिका: द स्टोरी ऑफ ए न्यू रेस, विकिंग प्रेस, न्यूयॉर्क, १९३१, पान २००. चक्राकार कार्यकारणभावामुळे प्रगतीची गती मंदावते, ही यात अभिप्रेत असलेली संदिग्ध कल्पना मात्र चुकीची आहे.

प्रकरण ३ रे

देशांतर्गत प्रादेशिक आर्थिक विषमतांची वाढ

एक साधे उदाहरण

संचयी कार्यकारणभावाच्या प्रक्रियेतील एकमेकात गुंतलेल्या चक्राकार परस्परावलंबनाचे तत्त्व सामाजिक संबंधांच्या संपूर्ण क्षेत्राला लावता येते, असे मी सुचविले आहे. आर्थिक अर्ध-विकासाचा व विकासाचा अभ्यास करताना हेच मुख्य गृहीत मानण्यात यावे.

समजा, एखाद्या प्रांतात आकस्मित बदल घडून येतो आणि घटनांच्या ओघाबरोबर तो ताबडतोब रद्द होत नाही; उदाहरणार्थ, जनतेच्या मोठ्या विभागाचे पोषण करणारा कारखाना जळून जातो आणि तो परत बांधण्यात, निदान त्या ठिकाणी बांधण्यात अर्थ नाही असे आढळून येते. ह्या प्राथमिक बदलाचा ताबडतोबीचा परिणाम असा होतो की, त्या कारखान्याची मालकी असलेले मंडळ व्यवहार बंद करते आणि तेथे कामावर असलेले कामगार बेकार होतात. त्यामुळे उत्पन्न व मागणी कमी होईल.

पुढे, कमी झालेल्या मागणीमुळे उत्पन्न कमी होईल, आणि त्या औद्योगिक मंडळाला व त्याच्या नोकरांना माल विकणाऱ्या अगर इतर सुखसोई पुरविणाऱ्या अनेक उद्योगधंद्यातही बेकारी निर्माण होईल. म्हणजे, अशा रीतीने, चक्राकार कार्यकारणभावाची प्रक्रिया सुरू होऊन, 'दुष्ट चक्रा'च्या पद्धतीने संचयी परिणाम घडू लागतील.

त्यानंतर, इतर बाह्य शक्तीमुळे बदल घडून आले नाहीत तर, बाकीच्या उद्योगधंद्यांच्या व तेथे जाऊ इच्छिणाऱ्या कामगारांच्या दृष्टीने तो प्रांत कमी आकर्षक ठरेल. ह्या प्रकियेला वेग प्राप्त झाला म्हणजे त्या प्रांतात प्रस्थापित झालेल्या उद्योगधंद्यांना व तेथे रहाणाऱ्या कामगारांना, अधिक चांगली बाजारपेठ मिळविण्यासाठी, दुसरीकडे कोठेतरी जाण्यास समर्पक कारणे अधिकाधिक मिळू लागतील. त्याप्रमाणे ते गेले म्हणजे उत्पन्न व मागणी कमी होईल. त्यामुळे, स्थानिक लोकसंख्येची वयो-

मानाप्रमाणे होणारी रचना त्या प्रांताला प्रतिकूल बनेल.

ह्या संचयी कार्यकारणभावाच्या परिणामांच्या कार्यतंत्रावर प्रकाश टाकण्यासाठी आपण कोणत्यातरी एका घटकाच्या वागणुकीचे परीक्षण करू या आणि त्यासाठी जरा दूरच्या घटकाची निवड करू या; त्यासाठी स्थानिक करपट्टी, हा घटक घेऊ या. या बाबतीत मी असे धरून चालणार आहे की, स्थानिक कर स्कॅंडिनेव्हियाप्रमाणे प्रत्यक्षपणे उत्पन्नावर बसविला जातो किंवा जगातील इतर अनेक देशांप्रमाणे तो अप्रत्यक्षपणे उत्पन्नाशी संबंधित झालेला असतो. तेव्हा, वरील परिस्थितीत, उत्पन्नाची व्याप्ती कमी झाली म्हणजे करपट्टी वाढवावी लागेल.

वाढलेल्या करपट्टीमुळे उद्योगधंद्यांना व कामगारांना तो प्रांत सोडून जाण्यास अधिक उत्तेजन मिळेल आणि जे एरवी तेथे जाण्याचा विचार करीत होते त्यांना बाहेर रहाण्यास उत्तेजन मिळेल. त्यामुळे दुसऱ्या फेरीत उत्पन्न व मागणी पुन्हा कमी होईल आणि परिणामी करपट्टी पुन्हा वाढेल आणि त्याचे पुन्हा पहिल्यासारखेच परिणाम होतील. शिवाय, प्रतिकूल वयाच्या संख्यावाढीमुळे दरमाणशी करपात्र उत्पन्न तर कमी झालेले असेलच परंतु त्याशिवाय सार्वजनिक कल्याण निधीमधील खर्चाची गरजही वाढलेली असेल.

अशा परिस्थितीत, वाढत्या करपट्टीमुळे स्थानिक अधिकारी निरनिराळ्या सार्वजनिक सोईंचा, उदाहरणार्थ मुलांच्या शाळा, वृद्धांसाठी घरे, रस्ते इत्यादींचा दर्जा जर कमी करण्यास प्रवृत्त झाले तर त्यामुळे, करपट्टीची पातळी कमी होऊ शकेल, पण परिणामी इतर महत्त्वाच्या दृष्टींनी उद्योगधंद्यांना व कामगारांना तो भाग अधिकच अनाकर्षक वाटेल.

आरंभीचा बदल होण्यापूर्वी करपट्टी जर स्थिरावलेली असेल तर बदल झाल्यानंतर ती समतोलाकडे— किंवा कोणत्याही स्थिर पातळीकडे सरकत नाही; उलट समतोल शक्तींच्या पहिल्या अवस्थेपासून ती सतत दूर जाते. त्यामुळे सतत नवे बदल घडून येतात, आणि करपट्टी अधिकाधिक वाढत जाते, व हे असेच पुढे चालू रहाते. प्राथमिक बदलाने सुरू केलेल्या संचयी परिणामयुक्त चक्राकार कार्यकारणभावाचे हे साधे उदाहरण खऱ्या सामाजिक क्रियांचे वैशिष्टचदर्शक आहे; मागणी व पुरवठ्याच्या वक्र रेषा किंमतींचा समतोल साधणाऱ्या पातळीवर एकमेकींना छेदतात, हे आर्थिक सिद्धांतातील आपल्या विचारसरणीचे प्रतीक बनलेले उदाहरण तितके वैशिष्टचदर्शक नाही, असे मला वाटते.

तरीसुद्धा, सुसंघटित कल्याणकारी राज्यांमध्ये करपट्टी जर ह्याप्रमाणे धोक्याच्या मार्गाने जात नसेल आणि फार चढण्यापूर्वी तिला पायबंद बसत असेल, त्याचप्रमाणे सार्वजनिक गरजा भागविण्याचा दर्जा अतिशय खालावण्यावर समाज निर्बंध घालीत असेल तर त्याचे स्पष्टीकरण, बाजारपेठेच्या शक्तींच्या क्रियाप्रतिक्रियांपेक्षा फारच निराळे असते; ते स्पष्टीकरण निरनिराळ्या राष्ट्रीय कायद्यांत आढळते. एखादा

समाज, त्याच्या नियंत्रणाखाली नसलेल्या कारणांमुळे, आर्थिक अडचणीत सापडला असेल तर त्याला सार्वजनिक निधीमधून मदत द्यावी आणि वरील स्वरूपाच्या संचयी प्रक्रिया थांबवाव्यात ह्या हेतूने हे कायदे केलेले असतात; त्याचबरोबर सार्वजनिक गरजापूर्तीचा किमान दर्जा पाळण्याचा आदेश देणे हेही त्यांचे कार्य असते.

समृद्ध असलेल्या व उत्तरोत्तर प्रगत होत असलेल्या सोविएतेतर [१६] जगातील आधुनिक व एकात्म राष्ट्रीय सरकारांनी विविध प्रकारांच्या नियंत्रित सार्वजनिक हस्तक्षेपांच्या गुंतागुंतीच्या पद्धतींचे जाळे तयार केले आहे; संचयी सामाजिक बदलाच्या आंधळ्या नियमाचा प्रतिकार करावा, आणि प्रदेश, उद्योगधंदे व सामाजिक गट यांच्यात विषमता निर्माण करणाऱ्या त्याच्या शक्तीला अडथळा करावा हा त्याचा मुख्य हेतू आहे. सुसंघटित समाजव्यवस्थेने अस्तित्वात आणलेल्या ह्या विरोधी वा भरपाई करणाऱ्या बदलाच्या प्रश्नाचा विचार मी पुन्हा पुढील प्रकरणात करणार आहे.

आता परत चर्चेच्या मुद्याकडे वळू या. मी दिलेल्या उदाहरणात प्राथमिक बदल प्रतिकूल होता, परंतु, पहिला बदल अनुकूल असला तरीही संचयी प्रक्रिया होतातच. उदाहरणार्थ, एखाद्या विशिष्ट विभागात कारखाना काढण्याच्या निर्णयाने त्याच्या सर्वसाधारण विकासाला चालना मिळते. पूर्वी बेकार असलेल्यांना किंवा कमी पगारावर काम करणाऱ्यांना काम व अधिक उत्पन्न मिळविण्याची संधी मिळते. मालाला व इतर सुखसोई पुरविणाऱ्यांच्या कामाला मागणी वाढल्यामुळे स्थानिक उद्योगधंद्यांची भरभराट होते. वाढत्या संधीचा फायदा करून घेण्यासाठी बाहेरील कामगार, भांडवल व कारखाने तिकडे आकर्षिले जातात. वाढत्या उत्पन्नामुळे व मागणीमुळे ज्याप्रमाणे इतर मालाची बाजारपेठ वाढते त्याचप्रमाणे ती नव्या उद्योगधंद्यांच्या निर्मितीमुळे व प्रस्थापित धंद्यांच्या विस्तारामुळे वाढते. वाढत्या नफ्यामुळे बचत वाढते, परंतु त्याच वेळी भांडवल गुंतवणूकही अधिक मोठ्या प्रमाणावर होते, आणि तिच्यामुळे मागणी व नफ्याची पातळी अधिकच उंचावते. आणि, विस्ताराच्या प्रक्रियेतून तिचे सातत्य टिकवून धरण्यास अनुकूल अशा बाह्य आर्थिक-रचना निर्माण होतात.

अधोगामी संचयी प्रक्रियेतील कार्यकारणभावाच्या आंतरसंबंधांचे जवळून निरीक्षण करण्यासाठी निवडलेला घटक म्हणजे स्थानिक करपट्टी, ऊर्ध्वगामी प्रक्रियेत कमी करता येते, आणि सार्वजनिक सुखसोईंची गुणवत्ता व संख्या वाढविता येते ; ह्या दोन्ही बदलांमुळेही उद्योगधंद्यांना व कामगारांना हा प्रदेश अधिक आकर्षक वाटेल, परिणामी स्थानिक आर्थिक घडामोडींना अधिक तेजी येईल आणि पुन्हा त्यामुळे सदृश्य अनुकूल परिणाम करपट्टी व सार्वजनिक आर्थिक व्यवहार यांवर होतील, इ.इ.

प्रदेशाप्रदेशांत समता आणण्याच्या हेतूने करपद्धतीत अंतर्भूत करण्यात आलेल्या प्रशासकीय योजनांच्या हस्तक्षेपामुळे, स्थानविशिष्ट विस्ताराचे आर्थिक

परिणाम कमी करता येतील ; ह्या प्रकरणात मी फक्त बाजारपेठेच्या मुक्त शक्तींच्या क्रियाप्रतिक्रियांचा विचार करीत असल्यामुळे, त्या शक्यतेकडे मी सध्यापुरते दुर्लक्ष करतो.

बाजारपेठेच्या शक्तींच्या क्रियाप्रतिक्रियांमुळे विषमतावाढ होते

एखाद्या प्रांताच्या अगर विभागाच्या व्यापारात बदल झाला आणि तो पुरेसा मोठा व टिकावू असला तर, अशाच प्रकारची परिस्थित्यनुरूप ऊर्ध्वगामी अगर अधोगामी, सर्वसाधारण स्वरूपाची संचयी प्रक्रिया सुरू होईल; किंबहुना मागणी, मिळकतीची ताकद व उत्पन्न, भांडवली गुंतवणूक व उत्पादन अशा आंतरसंबंधीत आर्थिक संख्यांकात ज्या बदलाच्या परिणामी प्रकर्षाने चढ अगर उतार घडून येऊ शकतो त्या प्रत्येकामुळे ती सुरू होईल. मला मुख्य विचार हा मांडावयाचा आहे की, बाजारपेठेच्या क्रियाप्रतिक्रियांमुळे प्रादेशिक विषमता बहुधा कमी होत नाहीत, तर उलट त्या वाढतात.

धोरणाच्या हस्तक्षेपापासून अबाधित अशी परिस्थिती बाजारपेठेच्या शक्तींच्या आधीन ठेवण्यात आली तर, औद्योगिक उत्पादन, व्यापार, बँक-व्यवहार, जहाज-धंदा-किंबहुना ज्यांच्यामुळे विकसनशील अर्थरचनेत सरासरीपेक्षा अधिक नफा मिळतो असे सर्वच आर्थिक व्यवहार आणि शिवाय शास्त्र, कला, साहित्य, शिक्षण व एकूण सर्व उच्च संस्कृती काही विभागांत व प्रांतांत केंद्रित होतील, आणि बाकीचा देश, कमी-अधिक प्रमाणात मागासलेला ठेवतील.

असे निवडक विभाग व प्रांत तेथे केंद्रित झालेल्या आर्थिक व्यवहारांना कधीकधी खास चांगली नैसर्गिक परिस्थिती उपलब्ध करून देतात ; असा अनुभव स्पर्धेत वरचढ झाल्यानंतर बहुतेकांच्या बाबतीत आला आहे. कारण स्वाभाविकपणेच आर्थिक भूगोल सारा रंगमंच तयार करतो. बंदराच्या बांधणीसाठी जेथे चांगल्यापैकी नैसर्गिक अनुकूलता असेल तेथेच बहुधा व्यापारी-केंद्रे वसविली जातात, आणि जड उद्योगधंद्यांची केंद्रे बहुधा नेहमीच कोळसा व लोखंडाच्या खाणींजवळ असतात.

परंतु, आज मात्र, एखाद्या केंद्राच्या आकर्षण-शक्तीचा उगम, काहीतरी तेथे प्रथम सुरू झाले—आणि तितक्याच किंवा अधिक चांगल्या रीतीनेही ते सुरू होऊ शकले असते अशा दुसऱ्या कोणत्याही ठिकाणी सुरू झाले नाही, तसेच जे सुरू झाले त्याला यश मिळाले ह्या ऐतिहासिक अपघातात असतो. अशा रीतीने सुरू झालेल्या व त्यानंतर सतत आंतर-बाह्य विकास पावणाऱ्या ह्या अर्थरचनांनी (अत्यंत व्यापक अर्थाने हा शब्द वापरला असून त्यात, अनेक व्यवसायात प्रशिक्षित श्रमिक जनता, सुलभ दळणवळण, विकासाची व मोकळेपणाची भावना आणि नव्या उद्यमशीलतेचे चैतन्य इत्यादींचा समावेश केला आहे), इतर ठिकाणे व विभाग यांचे नुकसान करून स्वतःची सतत वाढ बळकट करून घेतली आणि टिकवून धरली ; आणि इतर

ठिकाणी उलट सापेक्ष गतिहीनतेचा अगर परागतीचा ढाचा तयार झाला.

स्थलांतर, भांडवलाचे स्थानांतर व व्यापार : "प्रत्याघाती (उलट दिशेने होणारे) परिणाम"

एका ठिकाणच्या विकासाचे इतर ठिकाणांवर "प्रत्याघाती परिणाम" कसे होतात, हे सहज समजते. अधिक नेमके सांगावयाचे म्हणजे कामगार, भांडवल, माल व सुखसोई यांच्या स्थलांतरामुळे प्रादेशिक विषमतेच्या प्रवृत्तीला आपोआप प्रतिबंध होत नाही. उलट, (कामगारांचे) स्थलांतर, भांडवलाचे स्थानांतर व व्यापार ही स्वयंचालनेने संचयी प्रक्रियांच्या उत्क्रांतीची माध्यमे आहेत–त्यांच्यामधून सुदैवी प्रदेशात ऊर्ध्वगामी व दुर्दैवी प्रदेशात अधोगामी प्रक्रिया सुरू होतात. सर्वसाधारणपणे, पहिल्या प्रकारच्या प्रदेशात त्यांचे विधायक परिणाम होतात तर दुसऱ्या प्रकारात ते विघातक परिणाम घडवून आणतात.[१]

ज्या ठिकाणात व प्रदेशात आर्थिक हालचाली वाढत असतील तेथे बाहेर जाणारांपेक्षा देशाच्या इतर विभागातून येणारांची संख्या अधिक प्रमाणात आकृष्ट होईल. स्थलांतर नेहमीच निवडक असते; निदान स्थलांतर करणाऱ्यांच्या वयाच्या दृष्टीने तरी ते तसे असते ; त्यामुळे जलद गतीने वाढणाऱ्या प्रदेशांना ही हालचाल अनुकूल व इतरांना प्रतिकूल बनते.

सर्वांत श्रीमंत व अति-विकसित देशांत एक ऐतिहासिक कालखंड अगदी अलिकडेच संपत आला आहे ; या कालखंडात खालच्या आर्थिक व सामाजिक थरात संततिनियमन पसरत असते ; त्यामुळे गरीब प्रदेशात जननसंख्याही सापेक्षतेने अधिक असते.[२] निव्वळ स्थलांतरांच्या परिणामांत ह्या गोष्टीची भर पडून गरीब प्रदेशातील वयोमानाचे वाटप प्रतिकूल बनते. दूरवर पहाता त्यामुळे एकूण श्रमिक जनता व साधनसामुग्री यांच्यातील संबंधही कमी अनुकूल बनण्याचा संभव असतो. औद्योगिक केंद्रांकडे–व अमेरिकेकडे–जेव्हा युरोपच्या ग्रामीण प्रदेशातून दीर्घ काळ निव्वळ स्थलांतर चालू होते तेव्हाच्या तेथील दारिद्र्याचे स्पष्टीकरण, स्थलांतरामुळे व काही अंशी अधिक जनन प्रमाणामुळे निर्माण झालेल्या, प्रतिकूल वयोमानाच्या विभागणीत मुख्यत: सांपडते.

भांडवलाच्या हालचालींचीही अशाच प्रकारचे, अशाच विषमता वाढविणारे परिणाम घडविण्याकडे प्रवृत्ती असते. भरभराटीला येत असलेल्या केंद्रांत वाढत्या मागणीमुळे भांडवलाच्या गुंतवणुकीला अधिक उत्तेजन मिळेल, त्यामुळे उत्पन्न व मागणी वाढेल, आणि पुन्हा त्यामुळे दुसऱ्यांदा भांडवल गुंतवणूक वाढेल, इ.इ. वाढलेल्या उत्पन्नामुळे बचत वाढेल पण ती भांडवल गुंतवणुकीच्या मागे पडत राहील, कारण भांडवल पुरवठ्यासाठी तिला सतत तेजीची मागणी राहील. दुसऱ्या प्रदेशात नवी भरभराट होण्यासारखी स्थिती नसल्यामुळे परिणामी भांडवलाला गुंतवणुकी-

साठी मागणी सापेक्षतेने कमी रहाते ; त्या ठिकाणी कमी उत्पन्नामुळे व ते कमी कमी होण्याकडे कल असल्यामुळे बचतीचा पुरवठाही कमीच असतो पण तिच्या तुलनेने-सुद्धा भांडवलाला मागणी कमीच असते. बँकांना अन्य प्रकारे व्यवहार करण्याचे बंधन नसल्यास, त्या जेथे भांडवलावर अधिक व खात्रीची मिळकत मिळते अशा समृद्ध व प्रगतीकारक प्रदेशामध्ये, गरीब प्रदेशातील भांडवल ओढून घेण्याचे साधन बनतात, असे अनेक देशांच्या अभ्यासावरून दिसून आले आहे.

व्यापाराचे व्यवहारही गरीब प्रदेशांविरुद्ध आणि समृद्ध व प्रगतीपथावरील प्रदेशांना मूलभूत अनुकूल कल ठेवून चालतात. भरभराटीची केंद्रे प्रस्थापित झाली म्हणजे तेथील उद्योगधंदे अधिक किफायतशीर चाललेले असतात. बाजारपेठा खुल्या व वाढत्या प्रमाणात उपलब्ध झाल्याने अशा उद्योगधंद्यांना स्पर्धेत अधिकच लाभ मिळतो; उत्पादन अधिकाधिक फायद्याचे होऊन वाढू लागते, आणि त्यामुळे अन्य प्रदेशांतील चालू उद्योगधंदे व हस्तव्यवसाय खुरटून जातात. गेल्या शतकात इटलीचे राजकीय एकीकरण झाल्यानंतर अंतर्गत जकात नाहीशी झाल्यामुळे, इटलीच्या गरीब दक्षिणी प्रांतातील उद्योगधंद्यांच्या वाढीला निर्माण झालेला अडथळा हे ह्या बाबतीतील महत्त्वाचे उदाहरण असून, त्याचा संपूर्ण अभ्यास करण्यात आला आहे: उत्तरेकडील प्रांतातील उद्योगधंद्यांनी इतकी आघाडी मारलेली होती व ते इतके सामर्थ्यशाली होते की त्यांनी नव्या एकीकरणामुळे तयार झालेल्या बाजार-पेठेवर प्रभुत्व मिळविले ; आणि दक्षिणी प्रांतातील औद्योगिक प्रयत्न मोडून काढले.[३]

ह्या विकासात औद्योगीकरण ही गतिमान शक्ती असल्यामुळे, गरीब प्रदेश मुख्यतः शेतीप्रधान असतात असे विधान करणे द्विरुक्ती ठरेल: मी आताच उल्लेख केल्याप्रमाणे, राष्ट्रीय बाजारपेठेचा पूर्ण विकास झाल्यामुळे शेतीप्रधान प्रांतातील नव्या औद्योगिक वळणाचा प्रारंभही असफल करण्याची प्रवृत्ती निर्माण होईल. दक्षिण युरोपच्या मागासलेल्या विभागातील जवळजवळ $\frac{3}{4}$ लोकसंख्या शेतीवर उदर-निर्वाह करते. ह्या विभागातसुद्धा, कारखानदारी व इतर बिगर-शेतकी उद्योगधंदेच फक्त नव्हेत तर शेतीदेखील, समृद्ध विभागातल्यापेक्षा उत्पादनक्षमतेच्या दृष्टीने फार खालच्या पातळीवर आहे.[४]

“आर्थिक नसलेले घटक”

प्रादेशिक विषमता निर्माण करणाऱ्या संचयी प्रक्रिया अनेक कारणपरंपरांतून कार्यान्वित होतात आणि बाजारपेठेच्या क्रियाप्रक्रियांच्या आपल्या सैद्धांतिक विश्लेषणात बहुधा त्यांचा विचार करण्यात आलेला नसतो. स्थलांतरातील निवडकपणा व गरिबीचे प्रसवशक्तीवरील परिणाम या दोन अशा घटकांचा मी आधीच उल्लेख केला आहे.

भरभराटीच्या मार्गाला न लागलेल्या प्रदेशांना, स्वतःच्या ताकदीवर चांगल्या

प्रकारच्या रस्त्यांची सोय करता येत नाही आणि त्यांच्या इतर सार्वजनिक उपयुक्ततेच्या सोयीही निकृष्ट दर्जाच्या रहातात, आणि त्यामुळे त्यांच्या स्पर्धेतील अडचणी वाढतात. दळणवळणाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी तेथे रेल्वे बांधल्या जातील, म्हणजेच त्या प्रदेशाच्या गरजा फारशा ध्यानात न घेता त्या बांधल्या जातील.

याच अनुमानाप्रमाणे, बाहेरील मदतीशिवाय गरीब प्रदेश फारशा वैद्यकीय सोयी पुरवू शकणार नाहीत, तेथील लोक कमी आरोग्यसंपन्न असतील आणि त्यांची उत्पादनक्षमता कमी असेल. तेथे कमी शाळा असतील आणि असलेल्या शाळा फारच निकृष्ट दर्जाच्या असतील–दक्षिण युरोपातील गरीब प्रदेशातील लोक अद्यापही मोठ्या प्रमाणावर अशिक्षित आहेत.

तेथे रहाणारे लोक सरासरीने अधिक मागासलेल्या धर्मप्रकारांवर श्रद्धा ठेवणारे, निषेध (ताबू) व जादुटोण्याच्या मार्गाने पारंपारिक कल्पनांना रूढ करणारे असतील, आणि ते सर्वसाधारणत: अधिक धर्मभोळे व कमी बुद्धिवादी असतील. त्यांच्या मूल्यांच्या एकूण पद्धतीवर दारिद्र्याचा व मागासलेपणाचा असा काही ठसा असेल की, विकसनशील समाजाच्या प्रयोगशील व महत्त्वाकांक्षी ध्येयांबद्दल ते फारच कमी संवेदनाक्षम रहातील.

पारंपारिक आर्थिक सिद्धांताने विश्लेषण न केलेल्या माध्यमातून कार्यान्वित होणारे दारिद्र्याचे हे सर्व निराशाजनक परिणाम चक्राकार कार्यकारणभावाने परस्परांत गुंतलेले असतात, प्रत्येक दुसऱ्या सगळ्यात अडकलेला असतो, आणि ते सगळे, मी वर उल्लेख केल्याप्रमाणे, स्थलांतर, भांडवलाची हालचाल व व्यापार यांच्या व्यवहारात प्रतिकूल कलाने संबद्ध असतात. भरभराटीच्या केंद्रातील चढत्या आर्थिक पातळीचे, याच्या अगदी उलट परिणाम होतात ; आणि तेही अशाच चक्राकार कार्यकारणभावाने परस्परांत गुंतलेले असतात आणि अधिकाधिक विकास संचयी पद्धतीने सतत टिकवून धरतात.

आर्थिक सिद्धांताने या तथाकथित बिन-आर्थिक घटकांकडे दुर्लक्ष केले आहे आणि त्यांना विश्लेषणातून वगळले आहे. परंतु, आर्थिक बदलांच्या संचयी प्रक्रियांमधील चक्राकार कार्यकारणभावाच्या मुख्य माध्यमांपैकी ते असल्यामुळे त्यांच्याकडील दुर्लक्षामुळे आर्थिक सिद्धांतात महत्त्वाचा उणेपणा राहिला आहे. मी दुसऱ्या प्रकरणात निर्देश केल्याप्रमाणे आणि पुढे ११व्या प्रकरणात अधिक तपशिलाने मांडले आहे त्याप्रमाणे, आर्थिक विकास व अर्धविकासाच्या गतिमान समस्यांची मांडणी करण्यास हा सिद्धांत असमर्थ का ठरला–किंवा निराळ्या शब्दांत मांडावयाचे तर, ह्या समस्या मांडणे आर्थिक सिद्धांताला कसे टाळता आले याचे बरेचसे स्पष्टीकरण हेच आहे.

एखाद्या प्रदेशात झालेल्या आर्थिक भरभराटीमुळे, त्या प्रांताबाहेर होणाऱ्या सर्व संबंधित प्रतिकूल बदलांना, संदर्भ देताना, मी " प्रत्याघाती (उलट दिशेने घडणारे) परिणाम " म्हणणार आहे. या शिर्षकाखाली मी, स्थलांतर, भांडवलाचे थित्यंतर व

व्यापार यांच्या द्वारे होणारे आणि वर उदाहरणे दिलेल्या इतर सर्व सामाजिक संबंधांच्या संपूर्ण मालिकेद्वारे होणारे परिणाम यांचा समावेश करणार आहे; "आर्थिक" त्याचप्रमाणे "बिन-आर्थिक" अशा सर्व घटकांमधील प्रक्रियांच्या चक्राकार कार्यकारणभावामधून निर्माण होणाऱ्या एकूण सर्व संचयी परिणामांचा निर्देश ह्या शब्दसमुच्चयातून होतो.

या संदर्भात आणखी एक गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे तो हा की, अर्ध-विकसित देशांतील स्वस्त व पुष्कळदा सालस असलेले कामगार उद्योगधंद्यांना सहसा आकर्षित करीत नाहीत, असा सर्व इतिहासांचा निर्वाळा आहे. मागासलेल्या देशांकडे उद्योग-धंद्यांना आणण्यात कामगारांचा पुरवठा कारणीभूत झाल्याची जी थोडी उदाहरणे आहेत त्यात अमेरिकेतील न्यू इंग्लंडकडून अप्पर साऊथमध्ये झालेले कापड धंद्याचे स्थलांतर हे एक असे उदाहरण आहे; परंतु अशी उदाहरणे नियमाला असलेल्या अपवादांसारखी आहेत. उलट दिशेला कार्यान्वित असलेल्या अनेक शक्ती असतात. आर्थिक भरभराटीच्या प्रस्थापित केंद्रामधील बाह्य अर्थरचना ह्या त्यांपैकी असतात. साधारणतः कामगारांनाच अधिक मागणी असलेल्या प्रदेशांकडे स्थलांतर करावे लागते आणि भरभराटीच्या समाजाच्या भिन्न जीवनपद्धती व मूल्ये यांच्याशी मिळतेजुळते घेण्याचे अवघड प्रयत्न करावे लागतात.

"प्रसारीत परिणाम"

तथापि, आर्थिक भरभराटीच्या केंद्रांमधून इतर प्रदेशांकडे पसरणारे व प्रत्याघाती परिणामांच्या विरुद्ध असलेले, भरभराटीच्या गतीचे काही केंद्रत्यागी "प्रसारीत परिणाम"ही असतात. भरभराटीच्या केंद्राभोवतालच्या संपूर्ण प्रदेशाला, शेती उत्पादनाला बाहेरून वाढती मागणी आल्यामुळे फायदा मिळावा आणि तेथे सर्व क्षेत्रांतील व पातळीवरील तांत्रिक प्रगतीला चालना मिळावी हे स्वाभाविकच आहे.

अधिक दूरवरच्या परिसरातील ठिकाणांवरही केंद्रत्यागी प्रसारीत परिणाम घडविणारा आणखी एक मार्ग असतो. केंद्रांतील वाढत्या उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल उत्पादन करण्यासाठी अनुकूल परिस्थिती असलेल्या ठिकाणी हे परिणाम घडतात ; तेथे पुरेशा कामगारांना काम मिळाले तर तेथील नित्योपयोगी वस्तूंच्या उत्पादनधंद्यांनाही चालना मिळेल. ह्या प्रदेशात व जेथे नव्याने उद्योग सुरू होऊन यशस्वी होतील अशा ठिकाणी, पहिल्या केंद्रामधून निर्माण होणाऱ्या प्रत्याघाती परिणामांचे अडथळे बाजूला सारण्याइतका तेथील भरभराटीचा वेग जोरदार असेल तर ती ठिकाणेही, स्वावलंबी आर्थिक घडामोडींची नवीन केंद्रे बनतात.

औद्योगिक भरभराटीच्या केंद्रांमधून इतर ठिकाणांवर व प्रांतांवर तेथील उत्पादनाला मागणी वाढल्यामुळे व अन्य अनेक मार्गांनी प्रसारीत परिणाम होतात. हे परिणाम चक्राकार कार्यकारणभावाने संचयी सामाजिक प्रक्रियेत गुंफले जातात ;

त्यांच्या विरुद्ध असलेल्या व ज्यांच्या विरुद्ध ते विरोधी बदल सुरू करतात त्या उलटसुलट परिणामांच्या पद्धतीने त्यांची क्रिया घडते. सर्वसामान्य परिस्थितीत, एका घटकात झालेल्या बदलांमुळे प्रतिक्रिया म्हणून दुसऱ्या घटकांमध्ये होणारे बदल, पहिल्या बदलांच्या दिशेने यंत्रणा पुढे नेतात, ह्या मुख्य अनुमानात प्रसारीत परिणामां-मुळे गुंतागुंती निर्माण होतात.

परंतु, कोणत्याही परिस्थितीत, स्थिरसमतोलाच्या प्रमेयाला अनुरूप गृहीततत्त्व प्रसारीत परिणामांमुळे प्रस्थापित होत नाही. सीमेवरील प्रदेशांच्या उदाहरणात, (प्रत्याघाती व प्रसारीत) हे दोन प्रकारचे परिणाम एकमेकांना संतुलित करतील आणि त्या प्रदेशात "गतिहीनता" येईल. परंतु हे संतुलन स्थिरसमतोलाचे नसेल, कारण त्यांपैकी कोणत्याही एका बाजूला बदल झाला तर त्यामुळे ऊर्ध्वगामी अगर अधोगामी संचयी प्रक्रिया सुरू होईल.

वास्तव जगात भरभराटीचे, गतिशून्यतेचे व परागतीचे प्रदेश, निरनिराळ्या पातळीवर, बऱ्याचशा अखंडित क्रमाने, एकमेकांना लागून असतात ; आणि दोन विरुद्ध टोकांच्या प्रदेशांमध्ये सगळ्या संभाव्य छटा असतात. ज्या प्रमाणात, विखुरलेल्या औद्योगिक प्रगतीची एकूण बेरीज अधिक महत्त्वाची असते त्यामानाने देशातील आर्थिक दर्जाला उठाव मिळतो.

एखाद्या देशातील सर्वच प्रदेश ह्या संतुलित शक्तींच्या सीमेवर असण्याचीही शक्यता असते—सुरवातीचे विकासारंभ पुष्कळ व समर्थ, तसेच चांगले यशदायी असले, आणि केंद्रत्यागी प्रसारीत परिणाम सापेक्षतेने परिणामकारक रीतीने कार्यान्वित झाले तर अशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. अशा वेळी, विषमतेचा प्रश्न हा देशातील निरनिराळ्या प्रदेशांमधील प्रगतीच्या विभिन्न वेगाचा प्रश्न बनतो. परंतु, सर्वसाधारणपणे, अत्यंत जलद गतीने विकसित होत असलेल्या देशांतसुद्धा अनेक प्रदेश मागासलेले रहातात, आणि परिस्थिती जर बाजारपेठेच्या शक्तींच्या आधिन ठेवण्यात आली तर (गतिशून्य व परागत) ह्या दोन प्रकारचे प्रदेशच अधिक असण्याची शक्यता असते.

गेल्या शतकात अमेरिका व स्वीडनसारख्या देशांत औद्योगिक कारखान्यांना नैसर्गिक साधनसामुग्रीच्या दृष्टीने विशेषच अनुकूल परिस्थितीचा लाभ उठविता आला, आणि आर्थिक विकासाला असामान्य फलदायी अशा सांस्कृतिक परिस्थिती-सह इतर परिस्थितीही अस्तित्वात होती ; परंतु तेथेही थोड्याफार फरकाने समान व समकालीन भरभराटीच्या प्रक्रियेत संपूर्ण देशाला समाविष्ट करील असा विकास झाला नाही. जवळून पाहिल्यास पुष्कळ असमानता आढळून येतात. उदाहरणार्थ, अमेरिकेतील, ज्याचा सर्वसाधारणतः दक्षिण म्हणून उल्लेख केला जातो, तो सर्व प्रदेश अगदी अलिकडेपर्यंत गतिहीनच होता. अशाच रीतीने, पश्चिम सरहद्द प्रदेशात काही पिढ्यांपूर्वी जेव्हा शेतीमध्ये नवीन मोठ्या संधी निर्माण झाल्या तेव्हा न्यू

इंग्लंडमधील विशाल ग्रामीण विभागांचा ऱ्हासच होत गेला, आणि त्यातून अनेक विभागांची सुटका अद्यापही झालेली नाही.

उलट, ज्या देशात विकासाचे प्रारंभ अगदीच नगण्य होतात, आणि/किंवा जे होतात त्यांच्यामुळे मागणी, उत्पन्न, भाडवल गुंतवणूक व उत्पादन यांच्यात पुरेशी व व टिकावू वाढ होत नाही तो देश अर्ध-विकसित बनतो. परंतु, तेथेसुद्धा, दक्षिण अमेरिकेतील अनेक राज्यांप्रमाणे, अशी काही ठिकाणे व प्रदेश बहुधा असतात की जे औद्योगिकदृष्ट्या प्रगती करीत असतात.

दोन व्यापक अन्योन्य संबंध

संयुक्त राष्ट्रसंघाच्या युरोपविषयक आर्थिक मंडळाने, निरनिराळ्या युरोपियन राष्ट्रांतील प्रादेशिक विकासाच्या व अर्ध-विकासाच्या प्रश्नाच्या अनुभवनिष्ठ अभ्यासाकडे अनेक वर्षे वाढते लक्ष दिले आहे. त्यातून आतापर्यंत काढण्यात आलेले निष्कर्ष "युरोपची आर्थिक पहाणी" या वार्षिकात प्रसिद्ध करण्यात आले आहेत. ह्या प्रश्नांचे अधिक सर्वांगीण विश्लेषण १९५५मध्ये 'पहाणी'च्या एका खास प्रकरणात समाविष्ट करण्यात आले होते.[५] ह्या अभ्यासामधून फक्त दोन निष्कर्ष मला उद्धृत करावयाचे आहेत.

पहिला निष्कर्ष हा की, पश्चिम युरोपमध्ये प्रदेशाप्रदेशांतील उत्पन्नांमधील फरक, श्रीमंत देशांपेक्षा गरीब देशांमध्ये पुष्कळच अधिक मोठे आहेत. राष्ट्रीय सरासरीच्या $\frac{२}{३}$ हून ज्यांचे सरासरी उत्पन्न कमी आहे अशा प्रदेशात रहाणाऱ्यांचे प्रमाण देशातील एकूण लोकसंख्येशी किती आहे, हे प्रादेशिक विषमतेचे सोपे मापन असते. ते वापरले तर असे आढळून येते की, ग्रेट ब्रिटन व स्वित्झर्लंडमध्ये हे प्रमाण अगदी नगण्य टक्के आहे, नॉर्वे व फ्रान्समध्ये ते सुमारे दहा टक्के आहे, आणि इटली, तुर्कस्तान व स्पेन-मध्ये ते जवळजवळ ३३ टक्क्यांइतके आहे.[६]

दुसरा निष्कर्ष असा आहे की, पश्चिम युरोपच्या समृद्ध देशांमध्ये प्रादेशिक विषमता कमी होत असताना, गरीब देशांत मात्र याच्या विरुद्ध प्रवृत्ती आढळून येते.

ह्या दोन व्यापक अन्योन्यसंबंधांचे बरेचसे स्पष्टीकरण ह्या महत्त्वाच्या वस्तुस्थितीत आहे की, एखाद्या देशाने आधीच आर्थिक विकासाची जितकी अधिक उच्च पातळी गाठलेली असते तितके प्रसारीत परिणाम साधारणतः अधिक समर्थ असतात. कारण विकासाची उच्च पातळी आणि सुधारलेली वहातूक व दळणवळण, शिक्षणाची उच्चतर पातळी, विचार व मूल्ये यांचा अधिक गतिमान संपर्क यांचे साहचर्य असते— आणि ह्या सर्व बाबी आर्थिक भरभराटीच्या केंद्रत्यागी प्रसरण-शक्तींना बळकटी आणणाऱ्या किंवा त्यांच्या कार्याला येणारे अडथळे दूर करणाऱ्या असतात.

जेव्हा एखादा देश विकासाची उच्च पातळी गाठतो तेव्हा तेथील प्रसारीत परिणाम बलिष्ठ असल्यामुळे त्यांनी प्रत्याघाती परिणाम निर्बळ केले तर त्यामुळे

आर्थिक विकासाला उत्तेजन मिळते आणि म्हणून संचयी प्रक्रियेतील तो महत्त्वाचा घटक बनतो. कारण, मोठ्या प्रमाणावर अतीव दारिद्र्याचा नाश झाला म्हणजे मानवी साधनसंपत्तीच्या सुप्तशक्तींचा अधिक परिपूर्ण उपयोग होऊ लागतो. एकदा एखादा देश विकासाच्या उच्च पातळीवर चढला म्हणजे जलद व सतत प्रगती ही जवळजवळ स्वयंचलित प्रक्रिया बनते, याचे एक कारण हेच आहे.

उलट, अर्ध-विकसित देशांतील विकासाची पातळी सरासरीने कमी असते; तिच्या शापाचा एक भाग हा असतो की तेथील प्रसारीत परिणाम कमकुवत असतात. याचा अर्थ असा की, सामान्यपणे गरीब देशांत, बाजारपेठेच्या शक्तींचे मुक्त व्यवहार प्रादेशिक विषमता निर्माण करण्याचे आणि अस्तित्वात असलेल्या विषमता अधिक वाढविण्याचे कार्य करतात. आर्थिक विकासाची खालची पातळी आणि महान आर्थिक विषमता यांचे नेहमी साहचर्य असते, हाच प्रगतीच्या मार्गातला फार मोठा अडथळा आहे. अर्ध-विकसित देशांना खालच्या पातळीवरच ठेवण्याकडे त्यांचा कल असतो. ज्यांच्यामुळे संचयी प्रक्रियेत "दारिद्र्य हेच दारिद्र्याच्या निर्मितीचे कारण ठरते" अशा परस्परांत गुंतलेल्या संबंधांपैकी हा एक आहे.

मी पूर्वी उद्धृत केलेले बायबलामधील अवतरण पुन्हा येथे देण्याचा मोह मला टाळता येत नाही: "ज्याच्याजवळ आहे त्या प्रत्येकाला अधिक दिले जाईल आणि त्याच्याजवळ भरपूर होईल. परंतु ज्याच्याजवळ नाही त्याच्याजवळून जे थोडे असेल तेही काढून घेतले जाईल." बाजारपेठेच्या मुक्त व्यवहारात प्रादेशिक विषमता निर्माण करण्याची प्रवृत्ती अंतर्भूत असते, आणि देश जितका अधिक गरीब तितकी ही प्रवृत्ती बलवत्तर होत जाते, हे 'ज्याचा तो'च्या पद्धतीमधील आर्थिक अर्ध-विकास व विकास यासंबंधीचे दोन सर्वांत अधिक महत्त्वाचे नियम आहेत.

ह्या प्रकरणात मी राज्यसंस्थेच्या हस्तक्षेपाकडे दुर्लक्ष केले आहे. पुढील प्रकरणात राज्यसंस्थेच्या कार्याची चर्चा करताना मी असा मुद्दा मांडला आहे की, मी उहापोह करीत असलेल्या दोन व्यापक अन्योन्यसंबंधांची निर्मिती करणाऱ्या शक्तींना पुष्टी देण्याचेच काम राज्यसंस्थेच्या व्यवहारामुळे घडत असते.

आणखी इतर विरोधी बदलांची उदाहरणे

संचयी सामाजिक प्रक्रियेच्या चक्राकार कार्यकारणभावाचा जो नमुना मी थोडक्यात मांडीत आहे त्यात, अधिक सखोल विश्लेषणानंतर समाविष्ट करून घ्याव्या लागतील अशा अनेक गुंतागुंती व गुणवैशिष्ट्ये आहेत. कार्यकारणभाव चक्राकार असतो ह्या अनुमानाला असलेल्या अपवादांशी त्या सर्वांचा संबंध आहे.

विरोधी बदल झाले तर संचयी परिणाम कमकुवत होतील आणि प्रक्रिया अजिबात बंद पडण्याचाही संभव असेल. परंतु संतुलनाच्या अशा अपवादातही सम-तोलाच्या विश्लेषणाचे गृहीततत्त्व सहसा प्रस्थापित होऊ शकत नाही, कारण हा

समतोल अस्थिर असतो. दैववशात झालेल्या अशा समतोलाच्या दोन्ही बाजूंना, ज्यांच्या निर्मितीमधील सर्वच बदल एकाच दिशेने व संबंधित स्वरूपात होत नसतील अशा संचयी प्रक्रिया समाजपद्धतीत अंतर्भूत असू शकतील.

अशा विरोधी बदलात, एक नवा शब्दप्रयोग वापरून सांगावयाचे तर, ज्यांना, "बाह्य काटकसरीचा अभाव" म्हणून ओळखता येईल असे बदल असतात. उदाहरणार्थ, आर्थिक भरभराटीच्या केंद्राच्या परिस्थितीत अंतर्भूत असलेल्या घटकांपैकी काही परागतीकडे कल असलेले असू शकतात, किंवा विकासाची विशिष्ट पातळी गाठल्या-नंतर, उद्योगधंदे व लोकवस्ती अतिकेंद्रित झाल्यामुळे सार्वजनिक खर्चात व खाजगी खर्चातही वाढ होऊन, संचयी प्रक्रिया पालटविणारेही असू शकतात. पुन्हा एकदा लोकप्रज्ञेच्या घरगुती शब्दांत सांगावयाचे म्हणजे, "झाडे स्वर्गापर्यंत वाढू शकत नाहीत."

"प्रगल्भ होत जाणाऱ्या अर्थव्यवस्थेत" मागणी घटल्यामुळे निर्माण होणाऱ्या मंदीचे परिणामही याच सदरात मोडतील; अर्थातच महान मंदीच्या काळात, विशेषत: अमेरिकेत, रुजविण्यात आलेला हा निराशावादी सिद्धांत खरा असेल तर; परंतु, काही खास परिस्थिती वगळल्यास, ह्या सिद्धांताच्या अचूकपणाबद्दल मला शंका आहे.

किंवा असेही होऊ शकेल की, भरभराटीच्या केंद्रात वेतन व उत्पादनाच्या इतर घटकांचा मोबदला इतका उच्च थराला जाईल की, इतर प्रदेशांना त्याच्याबरोबर यशस्वी रीतीने स्पर्धा करण्याची संधी प्राप्त होईल. अगर, आर्थिक भरभराटीच्या दीर्घ काळात समृद्ध प्रदेशात जमा झालेला जुन्या भांडवली साधनसामुग्रीचा बराच मोठा साठा, जलद तांत्रिक प्रगतीच्या काळात शक्य तितक्या लौकर काढून टाकणे श्रेयस्कर असताही, तो ठेवण्याचा मोह होण्याची शक्यता असते. शिवाय, आधी प्रारंभ केल्याच्या सुदैवामुळे ज्या देशाने निम-मक्तेदारी दर्जाचा उपभोग घेतलेला असतो त्याची नवोद्योगाची चैतन्यशीलता व जोखीम घेण्याचे धाडस कमी झाल्याचेही आढळून येऊ शकते.[७]

उलट परिस्थितीत, अधोगामी संचयी प्रक्रियेतून बहिर्भूत विरोधी शक्ती निर्माण होऊन ती प्रक्रिया थांबू शकते. लोकसंख्येसंबंधीच्या पारंपारिक सिद्धांतात मालथस्‌ने सांगितलेले कठोर नियंत्रण म्हणजे, लोकसंख्येच्या वाढीमुळे उपजीविकेला आवश्यक असलेल्या पातळीखाली भरणपोषण घसरते आणि त्यामुळे मृत्यूच्या प्रमाणात वाढ होते, हे अशा विरोधी बदलाचे उदाहरण आहे. परागतीच्या वाढीची मर्यादा आणि म्हणून, प्रक्रियेची सर्वांत खालची सीमा ह्या अशा नियंत्रणामुळे प्रस्थापित होते. आर्थिक परागतीच्या दिशेने कार्यान्वित झालेल्या शक्तीमध्ये टिकावूपणा असल्याचे गृहीत धरले तर हा खालच्या पातळीवरील समतोल मात्र खरोखरीच स्थिर राहील. अलिकडे वैद्यकीय शास्त्रात झालेल्या स्फोटक प्रगतीमुळे, रहाणीमान

अत्यंत निकृष्ट पातळीवर असताही मृत्यू टाळणे सहजसाध्य व कमी खर्चाचे झाले आहे, आणि त्यामुळे लोकसंख्येवरील नियंत्रणे कमकुवत झाली आहेत. परिणामतः ह्या परागतीचा समतोल मानवी विपन्नतेच्या अधिकच खालच्या पातळीवर जाऊन पोहोचला आहे.

मागणी-पुरवठा व किंमती यांच्यातील विरोधी बदलांमुळे निर्माण होणाऱ्या समतोलाच्या क्रियाप्रतिक्रियांवर आर्थिक सिद्धांताने प्रमाणाबाहेर लक्ष केंद्रित केले आहे. ह्या क्रियाप्रतिक्रिया स्वाभाविकपणेच, सर्व देशांत व प्रांतांत, अल्प मुदतीच्या काळात, नेहमीच या सिद्धांतानुसार, कमीअधिक प्रमाणात घडत असतात. परंतु त्या बहुधा पृष्ठभागावरील लहरींप्रमाणे वरवरच्या असतात.

सर्वसाधारणतः अधिक प्राथमिक बदलांच्या अपेक्षेमुळे घडून येणारे बदल, त्यांच्या दिशेनेच संचयी प्रक्रिया पुढे नेतात; आणि ही गोष्ट मुख्य प्रमेयाशी जुळणारी आहे. अशा रीतीने, निग्रोंचे रहाणीमान वाढणार आहे ह्या गोऱ्यांच्या अपेक्षेचा कल बहुधा त्यांचे पूर्वग्रह कमी करण्याकडे असतो. अमेरिकेतील दक्षिणेकडील काही प्रांतांत, निग्रोंबरोबर ज्या गोऱ्यांची चढाओढ चालते त्यांच्यात विशेषतः, ह्या अपेक्षेमुळे काही काळतरी, वाढती अप्रीती व पूर्वग्रह निर्माण होतील; ही विरुद्ध प्रकारची दुय्यम प्रतिक्रिया आहे, पण अर्थातच ती समतोल निर्माण करणारी नाही.

चढत्या किंमतीमुळे लोक जेव्हा आणखी किंमती वाढतील अशी अपेक्षा करतात, तेव्हा त्यांचा कल बहुधा अधिक खरेदी व कमी विक्री करण्याकडे असतो; त्यामुळे किंमतींची वाढत जाण्याची प्रवृत्ती अधिक बळकट होते; आणि ही गोष्ट चक्राकार कार्यकारणभावाच्या आपल्या अनुभवाशी जुळणारी आहे. किंमती स्थिर होण्यापासून दूर जाणाऱ्या अर्थव्यवस्थेच्या संचयी क्रियेच्या पुढील अवस्थांमध्ये ह्या प्रक्रियेला गती प्राप्त होण्याचे मुख्य कारण अपेक्षाच असतात, असे विकसेलनो प्रतिपादन केले आहे.[८] अर्थात सिद्धांतावरील विश्वासामुळे अगर आधीच्या अनुभवामुळे, किंमती-वाढीनंतर किंमती पडतील अशी अपेक्षाही लोकांत निर्माण होण्याची शक्यता आहे; आणि त्यामुळे मग अर्थातच उलट परिणाम घडतील.

प्राथमिक बदलाला प्रतिसाद म्हणून विभिन्नरीत्या संबंधित, विविध प्रकारचे बदल होऊ शकतात याची नोंद कोणत्याही सामाजिक प्रक्रियांच्या वास्तववादी अभ्यासात घ्यावी लागते; आणि हे बदल कधीकधी परस्परांत अशा रीतीने गुंतलेले असतात की ते एकमेकांना विरोध करतात. तरीसुद्धा, काहीशा दीर्घकालीन मुख्य प्रवृत्तींचा विचार करता, बदल मुख्यतः एकमेकांना पुष्टी देतील, आणि अशा रीतीने त्यांच्या एकूण परिणामांच्या दृष्टीने संचयी होतील.

सर्वसाधारण व्यापारधंद्याच्या परिस्थितीतील बदल

तरीसुद्धा ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, दीर्घकाल टिकणारे बदल हे अल्प-

मुदतीच्या साखळी बदलांचे केवळ संचयी परिणाम असतात; एखाद्या देशातील सर्वसाधारण व्यापारधंद्याच्या परिस्थितीत घडणारे अल्पकालीन चढउतारही असेच असतात. संपूर्ण आर्थिक क्षेत्रात भरभराटीला जोर आलेला आहे, असा अर्थ तेजीमध्ये अभिप्रेत असतो. तेजीचे सर्वांत बलिष्ठ परिणाम प्रस्थापित औद्योगिक केंद्रांतच बहुधा दिसून येतील, परंतु दुसऱ्या ठिकाणीही तिच्यामुळे अनेक नव्या प्रारंभांना उत्तेजन मिळेल, किंवा पूर्वी प्रारंभ होऊन आता गती मंदावल्यामुळे मागे पडत असलेल्यांना ती चेतना देईल. तेजीमुळे बहुश: प्रसारीत परिणामांचे सापेक्ष सामर्थ्य वाढेल; मंदीमुळे ते कमी होईल.

सर्वसाधारण उद्योगधंद्यांच्या परिस्थितीमधील बदलांचा पारंपारिकतेने व्यवसायातील तेजीमंदीच्या चक्राची वा आर्थिक अरिष्टाची समस्या म्हणून उल्लेख केला जातो; आणि ह्या बदलांचे चक्राकार स्वरूप कधीच नाहीसे झाले असूनही ती परंपरा चालू राहिली आहे. याचे कारण अर्थातच हे आहे की, पद्धतीतील स्वयं-निर्मित बदल, जरी स्थल-कालाच्या दृष्टीने एकत्र नसले तरी ते, विरोधी स्वरूपाचेच असतात, हे आपण मान्य केलेले असते; आणि म्हणूनच ह्या प्रश्नाचा मी ह्या भागात उल्लेख करीत आहे. आर्थिक अरिष्टासंबंधीचे संशोधन कालक्रमाच्या वर्चस्वाखाली चालते: कालाच्या एका टप्प्यापासून अगर एका कालखंडापासून दुसऱ्या कालखंडापर्यंतच्या अवधीमधील एकूण बदलांवर लक्ष केंद्रित केले जाते, परंतु भौगोलिक अवधीमधील वैचित्र्याकडे दुर्लक्ष करण्यात येते, किंबहुना भौगोलिक अवस्थांत निरनिराळ्या काळांत होणाऱ्या बदलांकडेही लक्ष दिले जात नाही.

आर्थिक विकासाच्या दृष्टीने विशेष परिणामकारक असलेल्या सर्वसाधारण व्यापारधंद्यांतील बदलांवर भर देऊन संशोधन केल्यास ते अधिक हितप्रद ठरेल असा मला विश्वास वाटतो. प्रांतांच्या व विभागांच्या विभिन्नतेबद्दलचे संशोधन, सर्वसाधारण उद्योगधंद्यांच्या परिस्थितीत बाजारपेठेच्या क्रियाप्रतिक्रियांच्या प्रभावाखाली बदल घडत असताना, ह्या प्रांतीय व विभागीय विभिन्नतेत घडणारे बदल यांचे संशोधन, त्यात अंतर्भूत असेल.

संदर्भ टिपा :

१. हे विधान पुढील भागात स्पष्ट करण्यात येईल.

२. जेव्हा ही प्रक्रिया पूर्ण होते तेव्हा सरासरी प्रसवशक्ती अधिकही असेल किंवा वाढतही असेल, परंतु आर्थिक व सामाजिक दर्जाशी तिचे संबंध त्यावेळी विधायक असतात, विघातक नसतात.

३. इटलीच्या दक्षिणेतील राजकीय व शासकीय केंद्रांच्या बरखास्तीमुळे ह्या प्रक्रियेला अनुकूल परिस्थिती व उत्तेजन मिळाले; उत्तर इटलीमधील केंद्रे तेव्हा औद्योगिक हितसंबंधियांच्या हल्लीपेक्षा अधिक कचाटयात होती आणि त्यांनी संपूर्ण

देशाचे पुढारीपण बळकाविले. वास्तविक इटलीचे हे एकीकरण म्हणजे उत्तरेने दक्षिण जिंकून ताब्यात घेण्याचाच प्रकार झाला. ऐक्याच्या या प्रक्रियेत राज्यसंस्था कोणती भूमिका पार पाडते यासंबंधीचा विचार पुढील प्रकरणात करण्यात येईल.

अशाच प्रकारचे दुसरे अधिक मोठ्या प्रमाणावरील उदाहरण, अमेरिकेतील दक्षिणेकडील राज्यांच्या, यादवी युद्धापासून दुसऱ्या महायुद्धापर्यंतच्या काळात झालेल्या, दीर्घकालीन आर्थिक परागतीचे आहे. मी ५व्या प्रकरणात विवेचन केल्याप्रमाणे, प्रदेशाप्रदेशांत भेदभाव करण्याचा हा व्यापाराचा पद्धतशीर कल, राज्यकर्ता देश व त्याच्या वसाहती यांच्यातील आर्थिक संबंधामधील शोषणयंत्रणेचाच भाग असतो.

४. इटलीच्या राजकीय एकीकरणाच्या वेळी उत्तर इटलीमधील उद्योगधंद्यांना मिळालेल्या स्पर्धात्मक बलवत्तर स्थानाचे एक कारण तेथील शेतीव्यवस्थादेखील अधिक विकसित होती या वस्तुस्थितीवर आधारलेले आहे.

प्राध्यापक जेकब वायनर यांनी पुढील प्रशंसनीय मुद्दा मांडला आहे. ते म्हणतात : "गरीब देशातील खरा प्रश्न शेतीचा नसतो, किंवा कारखानदारीचा अभाव हा नसतो, तर दारिद्र्य व मागासलेपणा, दरिद्री शेती व दरिद्री कारखानदारी हा असतो." "आंतरराष्ट्रीय व्यापार व आर्थिक विकास" (इंटरनॅशनल ट्रेड अँड एकॉनॉमिक डेव्हलपमेंट), क्लेरेन्डन प्रेस, ऑक्सफर्ड, १९५३, पान ५२. रॉल प्रेबिश व ज्या इतरांनी, आर्थिक विकासाच्या कार्यक्रमात औद्योगीकरण हा आवश्यक व मुख्य आधार असल्याचे प्रतिपादन केले आहे त्यांच्यावर टीका करताना वायनर यांनी वरील मुद्दा मांडला आहे. पण त्यांचे खंडन अत्यंत ठोकळेबाज असून, समतोलापासून ढळलेल्या अर्थव्यवस्थेत सुधारणा घडविण्यासाठी आणि तिला गती देण्यासाठी औद्योगीकरण आवश्यक असते, हा अर्थ त्यांच्या लक्षातच आलेला नाही.

५. "प्रादेशिक विकास व औद्योगिक स्थाननिश्चितीचे युरोपातील प्रश्न"— युरोपची १९५४ मधील आर्थिक पहाणी (प्रॉब्लेम्स ऑफ रिजनल डेव्हलपमेंट अँड इंडस्ट्रिअल लोकेशन इन युरोप", एकॉनॉमिक सर्व्हे ऑफ युरोप इन नाइन्टीन फिफ्टीफोर), जिनिवा, १९५५, पा. १३६ व पुढे.

६. जर तक्त्यामध्ये वापरलेली प्रदेशांची शासकीय विभागणी अभ्यासाच्या प्रश्नाला धरून केलेली असती तर प्रत्येक देशातील विषमताच केवळ नव्हेत, तर देशादेशांतील सापेक्ष विषमतांमधील फरकही फार मोठा असल्याचे स्पष्ट दिसले असते.

७. भरभराटीची गती मंदावणारे अशा तऱ्हेचे घटक, दोन महायुद्धांच्या दरम्यान युरोपमध्ये कार्यान्वित झाले होते; त्यांचे पृथक्करण प्राध्यापक इन्गवर स्वेनिलसन यांच्या "युरोपियन अर्थरचनेतील वाढ व परागती"—संयुक्त राष्ट्रसंघाचे युरोपसाठीचे आर्थिक मंडळ (ग्रोथ अँड स्टॅग्नेशन इन द युरोपियन एकॉनॉमी—युनायटेड

नेशन्स एकॉनॉमिक कमिशन फॉर युरोप), जिनिवा, १९५४–या पुस्तकात पहावयास सापडते.

८. विकसेल यांचे किंमती स्थिर करण्याच्या धोरणाचे ध्येय बाजारपेठेतील शक्तींच्या क्रियाप्रतिक्रियांमुळे साध्य होणारे नव्हते, तर बुद्धिपुरस्सर अंगिकारलेल्या आर्थिक धोरणामुळे ते साध्य होईल अशी त्यांची अपेक्षा होती.

प्रकरण ४ थे

राज्यसंस्थेचें कार्य

श्रीमान देशातील राज्यसंस्थांची समताविषयक धोरणे

पश्चिम युरोपातील प्रादेशिक विकास व अर्ध-विकास यासंबंधीच्या, अगदी अलिकडील एका अभ्यासाचा, मी मागील प्रकरणात संदर्भ दिला, आणि त्यावरून निघालेल्या पुढील दोन निष्कर्षांवर भर दिला :

(१) श्रीमंत देशांपेक्षा गरीब देशांत प्रादेशिक विषमता फार मोठ्या प्रमाणावर आहेत; आणि

(२) श्रीमंत देशांत प्रादेशिक विषमता कमी कमी होत आहेत; तर गरीब देशांमध्ये याच्या उलट प्रवृत्ती असलेली आढळते.

ह्या दोन विस्तृत अन्योन्यसंबंधांचे स्पष्टीकरण म्हणून मी ही वस्तुस्थिती पुढे मांडली की, प्रत्यक्षपणे साध्य करण्यात आलेल्या आर्थिक विकासाच्या पातळीशी वैशिष्ट्यपूर्ण रीतीने संबंधित असलेले प्रसारीत परिणाम श्रीमंत देशात बलवत्तर व गरीब देशात कमकुवत असतील. त्यामुळे, "ज्याचा तो" या धोरणाखाली गरीब देशातील विषमता मोठ्या होतील व वाढतील. अत्यंत श्रीमंत देशात प्रत्याघाती परिणामांपेक्षा प्रसारीत परिणाम सरासरीने अधिक बलवान असतील, आणि परिणामी, बाजारपेठेच्या क्रियाप्रतिक्रियांमुळे विषमता खरोखरीच कमी होऊ लागतील; अशा परिस्थितीची आपण कल्पना करू शकतो.

ह्या दोन विस्तृत अन्योन्यसंबंधांचे स्पष्टीकरण देणारी आणखी एक महत्त्वाची वस्तुस्थिती आहे, ती ही की, पश्चिम युरोपातील श्रीमंत देश, अलिकडील पिढ्यांत निरपवादपणे "कल्याणकारी राज्यसंस्थे"प्रत पोहोचले आहेत. ह्या देशांतून प्रादेशिक समानतेकडे रोख असलेली शासकीय धोरणे कार्यान्वित करण्यात आलेली आहेत, आणि प्रत्याघाती परिणाम निर्माण करणाऱ्या बाजारपेठेच्या क्रियाप्रतिक्रिया थांबविण्यात आल्या असून, प्रसारीत परिणामात परिणत होणाऱ्यांना पुष्टी देण्यात आली आहे.

उलट, गरीब देशांत अशी धोरणे कमी असतात, बाजारपेठेच्या क्रियाप्रतिक्रियांना तेथे अधिक मोकळा वाव असतो—आणि आपण पूर्वी पाहिल्याप्रमाणे, तेथील प्रसारीत परिणाम सामान्यत: कमकुवत असल्यामुळे, प्रादेशिक विषमता निर्माण करण्यास ते अधिक समर्थ ठरतात. गरीब देशांपैकी अनेक देशांत विषमतेकडे असलेला स्वाभाविक ओघ, अंतर्भूत सरंजामदारी व विषमतेला पोषक असलेल्या इतर संस्था-संघटनांमुळे आणि गरिबांचे शोषण करण्यास श्रीमंतांना सहाय्य करणाऱ्या सत्ता-केंद्रामुळे अधिक वाढला आहे आणि वेगवान झाला आहे.

गरीब व श्रीमंत देशांच्या सरकारांच्या धोरणात हा फरक का पडतो याचे स्पष्टीकरण देताना आपल्याला पुन्हा एकदा चक्राकार कार्यकारणभावाचा निर्देश करावा लागतो. एकतर गरीब देश गरीब रहाण्याचे अंशत: कारण हे आहे की, अलिकडील पिढयांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेला पोषक धोरणे सुरू करण्याचे प्रयत्न तेथे कमकुवत राहिले आहेत, उलट, अशी धोरणे अधिक जोरदारपणे कार्यान्वित करून श्रीमंत देशांनी त्यांची आर्थिक प्रगती टिकवून धरली आहे. प्रसारीत परिणामांच्याप्रमाणे ह्या बाबतीतही, देशातील मानवी साधनसामुग्री कमी किंवा अधिक पूर्णांशाने वापरण्याचाच हा प्रश्न आहे.

आधुनिक कल्याणकारी राज्यांची समतानिष्ठ धोरणे कमी खर्चाची नाहीत. देशातील गरीब विभागांना मिळणाऱ्या फायद्यांना अनुरूप इतका त्याग, निदान तात्पुरता तरी, श्रीमंत विभागांना करावा लागतो. प्रसारीत परिणामाच्या कमकुवतपणामुळे गरीब देशांत अधिक विषमता निर्माण झालेल्या असल्यामुळे त्यांना समानतेच्या धोरणांची आवश्यकता अधिक असते, परंतु अशा धोरणांना तेथे अधिक अडचणी येतात. संचयी प्रक्रियेतील चक्राकार कार्यकारणभावाचे हे आणखी एक उदाहरण आहे: पुन्हा एकदा, "दारिद्र्याचे कारण दारिद्र्य असते," हे दिसून येते.

उलट, श्रीमंत देशांत, आर्थिक प्रगती व उत्पन्नाची चढती पातळी असल्यामुळे प्रत्येकाला अधिक मोकळीक प्राप्त होते, आणि त्यामुळे बुद्धिनिष्ठ औदार्याच्या ध्येयांना अधिक जोर येतो. लोक जेव्हा सुखवस्तू असतात आणि त्यांच्या जीवनात स्थैर्य असते, तेव्हा सवलती सोडण्यास व इतरांना बाजूला ठेवणारे अडथळे दूर करण्यास आपल्याला वाव आहे असे त्यांना वाटते, आणि सर्वांसाठी खर्चाचा भार सोसण्यास ते तयार होतात. ह्या प्रक्रियेतून पुढे सतत आर्थिक प्रगतीचा पाया बळकट बनत जातो.

कार्यकारणभावाच्या पद्धतीत—बाजारपेठेच्या शक्ती व शासकीय धोरणे—हे दोन प्रकारचे प्रभाव आणखी एका रीतीने परस्परांत गुंतलेले असतात. बलवान प्रसारीत परिणामांमुळे प्रत्याघाती परिणामांना परिणामकारक प्रतिकार झाल्या कारणाने—आणि त्यामुळे प्रादेशिक विषमतांची प्रवृत्ती कमी झाल्या कारणाने—समतेच्या धोरणांना अधिक मजबूत राजकीय पाया तयार होतो. आणि पुढे, अशा धोरणांमुळे जेव्हा अधिक समता निर्माण होते, तेव्हा, विकसित होत असलेल्या लोकशाहीचा पाया

अधिक मजबूत होत जातो. उलट परिस्थितीत, गरीब देशांतील प्रसारीत परिणामांच्या कमकुवतपणाला अनुरूप अशी अधिक मोठी आर्थिक विषमता तेथे निर्माण होते; आणि ती परिणामकारक लोकशाहीच्या विकासाला मारक असते—परंतु गरीब देशांना विशेषेकरून आवश्यक असलेल्या समतेच्या धोरणांना अशी लोकशाही सत्तेचा आधार होऊ शकली असती, कारण प्रसारीत परिणामांचा तौलनिक कमकुवतपणा आणि प्रत्याघाती परिणामांचे सामर्थ्य तेथे मोठे असते.

सर्वसाधारणपणे, आर्थिक विकासाच्या खालच्या पातळीवर प्रसारीत परिणाम तौलनिकदृष्टचा कमकुवत असल्यामुळे, बाजारपेठेच्या स्पर्धात्मक शक्ती, चक्राकार कार्यकारणभावाने, प्रादेशिक विषमता सतत वाढवीत असतील; विषमता आर्थिक विकासाला रोखून धरतील; आणि त्याचबरोबर समतेच्या धोरणांसाठी लागणारा सत्तेचा पाया कमकुवत करतील.-आर्थिक विकासाची उच्च पातळी प्रसारीत परिणाम समर्थ बनवील आणि प्रादेशिक विषमतांकडे होणारी घसरगुंडी थोपवून धरील; त्यामुळे आर्थिक विकास टिकून राहील, आणि त्याचबरोबर प्रादेशिक विषमता कमी कमी करण्याच्या धोरणासाठी अधिक अनुकूल परिस्थिती निर्माण करील. राष्ट्रीय सरकारची परिणती अधिक परिपूर्ण लोकशाहीकडे जाण्याच्या ध्येयाने प्रेरीत झालेल्या, आणि तौलनिकदृष्टचा सुखवस्तू असलेल्या गटांच्या व प्रदेशांच्या सुसह्य त्यागाच्या सहाय्याने मोठचा प्रमाणावर समतेची धोरणे कार्यान्वित करण्यास आवश्यक इतकी मुबलक साधनसामुग्री जवळ असलेल्या कल्याणकारी राज्याचे स्वरूप राष्ट्रीय सरकारास येणे आवश्यक आहे: हे ज्या प्रमाणात परिणामकारक रीतीने होईल, त्या प्रमाणात प्रादेशिक विषमतांमध्ये परिणत होणाऱ्या बाजारपेठांच्या आंधळचा शक्तींचा प्रतिकार करण्याची चेतना व सामर्थ्य दोन्ही त्या सरकारास प्राप्त होतील. आणि त्यामुळे पुन्हा देशातील आर्थिक विकासाला जोर येईल, आणि असेच पुन्हा पुन्हा चक्राकार कार्यकारणभावाने घडत राहील.

ही विधाने व्यापक व सर्वसाधारण स्वरूपाची आहेत आणि "सिद्धांत" अशा स्वरूपाचे असू शकतात. विहंगावलोकनात सामाजिक वस्तुस्थितीचे घटक जो आकार धारण करताना दिसतात त्याचे त्यात आकलन असते. नैसर्गिक साधनसामुग्री व देशातील तिचे वाटप, आंतरराष्ट्रीय संबंध, उत्पादन कार्याच्या राष्ट्रीय परंपरा, राष्ट्रीय व विभागीय ऐक्य, धर्म व विचारसरणी आणि आर्थिक, सामाजिक व राजकीय पुढाकाराची वृत्ती व नेतृत्व इत्यादी इत्यादींमधील फरकांमुळे प्रत्येक देश, प्रत्येक प्रदेश व खरे म्हणजे प्रत्येक व्यक्ती यांचे खास गुणधर्म व परिस्थिती मोठचा प्रमाणावर विविधता निर्माण करतील. परंतु, चक्राकार कार्यकारणभावाच्या संचयी क्रमाविषयीच्या सर्वसाधारण दृष्टिकोनात त्या सर्वांचा समावेश होऊ शकतो; मात्र समतोलाच्या विचारांच्या प्रभावाखाली असलेल्या आपल्या परंपरागत सिद्धांतात आणि "आर्थिक" व "बिन-आर्थिक" भेदांवर आधारलेल्या सिद्धांतात त्यांचा

अंतर्भाव होऊ शकत नाही.

"जुलुमी राज्यसंस्था"

"राज्यसंस्था" हा शब्दप्रयोग या ठिकाणी अशा अर्थाने वापरला आहे की त्यात बाजारपेठेच्या शक्तीमध्ये करण्यात येणाऱ्या सर्व संघटित हस्तक्षेपांचा समावेश होतो. अशा शब्दप्रयोगाच्या वापराच्या समर्थनार्थ ही वस्तुस्थिती सांगता येते की, आधुनिक काळात राज्यसंस्था ही वास्तविकपणे ह्या संघटित समाजाचा मुख्य आविष्कार बनली आहे, आणि देशातील इतर बहुतेक सर्व संघटना व ताकदवान गट यांच्याकडून होणाऱ्या हस्तक्षेपांचे नियंत्रण करणारी चौकट म्हणून प्रस्थापित झाली आहे.

अशा समावेशक अर्थाने राज्यसंस्थेचे पारंपारिक कार्य, विषमतेकडे प्रवृत्ती असलेल्या संचयी प्रक्रियेला पाठिंबा देण्याचे साधन म्हणून मुख्यत: उपयोगी पडण्याचे होते. आर्थिकदृष्टया विकसित व श्रीमंत असलेले प्रदेश व गट आपापले प्रयत्न संघटित करण्यात अधिक कार्यक्षम व परिणामकारक होते आणि इतरांच्या संघटित प्रयत्नांना पायबंद घालण्याची साधने ही बहुधा त्यांच्याजवळ होती, आणि म्हणून—संघटित समाज ह्या अर्थाने—राज्यसंस्था हे त्यांच्या हातातील स्वहित साधण्याचे साधन बनली.

सरंजामशाही समाज हा, जमिनींचा ताबा मिळविण्यासाठी आणि शेतकऱ्यांवर कर बसविण्यासाठी सत्ता हस्तगत करण्याचा श्रीमंत व बलवान लोकांनी केलेला प्रचंड कट होता. त्यात सभोवतालच्या ग्रामीण विभागांवर शहरे आपल्या "हक्कांची" जबरदस्तीने अंमलबजावणी करीत: शहरातील व्यापारी व उद्योगपती बाहेरच्या स्पर्धेपासून स्वत:चे संरक्षण करीत. शहरातील श्रीमंत वर्ग गरीब वर्गांपासून परिणामकारक रीतीने स्वत:चे संरक्षण करीत: व्यापारप्रधान राज्यव्यवस्थेतच केवळ नव्हे तर त्यापूर्वीही, कामगार विषयक कायदे कामगारांच्या विरुद्ध होते आणि त्यांचा मुख्य उद्देश वेतन कमी ठेवणे व कामगारांचा पुरवठा सतत चालू ठेवणे हा होता.

म्हणून आद्य अर्थशास्त्रज्ञांची कडवी राज्यसंस्थाविरोधी व संघटनाविरोधी भूमिका त्यांच्या काळातील खरोखरी "उदारमतवादा"ची भूमिका होती. साधारणत: "जुलुमी राज्यसंस्था" म्हणून जिचे वर्णन करता येईल त्या औद्योगिक-पूर्वकालीन राज्यसंस्थेच्या निषेधार्थ त्यांनी त्यांचे सर्व सिद्धांत तयार केले होते.

ह्या "जुलुमी राज्यसंस्थे"चे श्रीमंतांना गरिबांपासून संरक्षण देणारे बरेचसे कायदे औद्योगिक क्रांतीच्या पहिल्या अवस्थांमध्ये मोडले गेले. परंतु बऱ्याच दीर्घ-काळपर्यंत आर्थिक समतेकडे वाटचाल झाली नाही. औद्योगीकरणाच्या प्रारंभीच्या अवस्थांमधील दु:खी कामगार-जीवनाच्या अभ्यासाने मार्क्स व एंजल्स यांच्या क्रांतिकारक विचारसरणीचा पाया घातला; आणि डिकन्स, झोला व १९व्या शतकातील इतर अनेक सामाजिक कादंबरीकारात त्यामुळेच चीड व स्फूर्ति निर्माण झाली.

भांडवलशाहीच्या आरंभीच्या, लोकशाहीपूर्व व व्यक्तिनिष्ठ काळात, जलद आर्थिक विकासासाठी आवश्यक असलेल्या मोठ्या प्रमाणावरील बचतीचे व व भांडवल-निर्मितीचे साधन लोकांचे जीवनमान खालच्या पातळीवर ठेवणे हे होते. त्या काळात वाढत्या लोकसंख्येला जोर आला आणि शेतीमधील तांत्रिक प्रगतीमुळे कामगार पुरवठा इतका भरपूर झाला की, व्यापारी हितसंबंधनिष्ठ कायद्यांच्या सहाय्याशिवायच, केवळ बाजारपेठेच्या शक्तींच्या मुक्त व्यवहाराच्या जोरावर, वेतन खालच्या पातळीवर ठेवणे शक्य झाले.

अर्धविकसित प्रदेशांच्या आर्थिक विकासासाठीच्या धोरणांचा दीर्घ इतिहास

परंतु, अत्यंत गरीब व सगळ्यांत अप्रगत देशांतही, विषमतेच्या प्रवृत्तीला प्रतिबंध करण्यासाठी अधूनमधून शासनाकडून धोरणात्मक कार्ये केली जात होती, याकडे दुर्लक्ष करता कामा नये,.

हक्कविहीन लोक अधिक समतेसाठी आग्रह धरीत. अनादिअनंत काळापासून, श्रीमंतांविरुद्ध गरिबांनी केलेल्या, शहरांविरुद्ध शोषित ग्रामीण विभागांनी केलेल्या, जमीनदारांविरुद्ध शेतकऱ्यांनी केलेल्या उठावांची इतिहासात नोंद झालेली आहे. अशा यशस्वी झालेल्या हक्कविहिनांच्या उठावांना शासनाची मान्यता मिळत असे.

स्वीडनमध्ये कित्येक शतकांपूर्वीपासून अनेकदा "जमीन-सुधारणा" घडविल्या गेल्या आहेत, आणि अर्धविकसित देशांत आता अंमलात आणल्या जातात अगर योजिल्या जातात त्यापेक्षा त्या सुधारणा पुष्कळदा अधिक मूलगामी असत. स्वीडनच्या घटनेत जे शब्द अभिमानाने लिहिलेले आहेत त्यांचे भाषांतर साधारणतः पुढीलप्रमाणे करता येईल : "फक्त तिच्या खुल्या संमतीने कर बसवले जावेत असा जो अत्यंत प्राचीन काळापासून स्वीडनच्या जनतेला हक्क आहे त्याची अंमलबजावणी लोकसभेकडून केली जाते." स्वीडनमध्ये जमीनदारांचे हक्क शेतकऱ्यांच्या उठावांनी नेहमीच मुळापासून उखडून टाकले आहेत. तेथील शेतकऱ्यांनी त्यांचे जमीनधारणेचे हक्क शतकानुशतके शाबूत राखले व त्याबरोबरच त्यांनी त्यांचे नागरिक-स्वातंत्र्यही जतन केले, ह्या महत्त्वाच्या व अद्वितीय ऐतिहासिक वस्तुस्थितीला निर्देशून वरील विधान घटनेत घालण्यात आले आहे.

फार पूर्वकाळापासूनच, राष्ट्रीय सरकारे जेव्हा अस्तित्वात आली तेव्हा ती बहुधा नेहमीच लोकप्रियतेवर अंशतः विसंबून असत, आणि म्हणूनच जवळजवळ नेहमीच ती प्रादेशिक विषमतांच्या प्रवृत्तीविरुद्ध काही प्रमाणात विरोधी शक्तीचा वापर करीत. प्रत्येक राष्ट्रीय सरकार काही सामान्य सुखसोईंची जबाबदारी घेत असे, मागासलेल्या विभागात रस्ते बांधण्याची व तांत्रिक ज्ञानाची पातळी वाढविण्याची जबाबदारी उचलीत असे, परंतु गरीब देशांमध्ये अशा कामासाठी असलेल्या अपुऱ्या सार्वजनिक

निधीपैकी बेसुमार मोठा हिस्सा त्यातील समृद्ध विभागासाठी उपयोगात आणला जात असे.

रेल्वेंच्या नियोजनात, मी पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे, अल्पकालीन फायद्याच्या दृष्टिकोनामुळे, समृद्ध प्रदेशांचाच फायदा झाला. परंतु प्रथमपासूनच बहुतेक देशांमध्ये दुसराही एक उद्देश परिणामकारक असल्याचे आढळते, तो म्हणजे अर्धविकसित देश व्यापारासाठी खुले करण्याचा; आणि मालाच्या वहातुकीचे दर काही प्रमाणात हा उद्देश लक्षात घेत असत. वीज-निर्मितीच्या केंद्रांच्या उभारणीच्या व तिच्या वाटपाच्या बाबतीतही हीच स्थिती आढळते. बँकांचा विकास होत असताना, त्यांच्या कार्य-नियंत्रणाच्या नियमात प्रथमपासूनच, कमी औद्योगीकरण झालेल्या प्रदेशांच्या हिताच्या दृष्टीने भांडवली साधनसामुग्रीवर काही प्रमाणात नियंत्रण ठेवण्याची थोडीशी काळजी पुष्कळदा घेण्यात येई, नंतरच्या काळात अर्थव्यवहाराच्या खास संस्था स्थापन करण्यात आल्या आणि त्यांच्या कर्जासंबंधीच्या विशिष्ट गरजा पुरविण्यासाठी त्यांना आर्थिक मदत देण्यात येऊ लागली.

सागरी वहातुकीमध्ये झालेल्या क्रांतीमुळे युरोपातील शेतकऱ्यांना तीव्र स्पर्धेला तोंड द्यावे लागले, परिणामी शेतीकाम करणाऱ्यांना इतर कामगारांपेक्षा पुष्कळ कमी पैसे मिळू लागले, तेव्हा अनेक देशांच्या आर्थिक धोरणांत शेतमालाच्या किंमतींना संरक्षण देण्याचा अंतर्भाव करण्यात आला. गतिशून्य प्रदेशांत नवीन उद्योगधंदे सुरू करण्यासाठी व अस्तित्वात असलेल्यांना संरक्षण देण्यासाठी बहुतेक देशांत सर्वसामान्यपणे यापूर्वीपासूनच उपाययोजना होत्या. अन्यत्रवासी जमीनदारांपासून कुळांना संरक्षण देण्यासाठी, आणि जलशक्ती व वनसंपत्तीचा फायदा घेणाऱ्या मोठ्या कॉर्पोरेशन्सपासून शेतकऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी कायदे करण्यास काही देशांतून आधीच सुरवात झाली होती.

ही धोरणे कमकुवत होती, विशेषतः आता गरीब व तुलनेने अवरुद्ध देशांत अधिकच कमकुवत होती, आणि श्रीमंत प्रदेशांच्या हिताला अनुकूल धोरणांचा त्यांच्यावर वरचष्मा होता. परंतु कोणत्या ना कोणत्या प्रकारे ती नेहमी अस्तित्वात असत. खरे म्हणजे, अर्ध-विकसित प्रदेशांच्या आर्थिक विकासाची धोरणे राष्ट्रीय सरकारांइतकीच पुरातन आहेत.

प्रादेशिक समतेसाठी चाललेल्या प्रयत्नांच्या उपाययोजनांची मुख्य साधने राष्ट्रीय लोकसभा होत्या. त्यांचा जसा विकास झाला आणि तक्रारींना अभिव्यक्ती देण्याचे त्या जशा व्यासपीठ बनत गेल्या तसा ह्या धोरणांचा प्रवाह अधिक गतिमान झाला. मतदानाची मर्यादा कोणतीही ठरविली तरी गरीब मतदारच अधिक असतात आणि सापेक्षतेने गरीब असलेले तर बहुसंख्य असतात. म्हणून सत्ता हस्तगत करण्यासाठी राजकीय पक्षांना प्रादेशिक समतेला अनुकूल असलेल्या सुधारणांना चालना द्यावी लागली; पुढे मतदारांची संख्या क्रमशः वाढत गेल्यानंतर तर तसे करणे अधिकच

आवश्यक झाले.

लोकप्रिय आंदोलनांनी व आस्थेवाईक संस्थांनी महत्त्वाचे कार्य केले. हक्कदार-वर्गांतील काही व्यक्ती दुसऱ्या बाजूला जाऊन मिळाल्या आणि त्यांनी गरिबांचे नेतृत्व केले. अधिक प्रगत राष्ट्रांनी, गरीब प्रदेशांना व गरीब वर्गांना सर्वसाधारणतः अनुकूल असलेल्या कायद्यांच्या व नियंत्रणांच्या अधिकाधिक गुंतागुंतीच्या पद्धती विकसित केल्या.

सार्वजनिक निधीमधून अधिकाधिक कामासाठी पैशांची तरतूद करणे, आणि आर्थिक जबाबदारी स्थानिक समाजाकडून प्रांताकडे व दोहोंकडून सरकारकडे अशा रीतीने, अधिक मोठ्या घटकांकडे, अंशतः किंवा संपूर्णपणे सोपविणे हा समानतेच्या उपाययोजनांचा बऱ्याच अंशी प्रमुख प्रकार बनला. रस्ते बांधणी व रस्ते दुरुस्ती, रुग्णालये व औषधोपचार केंद्रांची सोय, स्वच्छता राखण्याची जबाबदारी, आरोग्याचे संरक्षण, शिक्षण ह्या क्षेत्रांत हे हळूहळू सुरू झाले. त्याचबरोबर नगरपालिकांनी उपलब्ध करून दिलेल्या किमान सार्वजनिक सुखसोईंच्या अंमलबजावणीची सक्ती करण्यात आली आणि प्रांत व स्थानिक जमाती यांच्यातील विषमता दूर करण्याच्या योजना चढत्या श्रेणीची करपद्धती अंमलात येण्याआधीच सर्वसाधारण करपद्धतीत अंतर्भूत करण्यात आल्या. गरीब प्रदेशात व्यावसायिक प्रशिक्षणाच्या संस्था, बाजारपेठेत अधिक सुलभ प्रवेश, कर्जे व अशाच इतर सवलती वाढल्या आणि त्या अधिक दृढ करण्यात आल्या.

जवळजवळ एका शतकापूर्वीच प्रगत देशात सामाजिक सुरक्षिततेच्या सुधारणांच्या दिशेने विकास सुरू झाला आणि त्यानंतर दोन-तीन दशकांनी चढत्या श्रेणीची कर-पद्धती आली; प्रांताप्रांतांतदेखील समता आणण्याच्या कार्याला ह्या दोन महान धोरणात्मक प्रवृतींनी फार मोठा जोरदार हातभार लावला.

"जुलुमी राज्यसंस्थे"कडून "कल्याणकारी राज्या"त झालेल्या श्रीमंत देशांच्या ह्या विकासाचे, श्रीमंत देशांची आर्थिक प्रगती व संचयी सामाजिक प्रक्रियेचा भाग म्हणून तिचे स्वरूप, यांच्या आंतरसंबंधांच्या दृष्टिकोनातून खोलवर तौलनिक विश्लेषण केल्यास ते मोठे फलदायी कार्य होईल, असा मला विश्वास वाटतो. निर-निराळ्या देशांत अनेक देशविशिष्ट फरक, विशेषतः काळाच्या दृष्टीने, असतील; तरीदेखील ऐतिहासिक विकासक्रमाचे व्यापक नमुने, त्याचप्रमाणे ज्या सामाजिक, आर्थिक व राजकीय घटकांमुळे ही प्रगतीची प्रक्रिया संचयी बनते तिच्या चक्राकार कार्यकारणभावाची कार्यपद्धती मूलतः समान असतात, हा महत्त्वाचा निष्कर्ष त्या अभ्यासामधून निघेल, अशी मला खात्री वाटते.

मुख्यतः अधिक समान संधीच्या दिशेने हा विकासक्रम पुढे जात असल्याचे आढळून येते आणि ही प्रवृत्ती सर्वकाळी आर्थिक विकासाच्या चढत्या पातळीशी संबंधित राहिलेली आहे. परंतु प्रारंभीच्या भांडवलशाहीच्या, लोकशाहीपूर्व अवस्थेत,

कामगार-पुरवठ्यात झपाट्याने झालेल्या वाढीमुळे व इतर परिस्थितीमुळे, नफा वाढत असताही वेतन कमी राहिले, आणि त्यातून जलद विकासासाठी आवश्यक असलेल्या मोठ्या बचतीची सोय झाली.

असा युक्तिवाद करणे शक्य आहे की, त्या काळात विषमता, व तिचे सातत्य शक्य करणारा लोकशाहीचा अभावदेखील, प्रगतीसाठी आवश्यक होता. "लोक-शाहीची मूल्ये" ह्या विषयावरील एका व्याख्यानात मि. अनुरिन बेवन यांनी, "आज आपल्याला परिचित असलेली लोकशाही ही विसाव्या शतकातील निपज आहे", या मुद्यावर भर दिल्यानंतर, म्हटले आहे की :

"मतदानाचा हक्क सार्वत्रिक असता तर औद्योगिक क्रांतीच्या महत्कृत्यांना मान्यता मिळाली असती की नाही याबद्दल शंकाच आहे. शंका यासाठी आहे की, ज्या भांडवलाच्या संचयाची सुफलिते आज आपण उपभोगित आहोत त्याचा बराचसा मोठा भाग आपल्या वाडवडिलांना न मिळालेल्या वेतनामधून तयार झाला आहे."[१]

ऐतिहासिक दृष्टीने, स्थित्यंतराच्या काळापुरती, ही गोष्ट खरी असली तरी, जे अर्ध-विकसित देश आता आर्थिक विकासासाठी नियोजन करीत आहेत तेथेही अशा समांतर विकासक्रमाची आवश्यकता कदाचित लागणार नाही, किंवा ती इष्ट, व बहुधा शक्यही होणार नाही. ह्या प्रश्नाची चर्चा ७व्या प्रकरणात मी पुन्हा करणार आहे.

"निर्मित सुसंवाद"

काही थोड्या देशांमध्ये आपण आता अशा परिस्थितीपर्यंत येऊन पोहोचलो आहोत की तेथे कोणत्याही मोठ्या सामाजिक गटांना, व परिणामी कोणत्याही प्रादेशिक विभागांना, खऱ्याखुऱ्या अर्थाने दरिद्री रहाण्यास परवानगी दिली जात नाही, आणि त्याहूनही अधिक महत्त्वाचे म्हणजे, तेथे नव्या पिढीला अधिकाधिक समान संधीचा लाभ मिळत आहे.

मी पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे, याचा अर्थ असाही आहे की, संपूर्ण लोकसंख्येची उत्पादनक्षमता तिच्या खऱ्या सुप्तशक्तीच्या सन्निध आणण्यात आली आहे. ज्या सुधारणा झाल्या त्यांनी प्रत्येक वेळी, आद्यअर्थशास्त्रज्ञ ज्याला "उत्पादकघटकांची गुणवत्ता" म्हणत, ती सतत वाढविली आहे. अशा रीतीने राष्ट्रीय उत्पादनाची पातळी उंचावून, आर्थिकदृष्ट्या सुधारणा व्यवहार्य ठरण्यासाठी आवश्यक असलेल्या अधिक साधनसामुग्रीची तरतूद त्यांनी करून दिली आणि त्याचबरोबर, सामाजिक सुधारणांचे धोरण सातत्याने पुढे चालू रहाण्याची हमीही त्यांनी निर्माण केली.

ह्या थोड्या देशांचे वर्णन आता एकात्मता साध्य केलेले देश म्हणून करता येण्याचे मुख्य कारण हे आहे की, तेथे सरकारी हस्तक्षेपांच्या गुंतागुंतीच्या जाळ्यामुळे कोणत्याही प्रदेशाला, उद्योगधंद्याला किंवा सामाजिक गटाला, विकासात फार मागे

रहाण्यास प्रतिबंध केला जातो. ज्या देशांमध्ये स्वातंत्र्याची व समतेची ध्येये ह्या कार्यक्षम सामाजिक शक्ती बनल्या आहेत तेथील राष्ट्रीय ऐक्यभावनेचा सरकारी हस्तक्षेपांना पाठिंबा मिळतो. ह्या ध्येयांची क्रमशः पूर्ती होत गेल्यामुळे त्यांचे सामर्थ्य वाढले आणि त्यामुळे राष्ट्रीय धोरणांसाठी ऐक्याचा पायाही मजबूत झाला.

आर्थिक प्रगतीने भरभराटीच्या गतीच्या प्रसारीत परिणामांना जोर आणला आहे, विषमता कमी केल्या आहेत आणि अशा रीतीने लोकशाहीचा पाया अधिक घनिष्ट बनविला आहे. त्याच बरोबर तिने परस्पर औदार्याला अधिक अनुकूल परिस्थिती निर्माण केली असून तिच्यामुळे समतेच्या शासकीय धोरणांचे कायदे करणे क्रमशः शक्य होत गेले आहे. तसेच ह्या देशातील परिस्थितीच्या साम्यामुळे आर्थिक प्रगती टिकवून धरली गेली आहे.

अशा रीतीने, प्रादेशिक साम्यासहित राष्ट्रीय एकात्मतेची सर्व धोरणे, आर्थिक विकासाच्या संचयी सामाजिक प्रक्रियेची फक्त एक अवस्था दर्शवितात-मात्र ही प्रक्रिया अधिक उच्च अवस्थेची असते असे मानावे लागते, कारण तिच्यात बाजारपेठेच्या विकासाबरोबरच, लोकांची राजकीय वृत्ती, सरकारी हस्तक्षेप, आणि वास्तविकपणे संपूर्ण राजकीय प्रक्रियेचा अंतर्भाव होतो. ह्या देशांमध्ये आता सामाजिक व राजकीय सुधारणा स्वतःच्या गतीने अधिक पुढे जात आहेत, आर्थिक प्रगतीचे एक अविभाज्य अंग म्हणून त्यांचा विकास होता राहिला आहे– आणि आर्थिक प्रगतीसुद्धा काही अंशी त्यांचा परिपाक म्हणून झाली असून ती तशी सतत होत राहिली आहे.

आता "सुधारणा" करण्याची गरज कमी झाली आहे कारण आता त्यांच्यासाठी लढा करण्याची आवश्यकता न रहाता सुधारणा केल्या जातात. उत्पादनात अपेक्षित वाढ झाल्यामुळे वाटपातील संघर्ष किमान होतात आणि त्यांच्या सतत क्रमशः सोडवणुकीची निश्चिती निर्माण होते. सर्वांना काम आहे, अशी परिस्थिती टिकवून धरणे आणि उत्पादन-वाढीला उत्तेजन देणे ही समतेवर अधिकाधिक आधारल्या जाणाऱ्या समाजातील मुख्य धोरणात्मक उद्दिष्टे बनतात आणि त्यांत सर्व प्रदेशांना व जनता-गटांना समान वाटा मिळतो.

ह्यांपैकी काही देशांत मूलभूत धोरणांच्या प्रश्नांवर इतके ऐक्य निर्माण झाले आहे की, त्यांच्या अंतर्गत राजकीय जीवनातील प्रारंभीचे नाटच नाहीसे झाले आहे. ह्या परिस्थितीत राजकीय पक्ष, व्यापारी व व्यावसायिक संघटना व दबाव आणणारे इतर गट अधिकाधिक क्षुल्लक हितसंबंधांवर जनतेचे लक्ष केंद्रित करीत आहेत. खरे म्हणजे स्वतःच्या अस्तित्वाचे समर्थन करण्यासाठी त्यांना तसे करणे भाग पडते. ही वस्तुस्थिती विरोधात्मक वाटेल परंतु ती खरी आहे. हितसंबंधातील सुसंवाद ज्या समाजात पुष्कळच मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात आलेले आहेत तो पुष्कळदा अतिशय परस्पर-असंतोष, आंतर-गट भांडणे व कटकटी यांचे दर्शन घडवितो.

राष्ट्रीय एकात्मतेच्या विकसित अवस्थेचे, वरवर पहाताना तरी निदान हेच

वैशिष्ट्य दिसते; म्हणजे त्या संघटित सामाजिक शक्तींच्या पुढाकाराखाली चालणाऱ्या सार्वजनिक चर्चेमध्ये प्रतिबिंबित होणारी लोकांची वृत्ती तरी तशी दिसते.

सार्वजनिक वादविवादाच्या ह्या पातळीवर जे चालते त्यामुळे लोकांच्या वृत्तीवर काही मर्यादेपर्यंत दबाव येत असला तरी, त्यांच्या सर्व कुरकुरीमागे, गंभीर स्वरूपाच्या तक्रारींच्या अभावाची सामायिक कबुली असते, शांत संतुष्टपणा असतो.

काही देश वैयक्तिक हितसंबंधातील सुसंवादाशी जवळीक निश्चितपणानेच दर्शवितात–तरी तो सुसंवाद, बाजारपेठेच्या नैसर्गिक क्रियाप्रक्रियांनी निर्मिलेला, नैसर्गिक नियमाच्या, उपयुक्ततावादाच्या अगर आर्थिक समतोलाच्या सिद्धांतातील जुना सुसंवाद नाही; बऱ्याच प्रमाणावर तो "निर्मित सुसंवाद" आहे; बाजारपेठेच्या ज्या क्रियाप्रक्रिया अनियंत्रित राहिल्या असता विसंवाद निर्माण करतात त्यांच्याच सहाय्याने, संघटित समाजाने घडवून आणलेल्या धोरणात्मक हस्तक्षेपांनी हा सुसंवाद निर्माण केलेला असतो. आणि हितसंबंधांच्या सुसंवादाची ही जवळीक अत्यंत संकुचितपणाने राष्ट्रापुरतीच मर्यादित असते. कल्याणकारी राज्य राष्ट्रवादी असते.

भावयंत्रणा

भावयंत्रणा वा किंमती ठरण्याच्या पद्धतीबद्दल जाता जाता थोडेसे विवेचन करतो. अत्यंत एकात्मता असलेल्या राष्ट्रवादी राज्यात ज्या परिस्थितीत भावयंत्रणा कार्य करते, तिच्यावर त्या संचयी सामाजिक प्रक्रियेत, निरनिराळ्या हितसंबंधांच्या निमसरकारी बनलेल्या संघटनांचा आणि काही खाजगी व्यापारधंद्यांचाही प्रभाव असतो. मागणी किंवा पुरवठ्यावर आणि परिणामी किंमतींवर प्रभाव पाडण्याइतके हे खाजगी धंदे सामर्थ्यशाली असतात; मुक्त स्पर्धेच्या सिद्धांतामधील गृहीततत्त्वाच्या हे अगदी उलट आहे.

किंमती हातचलाखीने निश्चित केल्या जातात. त्या केवळ बाजारपेठेतील शक्तींचा परिणाम नसतात. एका अर्थाने त्या "राजकीय किंमती" असतात; त्या सरकारी, निमसरकारी व खाजगी संघटना व खाजगी व्यापारधंदा यांच्या नियंत्रण कार्यावरही अवलंबून असतात. किंमती ठरविण्याच्या पद्धतीतील सरकारी हस्तक्षेप एका अर्थाने सर्वात अधिक निर्णायक असतात, कारण, लोकशाहीतील राजकीय प्रक्रियेच्या मार्गदर्शनानुसार, बिन-सरकारी हस्तक्षेपांना नियंत्रित करण्यासाठी, त्यांना शह देण्यासाठी अगर पाठिंबा देण्यासाठी ते केलेले असतात; आणि लोकशाही राजकारणाच्या प्रक्रियेतून निर्माण होणाऱ्या मूल्यांना व ध्येयांना साजेसे एकूण परिणाम घडवून आणण्याच्या हेतूने ते करण्यात आलेले असतात.

ह्या संघटनात्मक चौकटीत किंमतींची पद्धत कार्यान्वित होते आणि बहुधा ती अगदी समाधानकारक रीतीने चालू रहाते; किंबहुना असेही म्हणता येईल की, ह्या

देशांमध्ये भावयंत्रणेला नीट रीतीने कार्यान्वित होण्याची खरी संधी दिली जाते. इतर कमी एकात्मता असलेल्या देशांमध्ये प्रसारीत परिणाम कमकुवत असल्यामुळे व शिवाय तेथील सरकार " नैसर्गिक " शक्तींना अधिक मोकळा वाव देत असल्यामुळे, आणि एकूण सर्वसाधारण गरिबीच्या परिणामी धोरणात्मक हस्तक्षेपाला फारच कमी संधी असल्यामुळे, तेथे अगदी अल्पकालीन बदलही, सार्वजनिक संकटाची परिस्थिती निर्माण करणाऱ्या घटना सुरू करू शकतात.

संदर्भ टिपा

१. लोकशाही मूल्ये (डेमोक्रॅटिक व्हॅल्यूज), फेबियन प्रकाशन, क्र. २८२, लंडन, १९५०.

प्रकरण ९ वे

आंतरराष्ट्रीय विषमता

विश्लेषणासाठी घेतलेली गृहीततत्त्वे

ह्या प्रकरणात मी आंतरराष्ट्रीय विषमतांसंबंधी विचार करणार असून, त्यात पूर्वीच्या दोन प्रकरणांप्रमाणेच, महत्त्वाच्या घटनांचा व कार्यकारणसंबंधांचा विचार करणार आहे; सध्यातरी मी विशिष्ट उदाहरणांचा विचार करणार नाही. अर्ध-विकास व विकासासंबंधीचा जो सर्वसाधारण सिद्धांत मांडण्याचा मी प्रयत्न करीत आहे त्यात, ज्या वस्तू व जे संबंध सामान्य व महत्त्वाचे असतील त्यांचे स्पष्टीकरण व्हावे; त्याचबरोबर विशिष्ट अर्ध-विकसित देशांच्या खास परिस्थितीला मूर्तस्वरूपाच्या उत्तरोत्तर अवस्थात समाविष्ट करून घेण्यास तो समर्थ ठरावा, अशी या प्रश्नांची मांडणी असेल.

प्रथमपासून अखेरीपर्यंत माझे मुख्य गृहीततत्त्व हे आहे की, चक्राकार कार्यकारण-भावामुळे सामाजिक प्रक्रिया संचयी असते. प्रारंभी, काहीशी "जैसे थे" अवस्था गृहीत धरून मी विवेचनाला आरंभ करीत आहे; याचा अर्थ एक हा की, बाजारपेठेच्या क्रियाप्रक्रियांमध्ये संघटित जागतिक समाजसंघटनेकडून हस्तक्षेप होत नाहीत; आणि, दुसरा हा की, अतिशय गरीब देशांतील परंपरागत धोरणे असायची त्यांपेक्षा अर्धविकसित देशांतील राष्ट्रीय धोरणे निराळी नसतात. चालू प्रकरणाच्या अखेरीस मी पहिल्या गृहीततत्त्वाच्या वास्तवतेबद्दल चर्चा करीन आणि पुढील दोन प्रकरणांत मी राष्ट्रीय सरकारांच्या धोरणांबद्दल आणि आर्थिक नियोजनाबद्दल चर्चा करीन.

शेवटच्या दोन प्रकरणांत विशिष्ट देशांतील प्रादेशिक विषमतांच्या प्रश्नांबद्दल केलेली चर्चा आंतरराष्ट्रीय विषमतांबद्दलच्या विश्लेषणाशी दोन कारणांनी संबद्ध आहे. पहिले कारण हे की, बऱ्याच प्रमाणात दोन्ही प्रश्न सारखे आहेत; आणि दुसरे हे की, अतिगरीब देशांतील अंतर्गत विषमतांचा देशादेशांतील आंतरराष्ट्रीय विषमतांशी फार जवळचा संबंध आहे, ह्या दोन प्रकारच्या विषमता संचयी प्रक्रियेच्या चक्राकार कार्यकारणभावाने एकमेकींचे कारण होत असे दिसून येईल.

आपण मागे पाहिले की, काही थोड्या श्रीमंत देशांमध्ये राष्ट्रीय सीमांच्या आत एकात्मतेची प्रक्रिया झाली असून आता ती अत्यंत उच्च अवस्थेपर्यंत नेण्यात येत आहे. यामुळे तेथे कोणत्याही परिस्थितीत जन्माला आलेल्या सर्वांना समान संधी मिळते. बलवान प्रसारीत परिणाम आणि श्रीमंत देशांतील समानतेची धोरणे ह्या दोहोंचा हा एकत्रित परिणाम आहे. हे दोन्ही मुख्य घटक एकमेकांत चक्राकार कार्यकारण-भावाने गुंतलेले आहेत; आणि त्याचबरोबर आर्थिक प्रगती व विकासाची उच्च पातळी यांतही ते गुंतलेले आहेत.

ह्या श्रीमंत व प्रगतीशील देशांच्या लहानशा गटाच्या बाहेर असलेले इतर सर्व देश निरनिराळ्या प्रमाणांत गरीब आहेत आणि आर्थिक दृष्टीनेही कमी प्रगतीशील आहेत. ते अंतर्गत आर्थिक विषमतांनी गांजलेले आहेत, आणि त्यांच्यापैकी ज्या देशांत ह्या ना त्या प्रकारची राजेशाही किंवा प्रत्यक्ष हुकूमशाही नाही त्यांच्या लोकशाही शासनपद्धतीची परिणामकारकताही ह्या विषमतांमुळे कमी होत जाते.

राष्ट्रीय आर्थिक एकात्मतेचा सापेक्ष अभाव आणि सापेक्ष आर्थिक मागासलेपणा यांच्यातील संबंध उभयपक्षी आहेत. आर्थिक विकासाच्या खालच्या पातळीशी, सामाजिक हालचालींची, दळणवळणाची व सार्वजनिक शिक्षणाची खालची पातळी जुळते; वाढत्या संवेगाच्या प्रसारीत परिणामांना त्यामुळे अडथळे निर्माण होतात. त्याबरोबर ह्याच कारणांमुळे आणि अंतर्गत विषमतांच्या अस्तित्वामुळे गरीब देश पुष्कळदा कमी लोकशाहीनिष्ठ असतात; निदान ते गरीब असल्यामुळे, समान संधी देण्याच्या धोरणांवर, त्यांच्याकडून आर्थिक व मूलतः मानसिक मर्यादा येतातच. याशिवाय, संधीच्या असमानतेमुळे त्यांच्या उत्पादन घटकांची "गुणवत्ता" कमी रहाण्यास आणि त्यांच्या उत्पादन प्रयत्नांची "परिणामकारकता" कमी करण्यास मदत होते, आणि त्यामुळे त्यांच्या आर्थिक प्रगतीच्या मार्गात अडचणी येतात.

व्यापार, भांडवलाचे स्थानांतर व स्थलांतर यांचे परिणाम

राष्ट्रीय पातळीप्रमाणेच आंतरराष्ट्रीय पातळीवरही व्यापार आपण होऊन समानतेकडे कार्यप्रवण होतोच असे नाही. उलट त्याचे अर्ध-विकसित देशांवर बलवान प्रत्याघाती परिणाम होण्याची शक्यता असते.

बाजारपेठ अधिक व्यापक झाल्यामुळे प्रथम श्रीमंत व प्रगतिशील देशांचे सामर्थ्य वाढते, कारण त्यांचे कारखानदारी उद्योगधंदे आघाडीवर असतात आणि सभोवतालच्या विकासजन्य बाह्य काटकसरींमुळे त्यांना मजबुती आलेली असते; उलट, अर्ध-विकसित देशांत जे थोडे उद्योगधंदे असतात त्यांना, व विशेषतः तेथील लहान उद्योगधंदे व हस्तोद्योग यांना संरक्षण देण्यात आले नाही तर, औद्योगिक देशांमधून होणाऱ्या स्वस्त मालाच्या आयातीमुळे त्यांच्या उत्पादनाच्या किंमती अधिक ठरून, ते नष्ट होण्याच्या संकटात सापडतात.

बाह्य जगाशी व्यापारी संबंध वाढल्यामुळे ज्यांची संपूर्ण संस्कृती धुळीला मिळाली आहे अशा अर्ध-विकसित देशांची अनेक उदाहरणे सांगता येतील. उदाहरणार्थ, प्राचीन हस्तोद्योगाबद्दल प्रसिद्ध असलेल्या बगदाद शहरात आता रुप्यावरची कारागिरी करणारे फारच थोडे उरले आहेत, आणि त्यांनीसुद्धा ज्यात कमी कसब लागते असे परदेशी नमुने हस्तगत केले आहेत. तसेच तेथे आरबी साहित्यातील एखादे पुस्तक विकत घेण्यासाठी अतिशय खटपट करावी लागते, मात्र इंग्रजीमधील व आरबीमधील स्वस्त मासिके सहज व विपुल मिळू शकतात.

आंतरराष्ट्रीय व्यापाराचा अर्ध-विकसित देशांवर मुख्य विधायक परिणाम वास्तविकपणे त्यांच्या प्राथमिक उत्पादनाची वाढ होण्यात झाला आहे; आणि मुख्यतः बिन-कसबी कामगारांना कामावर ठेवणाऱ्या ह्या प्रकारच्या उत्पादनाचाच त्यांच्या निर्यातीत मोठा वाटा असतो. परंतु ह्या व्यापारात त्यांना निर्यात बाजार-पेठेत ठराविक मागणी असल्याचे आढळते, आणि मागणीचा एकूण कल जलद गतीने वाढण्याचा नसतो व किंमतीमध्ये चढउतार फार असतो. शिवाय, जेव्हा लोकसंख्या झपाट्याने वाढत असते आणि तिचा मोठा हिस्सा जेमतेमच उदरनिर्वाह करू शकत असतो——म्हणजेच बिन-कसबी कामगारांचा तुटवडा नसतो——तेव्हा त्या देशांतील निर्यात होणाऱ्या उत्पादनात तांत्रिक सुधारणा झाल्यास, तिचा फायदा, उत्पादन स्वस्त झाल्यामुळे ते उत्पादन आयात करणाऱ्या देशांनाच होण्याचा संभव असतो. आणि पुष्कळदा मागणी लवचिक नसल्यामुळे बाजारपेठही फारशी व्यापक होत नाही.

श्रीमंत देशांकडून गरीब देशांना जो सल्ला——व मदत—— दिली जाते ती, आज-देखील, पुष्कळदा, निर्यातीसाठी त्यांनी प्राथमिक उत्पादनाची वाढ करावी, अशा अर्थाची असते. सल्ला अर्थातच चांगल्या हेतूने दिलेला असतो, आणि एखाद्याच अर्ध-विकसित देशाचा अलगपणाने विचार करता, अल्प मुदतीच्या दृष्टीने तो सयुक्तिक-ही असू शकेल. मात्र अधिक व्यापक व दीर्घकालीन दृष्टिकोनातून, सर्वप्रथम उत्पादन-क्षमतेची, उत्पन्नाची व जीवनमानाची वाढ मोठ्या शेती उदरनिर्वाहाच्या क्षेत्रात करून श्रमशक्तीची पुरवठा-किंमत वाढविणे आणि औद्योगिक क्षेत्रातही वाढ करणे, हेच अधिक सयुक्तिक ठरेल. यामुळे आर्थिक विकास होईल आणि मिळकत वाढेल.

परंतु व्यापार हा विकास आपोआप घडवीत नाही; उलट, त्याची प्रत्याघाती परिणाम घडवून आणण्याकडे प्रवृत्ती असते आणि गतिशून्यता व मागासलेपणा टिकवून धरणाऱ्या शक्तींना बलिष्ठ करण्याकडे त्याचा कल असतो. जागतिक समाज-संघटने-कडून अगर प्रत्येक अर्ध-विकसित देशाकडून धोरणात्मक हस्तक्षेपांनी आर्थिक विकास घडवून आणला पाहिजे—ह्या दोन शक्यता आपल्या विवेचनाच्या सध्याच्या टप्प्याच्या अवलोकनाबाहेर आहेत; सध्या आपण फक्त बाजारपेठेच्या क्रियाप्रक्रियांच्या परिणामांचे विश्लेषण करीत आहोत.

व्यापाराप्रमाणेच भांडवलाच्या हालचालीवरही आंतरराष्ट्रीय विषमतांच्या

प्रतिकारार्थ अवलंबून चालणार नाही. वर वर्णन केलेल्या परिस्थितीत, एकंदरीत, भांडवल अर्ध-विकसित देशांपासून दूर राहील; आणि प्रगत देश झपाट्याने आणखी विकसित होत आल्यामुळे व भांडवलदार मालकांना चांगले नफे व सुरक्षिततेची हमी देत असल्यामुळे तर असे विशेषत्वाने घडेल.

आज आपण ज्यांना अर्ध-विकसित देश म्हणतो त्यांत पूर्वी जेव्हा भांडवल आले तेव्हा ते परदेशांतून नियंत्रित असलेल्या आणि निर्यातीसाठी प्राथमिक उत्पादन करणाऱ्या आर्थिक केंद्रांत प्रथम शिरले. ही केंद्रे भांडवलाच्या मालकांना बहुधा इतकी फायदेशीर होत की, गुंतविण्याच्या भांडवलाच्या दृष्टीने ती झपाट्याने स्वयंपूर्ण झाली. त्यापेक्षाही काही प्रमाणात मोठी भांडवल-गुंतवणूक, वसाहतीतील सरकारांच्या राजकीय नियंत्रणामुळे सुरक्षित बनलेल्या, रेल्वे व इतर सार्वजनिक उपयुक्ततेच्या क्षेत्रांत झाली. परंतु, युरोपियन राष्ट्रांच्या परदेशातील भांडवल निर्यातीचा मुख्य भाग, युरोपातून स्थलांतर करून त्यांनी समशीतोष्ण प्रदेशात केलेल्या नव्या वसाहतींमध्ये गेला.

१९३०-४०च्या काळात दशकाच्या प्रारंभापासून आंतरराष्ट्रीय भांडवली बाजारपेठेची घसरगुंडी सुरू झाली आणि ती अद्यापही सावरली गेलेली नाही. पुढे परकीय भांडवलाला सुरक्षिततेची हमी देणाऱ्या वसाहतवादी पद्धतीचा अंत झाला. या दोन घटनांनंतर भांडवल आपणहून जर मोठ्या प्रमाणावर अर्ध विकसित देशांकडे वळले असते तर ते निसर्गाच्या विरुद्धच झाले असते. अर्धविकसित देशांत भांडवलाची कमतरता आहे हे खरे, परंतु, त्यांची गरज ही भांडवलाच्या बाजारपेठेत परिणामकारक मागणी ठरत नाही.

उलट, परदेशी हुंडणावळीच्या क्षेत्रात निर्बंध नसते, आणि त्यांचबरोबर राष्ट्रीय विकासाच्या धोरणात भांडवलाला मोठा नफा मिळवून देण्याची तरतूद नसती— म्हणजे भांडवलाच्या बाजारपेठेतील शक्तींना अविरोध मोकळीक देण्यात आली असती तर अर्धविकसित देशांतील भांडवलदारांनीच त्यांचे भांडवल निर्यात केले असते. असे निर्बंध व धोरणे अस्तित्वात असताही प्रत्यक्षात अर्धविकसित देशांमधून सतत भांडवल बाहेर जात आहे; आणि वास्तववादी विश्लेषण करताना, त्या देशांत येणाऱ्या भांडवलातून हे जाणारे भांडवल वजा केले पाहिजे.

अर्ध-विकसित व विकसित देशांत आंतरराष्ट्रीय आर्थिक जुळणीच्या दृष्टीने कामगारांचे स्थलांतर, हा अखेरचा घटक, संपूर्णपणे वगळल्यास चालण्यासारखे, आहे. बहुतेक अर्ध-विकसित देशांतील लोकसंख्येचा बोजा हेच दर्शवितो की त्यांना निर्वासितांची गरज नाही, आणि अतिलोकसंख्येच्या परिणामी तेथे मिळणारे कमी वेतन निर्वासितांना आकर्षितही करीत नाही. उलट, ह्या देशांतून बहिर्गमन नैसर्गिक होईल, परंतु, स्थलांतर शक्य असले तरी, अनेक कारणांसाठी ते आर्थिक विकासाला फारसे मदतकारक ठरत नाही.

आणि ते शक्यही नसते. पहिल्या महायुद्धानंतर जग अशा रीतीने वसले आहे की एकंदरीत कोणत्याही देशात निर्वासितांचे स्वागत होत नाही. हौशी प्रवासी सोडल्यास, सर्वसाधारणपणे, जेथे जन्म होतो तेथेच लोकांना रहावे लागते; आणि अर्ध-विकसित देशांतील मोठ्या भागांत, गोऱ्या लोकांच्या देशांच्या अगर त्यांच्या प्रभावाखालील देशांच्या दृष्टीने " वर्णीय " असलेले लोक रहातात व हेच देश आर्थिक दृष्टीने अधिक संपन्नही आहेत; या देशांनी कायदे करून अगर व्यवस्थापनेत तरतूद करून निर्माण केलेल्या " वर्णीय " निर्बंधांनी निर्वसन बहुधा जवळजवळ बंदच पाडले आहे.

कमकुवत प्रसारीत परिणाम

म्हणून निर्वसनामुळे गरीब देशांना म्हणण्यासारखी मदत मिळण्याचा संभव नाही; आणि आंतरराष्ट्रीय व्यापार व भांडवलाचे चलनवलन अनियंत्रित असल्यास त्यांच्या माध्यमातून प्रगत देशांतील आर्थिक प्रगतीचे अर्ध-विकसित देशांवर प्रत्याघाती परिणाम घडून येतील. ह्या परिणामांची कार्यपद्धती, तिसऱ्या प्रकरणात वर्णन केलेल्या, कोणत्याही देशामधील विकासाच्या प्रक्रियेतील चक्राकार संचयी कार्यकारण-भावाप्रमाणेच असेल. मात्र, आंतरराष्ट्रीय दृष्टीने व्यापार व भांडवलाच्या चलनवलनाचे प्रत्याघाती परिणाम कार्यनिष्पत्तीवर अधिकच मोठा प्रभाव पाडतील, कारण तेथे वाढत्या संवेगाचे परिणाम फारच कमकुवत असतात.

कायदे, शासन व वर्तनक्रमातील फरक आणि भाषा, पायाभूत मूल्ये व श्रद्धा, जीवनमान, उत्पादनक्षमता व सोई यांतील विषमता यांमुळे वाढत्या संवेगाच्या प्रसाराला देशांतर्गत कोणत्याही निर्बंधापेक्षा राष्ट्रीय सीमा या फारच परिणामकारक अडथळे बनतात.

परराष्ट्रातील वाढत्या संवेगाच्या प्रसारीत परिणामांना, राष्ट्रीय सीमा व त्यांची सर्व संबंधित बंधने यांपेक्षा अधिक मोठे अडथळे अर्ध-विकसित देशांतील तीव्र दारिद्र्य व कमकुवत प्रसारीत परिणाम यांमुळे निर्माण होतात. उदाहरणार्थ, जेव्हा बंदरविभाग व्यापारामुळे व जहाजवहातुकीमुळे आर्थिक भरभराटीची केंद्रे बनतात—आणि तशी ती जगात बहुतेक सर्व ठिकाणी आहेत- तेव्हा हा वाढता संवेग देशातील सर्व प्रांतांपर्यंत बहुधा पोहोचत नाही. अशा रीतीने, मूलभूतपणे, अर्ध-विकसित देशांच्या विकासाच्या खालच्या पातळीमुळे तेथे असणाऱ्या कमकुवत प्रसारीत परिणामांचे प्रतिबिंबच मोठ्या प्रमाणावर देशादेशांमधील तौलनिक कमकुवत प्रसारीत परिणामात दिसते.

अशा परिस्थितीत, बाजारपेठेच्या शक्ती संचयित रूपाने आंतरराष्ट्रीय विषमता वाढविण्यास कारणीभूत होतात.

वसाहतशाहीचा आर्थिक आघात

पुष्कळसे अर्ध-विकसित देश अद्यापपर्यंत महानागरी (metropolitan)

सत्तांच्या राजकीय वर्चस्वाखाली होते आणि काही अजूनही आहेत. शिवाय, वसाहती नसलेले बहुतेक सर्व अर्ध-विकसित देश आर्थिकदृष्टचा परदेशांकडून नियंत्रित केले जात होते आणि बरेचसे अजूनही केले जातात; आणि या नियंत्रणाचे आर्थिक क्षेत्रातील परिणाम बव्हंशी वसाहतीवरील परिणामांसारखेच असतात.

वसाहतशाहीच्या आर्थिक परिणामांचा व परकीय आर्थिक नियंत्रणाचा विचार करताना, त्या देशांविरुद्ध असयुक्तिक असंतोष वाढविण्याचे टाळल्यास ते फायदेशीर होईल, असे मला वाटते. त्यासाठी या पुस्तकातील मुख्य सिद्धांत सतत लक्षात ठेवावयास हवा, तो हा की : चक्राकार कार्यकारणभावामुळे बाजारपेठेच्या अप्रतिबंधित क्रियाप्रक्रियांत विषमतांची वाढ करण्याची प्रवृत्ती अंतर्भूत असते, आणि सर्वसाधारण विकासाच्या खालच्या पातळीवर तर ती विशेषच असते. राष्ट्रीयदृष्टचा एकदा एखाद्या देशाने आर्थिक विकासाची सरासरीने उच्च पातळी गाठली की वाढत्या संवेगाच्या प्रसारीत परिणामांमुळे आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या धोरणांमुळे ह्या प्रवृत्तीला आळा बसेल. आंतरराष्ट्रीय बाबतीत, आताच सांगितलेल्या कारणांमुळे, प्रसारीत परिणाम अतिशय कमकुवत असतात आणि संचयी प्रक्रिया, जर बाजारपेठेतील शक्तींना मुक्त वाव दिला तर, अधिक सहजपणे विषमतांच्या दिशेने कार्यप्रवण होतात.

बाजारपेठेच्या क्रियाप्रतिक्रियांच्या ह्या प्रवृत्तीचा आणि वसाहत पद्धतीत अंतर्भूत असलेल्या राजकीय व आर्थिक सत्तास्थानाचा फायदा उठविण्याचा प्रयत्न, वसाहतवादी देशांची सरकारे व व्यापारधंद्यांतील माणसे करतात तेव्हा ते कपटकारस्थाने करीत असतात असे नाही. त्यांच्या वागण्याचा अर्थ इतकाच असतो की, जग जसे आहे तसे ते स्वीकारतात, स्वतःच्या हिताची काळजी घेतात, आणि जोपर्यंत फायदा होतो तोपर्यंत "खेळात सहभागी होतात"; म्हणजेच, चांगल्या व जबाबदार माणसांनी जसे वागावे असे अपेक्षित असते त्याप्रमाणे ते विचार करतात व वागतात.

याचा अर्थ असा समजला जाऊ नये की, सत्ताधारी देशांच्या व त्यांच्या व्यापाऱ्यांच्या वागणुकीने त्यांच्यावर अवलंबून असलेल्या देशांचे नेहमीच व अपरिहार्यपणाने नुकसानच झाले आहे. वसाहतवाद्यांच्या आर्थिक कार्यामुळे, खऱ्या अर्थाने, आर्थिक विकासाचा काही प्रमाणात प्रसार झाला आणि वसाहतवादाच्या विशिष्ट सत्तासंबंधाशिवाय तो शक्य झाला नसता. वसाहतवादी शक्तींच्या हेव्यादाव्यामुळे थायलंडचे राजकीय स्वातंत्र्य टिकून राहिले, परंतु तो देश ब्रह्मदेशापेक्षा अधिक विकसित झाला नाही.

वसाहतवादी सरकारांनी रस्ते, बंदरे, रेल्वे वगैरे बांधल्या, किंवा जिच्या अस्तित्वाशिवाय खाजगी व्यापारी कंपन्यांना त्यांची बांधणी करता आली नसती अशी राजकीय सुरक्षिततेची व आर्थिकदृष्टचा फायद्याची परिस्थिती निर्माण केली. वसाहतीतील राज्यकर्ते, लोक आणि व्यापारी यांच्या हिताचीच ही कामे अनेक वेळा असत. तरी देखील सर्वसाधारण आर्थिक विकासाची परिस्थिती निर्माण करण्याच्या

दिशेने ती महत्त्वाची पुढची पावले होती.

वसाहतीतील सरकारांनी कायदा, सुव्यवस्था व सनदी नोकरवर्ग तयार केला, प्राथमिक स्वच्छतेसाठी उपाययोजना केल्या, आणि काही ठिकाणी, लोकोपयोगी व उच्च शिक्षणाची, मर्यादित प्रमाणावर, सोय केली. वसाहतीतील सरकारांची व त्यांच्या व्यापारी मंडळींची ही उपयुक्त कार्ये ज्या ठिकाणी राजकीय वर्चस्व, अधिक परिपूर्ण अर्थाने शासननिष्ठ होते व बऱ्याच दीर्घ काळ टिकून राहिले होते, तेथे मोठ्या प्रमाणावर झाली; उदाहरणार्थ भारतात व इंडोनेशियातही; परंतु जेथे राजकीय वर्चस्व अपूर्ण होते अगर अल्पकालीन होते तेथे ती परिणामकारक झाली नाहीत, उदाहरणार्थ, मध्य पूर्वेतील देशांत.

अधिक व्यापक अर्थाने, प्रगत देशांच्या जगातील विचार व ध्येये यांच्याशी संपर्क वसाहतवादात अभिप्रेत होता. त्याने काही ठिकाणी व्यवस्थापकीय व व्यावसायिक जबाबदारी पेलण्यास समर्थ असे उच्च शिक्षण व प्रशिक्षण दिले; मात्र त्याची व्याप्ती निरनिराळ्या वसाहतवादी साम्राज्यांत कमीजास्त होती.

ज्या पूर्वकालीन वसाहती आता स्वतंत्र राष्ट्रे म्हणून स्वतःच्या मार्गाने पुढे जात आहेत त्यांना, त्यांच्या आर्थिक विकासाच्या धोरणांसहित सर्व धोरणांचा पाया म्हणून, हा वारसा मिळालेला आहे. परंतु परावलंबनाच्या काळात मात्र, जरी बहुतेक वसाहतींचा, त्या एकाकी राहिल्याने झाला असता त्यापेक्षा, अधिक विकास झाला असला तरी, त्यांच्या साक्षात सिद्धी आर्थिक विकासात परिणत न होण्याची सतत प्रवृत्ती दिसून आली. तिचे स्पष्टीकरण करण्यासाठी आपल्याला निरनिराळ्या शक्तींच्या क्रियाप्रक्रियांच्या चक्राकार कार्यकारणभावाची तंत्ररचना पाहिली पाहिजे.

शक्तींच्या क्रियाप्रक्रिया

महानागरी देशांना, अर्थातच, त्यांच्या स्वतःच्या उद्योगधंद्यांच्या उत्पादनासाठी अवलंबित देशांच्या बाजारपेठा वापरण्यात फायदा होता. अवलंबित देशांतील उद्योगधंद्यांची वाढ रोखण्यासाठी सत्ताधारी देशाने खास उपाययोजना केल्या असतील, आणि तशा त्या पुष्कळदा करण्यात आल्या, तरी दुसऱ्या देशावर राजकीय वर्चस्व असलेल्या देशाचे हे स्वाभाविक व्यापारी धोरण होते. परंतु अशा उपाययोजना बहुधा आवश्यक नसत— कारण, वसाहतींना संरक्षक जकाती बसविण्यास परवानगी नव्हती—आणि अशा संरक्षक जकातींच्या अभावी, राज्यकर्त्या देशांतील उद्योगधंदे वसाहतीतील कोणत्याही प्रतिस्पर्ध्यापेक्षा कमी किंमतीत माल विकू शकत.

त्याचप्रमाणे, अवलंबित देशांकडून प्राथमिक उत्पादनाचा माल मिळविण्यातही सत्ताधारी देशांना सरळ व स्पष्ट फायदा होता; तसेच तो विपुल व कमी किंमतीत मिळावा म्हणून भांडवल गुंतविणेही त्यांच्या हिताचे होते; तसे करून ते वसाहतीतील नैसर्गिक सामुग्री व तद्देशीय स्वस्त श्रमशक्ती यांचा स्वहितासाठी फायदा उठवीत

होते.

सत्ताधारी देशाला अवलंबित देशावर, शक्य तितक्या प्रमाणात, आयात व निर्यात दोहोची बाजारपेठ म्हणून, मक्तेदारी ठेवण्यातही उघडउघड लाभ होता. व्यापार व हुंडणावळीच्या धोरणावरील अधिकारामुळे त्यांना अग्रहक्क मिळविण्याची आयती साधने मिळाली होती. परंतु त्यांच्या मक्तेदारी हितसंबंधांचे संरक्षण ते नैसर्गिक व स्वाभाविक मार्गानेही, अधिक चांगल्या रीतीने करू शकत. कायदा व शासनरचनेचे स्वरूप आणि हळूहळू तयार झालेले पक्के व्यापारी संस्थांचे संबंध यांच्यामुळे त्यांना अधिकच मजबुती आली. ह्या प्रकाराला मी दुसऱ्या एका संदर्भात "सक्तीचा उभयपक्षवाद" म्हटले आहे; तो निरनिराळ्या अंशाने, सर्व वसाहती साम्राज्यांचे वैशिष्टच होता. राजकीय व आर्थिक परावलंबनाचा तो नैसर्गिक परिपाक होता, आणि राजकीय मुक्तीनंतरही आपले वर्चस्व टिकवून धरण्याकडे त्याची प्रवृत्ती आहे.

सत्ताधारी देशात ह्या उभयपक्षी संबंधांचे पुष्कळदा आदर्शीकरण करून, मातृ-देशाबरोबरचे, "सांस्कृतिक व आर्थिक घनिष्ट दुवे" म्हणून संबोधिले जात असे. आणि मी वर म्हटल्याप्रमाणे, अवलंबित देशांनाही त्यापासून पुष्कळच भरीव फायदे मिळत असत. परंतु, प्रक्रियेच्या अखेरीस त्यांच्यामुळे अवलंबित देशाला बराच मोठा आर्थिक तोटा होत असे, कारण खरेदी-विक्री करण्याच्या त्यांच्या बाजारपेठेची व्याप्ती कृत्रिम रीतीने मर्यादित करून ते त्या देशांच्या खरेदी-विक्रीच्या अटी अधिक गैर-फायद्याच्या बनवीत.

जाता जाता पुढील गोष्टींचा निर्देश करून आतापर्यंतच्या जगातील सत्तेसंबंधीच्या परिस्थितीवर मनोरंजक रीतीने प्रकाश टाकता येईल. जेव्हा प्रसंगविशेषी ह्या सक्तीच्या उभयपक्षी संबंधांना आव्हान दिले गेले तेव्हा ते अवलंबित देशांनी बहुधा दिले नाही; तर औद्योगिकदृष्टचा प्रगत असलेल्या देशांनी दिले; ते देश कच्च्या मालाची उत्पत्ती-स्थाने म्हणून ह्या परावलंबी देशांच्या बाजारपेठेत प्रवेश मागत आणि आपल्या तयार मालाच्या निर्यातीला तेथे शिरकाव मिळण्याचीही मागणी करीत.

परावलंबी देशांत सत्ताधारी देश जे भांडवल, उद्योग व कसबी कामगार पाठवीत ते स्वाभाविकपणेच आपली केंद्रे तयार करीत. ही केंद्रे सभोतालच्या अर्थव्यवस्थेपासून दूरावलेली व अलग, पण सत्ताधारी देशांतील अर्थव्यवस्थेशी संबंधित असत. परावलंबी देशांतील लोकांशी त्याचे औद्योगिक संबंध त्यांना बिन-कसबी कामगार म्हणून कामावर ठेवण्यापुरतेच मर्यादित असत. वांशिक व सांस्कृतिक फरकामुळे आणि वेतनाची व जीवनमानाची अत्यंत खालची पातळी यांमुळे अशा केंद्रांत देखील कडक स्वरूपाचा अलगपणा स्वाभाविकपणेच निर्माण होई.

ह्या अलगपणामुळे, तद्देशीय लोकांत तांत्रिक कसब व उद्योगधंद्यांचे साहस यांसहीत सर्व प्रकारचा सांस्कृतिक प्रसार होणे कठीण जाई. वसाहतशाहीतील हे आरंभीचे आर्थिक प्रारंभ केंद्रिभूत होऊन रहाण्याचे आणि वाढत्या संवेगाचा प्रसार

अत्यंत कमकुवत अगर अगदी शून्य रहाण्याचे हे एक प्रमुख कारण होते.

खाणींमध्ये व मळचांमध्ये काम मिळण्याची संधी निर्माण होऊन अधिक कामगारांना मागणी येऊ लागली तेव्हा वाढत्या लोकसंख्येने ती ताबडतोब पूर्ण होऊ लागली; वर उल्लेख केलेल्या, अंतर्गत सुरक्षा व शांतता राखण्याच्या, व सार्वजनिक स्वच्छतेच्या सोयी वाढविण्याच्या, निर्विवाद फायदेशीर धोरणामुळेही, लोकसंख्येच्या वाढीला जोर आला होता. वसाहतकारांना विपुल कामगार-पुरवठा आणि त्यांच्या केंद्रांत कमी वेतन देणे हितावह असल्यामुळे, जलद लोकसंख्या-वाढीने आणि बाहेरच्या मोठ्या व निकृष्ट शेतीच्या व्यवसायातील खऱ्या विकासाच्या अभावामुळे त्यांना अस्वस्थ वाटत नसे.

सत्ताधारी देशाला सुव्यवस्था व स्थैर्य अत्यंत हितावह वाटत असे. आणि म्हणून अवलंबित देशातील वरिष्ठ वर्गांबरोबर स्वाभाविकच त्यांचे संबंध आपोआप जुळून येत, काही वेळा ह्याच हेतूने असे वर्ग मुद्दाम निर्माण करण्यात आले. हे कृपापात्र गट, सर्वसाधारणपणे,'जिच्यामुळे त्यांना खास हक्क प्राप्त झाले होते ती आर्थिक व सामाजिक परिस्थिती 'जैसे थे " रहावी म्हणून आस्था बाळगीत, आणि देशात अधिक समानता निर्माण करण्याच्या हेतूने घेण्यात आलेल्या राष्ट्रीय एकात्मतेच्या धोरणांसाठी, अगर, अर्थव्यवस्थेतील निर्वाहाच्या उत्पादनक्षेत्रात विकासासाठी आवश्यक असे प्रगतीकारक आर्थिक धोरण स्वीकारले जावे म्हणून हे वर्ग कधीच आग्रह धरीत नसत.

एका दृष्टीने, वसाहतशाहीचा सर्वांत महत्त्वाचा परिणाम, वसाहत-राष्ट्र सामर्थ्यशाली राष्ट्रीयत्वाला मुकत असे, ह्या अभावात्मक वस्तुस्थितीशी निगडीत झालेला होता; आणि शिवाय, राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा समतोल विकास साधण्यासाठी विधायक उपाययोजना करण्याची प्रबळ इच्छा असणारे स्वतःचे सरकार वसाहतीत नसे. वसाहतकारांनी तेथे घडवून आणलेल्या बदलांच्या विकृत परिणामांमुळेच अनेक देशांत अशी परिस्थिती निर्माण झालेली होती हे खरे आहे; आणि वसाहतकारांनी अखेरीस क्रमशः तेथे अशी परिस्थिती अस्तित्वात आणली की वरील प्रकारच्या आशाआकांक्षा बाळगणे कोणत्याही रीतीने वास्तववादी व सयुक्तिक ठरले नसते. त्या काळात, राजकीय स्वातंत्र्याच्या अभावी तेथे समाजाला ऐक्यबद्ध व एकात्म बनविणाऱ्या हेतूचा अभाव निर्माण झाला. त्यानंतरच्या अवस्थेत, परकीय राज्यकर्त्यांना हाकलून देण्याचा नकारात्मक हेतू या देशांत निर्माण झाला, तेवढाच अपवाद.

वसाहती व तेथील लोक बाजारपेठेच्या शक्तींच्या क्रियाप्रक्रियांच्या कचाट्यात उघड्या व संरक्षणरहीत अवस्थेत पडत असत; आणि त्या शक्तींना फक्त परकीय सत्ताधारी देशांच्या हितासाठीच निराळे वळण मिळे. यामुळे आपोआपच त्यांची पुढाकाराची वृत्ती खंडीत होई आणि त्याचबरोबर लोकांच्या हिताने प्रेरित झालेले सार्वजनिक धोरण तयार करण्यात अडथळे आल्यामुळेही तिला वाव मिळत नसे.

या सर्व कारणांसाठी, आधीच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विषमतांसाठी कार्यप्रवृत्त असलेल्या, बाजारपेठेच्या शक्ती बलवान करणे हाच वसाहतशाहीचा मुख्य अर्थ होता. संयुक्त प्रक्रियेच्या चक्राकार कार्यकारणभावात तिने स्वत:ला गुंतवून घेतले, त्याला अधिक चालना दिली व एक विशिष्ट स्वरूपही दिले.

काही देशांतील संस्थासंघटनात्मक सत्तेच्या रचनेत वसाहतवादाला समांतर असे घटक होते—आणि काही देशांत अजूनही आहेत, व त्यांत स्वतंत्र देशांचाही समावेश आहे. उदाहरणार्थ, जाती संस्था, वांशिक व धार्मिक भेदभाव, अधिक संपन्न शहरांवर ग्रामीण विभागांचे अवलंबन, आणि सरंजामशाही व निम-सरंजामशाही पद्धतींत जमीनदार, व्यापारी, सावकार किंवा कर वसूल करणारा यांच्यावर शेतकऱ्यांचे अवलंबन.

विषमतेवर आधारलेल्या अशा दृढमूल संस्था प्रत्येक अर्ध-विकसित देशांतील आर्थिक प्रगतीच्या वैरी असतात. देशातील प्रसारीत परिणामांना तर त्या अडथळे निर्माण करतातच, पण त्याबरोबरच प्रगत परराष्ट्रांतील वाढत्या प्रसारालाही त्या प्रतिबंध करतात. मी वर उल्लेख केल्याप्रमाणे, त्यांनी सत्ताधारी देशांना वसाहतशाही टिकवून धरण्यासाठी सत्तेचा आधार दिला, आणि खरे म्हणजे, त्या सरकारांनी त्यांची वाढही केली. अशा जवळच्या नात्याने, अंतर्गत व आंतरराष्ट्रीय विषमता, चक्राकार पद्धतीत, परस्पर कार्यकारणभावाने, एकत्र अमोचनीय रूपाने गुंतलेल्या असतात.

डबघाईला आलेली वसाहतशाही

अर्ध-विकसित जगात जागृत राष्ट्रावादाचे युग सुरू झाल्याने वसाहती पद्धतीचा आता नाश होत आहे, आणि तिचा विनाश हा आपल्या नजरेसमोर घडत असलेला सर्वांत महत्त्वाचा राजकीय उत्पात आहे. इतिहासाच्या कालखंडात अत्यंत अल्प मुदतीतच, वसाहतशाहीचे शिल्लक राहिलेले अवशेषही नष्ट झाल्याशिवाय रहाणार नाहीत.

नवा राष्ट्रवाद नेहमीच, मर्यादित अर्थाने व अंशांनी, "लोकशाहीवादी" असतो, आणि, काहीही झाले तरी, "जैसे थे" परिस्थिती राखण्याबद्दल आस्था बाळगणाऱ्या गटांबरोबरची जुनी हातमिळवणी आता सामाजिक शांततेची हमी देऊ शकत नाही. अजूनही परावलंबी असलेल्या देशांत राजवटी टिकवून धरण्यासाठी लागणारा लष्करी व इतर खर्च, लोकनिष्ठ उठावांमुळे करावा लागणारा खर्च व त्यामुळे होणारे नुकसान, आणि आवश्यक सामाजिक सुधारणांसाठी सोसावा लागणारा आर्थिक बोजा व आर्थिक विकासासाठी करावी लागणारी भांडवल गुंतवणूक यांच्यामुळे वसाहती पद्धतीमधील फायदे नष्ट होतात आणि ती अधिकाधिक मोठ्या प्रमाणावर परकीय सत्ताधारी देशांना भार होऊन रहाते.

जेव्हा एखाद्या विशिष्ट बाबतीत परिस्थिती अशा थराला जाऊन पोहोचते की, तेथून शक्य तितक्या सुरळीतपणाने व जलदीने काढता पाय घेण्यातच स्पष्ट राष्ट्रीय हित असते, तेव्हादेखील सत्ताधारी देशातील खास मालमत्ताधारी लोक, त्यांच्या संसदेमधील संपूर्ण राजकीय गटांना कधी कधी दूषित करू शकतात. वसाहतकार व व्यापारी संघटना, नफा, भांडवल व संपूर्ण जीवन पद्धती त्यावर अवलंबून असल्याने, सवलती सोडताना विरोध करतात.

वसाहत पद्धत ही इतिहासातील राष्ट्रीय" सांस्कृतिक कार्याचे "वाहन आहे, अशा तऱ्हेची जी विचारसरणी वसाहतशाहीच्या कालखंडात निर्माण झाली होती आणि निरनिराळ्या सत्ताधारी देशांच्या सैद्धांतिक रचनांचा व वाक्प्रचारांचा भाग बनली होती तिचा बऱ्याच काळापर्यंत लेखक, मुत्सद्दी व सामान्य नागरिकांकडून पुरस्कार केला जाईल. परंतु मूलतः मात्र ही विचारसरणी म्हणजे आर्थिक हितसंबंधांचे पुष्कळदा बौद्धिक समर्थनच असते.

जेव्हा ह्या पद्धतीचा फायदेशीर पाया क्रमशः नष्ट होत जातो आणि ती वाढत्या खर्चाची राजकीय चैन म्हणून स्पष्टपणे पुढे येते, तेव्हा वसाहतशाही नष्टप्राय झालेली असते. राष्ट्रीय दृष्टिकोनांना ह्या परिस्थितीशी जुळवून घ्यावे लागेल. ह्या देशातील महान मानवतावादी परंपरेतील बुद्धिवादी नेते मात्र, त्याऐवजी, वसाहतशाहीचा अंत शहाणपणाने व दूरदर्शीपणाने हाताळून, तो किमान यातना देणारा कसा होईल, निदान मोठ्या शोकदायक घटना कशा टाळता येतील या व्यावहारिक प्रश्नांचीच चिंता अधिक करतील.

वसाहतशाहीने दिलेला वारसा

एखादा गरीब व मागासलेला देश जेव्हा राजकीय दृष्टीने स्वतंत्र होतो तेव्हा त्याला पूर्वी माहीत नसल्यास, राजकीय स्वातंत्र्य मिळाल्याने आपोआप आर्थिक विकासाच्या मार्गाला लागता येत नाही, असे आढळून येईल. पूर्वीपासून त्याला गतिशून्य अगर परागतीच्या अवस्थेला जखडून ठेवणाऱ्या संचयी सामाजिक प्रक्रिया राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही त्याच्या विरोधी उभ्या रहातील: जोपर्यंत त्याच्या विकासाची सर्वसाधारण पातळी खालची असेल तोपर्यंत बाजारपेठेतील शक्तींच्या "नैसर्गिक" क्रियाप्रक्रिया अंतर्गत व आंतरराष्ट्रीय विषमता वाढविण्याकडे सतत कार्यप्रवण रहातील.

त्याला वसाहतशाहीकडून केवळ निर्वाहासाठी उत्पादन करणाऱ्या अर्थव्यवस्थेचा वारसा मिळालेला असतो आणि शिवाय निर्यातीसाठी माल उत्पादन करणाऱ्या केंद्रांचाही. आर्थिक विकासासाठी तातडीने लागणारा यांत्रिक माल आयात करण्यासाठी त्याला ह्या प्रस्थापित मार्गानेच निर्यातीसाठीच्या उत्पादनावर भर द्यावा लागतो. व्यापारधंद्यांच्या संपूर्ण रचनेत (वसाहत व हुकूमत गाजविणारा देश यांच्यातील)

"सक्तीचा उभयपक्षवाद" प्रस्थापित झालेला असतो. जगातील निरनिराळ्या बाजारपेठांबरोबर बहुविध व्यापारी संबंध निर्माण होण्यासाठी त्या रचनेचे अधिक फायदेशीर पद्धतीत रूपांतर क्रमश:च होऊ शकते. राजकीय वसाहत म्हणून नवीन सरकार हमी देऊ शकत नसल्यामुळे, त्याला परकीय उद्योगपतींना व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील भांडवलाला आकर्षित करण्यात प्रारंभी अधिक अडचणी येतात.

वसाहतशाहीच्या वर्चस्वापासून मुक्त झाल्यामुळे सरकारला मिळणारा सर्वांत मोठा फायदा म्हणजे आपल्या देशबांधवांच्या हिताला अनुरूप पद्धतीने जीवन नियंत्रित करण्याचे स्वातंत्र्य हा असेल. आणि ह्या नव्या संधीचा, बाजारपेठेतील शक्तींच्या हालचालीत हस्तक्षेप करण्याच्या ह्या स्वातंत्र्याचा जर कुशलतेने व निश्चयाने उपयोग केला नाही तर ते आर्थिक फायद्याचे ठरणार नाही. ह्या प्रश्नाचा विचार मी पुढील दोन प्रकरणांत करणार आहे.

राष्ट्रीय विकासाची योजना तयार करण्याचे सामर्थ्य एखाद्या राष्ट्राच्या अंगी येण्यासाठी प्रथम त्यास आत्मस्वरूपाचा प्रत्यय येणे अत्यंत आवश्यक असते. स्वातंत्र्यसंग्रामातून उफाळून आलेल्या आत्मिक शक्तींमुळेच अनेकदा असा प्रत्यय येऊ लागतो. स्वातंत्र्याच्या लढ्यांतून राष्ट्र जन्मास आल्याचे एक उत्कृष्ट उदाहरण म्हणून अर्थातच भारताचा उल्लेख करता येईल.

उलट, दुसऱ्या महायुद्धाच्या काळात फॅसिस्ट इटलीचा पराभव झाल्यामुळे परिणामी संयुक्त राष्ट्रसंघाने घेतलेल्या निर्णयानुसार लिबियाला स्वातंत्र्य मिळाले; तसेच, पहिल्या महायुद्धानंतर ऑटोमन साम्राज्याची विभागणी करताना पश्चिम युरोपियन राष्ट्रांच्या हेव्यादाव्यांचा समतोल राखण्याच्या प्रयत्नांतून मध्यपूर्वेत अनेक देश स्वतंत्र राज्ये म्हणून अस्तित्वात आले, आणि म्हणूनच त्यांच्या सीमा कृत्रिम आहेत. केवळ यदृच्छेने राष्ट्रीयत्व प्राप्त झाल्यामुळे निर्माण होणारा कमकुवतपणा त्यांच्या बाबतीत निदर्शनास येतो.

याच संदर्भात, ज्या देशांनी आपले राष्ट्रीयत्व यशस्वी रीतीने प्रस्थापित केले आहे, आणि राष्ट्रीय धोरणे आखण्यास प्रारंभ केला आहे त्यांचा व्यापक अर्थाने शैक्षणिक प्रभाव, त्यांच्यापेक्षा कमी नशीबवान देशांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा ठरतो. गेल्या दहा वर्षांत, अनेक वसाहतींची मुक्ती, राष्ट्रीय विकासाची त्यांची तीव्र इच्छा व केव्हा केव्हा त्यांनी केलेले कार्यप्रवण नियोजन यांच्या संपर्काने अनेक अर्धविकसित देशांना नवी राष्ट्रीय धोरणे स्वीकारण्याची स्फूर्ति प्राप्त झाल्याचे आढळून येते; राजकीयदृष्टीने पूर्वीपासून स्वतंत्र पण परदेशाच्या आर्थिक वर्चस्वाने बांधल्या गेलेल्या अशा अर्धविकसित देशांत लॅटिन अमेरिकेतील देश प्रमुख आहेत.

जागतिक राज्याचा अभाव

विकसित देशांत प्रादेशिक विषमता कमी करण्यात आल्या आहेत, त्यांच्यापैकी

सर्वांत अधिक श्रीमंत व प्रगत देशांत त्या, वाढत्या संवेगाच्या प्रसारीत परिणामामुळे आणि राष्ट्रीय सरकारने केलेल्या धोरणात्मक हस्तक्षेपामुळे जवळजवळ नष्टच करण्यात आल्या आहेत, या गोष्टीची येथे आठवण करणे योग्य ठरेल. सर्व जगाचा विचार केल्यास मात्र, अत्यंत कमी विकसित देशातील अंतर्गत परिस्थितीसारखेच दृश्य दिसते; तेथे प्रसारीत परिणाम कमकुवत असतात आणि विषमतेकडे प्रवृत्त असलेल्या बाजारपेठेच्या शक्तींच्या क्रियाप्रतिक्रियांच्या प्रत्याघाती परिणामांना प्रतिबंध करण्यास सरकारचे हेतुपूर्वक धोरणात्मक हस्तक्षेप असमर्थ ठरतात.

आंतरराष्ट्रीय परिस्थिती अधिकच वाईट व असहाय्य असते, कारण एका देशातील राष्ट्रीय सरकार जे कार्य पार पाडते ते सर्व जगासाठी करू शकेल अशा आंतरराष्ट्रीय राज्याचा केवळ अंधुक प्रारंभ देखील अजून झाला आहे असे म्हणता येत नाही.

प्रसारीत परिणामांचा प्रभाव विशेष नसल्यामुळे बाजारपेठेच्या शक्तींच्या अप्रतिबंधित क्रियाप्रक्रियांत अंतर्भूत असलेली संचयी प्रक्रियांची प्रवृत्ती हे सतत वाढत जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय विषमतांचे एका दृष्टीने स्पष्टीकरण आहे. त्याचप्रमाणे समान संधीसाठी हस्तक्षेप करू शकणाऱ्या जागतिक राज्याचा अभाव हे दुसऱ्या दृष्टिकोनातून करण्यात आलेले स्पष्टीकरण आहे.

अधिक खोलवर पाहिले तर, असे धोरण ज्यावर आधारता येईल असा सर्व मानव-जातीसाठी मानसिक पाया तयार नाही, हे खरे स्पष्टीकरण होय; परस्परावलंबी मानवी ऐक्याचा पाया तयार नाही. नेहमीच नव्हे तरी पुष्कळदा सर्व प्रदेशांतील व सामाजिक वर्गांतील भाषा, धर्म व वांशिक ऐक्यासंबंधीची विचारसरणी यांमधून निर्माण होणारा सांस्कृतिक एकजिनसीपणा राष्ट्रांत आढळतो. राष्ट्रांत समान भवितव्याच्या प्रदीर्घ इतिहासातून उत्क्रांत झालेली ऐक्यभावना असते. राष्ट्रीय एकात्मतेच्या धोरणांसाठी जबाबदारीने सहभागी होण्याच्या अनुभवांमधून प्रगत देशांत ही भावना सतत वाढत गेलेली असून तिने विकासाची उच्च पातळी गाठली आहे. अशा राष्ट्रांतर्गत मनोभूमिकेशी तुलना करण्याजोगी मनोभूमिका जागतिक पातळीवर मुळीच आढळत नाही.

दुसऱ्या महायुद्धाच्या व त्यानंतरच्या लगतच्या काळात, आंतरराष्ट्रीय आर्थिक ऐक्याचा प्रारंभ करण्याच्या स्पष्ट हेतूने अनेक क्षेत्रांत आंतरसरकारी संस्था प्रस्थापित करण्याचे धैर्यशाली प्रयत्न झाले. युद्धाच्या काळात अनुभवलेली दुःखे व चिंता यांतून त्यांचा जन्म झाला. सगळ्यांनाच तेव्हा वाटत होते की जगाची पुनर्निर्मिती केली पाहिजे.

ह्या महत्प्रयत्नांचे परिणाम, राष्ट्रांना त्यांच्याबद्दल वाटलेल्या आशेच्या मानाने, खरोखरीच फार तोकडे आहेत; परंतु प्रयत्न अद्यापही चालू आहेत. आणि ते चालूच रहातील, कारण आंतरराष्ट्रीय ऐक्य व समता ही ध्येये, कोणताही देश वा कोणतीही जबाबदार व्यक्ती कधीही टाकून देऊ शकणार नाही. आणि म्हणून आंतर-सरकारी

संघटना, एकदा अस्तित्वात आल्यावर, शांततेच्या काळात कधीही नष्ट केल्या जाणार नाहीत. त्याअर्थाने त्या सर्वांत अधिक स्थिर स्वरूपाच्या मानवी संघटना. आहेत. इतर कोणत्या कारणासाठी नसली तरी, आपल्या आंतरराष्ट्रीय विवेकबुद्धीच्या समाधानासाठी त्यांची आवश्यकता आहे.

यांपैकी अनेक संघटना अजूनही, मुख्यत:, प्रचाराची व्यासपीठे आहेत, आणि त्याचबरोबर, निरनिराळ्या सरकारांत विचारविनिमय करण्याची व राजनैतिक संबंध ठेवण्याची माध्यमे आहेत. त्यांच्यापैकी काही, विद्वत्ताप्रचुर व्यवसायांसाठी व निरनिराळ्या देशांच्या सरकारांसाठी महत्त्वाचे प्रबंध अभ्यासपूर्वक तयार करतात. काहींना निरनिराळ्या देशांतील सरकारांमध्ये लहानलहान तांत्रिक बाबतींत सहकार्य घडवून आणण्यातही यश मिळते.

"पुनर्रचना व विकासासाठी आंतरराष्ट्रीय बँक "(इंटरनॅशनल बँक फॉर रिकन्स्ट्रक्शन अँड डेव्हेलपमेंट) कर्ज देते, आणि तिच्या भांडवलाचा काही भाग सरळ अर्ध-विकसित देशांकडे वळविला जातो–अर्थात हा भाग नि:संशय लहान असतो; काही देशांच्या बाबतीत तर, भांडवल परदेशात जात असल्यामुळे हे देश जितके भांडवल बाहेर घालवितात त्यापेक्षाही तो कमी असतो किंवा राजकीय स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भांडवलाची त्यांना जी क्रमश: परतफेड करावी लागते, त्यापेक्षाही तो कमी असतो. पुष्कळशा आंतरराष्ट्रीय संघटना तांत्रिक मदत देण्याच्या कार्यात सक्रीय असतात, पण हे कार्यदेखील अगदीच लहान प्रमाणावर चालते. अगदी लहान प्रमाणावर व प्रतिकात्मक पद्धतीचे म्हणता येईल इतक्या, भांडवल-सहाय्याचे वाटप करणारी एखादी आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन होईल अशी शक्यता आहे. आर्थिक विकासासाठी संयुक्त राष्ट्रसंघाचा खास निधी–(दि स्पेशल युनायटेड नेशन्स फंड फॉर इकॉनॉमिक डेव्हेलपमेंट) सनफेड–हे याच दृष्टीने महत्त्वाचे ध्येय आहे; जरी मोठ्या राष्ट्रांनी अद्याप त्याला संमती दिलेली नसली तरी त्याचे महत्व मोठे आहे.

दरम्यानच्या काळात, व्यापाराच्या अटींत सुधारणा करण्यासाठी व त्यांच्या निर्यातीच्या मागण्यांतील धोकादायक चढउतार रोखण्यासाठी आंतरराष्ट्रीय कृती करण्यात यावी ह्या मागण्या पुढे आणण्यासाठी अर्धविकसित देश आंतरराष्ट्रीय संघटनांचा उपयोग करीत आहेत. तरंतु ह्या क्षेत्रात महत्त्वाचे करार लवकर घडून येणे शक्य दिसत नाही. औद्योगिक मक्तेदारीवर आंतरराष्ट्रीय नियंत्रण बसविण्याची कल्पनाही गुपचुपपणे बाजूला टाकण्यात येत आहे.

अशा रीतीने व्यावहारीक फलनिष्पत्ती फारच कमी किंवा शून्य असली तरी, समान संधीसाठी सवलतहीन राष्ट्रे जेथे आपल्या मागण्या मांडू शकतील आणि बाजारपेठेतील शक्तींच्या कार्याविरुद्ध असंतोष व्यक्त करू शकतील अशी आंतरराष्ट्रीय व्यासपीठे आता अस्तित्वात आहेत हीच फार मोठी महत्त्वाची गोष्ट आहे. सध्याची लक्षणे जरी उत्साहभंग करणारी असली तरी अशी एक वेळ येईल की जेव्हा, अस्तित्वात

असलेल्या आंतरराष्ट्रीय संघटनातील जागतिक सरकारांचे अंकुर हळूहळू बलिष्ठ होतील आणि ते, प्रत्येक राष्ट्रीय सरकार त्याच्या सीमांतर्गत भागात जसे कार्य करते तसे कार्य अधिकाधिक मोठ्या प्रमाणावर करू लागतील.

आपण ही गोष्ट विसरता कामा नये की, अगदी अलिकडच्या काळापर्यंत, म्हणजे दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभापूर्वीच्या काळापर्यंत, संयुक्त राष्ट्रसंघाचा तांत्रिक मदतीचा कार्यक्रम (यू. एन्. टेक्निकल असिस्टंटस् प्रोग्रॅम) वस्तुतः ज्याचे प्रतीक आहे, असा लहान प्रमाणावरील आंतरराष्ट्रीय करांबद्दलचा दृष्टिकोन स्वीकारणे कोणाही अभ्यासकाला अगर मुत्सद्याला अशक्यच होते.

परंतु निष्कर्ष हाच निघतो की, नजीकच्या दृष्टिपथातील भविष्यकाळात, आंतर-सरकारी संघटनांच्या पुढाकाराने सुरू झालेली धोरणांच्या दुरुस्तीची कार्ये फारच कमी असतील—अर्ध-विकसित देशांतील खरेदीविक्रीच्या अटींत जे कमीअधिक बदल प्रतिवर्षी घडून येतील अशी अपेक्षा आहे, त्यापेक्षा ती फारच कमी असतील.

अशा परिस्थितीत, अर्ध-विकसित देशांना मुख्यतः त्यांच्या स्वतःच्या साधन-सामुग्रीवरच अवलंबून राहावे लागेल. त्यांची परिस्थिती सर्वस्वी निराशाजनक नाही. अधिकाधिक समतेच्या दृष्टीने बाजारपेठेच्या शक्तींच्या क्रियाप्रक्रियेत हस्तक्षेप करू शकणाऱ्या जागतिक सत्तेचा अभाव असताही, ही राष्ट्रे त्यांच्या अर्थव्यवस्थेवर स्वामित्व प्रस्थापित करीत आहेत आणि स्वतःच्या आयात-निर्यात व्यापारापुरते ते आंतरराष्ट्रीय व्यापाराचे नियमनही करू शकतात.

प्रकरण ६ वे

अर्ध-विकसित देशांमधील राष्ट्रीय सरकारांची धोरणे[१]

उगवता राष्ट्रवाद

आजपर्यंत बाजारपेठेच्या ज्या प्रक्रियांच्या प्रभावामुळे अर्ध-विकसित देश मागासलेले राहिले, त्यांची दिशा नवप्राप्त स्वातंत्र्याचा उपयोग करून घेऊन, हेतुपूर्वक धोरणांच्या हस्तक्षेपाने, ते आता पुष्कळ मोठ्या प्रमाणावर बदलू शकतात. ज्याने त्यांना पूर्वी खाली दाबले होते, त्या प्रक्रियांचे संचयी स्वरूप त्यांना त्यांच्या धोरणात्मक प्रयत्नांबद्दल आता उत्कृष्ट फळ देण्याचेही आश्वासन देते, मात्र, त्यांची धोरणे त्यांनी हुशारीने आखली पाहिजेत आणि ती परिणामकारक रीतीने पार पाडली पाहिजेत; परंतु हा "मात्र" फारच महत्त्वाचा आहे.

त्यांनी मिळविलेले अगर आता ते मिळवीत असलेले राजकीय स्वातंत्र्य हे त्यांचे फार मोठे तारण आहे. आपल्याला हितानुकूल ठरेल अशा पद्धतीने जीवन घडविण्याची त्यांना त्यामुळे मोकळीक मिळते. जागतिक राज्यसत्तेच्या अभावी, त्यांची धोरणे राष्ट्रवादी असली पाहिजेत; म्हणजे स्वतःची आर्थिक पातळी उंचावण्याच्या आणि बाकीच्या जगाबरोबर समान संधी मिळविण्याच्या तीव्र, एकाग्र-बुद्धीने ती आदेशित झाली पाहिजेत. ते गरीब असल्यामुळे त्यांनी आंतरराष्ट्रीय हिता-अहिताच्या विचारात शिरण्याचे प्रयोजन नाही; त्यांपैकी जे विचार त्यांनाही अनुकूल असतील त्यांचाच फक्त त्यांनी विचार करावा. श्रीमंत देशही फारसा मोठा खरोखरीचा त्याग करीत नाहीत, मात्र त्यांनी तो केल्यास ते स्वातंत्र्याच्या व समतेच्या ध्येयाला धरून होईल.

नवस्वतंत्र अर्ध-विकसित देशांना आर्थिक राष्ट्रवाद शिकविण्याची आवश्यकता नसते. मी पूर्वी सूचित केल्याप्रमाणे,लोकांना एकत्र आणण्याच्या आणि समान ध्येयाची व धोरणाची त्यांना स्फूर्ति देण्याच्या कामात राष्ट्रवादाला फार महत्त्वाची भूमिका असते, आणि कार्यक्षम जागतिक समजाच्या अभावामुळे तिचे महत्त्व अधिकच वाढते. परंतु ह्या विधानाचा राहिलेला भाग पूर्ण करणे ही मी माझी खास जबाबदारी समजतो,

आणि तो हा की, आर्थिक धोरण, केवळ राष्ट्रीय भावनांना पटते म्हणून सयुक्तिक ठरत नाही; आणि ते इतर देशांचे नुकसान करणारे असल्याच्या गुणामुळे तर तसे मुळीच ठरत नाही. ह्यावर जोर देणे महत्त्वाचे आहे, कारण, हक्कविहीन अर्ध-विकसित देशातील राष्ट्रवादात, अगदी स्वाभाविक कारणामुळेच, राष्ट्रांतर्गत विकासाच्या व कल्याणाच्या तीव्रेच्छेच्या विधायक प्रवृत्तीच केवळ नसतात, तर, त्यांच्या राष्ट्रीय आशाआकांक्षा दडपून टाकण्यासाठी जे श्रीमंत देश आतापर्यंत सत्तेचा उपयोग करीत असत, त्यांच्या विरुद्ध तीव्र असंतोषदेखील त्यात असतो.

सूज्ञ व समर्पक राष्ट्रवादाची मर्यादा ठरविताना पुढील सोपा नियम पाळला पाहिजे : स्वतःचे आर्थिक कल्याण साधणारी कोणतीही किंवा सर्व उपाययोजना समुचित कारणांच्या आधाराने करणे अर्ध-विकसित देशांना अगदी उचित असते, परंतु राष्ट्राच्या संपूर्ण व अंतिम परिणामांच्या दृष्टीने हितावह नसलेल्या धोरणात्मक उपाययोजना टाळण्याचा त्यांनी काळजीपूर्वक प्रयत्न केला पाहिजे. आणि सांस्कृतिक दृष्टीने त्यांनी सर्व जगापासून शिकण्याची तयारी ठेवली पाहिजे. श्रीमंत जगाच्या संस्कृतीपासून व मूल्यापासून अलग पाडणाऱ्या भिंती उभारणे हे पराभूतवादाचे धोरण असून, गरीब देशांना ते मुळीच परवडण्यासारखे नाही.

सयुक्तिक राष्ट्रवादाला हा उपदेश मी अगदी शुद्ध अंतःकरणाने देत आहे, कारण माझी खात्री आहे की, अर्ध-विकसित देशांच्या राष्ट्रवादी आर्थिक धोरणांच्या यशामुळे आपण अधिक जवळजवळ येऊ आणि आंतरराष्ट्रीय ऐक्यावर आधारलेल्या, एकात्म जागतिक धोरणाची परिणामकारक रीतीने अंमलबजावणी करण्याच्या अवस्थेपासून आपण दूर गेलेले असणार नाही. अर्ध-विकसित देशांची सांस्कृतिक पातळी खालची रहाण्याचे कारण दारिद्र्य हेच असते. आणि आपल्याला आवडो किंवा न आवडो, ही गोष्ट खरी आहे की, आपल्यापेक्षा भिन्न असलेल्यांच्याबद्दल नम्र दयाळूपणाची भावना बाळगल्याने ऐक्याची मनोभूमिका तयार होत नाही; ती समान व जवळजवळ समान असलेल्यांमध्येच आपोआप निर्माण होते.

अमेरिकेतील पददलित निग्रो, गोऱ्यांचे पूर्वग्रह दूर करून, स्वतःचे मानवी हक्क स्वाभाविक रीतीने मान्य करून घेऊ शकत नाही, तर, सुशिक्षित, सधन व निर्भय निग्रो—हाच त्यासाठी परिणामकारक लढा देणारा निग्रो असतो. आपल्या प्रगत देशातील कामगार जेव्हा संपाचा हक्क मिळवितात व दृढ करतात तेव्हाच ते समान पातळीवरून सामुदायिक करार करण्यास समर्थ ठरतात—आणि मग संप ही क्वचितच घडणारी घटना ठरते.

लोकोपकारी जमीनदारांनी दयाबुद्धीने पुढाकार घेऊन जमीन-सुधारणा कधीच दान केल्या नाहीत, तर जमिनीसाठी भुकेलेल्या शेतकऱ्यांच्या असंतोषाने त्या त्यांच्यावर लादल्या गेल्या. आणि आपल्या प्रगत देशातील सद्यकालीन शेती-उत्पादनाच्या किंमतीबद्दलचे धोरण शेतकऱ्यांच्या राजकीय सामर्थ्याने निर्माण झाले आहे. ह्या

राजकीय सामर्थ्याचा अभाव असता तर, यांपैकी बहुतेक देशांतील ग्रामीण विभाग, बऱ्याच काळापर्यंत, अधिक दरिद्री व मागासलेले राहिले असते.[२]

त्याचप्रमाणे, राष्ट्राराष्ट्रांत हा प्रश्न मूलतः सत्तेचा समतोल निर्माण करण्याचा प्रश्न आहे. आपल्या आंतरराष्ट्रीय संघटनांच्या कार्याच्या निरीक्षणावरून मी अशा निष्कर्षाला आलो आहे की, सध्याच्या ऐतिहासिक अवस्थेत त्यांच्या कमकुवतपणाचे मुख्य कारण आंतरराष्ट्रीय विषमता हे आहे. अधिक स्पष्टपणे सांगायचे म्हणजे, अर्ध-विकसित देशांची किफायतशीर सौदा करण्याच्या बाबतीतील अत्यंत कमी ताकद हे त्याचे कारण आहे, कारण त्या संघटनांमध्ये अशा देशांची औपचारिकरीत्या बहुसंख्या असली तरी श्रीमंत व बलवान राष्ट्रांच्या लहान अल्पसंख्येचे त्यांच्यावर वर्चस्व चालते.

हक्कविहीन (अंडरप्रिव्हिलेज्ड) राष्ट्रांमधील ऐक्याची वाढ

ज्या जागतिक परिस्थितीत अधिक लोकशाहीवादी सत्तेचा समतोल असेल आणि त्यामुळे आंतरराष्ट्रीय संयुक्त कृतीला अधिक मजबूत पाया असेल, अशी परिस्थिती निर्माण करण्याच्या दृष्टीने, हक्कविहीन राष्ट्रांमधील ऐक्याचा विकास, हे पुढे पडणारे पाऊल आहे. कारण, त्यामुळे त्या राष्ट्रांचे सामर्थ्य वाढते.

अर्ध-विकसित देशांचे मुख्य सांस्कृतिक व आर्थिक संबंध, आणि खरे म्हणजे त्यांची बहुतेक सर्व देवाणघेवाण, एका किंवा अनेक औद्योगिक देशांबरोबर, ठेवण्याकडे त्यांचा कल असतो; परंतु त्यांचे परस्परांशी संबंध मात्र कमकुवत असतात. दीर्घकालीन आर्थिक व सांस्कृतिक मागासलेपणा, परकीय आर्थिक वर्चस्व व विशेषतः राजकीय वसाहतशाही यांचा तो स्वाभाविक परिपाक आहे.

याच्याशी तुलना करावयाची झाल्यास ती श्रेष्ठत्व गाजविणाऱ्या वर्गातील कुटुंबांशी व त्यांतील व्यक्तींशी आश्रित व आश्रयदाते असे संबंध दृढपणे प्रस्थापित झाल्यामुळे निर्माण झालेल्या, अनेक गतिहीन देशांतील दलित वर्गातील कुटुंबे व व्यक्ती यांच्या बरोबरच्या निकट संबंधांच्या अभावाशी करता येईल. अशा समाजाप्रमाणेच व्यापक जगातही, हक्कविहीन समाजगटांना, स्वतःचा उद्धार, परस्परांशी आंतरसंबंध वाढवून करावा लागतो. एकमेकांशी सहकार्य करून आणि किफायतशीर सौदा करण्याची जी शक्ती असेल ती एकत्रित करून, अर्ध-विकसित देश, त्यांना अलगपणे अलभ्य असलेले महत्त्व, सर्व मिळून मिळवू शकतात.

अद्यापही, अर्ध-विकसित देशांमध्ये व्यावहारिक आर्थिक सहकार्य जवळजवळ नाहीच, आणि ते वाढविण्याचा पायाही कमकुवत आहे. कारण, आर्थिक संबंधाची जवळजवळ संपूर्ण अनुपस्थिती व पुष्कळदा कार्यक्षम दळणवळणाच्या सोयींचा अभाव अशी आरंभीची परिस्थिती आहे. परंतु, अधिक व्यापक राजकीय पातळीवर अर्ध-विकसित देशांतील ऐक्यभावना वाढत आहे आणि येत्या काळात ती इतिहासाची एक

महान शक्ती बनणार आहे. परकीय वर्चस्वाची व पिळवणुकीची आठवण, दारिद्र्याची व आंतरराष्ट्रीय विषमतेची तीव्र जाणीव आणि जगातील संधींच्या उपभोगात पूर्ण सहभागी होण्यासाठी उत्थानाची महत्त्वाकांक्षा ह्या गोष्टी त्यांच्यात सारख्याच आहेत.

अद्यापही पराधीन असलेल्या देशांतील स्वातंत्र्य-संग्रामांना ह्या सर्व राष्ट्रांनी मिळून दिलेला पाठिंबा ही आजच पुष्कळ महत्त्वाची राजकीय वस्तुस्थिती बनली आहे. त्यांच्या अंतर्गत धोरणात परस्परांच्या अनुभवापासून शिकण्यास त्यांनी प्रारंभ केला आहे, आणि ते विकसित देशांकडून सर्व नमुने घेत नाहीत. कालांतराने ह्या गटात व्यावहारिक आर्थिक सहकार्य वाढेल.

अर्ध-विकसित देशांमधून झगडत असलेल्या मानवजातीच्या मोठ्या विभागात जेव्हा आंतरराष्ट्रीय ऐक्यभावना वाढेल, तेव्हा विकसित देशांतील अल्पसंख्यांकांना समान ध्येयासाठी समान धोरणे आखण्यासाठी काळजीपूर्वक पावले टाकून, सामर्थ्यवान होत चाललेल्या बहुसंख्यांकांना येऊन मिळावे लागेल.

अनुकूल परिस्थितीत, जागतिक ऐक्य अशा रीतीने आपल्या समीप येईल, आणि जागतिक राज्यसत्तेच्या सदृष्याचा क्रमशः उद्‌गम अगर त्याची जवळीक निर्माण होईल, असे मला वाटते. ह्या बाबतीत श्रीमंत देशांचे औदार्य हा दुय्यम घटक असेल, आणि याचे कारण अगदी साधे आहे, आणि ते हे की, कोणत्या तरी प्रकारच्या सक्तीचा प्रबळ जोर नसेल तर, आपली प्रगत राष्ट्रे त्यांचे हक्क सोडून देण्यास आणि गरीब देशांसाठी त्याग करण्यास तयार नाहीत.

वरिष्ठ पातळीवरून चळवळी होऊन कोणत्याही देशाने स्वतःला भरीवपणाने सुधारलेले नाही; किंवा सामाजिक जाणिवेमधून, वरिष्ठ वर्गाने, खालच्या वर्गांबरोबर समान होण्याचा आणि त्यांना वर्गीय मक्तेदारीत प्रवेश देण्याचा सरळ स्वयंनिर्णय घेतल्यामुळे कधीही सुधारणा झालेली नाही. ध्येये व सामाजिक जाणीव फार महत्त्वाची भूमिका पार पाडतात, हे विसरता कामा नये; परंतु स्वयंप्रेरणेने कार्य करणाऱ्या शक्ती, व्यापक प्रमाणावर सुधारणांना चालना देणारी शक्ती या नात्याने कमकुवत असतात— मागण्यांचा आवाज व त्यांच्याबद्दल आग्रहाचा दबाव यांचा जोर त्यांना खेचण्यासाठी आवश्यक लागतो.

ज्यांच्या तक्रारी आहेत त्यांनी सामर्थ्य वाढविले म्हणजे मग ध्येये व सामाजिक जाणीव परिणामकारक ठरतात.

श्रीमंत व गरीब राष्ट्रे यांच्यातील वाढते अंतर

हेगेलच्या शब्दांत बोलायचे म्हणजे : आंतरराष्ट्रीय एकात्मतेच्या मार्गाचा शोध राष्ट्रीय एकात्मतेमधून घेतला पाहिजे. गरीब देशांकडून राष्ट्रवादी धोरणांचा अंगिकार आणि ह्या धोरणांच्या परिणामी व गट या नात्याने त्यांच्यातील वाढलेल्या

सहकार्यामुळे' किफायतशीर सौदे करण्याच्या त्यांच्या सामर्थ्याची वाढ, ह्या घटना, अधिक परिणामकारक जगव्यापी आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या विकासातील महत्त्वाची अवस्था होत.

ह्या पंडिती विचारांसाठी नेहमीप्रमाणे इंग्लिश लोकांत एक साधा व बोली-भाषेतील वाक्प्रयोग आहे : परिस्थिती सुधारण्यापूर्वी ती अतिशय बिघडली पाहिजे. वस्तुतः, समृद्ध व अति-विकसित देशात घडून आलेल्या राष्ट्रीय एकात्मतेने पुष्कळच आंतरराष्ट्रीय विघटन केले आहे. त्याचप्रमाणे, अर्ध-विकसित देशांच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या जवळीकतेमुळे, प्रथमतः, आंतरराष्ट्रीय तणाव वाढेल. भविष्यकाळात दृष्टिक्षेप टाकूनच आपण अशी शक्यता पाहू शकतो की, जेव्हा अधिक सुसंघटित राष्ट्रे अधिक निकटच्या आंतरराष्ट्रीय सहकार्याचा मार्गही शोधून काढतील.

परंतु हीसुद्धा एक शक्यताच आहे आणि ज्याच्यासाठी प्रयत्न करावेत असे वांछनीय ध्येय आहे. दुसरी व कमी सुदैवाची शक्यता आपण नजरेआड करू शकत नाही. ती अशी आहे की, खालच्या वर्गातील राष्ट्रे जसजशी अधिक ऐक्यबद्ध होतील व त्याच-बरोबर त्यांच्या तक्रारींबद्दल अधिक स्पष्ट जाणीव त्यांच्यात निर्माण होईल, तेव्हा ह्याच घडामोडीमुळे वरच्या वर्गातील राष्ट्रांतील स्वसंरक्षण भावना चेतावल्या जातील, आणि त्यामुळे, ह्या दोन वर्गांतील राष्ट्रांमधील राजकीय तणाव सतत वाढत जाईल.

सध्या श्रीमंत व आर्थिक दृष्टीने प्रगत राष्ट्रांना गरीब व अर्ध-विकसित देशांच्या आर्थिक विकासाच्या प्रयत्नांना तोंड देत असताना, स्वसामर्थ्याचा उपयोग करण्याचा सर्वात सोपा मार्ग त्यांना अनेक नकारात्मक पद्धतींनी स्वीकारता येईल. उल्लेखनीय अशी मोठी भांडवलाची मदत ते नाकारू शकतील आणि ते नाकारतात. अर्ध-विकसित देशांच्या निर्यात मालाच्या किंमती स्थिर करण्यासाठी आंतर-सरकारी कृतीत सामील होण्यास, जहाज वहातुकीच्या व औद्योगिक क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय व्यापारावर नियंत्रण घालण्यास, आणि ज्या सर्व चांगल्या गोष्टी करण्याची त्यांच्या अर्थशास्त्रज्ञांनी व मुत्सद्यांनी, दुसऱ्या महायुद्धाच्या व त्यानंतरच्या काळात, हमी दिली होती त्या करण्यास ते नकार देऊ शकतील आणि ते नकार देतात.

आंतरराष्ट्रीय संघटनांच्या अर्थसंकल्पांना मोठा हिस्सा देणारे देश या नात्याने, श्रीमंत देश हे अर्थसंकल्प लहान बनवू शकतात व ते लहान बनवितात; त्यामुळे एक-एकजुटीच्या कार्याच्या वाढीसाठी ह्या संघटनांची स्थापना झाली ती परिणामकारक होण्यात अडथळे येतात. अर्थसंकल्पांचे नियंत्रण, बहुतेक क्षेत्रांतील कुशल ज्ञानाची सापेक्ष मक्तेदारी आणि आंतरराष्ट्रीय संघटनांच्या प्रमुख अधिकाऱ्यांवर असलेले त्यांचे वजन व त्यांच्या निवडीवर व नेमणुकीवरही असलेले वजन, या सर्वांचा उपयोग करून ते धोकादायक नव्या गोष्टींचा प्रारंभ टाळू शकतात आणि प्रस्थापितपरिस्थितीला आव्हान देतील अशी संशोधने केली जाणार नाहीत याची दक्षता घेऊ शकतात. आंतर-राष्ट्रीय संघटनांच्या कार्याचे, विशेषतः आर्थिक क्षेत्रातील कार्याचे, विश्लेषण केले असता

आढळून येते की, ह्या संघटना (त्यांच्या हिताला) अधिकाधिक अनापायकारक बनविण्याचे प्रयत्न बहुधा यशस्वी झाले आहेत.

अधिक समृद्ध असलेल्या देशांतील स्वाभाविक प्रवृत्तीशी ही नकारात्मक धोरणे मिळती जुळती आहेत; कारण आहे ती परिस्थिती टिकवून धरणे त्यांच्या हितसंबंधांना धरून आहे. त्यांनी त्याग का करावा ? हे खरे आहे की, अर्ध-विकसित देशांत रहाणाऱ्या गरीब लोकांच्या कल्याणाप्रित्यर्थ व त्या हेतूने त्याग करणे शक्य आहे. शिवाय असेही म्हणता येईल की, हा त्याग आंतरराष्ट्रीय एकात्मतेला पोषक ठरेल, आणि श्रीमंत देशांच्या ध्येयांना धरून व त्यांच्याही दीर्घकालीन राष्ट्रीय हिताला अनुकूलच होईल. परंतु तशा धोरणाला योग्य असा मानसिक ऐक्याचा पाया तेथील लोकांत नाही आणि त्यांच्या राजकीय पुढारीपणातही अशी धोरणे स्वीकारण्याची दृष्टी व धाडस यांचा अभाव आहे.

त्याचबरोबर, राष्ट्रीय एकात्मतेसाठी झटत असताना अर्ध-विकसित देश अशा अनेक उपाययोजना केल्याशिवाय रहाणार नाहीत की ज्यांच्यामुळे श्रीमंत देश वर उल्लेखिलेल्या नकारात्मक धोरणाशिवाय इतर कोणतीही धोरणे स्वीकारण्यास निरुत्साही होतील. आणि श्रीमंत देशांची नकारात्मक धोरणे त्यांच्या बाजूने अर्ध-विकसित देशांना अशा उपाययोजना अधिक प्रमाणावर करण्यास भाग पाडतील. शिवाय, त्यांना त्यांच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या धोरणात श्रीमंत देशांबद्दल अधिक असहिष्णुता बाळगण्यास उत्तेजन देतील. पुन्हा एकदा, आपण संचयी परिणाम असलेल्या चक्राकार कार्यकारणभावाच्या परिस्थितीला सामोरे आलो आहोत.

वास्तविक, अर्ध-विकसित देशांची राष्ट्रीय आर्थिक धोरणे, मोठ्या प्रमाणावर, विशेषतः प्रारंभीच्या अवस्थात ज्या श्रीमंत देशांबरोबर त्यांचे परंपरागत अत्यंत निकट आर्थिक संबंध होते त्यांच्याविरुद्धच असावी लागतील. कारण ते संबंध वसाहती अगर निम-वसाहती परावलंबाचे प्रतिनिधित्व करीत होते आणि म्हणून ते संपुष्टात आलेच पाहिजेत. आणि जी पूर्वी अधिक सवलत असलेली राष्ट्रे होती व ज्यांच्या त्या सवलती आता काढून घेतल्या पाहिजेत त्यांच्या हिताच्या हे विरुद्धच होईल.

ह्या प्रक्रियेत, दीर्घकाळ अस्तित्वात असलेले अनेक आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंध तोडावे लागतील. अनेक ठिकाणी अर्ध-विकसित देशांना त्यांच्या नैसर्गिक साधन-सामुग्रीचा फायदा उठविणाऱ्या परकीय मालकीच्या उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयीकरण करावेसे वाटेल. ह्या राष्ट्रीय आर्थिक मुक्तीच्या प्रक्रियेमधील विशिष्ट उपाययोजनेसाठी असलेली कारणे कधी कमकुवत तर कधी बलवान असतील, कधी सयुक्तिक तर कधी असयुक्तिक असतील. पण सर्वच प्रकारच्या परिस्थितीत त्याचा परिणाम म्हणून अर्ध-विकसित देशांत भांडवल-गुंतविण्याचा विश्वास कमी होईल. खरे म्हणजे ह्या देशांबरोबरच्या सर्व व्यापारधंद्यांतील संबंधाबद्दलचा विश्वास त्यामुळे कमी होईल.

मी पूर्वी नमूद केले आहेच की, काही प्रमाणात, अर्ध-विकसित देशांत वाढता

राष्ट्रवाद वांछनीय व आवश्यकही आहे. तेथे रहाणाऱ्या लोकांना, अनेक शतकांच्या आर्थिक व सांस्कृतिक गतिशून्यतेने निर्माण केलेल्या उदासीनतेमधून व निराशेमधून बाहेर काढण्यासाठी आणि ज्यांच्याशिवाय कोणत्याही प्रकारचा विकास होऊ शकत नाही अशा, राष्ट्रीय सामाजिक व्यक्तींचे स्वरूप त्यांना प्राप्त करून देण्यासाठी, राजकीय पुढाऱ्यांना राष्ट्रवादी भावनांना आवाहन करावेच लागते.

अशी आवाहने बहुधा नेहमीच परिणामकारक ठरतात. बहुतेक अर्ध-विकसित देशांत राजकीय परंपरा, स्थिर राज्यकारभार व सुशिक्षित नागरिक यांचा अभाव आहे. ह्यांपैकी बहुतेक देशांतील लोक वांशिक व धार्मिक भावनांच्या आहारी गेलेले असतात. हे रहिवाशी जेव्हा त्यांच्या तक्रारींबद्दल जागृत होतात तेव्हा त्यांच्या राष्ट्रवादी भावनांचा विकास सहजपणे असयुक्तिक ठरण्याइतका तीव्र बनू शकतो. आणि ह्या भावना चेतविणे हे पुष्कळदा, प्रत्येक मुत्सद्याला आवश्यक असलेली राजकीय सत्ता मिळविण्याचे व टिकविण्याचे सर्वांत अधिक परिणामकारक व कधी कधी एकमेव साधन असते.

त्याचा सहज रीतीने असा परिणाम होऊ शकतो की, राजकीय पुढाऱ्यांना परकीय हितसंबंधाविरुद्ध अशी धोरणात्मक पावले उचलावी लागतात की जी देशाच्या खऱ्या विकासाच्या हिताने प्रेरीत झालेली नसतात; उलट लोकांच्या ज्या तीव्र राष्ट्रवादी भावना पुढाऱ्यांना चेतवाव्या लागतात त्यांच्याचसाठी ती घेतलेली असतात. आणि ह्या प्रक्रियेत त्या भावनांची तीव्रता अधिकच वाढते. त्यामुळे, ह्या धोरणात्मक पावलांच्या व भावनात्मक कार्यकारणभावाच्या परिणामी, विकसित देश अधिक नकारात्मक भूमिका स्वीकारण्यास प्रवृत्त होतात. आणि अशा रीतीने, चक्राकार कार्यकारणभावाने, श्रीमंत व गरीब देशांमधील राजकीय अंतर, संयुक्तपणे वाढण्याचा संभव असतो.

गरिबांचे सामर्थ्य

मदत द्यायची नाही, भांडवलाला स्थलांतर करू द्यायचे नाही, अर्ध-विकसित देशांच्या हिताला अनुरूप अशी संयुक्त कृती करण्याची तयारी करण्यात आंतरराष्ट्रीय संघटना यशस्वी ठरू द्यायच्या नाहीत; असे धोरण घेऊन श्रीमंत देश निष्क्रियतेचे सामर्थ्य वापरू शकतात व वापरतात.

आणि अर्थातच ते लाचही देऊ शकतात. लाच शब्दाचा अर्थ जर व्यापक केला व केवळ कायद्याच्या अर्थानेच वापरला नाही तर असे दिसून येते की, जुन्या वसाहती पद्धतीतील अनेक आवश्यक घटक, व्यक्तींना व सामाजिक गटांना लांच देण्याच्याच स्वरूपाचे होते. युद्धोत्तर काळातील जगात, राजकीय अटी घालून आर्थिक मदत देण्याचे जे प्रयत्न चालतात ते याच प्रकारात मोडतात. एकंदरीने पहाता, आणि त्यांचे कायमचे संभाव्य परिणाम लक्षात घेता, असे प्रयत्न फारसे यशस्वी झालेले

नाहीत. अखेरीस त्यांच्यामुळे पुष्कळदा लोकांचा असंतोष अधिकच वाढतो.

अर्ध-विकसित देश लष्करी, आर्थिक व व्यापारी दृष्टीने कमकुवत आहेत. मी अनेकदा त्यांच्या फायदेशीर सौदे करण्याच्या असमर्थतेचा उल्लेख जगातील असमतोलाचे एक मूलभूत कारण म्हणून केला आहे. अशा परिस्थितीत, कोणत्या तरी रीतीने त्रास देण्याची अगर तसे करण्याची धमकी देण्याची त्यांची पात्रता, हे त्यांचे खरे राजकीय सामर्थ्य आहे. ते सामर्थ्य त्यांनी प्रसंगविशेषी वापरले तर आपण आश्चर्य मानू नये.

परिणामकारक कार्यक्षम राजकीय लोकशाही अस्तित्वात येण्यापूर्वीच्या "दडपशाही करणाऱ्या राज्यसत्ते"च्या काळात, गरीब माणसाचे अखेरचे संरक्षण शस्त्र त्रास देणे हेच होते. थॉमस हॉब्सनी दाखवून दिले आहे की, कोणत्याही व्यक्तीच्या चांगली कृत्ये करण्याच्या शक्यता मर्यादित असल्या तरी, प्रत्येकाला आत्यंतिक वाईट करण्याच्या संधी अमाप असतात. ह्या तत्त्वाप्रमाणे जागतिक समाजसमूहातील असंतुष्ट सभासदांना धमकी देऊन दबाव आणण्याचे सामर्थ्य असते, आणि ते जसेजसे उदासीनता, सामाजिक विभक्तता व स्थानिक अलगपणाच्या प्रदीर्घ कालखंडातून बाहेर पडून राष्ट्रीय ऐक्य साधतील, तसेतसे ते हे सामर्थ्य स्वहितासाठी मोठ्या प्रमाणावर वापरावयास शिकतील.

सर्व जगाने किंवा श्रीमंत देशांपैकी एखाद्या विशिष्ट देशाने आपल्याला इतके वाईट रीतीने वागविले आहे की प्राप्त असलेली कोणतीही राजकीय साधने वापरणे योग्य व न्याय्य आहे असे पुष्कळ अर्ध-विकसित देशांतील लोकांना वाटते. स्वतःच्या न्यायीपणात सयुक्तिक हेतुवादाचा अभाव आढळल्यास तो भावनात्मक राष्ट्रवादाने ते बहुधा भरून काढतात. जे फायद्याचे असेल ते धोरण समर्थनीयही असते, ही जुनी अश्रद्धाळूपणाची विचारसरणी, पाश्चिमात्य वसाहतशाहीच्या शेकडो वर्षांत, अर्धविकसित देशांत, अर्थातच, दूरवर पसरली आहे; ह्या वसाहतशाहीने साधनांच्या बाबतीत नैतिक विचारांचे निर्बंध कधीच विशेष पाळले नव्हते.

अर्ध-विकसित देशांच्या विकासाच्या समस्यांबद्दल श्रीमंत देश जितके अधिक नकारात्मक धोरण स्वीकारतील, तितक्या मोठ्या प्रमाणावर, ते देश धमक्या देऊन दबाव आणण्याचा धोका वाढत जाईल. जागतिक लोकशाहीच्या दिशेने—म्हणजे श्रीमंत देशांत आंतरराष्ट्रीय ऐक्याची वाढ आणि समान संधी निर्माण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याचा वाढता प्रवाह सुरू होण्याच्या दिशेने—खरी प्रगती ज्या प्रमाणात होईल, त्या मानानेच आपण अशी आशा बाळगू शकू की, अर्ध-विकसित देशांतील मुत्सद्दी दूरदृष्टीने श्रीमंत देशांविरुद्ध धमक्या देऊन कार्यभाग साधण्याचे धोरण सोडून देण्याच्या मनःस्थितीत येतील. उलट, श्रीमंत देशांचा नकारात्मक दृष्टिकोन अशा तऱ्हेच्या दबावाची थोडी उदाहरणे दृष्टीस पडली तरी अधिक परिणामकारक रीतीने दृढ होईल, ही गोष्ट स्पष्ट आहे. पुन्हा एकदा आपण संचयी

परिणाम असणाऱ्या चक्राकार कार्यकारणभावाच्या तत्त्वांच्या सामोरे आलो आहोत.

दरम्यानच्या काळात आपण झपाट्याने अशा एका कालखंडाकडे जात आहोत की ज्यात, सापेक्षेने कमी लष्करी सामर्थ्य असलेल्या देशांना, जे हक्कविहीन व असंतुष्टही आहेत त्यांना, वर्चस्वाखाली ठेवण्यासाठी आपले श्रेष्ठ लष्करी सामर्थ्य वापरणे श्रीमंत देशांना शक्य नाही. अर्थातच, ह्या फार मोठ्या बदलामुळे जगात अधिक योग्य शक्तीचा समतोल निर्माण होईल. हा बदल आंतरराष्ट्रीय संघटनांनी घडवून आणलेला नाही. खरे म्हणजे हेतुनिष्ठ धोरणांमधून तो निष्पन्नच झालेला नाही, तर तांत्रिक विकासाच्या आंधळ्या शक्तींमुळे निर्माण झाला आहे. या अणू-युगात, आंतरराष्ट्रीय संबंधात शक्तीचा वापर सर्व देशांतील सामान्य जनतेत अधिकाधिक अप्रिय झाला आहे; आणि श्रीमंत देशांत तो विशेषच अप्रिय होत आहे. कारण संघर्षामुळे नुकसान होण्यासारखे तेथील रहिवाशांजवळ सर्वांत जास्त आहे. ज्यातून जागतिक स्फोट होण्याचा धोका असेल अशा कोणत्याही कृतीबद्दल तेथील लोक सावध असतात.

जर, एखाद्या आणीबाणीच्या परिस्थितीत, श्रीमंत व लष्करीदृष्ट्या सामर्थ्यवान देशांपैकी एखाद्या देशाने, लष्करी सामर्थ्याचा वापर करण्याची धमकी देऊन एखाद्या अर्ध-विकसित देशावर विशिष्ट कृती करण्यासाठी दबाव आणला, तर हल्लीच्या काळात ती परिणामशून्य कृती ठरेल; उघडकीला येईल अशी थापेबाजी ठरेल. आणि मग ती उलटण्याचाही संभव असतो. धसास लागलेल्या प्रश्नावर श्रीमंत देशांत जे ऐक्य असेल ते त्यामुळे सहज संपुष्टात येऊ शकेल. त्याचबरोबर, हक्कविहीन राष्ट्रांमध्ये ऐक्य घडवून आणण्यास अशा धमकीइतकी सामर्थ्यवान चेतना अन्य स्वरूपात क्वचितच मिळेल.

आणि ज्या ज्या वेळी अशी धमकी दिली जाईल व प्रत्यक्ष कृतीत आणली जाणार नाही, त्या त्या वेळी तिच्या सामर्थ्याची थोडी जादू कमी होईल. आणि त्यानंतरच्या भविष्यकाळात धमकीचा उपयोग मुळीच होणार नाही. परंतु बळाच्या वापराच्या धमकीशिवाय सामर्थ्यशाली देशांच्याही निर्वाणीच्या आदेशांना अर्थ नसतो. ह्या परिस्थितीचा, सापेक्षतेने कमी लष्करी सामर्थ्य असलेल्या गरीब देशांना, डावपेचांच्या दृष्टीने फायदा मिळतो; आणि जगात आज असलेल्या सरासरी पातळीपेक्षा ते अधिक बेपर्वाईने वागणारे असतील तर विशेष फायदा मिळेल.

श्रीमंत देशांपैकी एखाद्या देशाच्या सरकारने खरोखरीच स्वतःच्या लष्करी श्रेष्ठत्वाचा वापर करण्याचे ठरविले तर त्या परिस्थितीत या देशांसमोरील पेच स्पष्ट दृष्टीस पडेल. जगातील लोकमत त्या देशाविरुद्ध एकवटल्याचे त्याला आढळून येईल, आणि स्वदेशातही बहुधा भयानक दुफळी माजल्याचे दिसेल. बळाच्या वापरामुळे त्या सरकारला जे काही अल्पकालीन फायदे मिळविता येतील ते सोडल्यास, कायमचा व निश्चित परिणाम नकारात्मकच होईल, कारण गरीब देशांचे प्रतिकार-

सामर्थ्य व द्वेशभावना ते स्वतःविरुद्ध एकवटून घेतील.

अर्ध-विकसित देशांना लष्करी बळाचे निदर्शन करून श्रीमंत देशांच्या इच्छेपुढे मान तुकविण्यास लावण्याचे दिवस फार काळापूर्वीच संपले आहेत—ही गोष्ट जागतिक दृष्टिकोनाच्या दृष्टीने सयुक्तिक असो वा नसो, आणि कायदेशीर प्रस्थापित स्थितीला धरून असो वा नसो, वस्तुस्थिती अशीच आहे.

नैतिक तत्त्व

श्रीमंत व अति-विकसित देशांत, इतर मतांबरोबरच आणखीही एक मतप्रवाह नेहमीच अस्तित्वात असतो, तो म्हणजे साम्राज्यशाहीविरोधी भावनांचा, आणि अधिक स्थूलमानाने, पददलितांबद्दलच्या सहानुभूतीचा. मी ९व्या प्रकरणात दाखवून देणार आहे त्याप्रमाणे, पाश्चिमात्य संस्कृतीमध्ये समाविष्ट असलेल्या परंपरागत नैतिकमूल्यावर तो आधारलेला आहे.

पश्चिम युरोपमधील जुन्या वसाहती देशांत व ब्रीटिशांच्या "गोऱ्या" वसाहतीं-मध्येही ह्या प्रवृत्ती आढळून येतात; अमेरिकेप्रमाणे ह्या वसाहतींना राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी कधीही लढावे लागले नाही. ज्यांची वसाहती साम्राज्ये नष्ट झाली आहेत अशा जर्मनी, इटली व आता मुख्यतः नेदर्लंडस्‌मधील देशात, ह्या भावना अधिक प्रमाणावर आढळून येतात; तसेच ज्यांनी कधीच वसाहती मिळविल्या नव्हत्या त्या स्कँडिनेव्हियातील देशातही त्या आढळतात, मात्र वसाहती सत्तांबरोबरील हितैक्या-मुळे आणि विशेषतः संधिसाधू अज्ञानामुळे व अलिप्ततावादामुळे त्या बहुधा मागे खेचल्या जातात. तरीसुद्धा, सर्वच श्रीमंत देशांत ह्या उदारमतवादी प्रवृत्ती बहुधा इतक्या मोठ्या प्रमाणावर असतात की, त्यांच्यापैकी एका किंवा अधिक देशांच्या हिताचे उल्लंघन करणाऱ्या अर्ध-विकसित देशांविरुद्ध एक आघाडी टिकवून धरणे त्यांना कठीण अगर अशक्य होते.

अनेक कारणांमुळे, पश्चिम युरोपातील श्रीमंत देशांपेक्षा किंवा ब्रिटिशांच्या "गोऱ्या" वसाहतींपेक्षा, साम्राज्यवादविरोधी व गरीबदेशांबद्दलच्या सहानुभूतीच्या भावना, अमेरिकेत पुष्कळच तीव्र आहेत. युरोपमध्ये व विशेषतः जगाच्या अर्ध-विकसित भागामध्ये, मी असे पाहिले आहे की, तेथील सामान्य माणसांना व मुत्सद्यां-नाही, अमेरिकन संस्कृतीतील ही प्रवृत्ती किती महत्त्वाची आहे याची खरी गुणग्राहकता नाही; आणि अमेरिकेचे राजकीय दोस्त असलेल्या, युरोपमधील जुन्या वसाहती सत्तांना पाठिंबा देण्याच्या अमेरिकेच्या सामर्थ्यावर त्यामुळे व्यवहारात किती मर्यादा पडतात याचेही त्यांना बरोबर आकलन नाही.

राजकीयदृष्ट्या परतंत्र असलेल्या देशांबरोबर, किंवा पूर्वी जे परतंत्र देश होते त्यांच्याबरोबर, युरोपियन सत्ताधाऱ्यांचे जे व्यवहार चालतात त्यांच्या हेतूंविषयी सर्वसाधारण अमेरिकन नागरिकाला संशय वाटतोच. शीत युद्ध चालू ठेवण्यात अंतर्भूत

असलेल्या गुंतागुंतीच्या डावपेचात्मक हितासाठी अनेक भिन्न भिन्न व पुष्कळदा नाजूक अशा दोस्तीच्या करारांची आवश्यकता नसती, तर अमेरिकेने अनेकदा व अधिक सडेतोडपणाने, गरीब देशांची बाजू घेतली असती. विशेषत: आजही राजकीय दृष्टीने परतंत्र असलेल्या देशांतील स्वातंत्र्य-युद्धांना तिने पाठिंबा दिला असता.

वसाहती सत्तांपैकी अमेरिकेच्या दोस्त राष्ट्रांच्या दृष्टीने, त्यांना असंतोष वाटेल इतक्या वेळा, अमेरिका तसे प्रत्यक्षपणे करीतच असते. इंडोनेशियाच्या स्वातंत्र्य प्राप्तीबद्दल डचांनी अमेरिकेला दोष दिला. अलिकडच्या काळात जेव्हा इंडोनेशियाने त्यांचे आर्थिक हक्क धुडकावून लावले तेव्हा अनेक डच लोकांना वाटले की त्याची अंतिम जबाबदारी अमेरिकेकडेच जाते, कारण त्यांच्या मताप्रमाणे, वॉशिंग्टनने नव-स्वतंत्र राष्ट्रांबद्दल अधिक कडक धोरण स्वीकारले असते तर ती घटना घडली नसती. पश्चिम गिनीच्या लोकांना राजकीय स्वातंत्र्याची स्वप्ने दिसतात आणि स्वातंत्र्य प्राप्तीची निश्चित तारीख ठरविण्याचा ते आग्रह धरतात याचे कारण अमेरिका त्यांना उत्तेजन देते अशा विचारांनी ऑस्ट्रेलियन लोकांना अमेरिकेबद्दल कटुता वाटते. आणि अलिकडच्या काळात अनेक प्रसंगी, फ्रेंच पत्रकारांनी व मुत्सद्यांनी उत्तर आफ्रिकेतील अरबांच्या उठावाबद्दल अमेरिकेला व रशियाला आलटून पालटून दोष दिला आहे.

वसाहतवादविरोधी परंपरेत असलेल्या प्रवृत्तींपेक्षाही अधिक सखोल पातळीवर, सर्व श्रीमंत देशांमध्ये अशी विस्तृत पसरलेली अस्पष्ट भावना आहे की, गरीब देशांतील हालअपेष्टात अन्यायाचे व नैतिक चुकांचे बीज आहे; आणि त्यांच्या स्वत:च्या अर्ध-सुरक्षिततेला त्यामुळे कोणतातरी अज्ञात, महाभयंकर व अभद्र धोका आहे. अर्ध-विकसित देशांविरुद्ध प्रतिहल्ला करू इच्छिणाऱ्या श्रीमंत देशांतील मुत्सद्यांचे हात, काही मर्यादेपर्यंत, वरील प्रवृत्तींमुळे, रोखले जातात.

सोविएत कक्षेची संबद्धता

ह्या पुस्तकातील विवरण फक्त सोविएतेतर जगापुरते आहे असे पुस्तकाच्या प्रस्तावनेत नमूद करण्यात आले आहे. परंतु १ ते ५ प्रकरणांत असलेल्या विश्लेषणाशी ह्या अस्पष्ट गृहीततत्त्वाचा विशेष संबंध नाही. वसाहती पद्धतीचा अंत आणि जागतिक सत्तेचा अभाव ह्यासंबंधीच्या ५व्या प्रकरणातील चर्चेच्या बाबींची कारणेही मुख्यत: सोविएत-कक्षेच्या बाहेर आहेत. त्याचप्रमाणे आर्थिक नियोजनासंबंधीच्या काही सर्वसाधारण, प्रश्नांची चर्चा असलेल्या पुढील प्रकरणाशीही ह्या गृहीततत्त्वाचा संबंध नाही. परंतु, ह्या प्रकरणात अर्ध-विकसित देशांच्या राष्ट्रीय धोरणांसंबंधी जी चर्चा केली आहे, आणि विशेषत: सोविएतेतर जगातील दोन वर्गांतील राष्ट्रांच्या संबंधांच्या विकासाबद्दलची जी चर्चा आहे, तिचा मात्र सोविएत कक्षेत काय घडते

याच्याशी निकटचा संबंध आहे. त्या घडामोडींचा इतर जगातील—व विशेषत: अर्ध-विकसित राष्ट्रांतील आर्थिक व राजकीय संबंधांवर काय परिणाम होतील त्यांच्याशी निश्चितपणे फार जवळचा संबंध आहे.

आणि म्हणून स्तालिनच्या मृत्यूनंतर तेथे जे प्रचंड बदल राजकीय व आर्थिक बाबतींत घडत आहेत त्यांची चर्चा वास्तविकपणे येथे करावयास पाहिजे. त्यांचे अर्ध-विकसित देशांच्या प्रश्नांवर काय परिणाम घडतील ?— असा प्रश्न उपस्थित करावयास पाहिजे. ह्या प्रश्नाचे उत्तर न देता जर आपण आपले विवरण तसेच थांबवीत असलो तर त्याचा अर्थ इतकाच की, आधीच्या प्रकरणांच्या अखेरीस आपण निश्चित निष्कर्षांच्या भरीव पद्धतीप्रत येऊन पोहोचू शकलो, परंतु सध्याचे प्रकरण मात्र एक मोठे प्रश्नचिन्ह देऊन पूर्ण करावे लागणार आहे.

संदर्भ टिपा

१. संपूर्ण पुस्तकाप्रमाणेच हे प्रकरणही इजिप्तने सुएझ कालव्याचे राष्ट्रीय-करण करण्यापूर्वी आणि त्या घटनेने प्रारंभित केलेले आंतरराष्ट्रीय परिणाम दिसू लागण्यापूर्वी लिहिले आहे. परंतु त्यात बदल करण्याची मला आवश्यकता वाटली नाही.

२. प्रगत देशातील हक्कविहीन लोकांच्या काही गटांनी मिळविलेल्या ह्या राजकीय विजयांपैकी काही त्यांनी अर्ध-विकसित देशांतील, त्यांच्याहूनही अधिक हक्कविहीन असलेल्या लोकांचे नुकसान करून, मिळविले आहेत. जागतिक सत्तेच्या अभावी, एकात्मता असलेली राष्ट्रे आणि त्यांचे कमी हक्क असलेले गटही, अशा संयुक्त धोरणात हितसंबंधी भागीदार म्हणून सामील होतात की, अधिक व्यापक दृष्टिकोनातून पाहिले असता, ती धोरणे आंतरराष्ट्रीय विषमता व पिळवणूक वाढविणारी ठरतात, ह्या वस्तुस्थितीचे हे उदाहरण आहे.

क्युबा व जावामधील लोक, आपण युरोपातील लोकांनी जर बीट पिकविण्यासाठी कमी श्रम खर्च केले, तर थोडे अधिक पैसे मिळवितील. आपल्या शेतकऱ्यांच्या लोण्याला संरक्षण देऊन, मार्गारिनसाठी, कच्च्या मालाचे उत्पादन करणाऱ्या राष्ट्रांना आपण कमी संधी देत आहोत. इजिप्तच्या कापूस-उत्पादकांना अमेरिका ज्या पद्धतीने वागवीत आहे ती त्यांना पसंत पडणे शक्यच नाही.

परंतु ह्या वस्तुस्थितीमुळे, राष्ट्रीय जीवनात राजकीय सत्तेच्या समतेच्या आधारावर ऐक्य कसे प्रस्थापित होते याचे उदाहरण देऊन मी जो मुद्दा मांडला आहे तो विसंगत ठरत नाही.

प्रकरण ७ वे

अर्ध-विकसित देशांमधील राष्ट्रीय आर्थिक नियोजन

सरकारी योजनेच्या आवश्यकतेसंबंधी एकवाक्यता

अर्ध-विकसित देशांपैकी प्रत्येकाला व सर्व अर्ध-विकसित देशांना राष्ट्रीय आर्थिक विकासाचे धोरण असले पाहिजे, याबद्दल त्यांच्यात मतैक्य आहे; हा त्यांच्या सरकारी धोरणात झालेला सर्वांत महत्त्वाचा बदल आहे.

त्यांच्यापैकी प्रत्येक देशाची सर्वंकश, एकात्म राष्ट्रीय योजना असली पाहिजे असाही सार्वत्रिक आग्रह खरोखरी धरण्यात येतो. सर्व अर्ध-विकसित देश स्वत:साठी अशी योजना तयार करण्याच्या आता प्रयत्नात आहेत; या महान जागृतीचा (ग्रेट अवेकनिंग) स्पर्श अद्याप ज्यांना झालेला नाही, अशी काही थोडी राष्ट्रेच याला अपवाद आहेत.

सर्वंकश योजना तयार करण्याचा पुढाकार आणि तिची अंमलबजावणी ह्या दोहोंची जबाबदारी सरकारनेच घेतली पाहिजे, असे सर्वजण गृहीत धरतात. एका विचारसरणीप्रमाणे, बाजारपेठेच्या शक्तींच्या व्यवहारात सरकारी हस्तक्षेप करून सामाजिक प्रक्रियेला ऊर्ध्व गती देण्याच्या दृष्टीने त्याचे नियंत्रण करण्याचा राष्ट्रीय सरकारचा डावपेचात्मक कार्यक्रम म्हणजेच योजना होय.

पाश्चिमात्य जगातील पुढारलेल्या देशांमध्ये जी कामे खाजगी उद्योगधंद्यांकडे सोपविण्यात येतात ती कामे, मागासलेल्या देशांतील अनेक कमतरतांमुळे, तेथील सरकारलाच करावी लागतील, असेही सर्वजण मान्य करतात. मध्यवर्ती सरकारी नियोजन व "खाजगी उद्योगधंदे" यांच्यात विरोधाची निराधार कल्पना करून आणि नियोजनामुळे लवचिकपणा नाहीसा होतो असे गृहीत धरून आर्थिक विकास व अर्ध-विकासासंबंधीच्या विवरणात कधी कधी गोंधळ केला जातो; यासंबंधीच्या सद्यकालीन साहित्यात व त्यापैकी जो बहुसंख्य भाग पुढारलेल्या देशात लिहिला जातो त्यात हा गोंधळ विशेषकरून दृष्टीस पडतो.

परंतु एखाद्या अर्ध-विकसित देशाने आर्थिक विकासाची ऊर्ध्वगामी संचयी प्रक्रिया

सुरू करण्यात व धोरणात्मक हस्तक्षेपांनी ती टिकविण्यात जर खरोखरीच यश मिळविले, तर त्या देशात असलेल्या किंवा त्याने निर्माण केलेल्या खाजगी उद्योग-धंद्यांना तेथे अधिक वाव मिळेल, कमी मिळणार नाही, ही गोष्ट स्पष्ट आहे. लवचिकपणाचा अभाव ही अर्ध-विकासाची खूण असते; ती पुसून काढण्याचे ध्येय मध्यवर्ती नियोजनाने सतत बाळगले पाहिजे, आणि संपूर्ण आर्थिक व सामाजिक बांधणीत अधिक लवचिकपणा प्रस्थापित करण्याचे प्रयत्न केले पाहिजेत.'

सार्वजनिक व खाजगी जबाबदाऱ्यांची सीमारेषा कोठे आखावी हा बहुधा तत्त्वाचा प्रश्न नसतो, व्यावहारिक औचित्याचा असतो; तो बाजूला ठेवल्यास, राष्ट्रीय सरकारने देशाच्या संपूर्ण आर्थिक विकासाच्या मार्गदर्शनाची जबाबदारी घ्यावी अशी अपेक्षा असते; योजना व योजना कार्यान्वित करण्यासाठी लागणारी सरकारी हस्तक्षेपांची सुसंगत पद्धत यांच्या सहाय्याने हे मार्गदर्शन करावे लागते.

अर्ध-विकसित देशांमध्ये महत्त्वाचा राजकीय प्रश्न म्हणून आर्थिक विकासा-संबंधी समान उत्कंठा उदयास आली आहे; आणि, सर्वसामान्य माणसाच्या जीवनाची पातळी उंचावणे म्हणजे आर्थिक विकास अशी व्याख्या करण्यात येत आहे; तसेच, आर्थिक विकास हे सरकारचे कर्तव्य आहे; सरकारने सर्वसाधारण आर्थिक योजना तयार केली पाहिजे व ती कार्यान्वित केली पाहिजे—या योजनेत विकास सुरू करण्यासाठी व तो सतत चालू रहाण्यासाठी लागू करावयाच्या हेतूपूर्वक नियंत्रणांची व उत्तेजनांची व्यवस्था असली पाहिजे, याबद्दल त्यांच्यात मतैक्य आहे—ह्या सगळ्या गोष्टी इतिहासात अगदी नवीन आहेत. सध्या विकसित असलेल्या देशांत घडलेल्या घटनांचे वर्णन (अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ) शुम्पीटर यांनी दर्शविलेल्या आदर्श रचनेत केलेले असते, त्याच्या अगदी उलटया क्रमाने जाण्याच्या प्रयत्नांचे त्या प्रतीक आहेत.

गरिबीत व संकटात रहाणारा हा निम्म्याहून अधिक मोठा मानवजातीचा भाग, आर्थिक विकासाची जबाबदारी सरकार घेते असे धोरण, मोठ्या प्रमाणावर अनुसरण्यास कशा रीतीने प्रारंभ करतो हेच केवळ आपण पहात नाही; तर आपल्या असेही दृष्टीस पडते की, तसेच करण्याचा निश्चित व तातडीचा सल्ला त्यांना प्रगत देशांतील सर्व विद्वानांकडून व मुत्सद्यांकडून दिला जातो. तसेच, प्रगत देशांतील सरकारेही सर्व आंतर-सरकारी संघटनांच्या गंभीर निर्णयात सहभागी होतात तेव्हा त्यांना तोच सल्ला देतात. अर्ध-विकसित देशांतील वाढत्या अडचणींना तोंड देण्याचा दुसरा कोणताही मार्ग प्रगत देशातील कोणालाही दिसत नाही, हे उघड आहे; स्वदेशातील आर्थिक प्रश्नांसंबंधी त्यांची दृष्टी यापेक्षा भिन्न असली तरीदेखील यात फरक पडत नाही.

सरकारी नियोजनाच्या मुख्य समस्या

देशाच्या उत्पादन शक्ती वाढविण्याच्या हेतूने गुंतवणुकीची एकूण रक्कम

वाढविण्याचा निर्णय जाहीर करणे, आणि ही वाढ कशा रीतीने करता येईल याची स्पष्टता करणे हा प्रत्येक राष्ट्रीय विकासयोजनेचा मुख्य उद्देश असतो.

ही एकूण रक्कम योजनेला ठरवावी लागते, आणि शिवाय निरनिराळ्या कामांसाठी नेमून द्यावयाच्या भांडवलाची प्रमाणेही ठरवावी लागतात; उदाहरणार्थ, वहातूक व वीज उत्पादनातील एकूण सोई वाढविणे; नवीन कारखाने बांधणे व जड उद्योगधंद्यासाठीं त्याचप्रमाणे सर्व प्रकारच्या इतर उद्योगधंद्यांसाठी यंत्रे मिळविणे; पाणी-पुरवठ्याच्या योजनांत दीर्घकालीन गुंतवणूक करून व शेतीची हत्यारे, यंत्रे व खत यांसाठी अल्प मुदतीची गुंतवणूक करून शेतीमधील उत्पादनाची पातळी उंचावणे; श्रमिक जनतेचे आरोग्य, शिक्षण व प्रशिक्षण यांची पातळी सुधारणे इत्यादी.

योजना व्यावहारिक व परिणामकारक ठरण्यासाठी ती केवळ सर्वसाधारण स्वरूपाची असून चालत नाही, तर निरनिराळ्या विभागांचे काळजीपूर्वक नियोजन करून तिच्या आदेशांची योग्य आखणी सविस्तर व्हावी लागते. आणि हे आदेश प्रत्यक्षात उतरविण्यासाठी तिने निश्चित स्वरूपाची विलोभने व नियंत्रणे यांबद्दलचे आदेश दिले पाहिजेत.

वाढती सामाजिक चलनशीलता व प्रादेशिक आर्थिक समता यांच्या दिशेने वाटचाल करणारे राष्ट्रीय एकात्मतेचे धोरण संपूर्ण देशात जलद व टिकावू आर्थिक वाढ घडवून आणण्यासाठी सहाय्यकारी असते हा बोध प्रगत औद्योगिक देशांपासून योजनाकारांनी घ्यावा. म्हणून, प्रदेशाप्रदेशांतील व निरनिराळ्या व्यवसायांतील विकासांच्या प्रेरणेचे प्रसारीत परिणाम समर्थ बनविणे हा योजनेत प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या सरकारी धोरणांचा एक मुख्य हेतू असला पाहिजे. ह्या बाबतीत, बहुतेक अर्ध-विकसित देशांना सामाजिक व आर्थिक विषमतांच्या जीर्ण संस्था-संघटनांना तोंड द्यावे लागते; पुष्कळदा त्या सहजासहजी मोडूनही काढता येत नाहीत. ह्या पारंपारिक सामाजिक विषमता टिकवून धरण्यात ज्यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत अशा सामाजिक गटांच्याच हाती, अनेकदा, प्रारंभीच्या काळात राज्यसत्ता असते.

ह्या सामाजिक विषमता मोडून काढणे आणि आर्थिक विकासाला खुलविणारी मानसिक, वैचारिक, सामाजिक व राजकीय परिस्थिती निर्माण करणे सर्वाधिक महत्त्वाचे ठरते. राष्ट्रीय योजनेत जमीन-सुधारणांना महत्त्व असते, कारण शेती-उत्पादन वाढविण्याची ती पूर्वअट असतेच, पण शिवाय, गतिहीन समाजातील जुनी वर्ग-रचना मोडून काढण्याचे ते साधन असते. आरोग्य व शिक्षण क्षेत्रांतील सुधारणाही दुहेरी कामगिरी पार पाडतात; त्या लोकांची उत्पादनक्षमता प्रत्यक्षपणे वाढवितात, आणि त्याचबरोबर, बुद्धिनिष्ठ हेतूंना अधिक महत्त्व प्राप्त होईल अशी व्यक्तींची व समाजाची पुनर्घटना करतात.

गरीब, अपंग, वृद्ध व विशेषत्त्वे करून लहान मुले, ह्या सामाजिक आपद्ग्रस्तांना

मदत करणे हे ह्या बुद्धिनिष्ठ प्रवर्तकहेतूंना समर्थ बनविण्याच्या सर्वसामान्य प्रयत्नात निश्चितच महत्त्वाचे ठरेल. प्रगत देशात ज्या "सामाजिक सुरक्षितता" या नावाने ओळखल्या जातात, त्या प्रकारच्या पुनर्वाटपाच्या उपाययोजना, गरीब अर्ध-विकसित देशाला, आर्थिक विकासाच्या प्राथमिक अवस्थेत खरोखरीच झेपत नाहीत. आता अतिप्रगत असलेल्या देशांच्या आर्थिक विकासाच्या प्रारंभीच्या अवस्थेत त्यांपैकी कोणत्याच योजना नव्हत्या; आणि जेव्हा त्या देशांतील दरमाणसी सरासरी उत्पन्नाची सर्वसाधारण पातळी उंचावली तेव्हाच ह्या प्रकारच्या समतानिष्ठ धोरणांना महत्त्वाचे कार्य करता येऊ लागले—त्यांच्या त्यावेळच्या उत्पन्नाच्या पातळीबरोबर जाण्याची आशा अर्ध-विकसित देशांना नजिकच्या भविष्यकाळात तरी करता येणार नाही; ह्या सर्व गोष्टींचा अर्ध-विकसित देशांनी काळजीपूर्वक विचार करावा.

सोविएत युनियनमध्ये, अगदी भिन्न राजकीय व संस्थाविषयक परिस्थितीत घडत असलेली औद्योगिक क्रांती, शंभर वर्षे उशीराने झाली. तिनेही ह्या एका बाबतीत पूर्वीच्या भांडवलदारी विकासाच्या मार्गानेच वाटचाल केली, म्हणजे टिकाव् व जलद भांडवल-निर्मितीसाठी श्रमिक जनतेचे खरे उत्पन्न व उपभोग अत्यंत कमी ठेवले, याची आठवण अर्ध-विकसित देशांनी ठेवण्यास हरकत नाही.

उपभोग न घेता, गुंतवणुकीसाठी राखून ठेवावयाच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या भागात सक्तीने वाढ करण्याखेरीज आर्थिक विकासाचा दुसरा मार्ग नाही. त्याचा अर्थ अतिशय काटकसरीच्या धोरणाची अंमलबजावणी असा आहे; उच्च श्रेणीचे नफे मिळवून ते परत औद्योगिक वाढीसाठी जमा करण्याच्या किंवा कर वाढविण्याच्या—कोणत्याही मार्गाने ही अधिक बचत निर्माण केली तरी त्यात फरक पडत नाही.

ही काटकसर जनतेच्याच रहाणीच्या पातळीत करावी लागते, कारण जनता बहुसंख्य असते, आणि आजच्या अर्ध-विकसित देशांत ह्या काटकसरीच्या धोरणाची अंमलबजावणी फारच कठीण जाते; हल्लीच्या प्रगत देशांच्या आर्थिक विकासाच्या प्रारंभीच्या अवस्थेत ती इतकी अवघड कधीच नव्हती. अर्ध-विकसित देशांतील जनता अधिक दरिद्री आहे हे त्याचे एक कारण आहे; त्याचे दुसरे कारण, आर्थिक विकासाचा हेतू जनतेच्या रहाणीची पातळी उंचावणे हा असतो ही नवी विचारसरणी आहे—प्रगत देशांच्या पूर्वीच्या इतिहासात तदसदृश विचारसरणी नव्हती, पण ही नवी विचारसरणी मात्र त्यांच्या उदार पाठिंब्याने आता प्रसार पावली आहे.

जनतेला मतदानाचा हक्क देण्यासारखे लोकशाहीचे प्रकार स्वीकारल्यामुळे हे काम अधिकच कठीण होते. "जगातील काही भागात जीवन अगदी प्राथमिक अवस्थेत आहे, तेथे लोकांना लोकशाहीने निवडणूक करण्याचा हक्क देणे, आणि मग त्यांना ताबडतोबीच्या सुखांचा त्याग करावयास सांगणे, सोपे नाही. हे मुळीच सोपे नाही."[२] प्रगत देशांच्या विकासाच्या प्रक्रियेत, अगदी अलिकडच्या काळापर्यंत, परिणामकारक

राजकीय मतदानाचा हक्क, निरनिराळ्या युक्त्यांमुळे, उच्च उत्पन्न श्रेणीपुरताच मर्यादित होता. तशा प्रकारच्या "मर्यादित लोकशाही"बद्दल आज आकर्षण उरलेले नाही.

अर्धविकसित देशांना, सार्वत्रिक मतदानाच्या हक्कासह, संपूर्ण लोकशाहीचा मार्गच स्वीकारला पाहिजे. त्याला पर्याय एकच आहे, तो म्हणजे अल्पसंख्यांकांची सत्ता कायदेशीर ठरविणे, किंवा लोकशाहीच्या बाह्य स्वरूपाचा स्वीकार केल्यास, ते प्रकार सौम्य करणे. परंतु, ह्या देशातील परंपरागत समाजरचना आर्थिक गतिहीनतेच्या दीर्घकालीन प्रभावाखाली तयार झालेली असून अत्यंत विषम व जुनाट आहे, त्यामुळे वर उल्लेखिलेल्या पर्यायी मार्गाचा स्वीकार केल्यास, टिकावू आर्थिक विकासाला आवश्यक असलेल्या केंद्रत्यागी प्रसारीत परिणामांच्या बलसंवर्धनाला अडथळा करणाऱ्या सामाजिक विषमता कायम टिकविणे असाच त्याचा अर्थ होईल. तेथे अस्तित्वात असलेली व टिकवून धरण्यात आलेली विषमता उद्योगधंदे, बचत व गुंतवणूक यांना पोषक नाही. सध्याच्या प्रगत देशांतील औद्योगिक क्रांतीत काय घडले त्याची तुलना येथे गैरलागू आहे.

तेव्हा, अर्ध-विकसित देशांना, त्यांच्या येथे अस्तित्वात असलेले आर्थिक विकासातील अडथळे दूर करण्यासाठी, सध्याच्या प्रारंभीच्या अवस्थेतदेखील खऱ्या लोकशाहीची गरज आहे; परंतु त्याचबरोबर, जलद विकासाला आवश्यक इतक्या प्रमाणात उपभोगाची पातळी खाली ठेवणे लोकशाहीमुळे तेथील सरकारांना कठीण जाते. ह्या मूलभूत राजकीय विरोधाभासाच्या पार्श्वभूमीवरच, अर्ध-विकसित जगातील मोठ्या भागात दृष्टीस पडणाऱ्या फॅसिस्ट किंवा कम्युनिस्ट प्रकारांच्या गतिमान हुकूमशाहीकडील प्रवृत्तींचा विचार केला पाहिजे.

राज्यसंस्था लोकशाहीची, अल्पसंख्यांकांची की हुकूमशाहीची हा प्रश्न बाजूला ठेवला तरीदेखील, हे सर्व नियोजन करण्याची व त्याची अंमलबजावणी करण्याची अपेक्षा ज्या राज्यसंस्थेकडून करण्यात येते ती अर्ध-विकसित देशांत पुष्कळदा कमकुवत असते आणि तिचा कारभार तौलनिकदृष्ट्या अकार्यक्षम व कधी कधी भ्रष्ट असतो. बहुधा प्रांतिक व स्थानिक पातळीवर तो विशेषकरून कमकुवत असतो.

मध्यवर्ती आर्थिक नियोजन नेहमीच कठीण असते, आणि प्रगत देशांनी त्याचे प्रयोग करून पाहिले आहेत परंतु ते संपूर्णपणे यशस्वी क्वचितच ठरले आहेत. आता, राजकीय व शासकीय यंत्रणा कमकुवत असलेल्या आणि मोठ्या संख्येने निरक्षर लोकवस्ती असलेल्या अर्ध-विकसित देशांना, ज्याला अतिश्रेष्ठ नियोजन (सुपर प्लॅनिंग) म्हणता येईल त्याचा प्रयोग करावयाचा आहे.

या प्रयोगात असंख्य चुका व काही ठिकाणी संपूर्ण अपयश यांची सकारण अपेक्षा आहे; परंतु हा प्रयत्न न केल्यास पर्यायाने, आर्थिक व सांस्कृतिक गतिहीनता, किंवा परागती यांच्या सातत्याला मान्यता देण्यासारखेच आहे; आणि आजच्या जगात

राजकीय दृष्टीने ते अशक्य आहे. आज जगभर, अर्ध-विकसित देशांत, मोठ्या प्रमाणावर, राष्ट्रीय नियोजनाचे ध्येय मान्य होण्याचे कारण अर्थातच हे आहे, आणि म्हणूनच, प्रगत देशांतील सरकारे व तज्ञ ह्या धोरणाच्या दिशेला एकमताने मान्यता देतात.

आणखी एक सर्वसाधारण विचार: राष्ट्रीय आर्थिक नियोजनाच्या दृष्टीने प्रजोत्पादनाचा वेग अतिशय महत्त्वाचा असतो. मृत्यूचे मान कमी होण्याची प्रक्रिया हल्लीच्या प्रगत राष्ट्रांत फारच मंद गतीने झाली आणि ती होण्यासाठी अनेक पिढ्या जाव्या लागल्या; परंतु वैद्यकशास्त्रातील स्फोटक प्रगतीमुळे ती अर्ध-विकसित देशांमध्ये फारच अल्प मुदतीत घडण्याची शक्यता अपेक्षित आहे; त्याचप्रमाणे, जीवनमानाची पातळी खरोखरीच उंचावली नाही तरीदेखील मृत्यूचे प्रमाण कमी होण्याची अपेक्षा आहे. प्रगत देशांत अद्यापही हयात असलेल्या पिढीच्या बालपणी तेथे मृत्यूचे जे प्रमाण होते त्यापेक्षा अर्ध-विकसित जगाच्या काही भागांत ते आजच कमी आहे. येत्या १०-२० वर्षांत अर्ध-विकसित देशांतही प्रगत देशांसारखीच परिस्थिती कायम होणे शक्य आहे.

मृत्यूचे प्रमाण कमी होत असतानाच जननाचेही जर कमी झाले नाही तर लोकसंख्या वाढीचा नैसर्गिक वेग वाढेल; आरोग्याच्या सुधारणांमुळे जननाचे प्रमाण उलट वाढतच असते. दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभी होती त्यापेक्षा अर्ध-विकसित देशांची लोकसंख्या सध्या १/३ने जास्त आहे; येत्या ३०-४० वर्षांत ती दुप्पट होण्याची अपेक्षा आहे. लोकसंख्येची वाढ जलद झाली तर सध्याची जीवनरहाणीची पातळी टिकवून धरण्यासाठीसुद्धा अधिक गुंतवणूक करावी लागते, आणि त्यामुळे आर्थिक विकासात अडथळे येऊन तो संथ होण्याचा संभव असतो; सर्व अर्ध-विकसित देशांत—ज्यांच्या लोकसंख्येचे व नैसर्गिक साधनसामुग्रीचे संबंध अधिक अनुकूल आहेत अशा अर्ध-विकसित देशांतही—तसे होण्याची शक्यता आहे. म्हणून कोणत्याही विशिष्ट विकासाच्या वेगासाठी तेथे अधिक त्याग करावा लागेल, असा याचा अर्थ आहे.

आणि म्हणून, राष्ट्रीय योजनेत जननावर मर्यादा घालण्याच्या हेतूने, लोकसंख्येचे धोरण आखलेले असावे. लोकसंख्येच्या नैसर्गिक वाढीचा वेग आणखी वाढण्याचे थांबविण्यासाठी जोरदार व यशस्वी कुटुंब नियोजनाची मोहीम आवश्यक झाली आहे.

प्रवृत्त केलेली व नियंत्रित संचयी प्रक्रिया

अर्ध-विकसित देशांच्या आर्थिक विकासाच्या राष्ट्रीय नियोजनाच्या कार्यातील दूर करावयाच्या व्यावहारिक अजचणींबद्दल मी जास्त चर्चा करणार नाही. आतापर्यंत मी त्याबद्दल थोडक्यात अभिप्राय व्यक्त केले कारण मला पुढील दोन प्रश्नांची अधिक सांगोपांग चर्चा करण्यासाठी सर्वसाधारण पार्श्वभूमी द्यावयाची होती; ते

प्रश्न असे : अमूर्त आदर्शरचना ह्या दृष्टीने विचार केला असता, राष्ट्रीय योजनेचा अर्थ काय ? आणि तिचे निकष तर्कशुद्धपणे कसे शोधून काढता येतील ?

पूर्वी केलेल्या चर्चेमधून पहिल्या प्रश्नाचे उत्तर काढता येते. राष्ट्रीय योजना हा देशातील आर्थिक विकासाच्या संचयी प्रक्रियांचा सरकारी आराखडा असावा; सामाजिक पद्धतीत बाहेरून, मुद्दाम घडवून आणलेल्या काही बदलांमुळे ही प्रक्रिया सुरू होते, टिकून रहाते व नियंत्रित होते आणि योजनेत स्पष्ट करण्यात आलेल्या हेतूपूर्वक सरकारी हस्तक्षेपांच्या रूपाने हे बदल घडवून आणण्यात येतात. म्हणून देशातील समाजव्यवस्थेतील चक्राकार कार्यकारणभावाच्या अभ्यासावर ही योजना उभारलेली असावी; हा कार्यकारणभाव "आर्थिक" त्याचप्रमाणे "बिन आर्थिक" अशा सर्व संबंधित घटकांत पहिल्यापासून अखेरपर्यंत अस्तित्वात असतो.

गरीब देश नैसर्गिक क्रमावर अवलंबून रहातात तोपर्यंत चक्राकार कार्यकारण-भावाचे गृहीततत्त्व त्यांना निराशा उत्पन्न करणारा सिद्धांत वाटतो, परंतु हेतूपूर्वक हस्त-क्षेपांचे धोरण स्वीकारणाऱ्यांना तो विलोभनीय पारितोषिक देऊ शकतो. ध्येयबद्ध राष्ट्रीय प्रयासातून, या तत्त्वामुळे, प्रयत्नांच्या मानाने अधिक फलनिष्पत्तीचे आश्वासन मिळते— मात्र प्रयत्नांनी ऊर्ध्वगामी संचयी प्रक्रियेचा प्रारंभ करण्यात यश मिळविले पाहिजे.

अमेरिकेतील निग्रो लोकांच्या विकासाच्या समस्यांबद्दल मी मिळविलेल्या वृत्तांतावरून विकासाच्या संचयी प्रक्रियेच्या चक्राकार कार्यकारणभावाची भरीव उदाहरणे घेता आली; त्यावरून दुसऱ्या प्रकरणात मी निष्कर्ष काढला की, चक्राकार कार्यकारणभावाच्या वस्तुस्थितीमुळेच निरनिराळ्या धोरणात्मक उपाययोजनांनी ऊर्ध्वगामी क्रिया सुरू करता येते; त्यासाठी प्रारंभीची चालना कोठेही दिली तरी चालते. परंतु प्रयत्नांचा अपव्यय टाळण्यासाठी विकासाचा प्रश्न योग्य रीतीने हाताळला गेला पाहिजे यावरही मी भर दिला होता. ह्या दृष्टीने पाहिल्यास, राष्ट्रीय योजना म्हणजे सरकारी हस्तक्षेपासाठी व्यूहरचनेची निश्चित आखणी होय; तिचा हेतू देशाचा सर्वसाधारण आर्थिक विकास जास्तीतजास्त वाढविण्याचा असतो, आणि लोक सहजासहजी मान्य करतील इतक्या त्यागाची त्या व्यूहरचनेत अपेक्षा असते. कमाल फलनिष्पत्तीसाठी प्रयत्नांचा वापर कसा करावा हे अर्धविकसित देशांना गरिबीमुळे फार काळजीपूर्वक अभ्यासाने निश्चित करून घेण्याची नितांत आवश्यकता असते.

योजना अभ्यासावर आधारली पाहिजे या गोष्टीवर मी भर देतो; आणि समाज-व्यवस्थेतील सर्वांत कमी उपलब्ध असलेल्या विशिष्ट कार्याच्या संबंधाबद्दल हा अभ्यास असला पाहिजे; म्हणजे समाजव्यवस्थेतील सर्व घटकांत असलेल्या चक्राकार कार्यकारणभावाच्या संबंधाबद्दल तो केला पाहिजे. अशा अभ्यासाच्या आवश्यकतेवर भर दिल्यास त्याचे समर्थन बुद्धिनिष्ठ भूमिकेतून करता येते, असा मला विश्वास वाटतो. ह्या संबंधाबद्दलचे आपले ज्ञान जसे व जेव्हा समृद्ध होईल तेव्हा राष्ट्रीय नियोजनात खरी प्रगती होईल; आणि क्रमशः ते पुढारलेल्या उपयोजित सामाजिक शास्त्राच्या

पातळीवर उचलले जाईल.

राष्ट्रीय योजना ही कार्यासाठी केलेली व्यूहरचना असते, ह्यावरही त्याचवेळी भर दिला पाहिजे. आर्थिक विकास घडवून आणण्याचे उत्तरदारित्व स्वीकारलेल्या सरकारची इष्टतेइतके पूर्ण व निश्चित ज्ञान मिळेपर्यंत वाट पहाण्यासारखी स्थिती नसते. वस्तुस्थितीचा व संबंधांचा शक्य तितका उत्कृष्ट अंदाज बांधून त्याच्या आधारावरच त्याला निर्णय घ्यावा लागतो.

तरीसुद्धा, ह्या व्यावहारिक दृष्टिकोनातूनदेखील, योजनेचा तर्कशुद्ध अर्थ आणि कोणती वस्तुस्थिती व संबंध योजनेला समर्पक आहेत याचे आकलन सरकारला असणे अत्यंत महत्त्वाचे असते.

योजना भरीव असावयास पाहिजेत

माझा पुढील मुद्दा असा आहे : वैयक्तिक उद्योगधंद्यांचा खर्च व नफा यांच्या राष्ट्रीय योजना बनविणे सयुक्तिक होणार नाही.

योजनेत करण्यात येणारी बहुतेक गुंतवणूक बाजारपेठेच्या दृष्टीने नफ्याची नसते. अद्याप अस्तित्वात नसलेल्या परंतु पंचवार्षिक किंवा दशवार्षिक योजनेनंतरच्या, म्हणजे सुदूर भविष्यकाळासाठी ज्यांची योजना करण्यात आलेली असते अशा उद्योगधंद्यांना सहाय्य देणाऱ्या बाह्य काटकसरीत मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करावी लागते, तिच्या बाबतीतच केवळ हे खरे आहे असे नाही.

बराचसा पक्का माल तयार करणाऱ्या बहुतेक कारखानदारी उद्योगधंद्यांच्या बाबतीतही हे खरे असते. किंबहुना, ते पूर्वकाळात सुरू झालेले नसतात, आणि आतासुद्धा या ना त्या मार्गाने सरकारी सहाय्य मिळाल्याशिवाय सुरू होत नाहीत, कारण त्यांनी तयार केलेले उत्पादन चढाओढीच्या किंमतीत बाजारात विकले जाण्याची शक्यता नसते.

अर्ध-विकसित देशांत बेकारी व अर्ध-बेकारी असते याचे सर्वसाधारणपणे कारण हे असते की बाजारपेठेत त्यांच्या परिणामकारक श्रमांना मागणी नसते. खरे म्हणजे, एखाद्या प्रदेशाची किंवा देशाची अर्थव्यवस्था गतिहीन असते कारण तो यशस्वी रीतीने चढाओढीत टिकू शकत नाही. या दृष्टीने, राष्ट्रीय योजनेचा महत्त्वाचा अर्थ गुंतवणुकीला संरक्षण देणे हाच असतो; खाजगी उद्योगधंद्यांच्या दृष्टीने जे फायदेशीर नसतात असे धंदे सुरू करणे शक्य होण्यासाठी बाजारपेठेच्या शक्तीपासून त्यांना संरक्षण देणे हेच राष्ट्रीय योजनेचे मुख्य कार्य असते.

हे कार्य करण्यासाठी, संपूर्ण समाजाच्या समान व दीर्घकालीन हितसंबंधाचे प्रतिनिधी या नात्याने राष्ट्रीय सरकार पुढे येते. खाजगी उद्योगधंद्यांचा हिशोब खर्च व नफा यांच्या दृष्टीने चालतो आणि ते राष्ट्रीय नियोजनाच्या सामाजिक ध्येयाला प्रामाणिकपणे स्थान देत नाहीत, या दृष्टिकोनातील अपुरेपणा त्यास जाणवतो.

देशाच्या दीर्घकालीन हिताच्या दृष्टीने पाहिल्यास, प्रत्येक नवीन गुंतवणूक व उद्योग ज्या खाजगी किंवा सार्वजनिक संस्थेने केला असेल तिला अपेक्षित पैशांची प्राप्ती देतोच, पण त्याशिवाय आणखीही एक जादा प्राप्ती मिळवून देतो. योजनेत तरतूद करण्यात आलेल्या नवीन गुंतवणुकीच्या व उद्योगांच्या प्रत्येक समूहामुळे आर्थिक वाढीची संचयी प्रक्रिया सुरू होते, हे जर आपण गृहीत धरले तर ही जादा प्राप्ती होते हे आपल्याला मान्य होईल.

प्रत्येक नवीन उद्योग इतर उद्योगधंद्यांना सहाय्यकारी बाह्य काटकसरी तयार करून देतो, त्या ताबडतोब किंवा दूरच्या भविष्यकाळासाठी असतात, त्यांचे मूल्य, व्यापक होत जाणाऱ्या बाजारपेठेचे मूल्य, प्रशिक्षित कामगारांची संख्या वाढविण्याचे मूल्य, आणि ज्या मानाने जीवनमान हळूहळू वाढते त्या मानाने वाढणारे उपभोगाच्या उच्चतर पातळीचे सर्वसाधारण उत्पादक मूल्य व विशेषत: आरोग्य, शिक्षण व संस्कृती यांच्या उच्च श्रेणीचे मूल्य——ह्या सर्व मूल्यांची मिळून ही अधिक नफ्याची प्राप्ती तयार होते. उत्पादन पद्धत सुरू करण्यासाठी व ती कार्यक्षम रहाण्यासाठी लागणाऱ्या प्रारंभीच्या खर्चापेक्षा, उत्पादनाच्या व राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीवरून मोजण्यात येणारे अंतिम परिणाम पुष्कळच अधिक असले पाहिजेत ही गोष्ट संपूर्ण आर्थिक व सामाजिक रचनेत संचयी प्रक्रिया चालू असतानाच्या काळातील चक्राकार कार्यकारणभावात अंतर्भूत असते आणि हे गतिमान सामाजिक फायदेच जादा नफ्याच्या प्राप्तीच्या रूपाने दिसतात.

राष्ट्रीय योजनेत ह्या जादा आर्थिक परिणामांची गणना करावी लागते. नफ्याची मोजणी करताना ह्या दुसऱ्या प्राप्तीच्या मोजणीचीही त्याला जोड देण्याची अत्यंत आवश्यकता असते——त्यामुळे सरकारी हस्तक्षेपांना सर्वसाधारणपणे निश्चित हेतू देता येतो आणि विशेषत: खास लक्ष्यांचा कसोटीचा प्रश्न सोडविण्यासाठी व निरनिराळ्या हस्तक्षेपांचा समतोल साधण्यासाठी राष्ट्रीय योजनेत घेण्यात आलेल्या निर्णयांना तर्कशुद्ध आधार देता येतो. तर्कशुद्ध हेतूंनी तयार करण्यात आलेल्या योजनेतील गुंतवणुकीची पातळी, निरनिराळे उद्योगधंदे आणि उद्योगधंदे व एकूण शेतीव्यवस्था, तसेच आरोग्य, शिक्षण व प्रशिक्षण योजना इत्यादीसाठी गुंतवणुकीच्या वाटपाचे अग्रक्रम ठरविण्यासाठी असे निर्णय आवश्यक असतात. त्याचप्रमाणे अपेक्षित फलनिष्पत्ती व्हावी म्हणून लागणारी साधनसामुग्री निश्चित करण्यासाठीही त्यांची आवश्यकता असते.

ह्यांपैकी कोणत्याही समस्येचे उत्तर, किंबहुना योजनेची रचनादेखील, बाजारपेठेच्या भाषेत तयार करता येणार नाही. वास्तविक गुंतवणुकीच्या योजना आणि त्यांचे परिणाम यांची माहिती देणारी संचयी वाढीची संपूर्ण प्रक्रिया सरकारला प्रसिद्ध करावी लागते; निरनिराळ्या शाखांतील उत्पादनाच्या परिणामावर, नित्योपयोगी वस्तूंच्या वापरावर, कामगारांना काम मिळण्यावर व नैसर्गिक साधन-

सामुग्रीवर, आरोग्य, शिक्षण व कामगारांची उत्पादनक्षमता इत्यादी इत्यादींवर होणारे विविध विभागांतील व निरनिराळ्या वर्षांतील परिणाम त्यात दाखवावे लागतात, आणि तसे करताना, अर्थरचनेमधील सर्व घटकांत होणाऱ्या चक्राकार कार्यकारण-भावाच्या अंतर्गत क्रियाप्रतिक्रियांवर लक्ष मुख्यत: केंद्रित करावे लागते. योजना केल्याप्रमाणे खरोखरीच प्रक्रिया सुरू होईल व विकास पावेल याची हमी मिळण्यासाठी बाजारपेठांत करावयाच्या निश्चित स्वरूपाच्या सरकारी हस्तक्षेपांसंबंधीही योजनेने निर्णय घेतले पाहिजेत.

मी निर्देश केल्याप्रमाणे, प्रत्यक्ष जीवनात, त्यातल्यात्यात अदमासावर सरकारला समाधान मानावे लागते. मात्र मुद्दा हा आहे की, हे अंदाज खरोखरी महत्त्वाच्या गोष्टींबद्दलचे असले पाहिजेत, बहुश: असंबद्ध असलेल्या बाजारपेठांच्या घडामोडी-बद्दलचे नसावेत.

भावयंत्रणा आर्थिक नियोजनाला तर्कशुद्ध निकष पुरवीत नाही

भावयंत्रणेचे निरनिराळे घटक, आणि खास करून खर्च, किंमती व नफ्याचे दर, यांच्या भाषेतच मुख्यत: राष्ट्रीय योजना व्यवहारात स्वाभाविकपणे प्रतिपादन करावी लागते. योजनांतर्गत सविस्तर तुलनांचे ते प्रमुख साधन असते, आणि अशा रीतीने व्यक्त करण्यात आलेल्या "प्रासंगिक खर्चा"च्या मोजणीवरच उत्पादनाच्या घटकांची जुळणी कशी करावी याबद्दलचे दररोजचे निर्णय आधारावे लागतात.

वास्तविकपणे, राष्ट्रीय योजनेत निश्चित करण्यात आलेल्या इष्टांकाप्रत जाण्याच्या आर्थिक प्रक्रियेच्या उद्दिष्टांचा मोठा भाग खर्चात, किंमतीत व नफ्याच्या दरात बदल करूनच साध्य करावा लागतो, आणि हे बदल ज्या परिस्थितीत किंमतींची पद्धत कार्य करते तिच्यात स्थित्यंतर करून घडवावे लागतात. त्यामुळे काही मर्यादेपर्यंत, सामाजिक जादा-नफ्याच्या प्राप्तीचे अलग अलग नफ्यात रूपांतर होते : आदर्श परिस्थितीत, किंमतींच्या पद्धतीमधील स्थित्यंतरामुळे तो संपूर्णपणे, नफ्यात जिरला असता; आणि मग त्यामुळे अलग अलग नफ्याच्या दराने राष्ट्रीय योजनेच्या ध्येयाला पूर्णपणे सुसंगत प्रयोजन प्राप्त करून दिले असते.

मात्र, राष्ट्रीय नियोजनाचे निकष किंमतींच्या पद्धतीच्या अगदी कक्षेबाहेर असतात. आर्थिक नियोजनाला कोणतेही "वस्तुनिष्ठ" निकष नसतात. योजना व तिची लक्ष्ये अंतिम दृष्टीने विश्लेषण करून पाहिल्यास, निर्णय घेऊन निश्चित करावयाची असतात, आणि हे निर्णय म्हणजे निरनिराळी, वैकल्पित शक्यतेतील ध्येये व साधने यांच्या समुच्चयामधून केलेली निवड असते. ह्या निवडी म्हणजे धोरणाचे निर्णय असतात; आणि ते राजकीय प्रक्रियेने निश्चित केलेल्या राष्ट्रीय विकासाच्या ध्येयाच्या भाषेत घेण्यात आलेले असतात.

आमच्या विद्वत्ताप्रचुर नियतकालिकातून १९२० च्या प्रारंभापासून, योजनाबद्ध

अर्थव्यवस्थेत तर्कशुद्धता असण्याची शक्यता आहे का यासंबंधी, मोठी खुमासदार चर्चा झाली. तिचा आरंभ प्राध्यापक लुडविग वान मायझेस् यांनी केला; त्यांनी सांगितले की आर्थिक नियोजन अयशस्वीच झाले पाहिजे, कारण त्यात खुल्या बाजारपेठेचा अभाव असतो, व सरकारने हस्तक्षेप न केलेली खर्चाची व नफ्याची पद्धत नसते. यामुळे काय करावे व काय करू नये हे वस्तुनिष्ठपणे ठरविण्यासाठी कोणत्याही आर्थिक निकषाचा वापर करणे अशक्य होईल.

सामाजिक प्रक्रियेचा विकास कसा व्हावा हे ठरविण्याचे "वस्तुनिष्ठ" निकष असतात, आणि हे वस्तुनिष्ठ निकष बाजारपेठेतील क्रियाप्रक्रियांमधून मिळतात, पण नियोजन मात्र निश्चितपणे "अनियंत्रित" असते——ह्या विचारातच, मी दुसऱ्या भागात निर्देश करणार असलेले, परंपरागत, तर्कदुष्ट पूर्वग्रह थोडक्यात व्यक्त झालेले असून त्यांच्यामुळेच आर्थिक सिद्धांताचा विकास रोखला गेला आहे.

तर्कशास्त्राच्या आधारावर ज्या प्रकारच्या नियोजनाचा सयुक्तिकपणा अशक्य असल्याचे अलिकडेच सिद्ध करण्यात आले, त्याच प्रकारचे आर्थिक नियोजन, जवळ-जवळ सर्वच अर्धविकसित देशांत सध्या चालू आहे, ही उपरोधात्मक वस्तुस्थिती आहे; हे नियोजन पुष्कळदा अर्थशास्त्रज्ञांच्या समर्थ मार्गदर्शनाखाली चालते; मात्र यांपैकी अनेक शास्त्रज्ञ विचारांच्या दुसऱ्या शाखांत जुन्या परंपरेला धरून असलेल्या चुकीच्या युक्तिवादाची विद्वत्तापूर्ण रचना स्वीकारताना आढळतात; अशाच विचारसरणीला वान मायझेस् यांनी सरळ व म्हणूनच ओबडधोबड अभिव्यक्ती देण्याखेरीज दुसरे काहीही केलेले नाही.[3]

मागासलेल्या व गतिहीन देशाची अर्थव्यवस्था संपूर्णपणे तर्कदुष्ट असते; तिचा एक भाग या नात्याने बाजारभावांची पद्धत सयुक्तिकपणावर फारसा मोठा हक्क सांगू शकत नाही.. शिवाय, राष्ट्रीय योजनेचा कार्यकारी विभाग असलेल्या शासकीय हस्तक्षेपांच्या योगाने होणारा सतत बदल हा तिच्यातील आवश्यक भाग असतो. त्यामुळे ती "आर्थिक" व "वस्तुनिष्ठ" निकषाचा तर्कशुद्ध पाया होऊ शकत नाही. आदर्श परिस्थितीत, राष्ट्रीय योजनेच्या ध्येयांना प्रामाणिक अभिव्यक्ती देण्याच्या हेतूने बाजारभावांची पद्धत बदलली गेली असती, परंतु हे बदल निश्चित करण्याचा ती स्वत: निकष बनण्याच्या हे अगदी उलट आहे.

चौथ्या प्रकरणाच्या अखेरीस मी नमूद केल्याप्रमाणे, आपल्या औद्योगिक व उच्च एकात्म देशात आपण बाजारभावांना मालक न करता आपला सेवक बनविण्यात चांगलेच यश मिळविले आहे. हे कार्य आपण बाजारपेठांची सार्वजनिक व खाजगी संघटना करण्याच्या दीर्घ व क्रमानुक्रमाच्या प्रक्रियेने केले; परंतु लोकप्रिय चर्चांमधून या गोष्टीचे योग्य स्मरण ठेवण्यात येत नाही, हे चमत्कारिक वाटते. स्वित्झर्लंड किंवा अमेरिकेसारख्या अत्यंत सुसंघटीत अर्थरचना असलेल्या देशांमधून अशा चर्चांमधून प्रतिपादन करण्यात येते की, "स्वतंत्र उद्योगधंद्या"तील मुक्त चढाओढीत मागणी

व पुरवठ्याच्या नियमानुसार वास्तविकपणे किंमती ठरत असतात; परंतु हे मुळीच खरे नाही.

किंमतीवर नियंत्रण मिळविण्याच्या ह्या बिकट कार्याला अर्धविकसित देश आता प्रारंभ करीत आहेत, आणि राष्ट्रीय योजना यशस्वी करण्याचे परिणामकारक साधन म्हणून किंमतींना राबविण्याचे प्रयत्न करीत आहेत. आणि हे कार्य अधिक जलद गतीने व परिपूर्णतेने करण्यास त्यांना परिस्थिती भाग पाडीत आहे. शिवाय सापेक्षतेने अतिशय कमकुवत अशा राजकीय व व्यवस्थापकीय पायावर ते त्यांना पार पाडावयाचे आहे.

अनिर्बंध कार्यक्रमाचे प्रमाणवचन नव्हे

बाजारभाव पद्धतीचा निकष लावून राष्ट्रीय आर्थिक योजना सयुक्तिकपणे तयार करता येणार नाही, आणि खाजगी उद्योगधंद्यांच्या नफ्याचा निकष लावूनही करता येणार नाही, ह्या गोष्टीवर मी भर दिला आहे; तसेच चक्राकार कार्यकारण-भावाच्या संचयी प्रक्रियेच्या भरीव कार्यक्रमांचे शासकीय प्रसिद्धीकरण म्हणजेच योजना आणि अंतिम विश्लेषणाच्या दृष्टीने ती राजकीय निर्णयांनी आदेशित झालेली-असली पाहिजे, ह्या गोष्टीवरही मी भर दिला आहे; पण त्यामुळे मी अनिर्बंध कार्यक्रमांचे प्रमाणवचन सांगत नाही तर अगदी त्याच्या उलट उपदेश करीत आहे.

बाजारपेठांच्या घडामोडींची केवळ नोंद न करता, अधिक खोलवर जाणे आणि योजनाबद्ध संचयी विकासाच्या प्रक्रियेत तिच्यातील गुंतागुंतीचे आंतरसंबंध कसे कार्यान्वित होतील याची निश्चिती करून घेणे, हे आत्यंतिक कठीण विश्लेषणात्मक कार्य आहे. परंतु माझे म्हणणे जर खरे असेल तर, ह्या आंतरसंबंधांचे भरीव कार्य-क्रमाच्या रूपाने खरेखुरे मोजमाप करण्याचा प्रयत्न करण्याखेरीज तर्कशुद्ध आर्थिक नियोजनाचा दुसरा मार्ग नाही ; किंमती, (उत्पादनाचा) खर्च व नफा यांत पड-णाऱ्या त्यांच्या भ्रष्ट प्रतिबिंबावरून ती मोजणी करून चालणार नाही. व्यावहारिक नियोजन, निदान बऱ्याच दीर्घ काळापर्यंत, अधिक-नफ्याच्या अंदाजी हिशोबाच्या अदमासावर आधारावे लागणार असले, तरी हे अदमास करताना मात्र, ह्या बऱ्याच कमी प्रमाणावर सुलभ असलेल्या आर्थिक व सामाजिक घडामोडी विचारात घ्याव्या लागतील.

जीवनमानाची पातळी झपाट्याने उंचावण्याचा मोह दडपून टाकण्याचे आर्थिक धोरण स्वीकारण्याची कारणे व्यावहारिक क्षेत्रात, ह्या दृष्टिकोनाच्या परिणामकारक अंमलबजावणीमुळे मिळतील. गरीब, अर्धविकसित देशांतील बिकट परिस्थतीचा मी या प्रकरणाच्या प्रारंभी निर्देश केला आहे; अशा देशाला "खोल गर्तेमधून स्वतःला वर उचलण्याची" महत्त्वाकांक्षा असते आणि आर्थिक विकासाची टिकाऊ प्रक्रिया सुरू करावयाची असते; त्यांनी आपले उत्पन्न व खर्च यांची अत्यंत काळजीपूर्वक मोजदाद

केलीच पाहिजे आणि सर्वसाधारणपणे काटकसरीच्या धोरणाची अंमलबजावणी केली पाहिजे.

राष्ट्रीय योजनेचा मुख्य हेतू खरोखरीच, उपलब्ध साधनसामुग्रीत अधिकाधिक काटकसर करणे हा असतो. पर्यायी कार्यांसाठी साधनसामुग्रीची वाटणी करण्याशी तर्कशुद्ध आर्थिक वागणुकीचा नेहमीच संबंध असतो : "प्रासंगिक खर्चा"च्या कल्पने-मागील वास्तविकता हीच असते. परंतु प्रत्यक्षात मात्र पुष्कळ अर्ध-विकसित देश "प्रदर्शनीय" सार्वजनिक प्रकल्पांसाठी आणि विकासाचा मार्ग खुला नसलेल्या आर्थिक शाखांत गुंतवणुकीसाठी व उत्पादनासाठी मौल्यवान मदत-निधी खर्च करतात आणि दुर्मिळ साधनसामुग्रीचा भयंकर अपव्यय करताना दिसतात ; नियोजनातील अप-यशाचा हा परिणाम असतो, आणि नियोजन सुधारणे हाच एक त्यावरचा उपाय असतो. त्यासाठी संचयी विकासाच्या प्रक्रियेतील चक्राकार कार्यकारणभावाच्या संबंधांचे वास्तववादी विश्लेषण करण्याची आवश्यकता असते.

अर्ध-विकसित अर्थरचनेचे वैशिष्टच असलेल्या लवचिकपणाच्या अभावावर विजय मिळविणे हा योजनेचा आणखी एक हेतू असतो. कोंडी कुठे होण्याचा संभव आहे हे तर्कनिष्ठ विश्लेषणाने ओळखून, त्या ज्ञानाच्या आधाराने धोरणाच्या उपाय-योजना आदेशित करावयाच्या अशी अर्ध-विकसित देशांची आर्थिक नियोजनाची व्यूहरचना मुख्यतः असली पाहिजे. सयुक्तिक आर्थिक नियोजनाने बाजारपेठा विस्तृत करण्याचे ध्येय नजरेसमोर ठेवले पाहिजे, आणि अशा रीतीने विस्तारीत झालेल्या बाजारपेठांत तयार होणाऱ्या किंमतींचा आपल्या कार्यासाठी उपयोग करून घेतला पाहिजे. परंतु बाजारपेठेतील ह्या घडामोडी नियोजनाचा निकष होऊ शकतात असा याचा मुळीच अर्थ नाही; उलट त्या नियोजन-निर्मित असतात, अगर त्यांतील बदलामुळे निर्माण झालेल्या असतात.

लोकांचे व शासनाचे विचार अनेक लोकप्रिय पूर्वकल्पनांपासून मुक्त करणे हा राष्ट्रीय आर्थिक नियोजनाचा तिसरा सर्वसाधारण हेतू असतो ; अतिशय विकसित देशांशी हेव्याने केलेल्या तुलनेमधून पुष्कळदा हे विचार निर्माण झालेले असतात आणि ते दूर फेकले गेले नाहीत तर अर्ध-विकसित देशांच्या आर्थिक धोरणांवर ते निश्चित-पणे वर्चस्व गाजवितात. प्रत्यक्ष प्रकल्पांच्या दृष्टीने केलेल्या तर्कशुद्ध नियोजनात दृष्टोपत्तीस येणाऱ्या वास्तविक कार्यकारणभावाच्या संबंधांचे ज्ञान करून घेणे हाच पूर्वकल्पनांपासून मुक्त होण्याचा एकमेव मार्ग असतो.

राष्ट्रीय आर्थिक नियोजनात आंतरराष्ट्रीय व्यापाराचे स्थान

हीच तत्त्वे, अर्थातच, आंतरराष्ट्रीय व्यापारालाही सारखीच लागू पडतात. अर्ध-विकसित देशाच्या विकास योजनेला निरपवादपणे परदेशातून मोठ्या प्रमाणा-वर यंत्रसामुग्री विकत घ्यावी लागते. पुष्कळदा आयातीमधील ही वाढ परदेशातून

मिळालेल्या देणग्यांनी अगर कर्जांनी संपूर्णपणे भरून निघत नाही ; तशी ती भरून निघाली नाही म्हणजे अर्ध-विकसित देशाला निर्यात-वाढीचे आटोकाट प्रयत्न करावे लागतात. हे करण्यातील त्याचे सामर्थ्य त्याच्या स्वतःच्या उत्पादन साधनांमुळे आणि पुष्कळदा परकीय मागण्यांच्या लवचिकपणाच्या अभावामुळे मर्यादित होते ; म्हणून त्याला नित्योपयोगी वस्तूंच्या आयातीवर निर्बंध घालावे लागतील; तसे केले तरच त्यास आवश्यक असलेली महत्त्वाची आयात करता येईल.

परराष्ट्रीय व्यापाराच्या जुळणीत मुद्दाम घडवून आणलेल्या ह्या बदलांच्या जोडीने अर्ध-विकसित देशाला शेतीमध्ये व पक्का माल तयार करण्याच्या उद्योग-धंद्यात उत्पादन-वाढ करावी लागेल तरच त्यास चलनवाढ थांबविता येईल ; त्याचप्रमाणे, चैनीच्या वस्तूंच्या आयातीमुळे स्वदेशात अनिष्ट गुंतवणुकीला व उत्पादनाला उत्तेजन मिळू नये म्हणून त्या वस्तूंच्या किंमतीवर व वापरावर नियंत्रणे बसवून त्यांची मागणी मर्यादित करावी लागेल. गुंतवणुकीची पातळी वाढविण्यासाठी भांडवल-निर्मिती करताना तिच्या जोडीला निरनिराळ्या धोरणात्मक उपाययोजना करून बचत करावी लागेल. वस्तूंचा उपभोग, उत्पादन, आयात व निर्यात यांच्या संख्येत मुद्दाम घडवून आणलेले हे बदल राष्ट्रीय योजनेतील फार महत्त्वाचे घटक असतात.

गुंतवणूक व उत्पादन वाढल्यानंतर उत्पादनाच्या घटकांत नवीन समन्वय मुद्दाम साधावा लागतो आणि आर्थिक विकासाचा प्रारंभ करणाऱ्या प्रत्येक देशाला अशा परिस्थितीत देशांतर्गत चलनवाढीचा तणाव नेहमीच अपेक्षित असतो. त्यावर काळजीपूर्वक नियंत्रण घालण्यात आले तरी, विकासाच्या प्रक्रियेत वाढते उत्पादन व उपभोगाच्या वस्तूंच्या मागणीमधील वाढ प्रतिबिंबित होण्याचा संभव असतो; आणि यांपैकी वाढलेल्या मागणीचा काही भाग नेहमीच आयातीकडे वळतो. आणि कोणत्याही परिस्थितीत, भांडवली मालाच्या वाढत्या आयातीमुळे विनिमयाच्या साधनावर तणाव पडणे अपरिहार्य असल्यामुळे आर्थिक विकासाचा निश्चय केलेल्या अर्धविकसित देशाला निर्यात-निर्बंध घालावेच लागतील ; दुसऱ्या कोणत्याही कारणासाठी घालावे लागले किंवा न लागले तरी विनिमय-संतुलनासाठी घालावेच लागतील.

अशा रीतीने, स्वदेशी मालाला संरक्षण देण्याचा हेतू नसला तरीदेखील सर्वच परिस्थितीत आवश्यक असलेले हे निर्यात-निर्बंध राष्ट्रीय योजनेसाठी योग्यच असतात ; कारण मी वर उल्लेख केल्याप्रमाणे राष्ट्रीय योजनेत अशा अनेक गुंतवणुकी कराव्या लागतात की ज्या स्पर्धाक्षम नसतात आणि म्हणून त्यांना आश्रय पाहिजे असतो. जेव्हा ही उत्पादनाची नवी क्षेत्रे बाजारपेठेत अधिक माल पाठविण्याइतकी परिपक्व होतात तेव्हा ती हळूहळू चलनवाढीचा तणाव कमी करतात आणि विनिमयातील अडचणी दूर करतात.

ह्या वाढत्या पुरवठ्यापैकी काही पुरवठा निर्यात मालाचा असेल; काही मालाच्या

निर्यातीला मदत देणेही अर्ध-विकसित देशाला सयुक्तिक वाटेल. गतिशून्यता व आर्थिक पारतंत्र्य यांमुळे बहुतेक अर्ध-विकसित देशांना असंतुलित अर्थव्यवस्थेचा वारसा मिळालेला असतो; त्यामुळे त्यांना उत्पादन-वाढीचा मोठा भाग स्वदेशातील बाजारपेठेत खावटीसाठी नवा माल अधिक प्रमाणावर पाठविण्यासाठी लागेल; हा माल आयात मालाची जागा घेईल आणि क्रमशः उपभोगाच्या वस्तूंच्या वापराच्या वाढीला व स्वयंपूर्णतेला वाव मिळेल.

परराष्ट्रीय व्यापार व विनिमय यांच्या दृष्टिकोनामधून दिसणारे कोणत्याही राष्ट्रीय योजनेचे महत्त्वाचे घटक मी या ठिकाणी सोप्या पद्धतीने पुनः मांडीत आहे. अलिकडे पुष्कळदा परराष्ट्रीय व्यापारात हस्तक्षेप न करण्याचा व परराष्ट्रीय विनिमयात ढवळाढवळ न करण्याचा सल्ला अर्धविकसित देशांना फुकाफुकी देण्यात येतो, याचा अर्थ बहुतेकांच्या बाबतीत आर्थिक विकासाची खटपट करू नका असाच असतो.

उलट, व्यापार व हुंडणावळ याबाबतचे आदेश अंमलात कसे आणावे, आणि देशांतर्गत चलनवाढीच्या दबावावर आवश्यक ते किमान नियंत्रण कसे टिकवावे याबद्दल त्यांना सल्ला दिला पाहिजे ; कारण व्यापार व हुंडणावळीवरील अनुशासनाच्या सयुक्तिक व कार्यक्षम व्यवस्थापनासाठी किमान नियंत्रण ही पूर्वअट आहे. वर उल्लेखिलेल्या सल्ल्याची अर्धविकसित देशांना नितांत गरज आहे, कारण पैसा, व्यापार व हुंडणावळ यांच्या धोरणाच्या क्षेत्रात अकार्यक्षम व्यवस्थापन राष्ट्रीय नियोजनाची दुर्दशा करू शकते, असे अनेक खेदजनक उदाहरणांनी दाखवून दिले आहे.

संरक्षणाची खास गरज

व्यापाराचे नियमन आणि संरक्षणाच्या हेतूने त्याची अंमलबजावणी या प्रश्नाकडे पुन्हा एकदा पहाताना, मी आग्रहपूर्वक प्रतिपादन करणार आहे की, बाजारभावांच्या पद्धतीच्या "वस्तुनिष्ठ" आर्थिक निकषाच्या संदर्भात ते सयुक्तिकपणे तयार करता येणार नाहीत ही गोष्ट अगदी स्पष्ट आहे ; म्हणजेच तुलनात्मक खर्चाचे गतिहीन तत्त्व जसेच्या तसे लावून वरील गोष्टी करता येणार नाहीत. स्वदेशातील बाजारपेठ अत्यंत लहान असल्यामुळे माल तयार करण्याच्या उद्योगधंद्यांची वाढ खुंटते किंवा ते अस्तित्वातच येत नाहीत. स्वदेशी बाजारपेठ पुष्कळदा परदेशी मालाने भरून गेलेली असते, आणि हा माल निर्यात करणाऱ्या देशांच्या दृष्टीने ही मागणी बहुधा सीमान्तिक असते. बाहेरील स्पर्धेपासून स्थानिक उद्योगधंद्यांना संरक्षण देऊन त्यांना विकासाची संधी देता येईल.

मी पूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे, प्रत्येक नव्या कारखान्यामुळे संपूर्ण अर्थरचनेला फायदा मिळतो, त्याची गणती नफ्याच्या मोजणीत केली जात नाही, परंतु विविध प्रकारच्या बाह्य अर्थरचनांना त्यांचा फायदा मिळतो, प्रशिक्षित कामगारांच्या संख्येत

वगैरे वाढ होते. हे, स्थानिक उद्योगधंद्यांना संरक्षण का दिले पाहिजे याचे दुसरे सर्वसाधारण कारण आहे. विकसित देशापेक्षा अर्धविकसित देशाच्या दृष्टीने, अनेक कारणांसाठी, तुलनेने वर उल्लेख केलेले फायदे फार अधिक महत्त्वाचे असतात.

अर्धविकसित देशातील श्रमिक जनतेचा मोठा विभाग बेकार असतो किंवा "लपलेल्या बेकारी"च्या निरनिराळ्या प्रकारच्या कामामधून जेमतेम पोट भरण्यासाठी धडपडतो, हे अर्धविकसित देशाचे आणखी एक वैशिष्टच असते. उत्पादनक्षम कामात श्रमिकांना काम न मिळणे, म्हणजेच एका दृष्टीने तो देश अर्धविकसित आहे असे विधान करणे होय : दुसऱ्या दृष्टीने त्या देशाला विकसित होण्याची संधी मिळाली पाहिजे, हे त्यात सूचित होते. ह्या "स्वतंत्र" कामगारांपैकी काहींना उपयुक्त काम मिळाले तर त्या देशाला एकूण फायदा पुष्कळ मिळेल ; त्यासाठी त्याला स्पर्धेविरुद्ध संरक्षक उपाय योजावे लागले तरी हरकत नाही.

अर्धविकसित देशात, अनेक कारणांमुळे, औद्योगिक उद्योगधंदे व शेती यांतील रोजगारीमधील तफावत, विशेषच अधिक असते. त्या मानाने उद्योगधंद्यांना आवश्यक इतके संरक्षण दिले नाही तर त्यांच्या वाढीवर अनिष्ट परिणाम होतील.

अशा प्रकारच्या हेतूंनी आंतरराष्ट्रीय व्यापारात केलेले हस्तक्षेप राष्ट्रीय योजनेत मांडण्यात आलेल्या बाजारभावाच्या पद्धतींना नवीन वळण देण्याच्या सर्वसाधारण प्रयत्नांचाच भाग असतो ; आर्थिक विकासाची टिकावू संचयी प्रक्रिया सुरू होईल अशा रीतीने हे वळण देण्याचा प्रयत्न असतो. बाजारभाव पद्धतीत हस्तक्षेप करण्याची पद्धत हाच राष्ट्रीय योजनेच्या अंमलबजावणीचा मुख्य भाग असतो ; योजनेचे ध्येय ऊर्ध्वगामी संचयी प्रक्रिया सुरू करण्याचे असते, ते साध्य होण्याच्या दिशेने ह्या पद्धतीची जी व्यावहारिक मदत होईल तिच्यावरून तिच्या उपयुक्ततेचे मूल्य ठरविले पाहिजे.

पुन्हा एकदा—अनिर्बंधित कार्यक्रमाला निमंत्रण नव्हे

आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या क्षेत्रात हे तत्त्व लागू करणे म्हणजेही अनिर्बंध कार्यक्रमाला निमंत्रण नव्हे.

तर्कशास्त्राच्या दृष्टीने असमर्थनीय व भ्रामक असलेल्या मुक्त व्यापाराच्या किंवा त्याच्या अनुशंगिक तत्त्वाचा त्याग करून, त्याऐवजी, अर्धविकसित देशात अस्तित्वात असलेल्या आणि राष्ट्रीय योजना ज्यांच्यावर आधारली जावी त्या संबंधित घटकांच्या अभ्यासाने स्पष्ट होणाऱ्या राष्ट्राच्या खऱ्या हिताचा व खऱ्या कार्यकारणभावी संबंधांचा स्वीकार करून राजकीय मूल्यमापनाच्या पातळीत बदल केल्याचे ते द्योतक आहे.

कोणत्याही अर्धविकसित देशाला त्याच्या संभाव्य आयात-निर्यातीच्या मालाचे आंतरराष्ट्रीय भाव अत्यंत काळजीपूर्वक लक्षात घेतल्यावाचून चालणार नाही.

परराष्ट्रात असलेल्या किंमती या समस्येमधील स्वतंत्र परिवर्तनीय घटक असतात : अर्धविकसित देशाला स्वदेशातील किंमतींच्या रचनेवर जसा प्रभाव पाडता येतो आणि त्यात बदल करता येतो त्याप्रमाणे परराष्ट्रातील किंमतीत करता येत नाही ; ती गृहीत वस्तुस्थिती असते.

मी वर निर्देशित केल्याप्रमाणे, ज्या वस्तू अधिक स्वस्त किंमतीत आयात करता येतील किंवा तोटा भरून काढण्यासाठी मदत देऊन निर्यात कराव्या लागतील अशा वस्तू स्वदेशात तयार करण्याचे अर्धविकसित देशाने ठरवावे यासाठी समर्पक कारणे आहेत. परंतु त्यासाठी त्यांनी स्वतंत्रपणे निर्णित होणारे घटक म्हणून आंतरराष्ट्रीय किंमतींची पूर्ण दखल घेतली पाहिजे ; आणि तसे केले नाही तर विकासाची प्रक्रिया मंदावेल. अर्धविकसित देशामध्ये संरक्षक उपाययोजना सयुक्तिक असतात असे सिद्ध करता आले तरी, बहुतेक अर्धविकसित देशांत आज लागू करण्यात येणारे आंतरराष्ट्रीय व्यापारातील हस्तक्षेप अत्यंत असयुक्तिक आहेत, ही गोष्ट लपविण्यासाठी त्याचा अर्थातच उपयोग केला जाऊ नये.

खरे म्हणजे, आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या जुन्या सिद्धांतातील ज्या प्रकरणाला आपण रिकार्डोच्या वेळेपासून आतापर्यंत "तौलनिक खर्चाच्या किंमती" किंवा "तौलनिक फायदे" हे नाव दिलेले आहे ते प्रकरण, आपल्याला आवश्यक असलेल्या आर्थिक अर्ध-विकास व विकासाच्या सिद्धांतातही कायम ठेवले पाहिजे. आर्थिक विकासाच्या धोरणाचे नित्य परिणाम असलेले जादा नफा, चलनवाढीचा तणाव व विनिमयातील अडचणी हे विषय त्यात घालता येतील. हे व इतर बदल जर पद्धतशीर रीतीने, आर्थिक सिद्धांतामधील परंपरागत पूर्वानुकूलग्रहांनी भारावून न जाता, करण्यात आले तर, तौलनिक खर्चांच्या किंमतींचा गतिशील सिद्धांत तयार होईल ; आणि तो राष्ट्रीय आर्थिक नियोजनाच्या सर्वसाधारण सिद्धांताचा अविभाज्य भाग बनेल ; अशा सिद्धांताची रचना आपल्याला करावयाची आहे.

अनेक कारणांमुळे अर्धविकसित देश विकसित देशांपेक्षा फार निराळ्या स्थितीत आहेत, आणि मी दुसऱ्या संदर्भात सविस्तरपणे स्पष्टीकरण केल्याप्रमाणे, आंतरराष्ट्रीय व्यापारात "दुहेरी नैतिक पातळी" ठेवण्यास सयुक्तिक कारणे आहेत. आंतरराष्ट्रीय निधी मंडळाचे व व्यापार व वाहतूक मंडळाचे (गॅट) चे कार्य आणि ह्या संघटनांच्या बाहेर चालणाऱ्या व्यापारी धोरणातील बऱ्याचशा द्विपक्षीय वाटाघाटी "द्यावे तसे घ्यावे" ह्या तत्त्वानुसार चालतात. अतिविकसित देशांतील संबंधांच्या बाबतीत हे योग्य असेल, परंतु अर्धविकसित देशांच्या संबंधात ते खोटया समानतेच्या गृहीत-तत्त्वाचे अस्तित्व दर्शविते.

चलनवाढीचा तणाव आणि परराष्ट्रीय विनिमय साधनावरील तणाव हे आर्थिक विकासाच्या धोरणाचे नित्य परिणाम आहेत. परराष्ट्रीय व्यापाराचे कडक नियंत्रण करणे त्यांना ह्या कारणासाठी आवश्यक झाले आहे ; तसे केले तरच त्यांना विकासाचे

धोरण चालू ठेवता येईल. शिवाय, अर्ध-विकासाच्या परिणामी त्यांची अर्थरचना असंतुलित असल्यामुळे आणि त्यांना स्पर्धेचे सामर्थ्य नसल्यामुळे हे नियमन संरक्षणासाठी वापरण्याची त्यांना खास कारणे आहेत ; विकसित देशांना ही कारणे नाहीत. निर्यात वाढविण्याची प्रत्येक संधी वापरण्यास हे अर्ध-विकसित देश उत्सुक रहातील, आणि म्हणून त्यांच्या नियमनामुळे सर्वसाधारणपणे जागतिक व्यापार कमी होणार नाही ; मात्र विकसित देशांनी अशी नियंत्रणे घातली आणि त्यांना विनिमयाच्या अडचणींना तोंड देता आले तर, त्यामुळे जागतिक व्यापार खरोखरीच कमी होतो.

विकसित देशांनी एकपक्षी व्यापारी सवलती द्याव्यात अशी मागणी अर्ध-विकसित देशांनी करावी हे सयुक्तिक आहे. विकसित देशांकडे त्यांच्याकडून होणाऱ्या निर्यातीच्या संबंधात ते पूर्णपणे खुल्या व्यापाराचे पुरस्कर्ते रहातील आणि निर्यातीला मदत देण्याचा स्वतःचा हक्कही राखून ठेवतील ; परंतु स्वतःच्या देशात होणाऱ्या आयातीवर निर्बंध घालतील. आणि अशी वृत्ती तार्किक दृष्टीने विसंगत आहे असे म्हणणाऱ्यांविरुद्ध त्यांच्याकडे सबळ युक्तिवाद आहे.

संदर्भ टिपा

१. पहा—संयुक्त राष्ट्रसंघाच्या, लॅटिन अमेरिकेसाठी नेमलेल्या आर्थिक मंडळाने तयार केलेले, "आर्थिक विकासाचे विश्लेषण व संयोजन", भाग १ ला. योजनेचा कार्यक्रम ठरविण्याच्या तंत्राची प्रस्तावना, न्यूयॉर्क, १९५५, पान ३ व पुढे.

२. श्री. अनुरिन बेवन यांच्या "लोकशाहीची मूल्ये" या विषयावरील व्याख्यानामधून मी पुन्हा उद्धृत करीत आहे. ४थ्या प्रकरणात मी त्यांचा उल्लेख केला होता.

३. अनेक समाजवादी लेखकांनी वॉन मायझेस्च्या युक्तिवादातील मुख्य गृहीत तत्त्व स्वीकारले आहे पण अगदी उलट भूमिका घेतली आहे आणि "कल्याणकारी" कामे कमाल प्रमाणावर करून आर्थिक विकासाला सयुक्तिक होणे शक्य आहे, असा आग्रह धरला आहे.

आधुनिक वादविवाद हे जुन्या वादांचेच पुनरावतार आहेत. उदारमतवादी तत्त्वाची बाजू ५० वर्षांपूर्वी गुस्ताव कासल यांनी व इतर अनेकांनी मांडली आणि आधुनिक समाजवादी कल्याणकारी सिद्धांतातील सर्व महत्त्वाची तत्त्वे, मि. विझर यांनी त्याही पूर्वी मांडली आहेत. त्यांच्या नैसर्गिक मूल्ये ह्या पुस्तकात ती मांडली गेली आहेत; ते समाजवादी नव्हते, आणि आदर्श कम्युनिस्ट राज्यात सर्व कल्याणकारी योजना प्रत्यक्षात येतील असे मत त्यांनी प्रतिपादन केले आहे. (व्हिएन्ना, १८८९).

प्रकरण ८ वे

आव्हान

अर्ध-विकसित देशांना असलेली संशोधनाची आवश्यकता

सध्या विकसित असलेल्या राष्ट्रांनी ज्या अडचणींना तोंड दिले त्यांपेक्षा कितीतरी अधिक अडचणींना अर्ध-विकसित देशांना आर्थिक विकासाच्या मोहिमेत टक्कर द्यावी लागत आहे.

ज्या आर्थिक पातळीवर ते विकासाला प्रारंभ करीत आहेत, ती त्यांच्यापैकी बहुतेकांची, पुष्कळच अधिक खालची आहे. लोकसंख्या व साधनसामुग्री यांच्यातील संबंध बहुधा अधिक प्रतिकूल आहेत, आणि लोकसंख्येच्या वाढीची प्रवृत्ती अधिक गतिमान व धोकादायक आहे. त्यांच्याजवळ आंतरराष्ट्रीय भांडवलाची बाजारपेठ नाही, किंवा परदेशात स्थायिक होण्याचा मोकळा मार्ग नाही ; सध्या विकसित असलेल्या देशांजवळ ह्या दोन्ही गोष्टी होत्या. त्यांना बुद्धिवादी परंपरेचा वारसा मिळालेला होता आणि सुव्यवस्थित राज्यव्यवस्थेचाही ; आज विकसित असलेल्या देशांच्या प्रारंभीच्या इतिहासातील ह्या दोन्हीं महत्त्वाच्या गोष्टी अर्धविकसित देशांत नाहीत.

आणि ते उशीरा आले आहेत : सध्याच्या विकसित देशांना सभोवतालच्या जगातील मागासलेल्या राष्ट्रांच्या घेराव्यात औद्योगिक बेटे म्हणून स्वतःची प्रगती करता आली, आणि त्यांच्या तयार मालासाठी बाजारपेठा म्हणून व कच्च्या मालासाठी पुरवठास्थाने म्हणून मागासलेल्या देशांचा उपयोग करून घेता आला ; त्यासाठी त्यांनी मागासलेल्या देशांना वसाहती गुलामगिरीतही ठेवले—औद्योगिक प्रगतीची ही संधी आजच्या अर्ध-विकसित देशांना उपलब्ध नाही.

त्यांना एकच अनुकूलता आहे, आणि ती म्हणजे, आपले संचित शास्त्रीय व तांत्रिक ज्ञान; परंतु ह्या ज्ञानाचा उपयोग करून घेण्यासाठी त्यांना सर्व क्षेत्रांत नवीन संशोधन करण्याची आवश्यकता आहे.

आपले राजकारण, शासकीय व्यवस्थापन व सामाजिक सुधारणा यांचे तंत्र काय,

किंवा उत्पादन व वाटप यांचे तंत्र काय, आहेत तशी त्यांनी स्वीकारली तर ती त्यांना फायद्याची ठरणार नाहीत. विकसित देशांच्या फार भिन्न परिस्थितीला जुळण्यासाठी ह्या तंत्राचा विकास करण्यात आलेला आहे, आणि अर्ध-विकसित देशांच्या गरजांना ती साजेशी नाहीत.

उपलब्ध असलेल्या सर्व ज्ञानाचा अर्ध-विकसित देशांनी उपयोग करावा, परंतु त्यांच्या मूल्यांना व परिस्थितीला जुळतील अशी स्वतःची खास तंत्रे त्यांनी शोधून काढावीत, हा आदर्श चांगला आहे. हे परिणामकारक रीतीने करण्यासाठी, मूलभूत संशोधनासहीत सर्व पातळीवरील संशोधनाची त्यांना आवश्यकता आहे,

त्यांच्यासाठी इतर कोणालाही ते बहुतांशी करता येणार नाही. आर्थिक विकासात यशस्वी होण्याची खरी संधी मिळावी म्हणून, शास्त्रज्ञांच्या प्रशिक्षणासाठी आणि सर्व क्षेत्रांत शास्त्रीय संशोधन करण्यासाठी अर्ध-विकसित देशांनी विद्यालये व महाविद्यालये यांची तरतूद करण्याच्या कामाला सर्वांत अग्रक्रम दिला पाहिजे. श्रीमंत देशांनी अशा संस्थांच्या स्थापनेसाठी खरे भरघोस अनुदान देण्याचा विचार करावा, असे मी दुसऱ्या संदर्भात सुचविले आहे. अशा अनुदानांचे, अर्ध-विकसित देशांना विकासाच्या संचयी प्रक्रियेत गती मिळविण्याच्या कार्यात मोठे व टिकावू परिणाम होतील.

आर्थिक सिद्धांतात नव्या दृष्टिकोनाची आवश्यकता :

अर्ध-विकसित देशांजवळ, स्वतंत्ररीत्या उपयोग करण्यासाठी, आपला वंशपरंपरेने आलेला आर्थिक सिद्धांतही आहे ; परंतु तोदेखील त्यांनी त्याचे गुणदोषविवेचन केल्याशिवाय स्वीकारू नये. स्वतःच्या समस्या व हित यांना अनुरूप ठरेल अशा रीतीने त्यांनी त्याला नवा आकार द्यावा.

हा सिद्धांत प्रथम औद्योगिक देशात मांडण्यात आला आणि पुढे विकसित करण्यात आला ; त्याचा बराचसा भाग त्या देशातील प्रभावी हितसंबंधांचा युक्तिवाद आहे, ह्या वस्तुस्थितीची अर्ध-विकसित देशांनी खास जाणीव ठेवावी; ह्या प्रश्नाचे अधिक विवरण मी दुसऱ्या भागात करणार आहे. आतापर्यंत आर्थिक सिद्धांताने अर्ध-विकसित देशांच्या समस्यांचा बहुशः विचार केलेला नाही. तरीदेखील त्याच्या गुणदोषांची चर्चा न करता तो त्यांना लागू करण्याचा प्रयत्न केला तर सिद्धांत चूक ठरतो.

अशीच परिस्थिती आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या बाबतीत स्पष्टपणे झाली असल्याचे आता आपण पहाणार आहोत. हा सिद्धांत असे सूचित करतो की, उत्पन्नात समानता निर्माण होण्याची क्रिया व्यापार सुरू करतो; परंतु प्रत्यक्षात मात्र, औद्योगीकरण झालेला देश व अर्ध-विकसित देश यांच्यात अनियंत्रित व्यापार झाल्यास, त्याचा नित्याचा परिणाम, अर्ध-विकसित देशात दारिद्र्याची व गतिहीनतेची संचयी प्रक्रिया सुरू होण्यात होतो.

अर्ध-विकसित देशांना व्यापारासंबंधी व कर्जफेडीसंबंधी सध्या जो सल्ला देण्यात

येतो त्याचा आधार असाच कमकुवत असतो, कारण त्यामागचा सिद्धांत ह्या देशांच्या समस्यांना गैरलागू आहे. म्हणजे हा सल्ला शास्त्रीय दृष्टीने निराधार व व्यावहारिक दृष्टीने चुकीच्या मार्गाला लावणारा असतो.

अर्ध-विकसित देशांच्या विकासाच्या समस्यांसंबंधीचे बहुतेक साहित्य प्रगत औद्योगिक देशांत तयार होते. सुदैवाने त्यांपैकी बहुतेकांचा दृष्टिकोन असैद्धांतिक असतो ; जोपर्यंत आर्थिक सिद्धांत अर्ध-विकसित देशांच्या समस्यांशी योग्य रीतीने जुळवून घेण्यात आलेला नाही तोपर्यंत ही गोष्ट उपयुक्तच आहे.

परंतु, ह्यापैकी बऱ्याचशा साहित्यात, अर्ध-विकसित देशांच्या समस्यांविषयी त्यांच्या हिताच्या दृष्टीने विचार केलेला नसतो ; कळत वा नकळत, एखाद्या प्रगत देशाच्या किंवा त्यांच्या गटाच्या, राष्ट्रीय राजकीय हिताच्या दृष्टीने विचार केलेला असतो, याचीही नोंद आपण घेतली पाहिजे. शीत-युद्धाच्या तडाख्यात परिस्थिती अधिकच बिघडली आहे, कारण तिच्या विश्लेषणाचे मार्गदर्शन करणारे राष्ट्रीय हितसंबंध, आता पुष्कळदा, ह्या जागतिक संघर्षात केवळ लष्करी-हितसंबंधापुरतेच संकुचित दृष्टीने ध्यानात घेतले जातात.

आता अर्ध-विकसित देश स्वतःच्या इच्छा व व्यथांसंबंधी अधिक बोलके होत आहेत, म्हणून संशोधनाच्या दिशेत बदल अपेक्षित आहे. त्यांच्या हिताच्या दृष्टीने आर्थिक समस्यांचा अधिकाधिक अभ्यास होऊ लागेल. समतावादी दृष्टिकोनाचाही आदर्श हाच आहे; आणि आर्थिक सिद्धांतात त्याला फार मूलगामी स्थान मिळालेले असल्यामुळे, आर्थिक संशोधनाची ही नवी दिशा आपल्या पाश्चिमात्य संस्कृतीमधील बलवान व सखोल मनोभावनेशी जुळणारी आहे—ही उत्कट मनोभावना सांस्कृतिक पुनरुज्जीवनाच्या युगापासून व त्याच्याही आधीच्या काळापासून निर्माण झालेली आहे.

अस्तित्वात असलेल्या आर्थिक विषमतांच्या बाबतीत, आर्थिक सिद्धांताची ही अधिक वास्तववादाकडे वळलेली दृष्टी नवी असून, तिच्यामुळे जुन्या, जैसे—थे—पूर्वानुकूलग्रहांचा व विशेषतः खुल्या व्यापाराच्या विचारसरणीचा व स्थिर समतोलाच्या दृष्टिकोनाचा अंत होईल, असे माझे मत आहे ; आणि त्याची कारणे सांगण्याचा ह्या पुस्तकात मी प्रयत्न करीत आहे. त्याचप्रमाणे, "आर्थिक घटक" व "आर्थिक नसलेले घटक" यांच्यातील भेदही तर्कदुष्ट व परिणामी फसवणूक करणारा म्हणून अव्हेरावा लागेल. आर्थिक सिद्धांताने वास्तववादी होण्यासाठी सर्व संबंधित घटकांचा विचार केला पाहिजे ; सर्वसामान्य आर्थिक सिद्धांत सामाजिक सिद्धांत बनला पाहिजे.

समाजपद्धतीमधील सर्व घटकांत चक्राकार कार्यकारणभाव असतो आणि त्याची परिणती संचयी प्रक्रियेत होते, हे नव्या सिद्धांताचे मुख्य गृहीततत्त्व असेल, असा मला विश्वास वाटतो ; आणि अशा प्रकारच्या सर्वसाधारण सिद्धांताची रूपरेखा काढ-

ण्याचा मी प्रयत्न केला आहे. आर्थिक प्रक्रियेच्या सर्वसाधारण सिद्धांताबद्दल गंभीर-पणाने चर्चा करण्यास समर्थ होण्यापूर्वी आपण काय साध्य केले पाहिजे याचे फक्त ओझरते दर्शन या रूपरेखेत मिळते. आपल्या परंपरागत सिद्धांतात हल्ली समाविष्ट करण्यात आलेल्या अनेक खास विचारांना व सिद्धांतांना ह्या नव्या सिद्धांतात स्थान मिळेल. अशा रीतीने नव्या पार्श्वभूमीवर, सतत उपयोग करण्यासाठी, त्यांचे जतन केले जाईल. ह्या मुद्याची चर्चा मी पुन्हा ११ व्या प्रकरणात करणार आहे.

अशा प्रकारचा सर्वसाधारण सिद्धांत नीटनेटक्या अर्थशास्त्रीय मोजमापाच्या नमुन्यात बसण्याची शक्यता आहे असा भ्रम मी मुळीच बाळगून नाही, हेही मला सांगावयाचे आहे. संबद्ध बदलते घटक आणि त्यांच्यातील संबद्ध संबंध इतके असंख्य असतात की अशा प्रकारच्या बहादुर सुलभतेला तेथे वाव नसतो. याचा अर्थ असा मात्र नाही की विशिष्ट प्रश्न ह्या पद्धतीने फायदेशीरपणे हाताळता येत नाहीत-- परंतु त्यासाठी महत्त्वाच्या वस्तुस्थितीच्या व संबंधांच्या ज्ञानावर आधारीत बदलते घटक व गृहीततत्त्वे यांची निवड केली पाहिजे, आणि असे ज्ञान फक्त सर्वसाधारण सिद्धांतामधूनच मिळू शकते.

भावी काळात सर्व देशांतील अर्थशास्त्रज्ञ, अर्ध-विकसित देशांच्या विकासाच्या समस्या, त्या देशांचे हित, मूल्ये व आकांक्षा लक्षात घेऊन अभ्यासतील, याची मला खात्री आहे. परंतु, तसे करण्याची मुख्य जबाबदारी त्या देशांच्या तरुण अर्थशास्त्रज्ञांचीच आहे. अर्ध-विकसित देशांपैकी अत्यंत गरीब व सर्वाधिक अस्वस्थ असलेल्या देशाच्या राजधानीत, कैरोत भाषण करताना, श्रोत्यांमध्ये उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांना उद्देशून बोलणे व्याख्यानाच्या अखेरीस मला अगदी स्वाभाविक वाटले, आणि मी त्यांना मला जे फार मोठे आव्हान व संधी वाटते त्याचे निवेदन स्वाभाविकपणेच केले. या पुस्तकाचा वाचकवर्ग जरी अधिक विस्तृत असला तरी त्यावेळी मी केलेल्या भाष-णाचा संक्षिप्त आढावा या ठिकाणी देणे मला योग्य वाटते.

अर्धविकसित देशांतील तरुण अर्थशास्त्रज्ञांनी करावयाचे कार्य

प्रगत देशांतील आर्थिक विचारसरणींमधील पूर्वानुकूलग्रहांमुळे अर्ध-विकसित देशां-तील तरुण अर्थशास्त्रज्ञ चुकीच्या मार्गाला लागले तर आजच्या ह्या 'महान जागृती'च्या युगात ती शोककारक घटना ठरेल; विकसित देशांतील अभ्यासकांना तर्कशुद्ध पद्धतीने विचार करण्यात त्या ग्रहांमुळे अडथळे येतात; परंतु अर्धविकसित देशांतील संशोधकांच्या बौद्धिक प्रयत्नांच्या दृष्टीने तर ते त्यांना प्राणघातकच ठरतील.

त्याऐवजी त्यांनी ह्या अर्थशून्य, असंबद्ध व पुष्कळदा स्पष्टपणे अपुऱ्या असलेल्या सिद्धांतांचे व सैद्धांतिक दृष्टिकोनाचे बरेचसे भाग फेकून देण्याचे धैर्य दाखवावे आणि स्वतःच्या गरजा व समस्या यांच्या अभ्यासावरून नव्याने विचार करण्यास प्रारंभ करावा अशी माझी इच्छा आहे. त्यातून ते कालबाह्य पाश्चिमात्य उदारमतवादी अर्थ-

शास्त्राच्या व मार्क्सवादाच्याही कक्षेच्या बाहेर निघून पुढे जातील.

आमचे जुने सिद्धांत व सैद्धांतिक वादविवाद यांच्यापैकी पुष्कळसे शंभर वर्षां-पूर्वीचे किंवा त्याहूनही अधिक पूर्वीचे आहेत ; त्यांचे चर्वितचर्वण करीत बसण्यापेक्षा अर्धविकसित देशांतील तरुण अर्थशास्त्रज्ञांनी आमच्या परंपरेतील जे खरोखरी व्याव-हारिक व उपयुक्त आहे ते उचलावे ; आणि स्वतःच्या समस्यांना जुळेल अशी नवी सैद्धांतिक बांधणी करण्यास प्रारंभ करावा. त्यानंतर, पुष्कळसे जुने व परिचित विचार व प्रमेये नव्या चौकटीत बसण्यास योग्य बनविल्यानंतर उपयुक्त ठरतात, असे त्यांना आढळून येईल.

सर्व अर्ध-विकसित देश आता आर्थिक धोरणाच्या नव्या मार्गाने वाटचालीस आरंभ करीत आहेत; कोणत्याही प्रगत देशाच्या इतिहासात त्या मार्गाशी जवळचे साधर्म्य आढळत नाही. तत्कालीन ऐतिहासिक परिस्थितीला अधिक सुयोग्य व मुख्यतः तिने घडविलेल्या, सामाजिक व आर्थिक सिद्धांतांच्या नव्या पुनर्रचनांना, विकसित देशांतील आर्थिक घडामोडींच्या व धोरणांच्या क्रमाने जन्म दिला ; त्याच-प्रमाणे, अर्ध-विकसित देशांतील अत्यंत भिन्न घडामोडी व धोरणे ही सामाजिक व आर्थिक संशोधनाला नवीन व भिन्न सैद्धांतिक चौकट देण्यासाठी आव्हान होत, असे समजून त्यांचा स्वीकार करणे पूर्णपणे योग्य ठरेल.

ही आशा खरी ठरली तर,आतापर्यंत आर्थीक व सांस्कृतिक मागासलेपणात राहि-लेल्या ह्या मोठ्या बहुसंख्य मानवजातीच्या जागृतीचा एक प्रासंगिक परिणाम म्हणून, नवीन शास्त्रीय शोध लागतील आणि आपले सांस्कृतिक क्षितिज विस्तृत होईल—त्यातून पुढे आपली समान संस्कृती समृद्ध होईल. ह्या धाडसी आशेच्या स्फूर्तीमधूनच मी ह्या पुस्तकात, व हे पुस्तक ज्या व्याख्यानांवर आधारलेले आहे त्या पूर्वीच्या व्याख्या-नांत, काहीशा प्रक्षोभजनक भाषेत अनेक परंपरागत सैद्धांतिक दृष्टिकोनांचा विचार केलेला आहे ; हे दृष्टिकोन विशेष हक्कदार देशांच्या आर्थिक प्रगतीच्या काळात व जगावर त्यांचे निर्विवाद बौद्धिक नेतृत्व होते त्या काळात तयार झालेले आहेत.

एका बाबतीत अर्ध-विकसित देशांतील अभ्यासकांना प्रारंभीच एक खास अनु-कूलता मिळेल : ती ही की, सापेक्षतेने श्रीमंत व प्रगत असलेल्या देशांतील आर्थिक सिद्धांताच्या विकासावर समर्थनाचे जे खास बंधन होते त्यापासून सहसा ते अलिप्त असतील. अर्ध-विकसित देशांतील दरिद्री जनतेच्या मागण्या पूर्ण करण्याची गरज़ हा त्यांच्या अभ्यासाचा स्वाभाविकपणेच प्रारंभ असेल. अशा रीतीने, त्यांच्या बाबतीत, सनातनी "ज़ैसे थे"च्या अनुकूल पूर्वग्रहावर समतेचा सिद्धांत त्यांना उतारा म्हणून उपयुक्त वाटेल ; आमच्या पाश्चिमात्य परंपरेत याच्या विरुद्ध प्रवृत्ती आढळून येते. (पुढील १० वे प्रकरण पहावे.)

अर्ध-विकसित देशांतील फार मोठ्या व वाढत्या संख्येच्या अभ्यासकांत आर्थिक सिद्धांताचे वितरण करण्याची प्रक्रिया चालू आहे ; तिच्यात, एका प्रकारच्या पूर्वा-

नुकूलग्रहापासून दुसऱ्या प्रकारच्या पूर्वानुकूलग्रहांचे वर्चस्व स्थापन होण्याच्या बदलापेक्षा अधिक मूलभूत बदल घडण्याची मला संधी दिसते. कारण पूर्वीच्या प्रकारच्या पूर्वग्रहांपासून मुक्त होताना अभ्यासक त्यांचा व त्यांना आधार देणाऱ्या सिद्धांतांचा तर्कशुद्ध परामर्श घेण्यास स्वाभाविकपणेच उद्युक्त होतील. अशा रीतीने, अर्थशास्त्रातील सैद्धांतिक परंपरेच्या कक्षेबाहेरचा दृष्टिकोन त्यांनी स्वीकारला, म्हणजे मग, हे पूर्वानुकूलग्रह आपल्या विचारसरणीतील तात्त्विक व विश्वाचा अंतिम हेतू सांगण्याच्या प्रयत्नांशी कसे संबद्ध आहेत हे त्यांना स्वतःला उमजण्याची शक्यता आहे ; हे प्रयत्न म्हणजे मूल्यांना वस्तू म्हणून लेखण्याची तत्त्वज्ञानाची जुनी क्लृप्ती असते.

आणि अशा प्रकारचा तर्कदुष्ट भाग विकारसरणीतून अजिबात टाळण्याची महत्त्वाकांक्षाही त्यांच्यात निर्माण होण्याची शक्यता आहे. परंतु त्यांना तसे करण्याची संधी फार कमी, हे मान्य केले पाहिजे. समाजशास्त्रांच्या इतिहासावरून दिसून आले आहे त्याप्रमाणे, ते स्वतःचे नवे पूर्वानुकूलग्रह तयार करून त्यांचा स्वीकार करतील, आणि ते ग्रह त्यांच्या विभिन्न समर्थनांच्या गरजांना अनुरूप असतील, त्याचप्रमाणे, नवीन आध्यात्मिक विचारपद्धतीत त्यांचा अंतर्भाव करून ते त्यांना मजबूत करतील. परंतु पारंपारिक पूर्वानुकूलग्रहांपासून मुक्त होण्याची प्रक्रिया चालू असताना त्यांना बौद्धिक स्वातंत्र्याचा छोटासा मध्यंतराचा काळ मिळेल; त्याचा उपयोग करून, त्यांच्यापैकी काहीजण, वस्तुरूप मूल्यांना न मानणाऱ्या सामाजिक सिद्धांताची रचना करण्याच्या हेतूने जाणीवपूर्वक कार्यारंभ करण्याची शक्यता बाजूला टाकू नये.

हे साध्य करण्याचा तर्कशुद्ध मार्ग, स्पष्ट मूल्यनिष्ठ गृहीततत्त्वांच्या आधारावर विचार करणे हा आहे; मात्र, फक्त व्यावहारिक व राजकीय अर्थ काढतानाच अशा तत्त्वांचा आधार घेऊ नये, तर त्याच्याही पूर्वी, वस्तुस्थिती व कार्यकारणभावाचे संबंध निश्चित करताना व त्यांचे विश्लेषण करतानाच तो घ्यावा. विचारपद्धतीसंबंधीच्या ह्या स्पष्टीकरणामुळे आणि शास्त्रीय लेखनातील तिच्या उपयोगामुळे त्यांची विश्लेषण करण्याची हत्यारे अधिक धारदार होतील, आणि व्यावहारिक व राजकीय कारणासाठी जेव्हा त्यांचा वापर केला जाईल तेव्हा ती अधिकच सामर्थ्यवानही बनतील.

आपल्या पारंपारिक सैद्धांतिक दृष्टिकोनातील अनावश्यक भाग टाकून देऊन, त्याचबरोबर, त्या जुन्या विचारातील व प्रमेयातील मौल्यवान भागाची आर्थिक व सामाजिक समस्यांबद्दलच्या नव्या दृष्टिकोनाला जुळेल अशा रीतीने पुनर्रचना करण्याचे, म्हणजे त्यात जे खरोखरीच उपयुक्त व व्यावहारिक आहे त्याची निवड करण्याचे कार्य सोपे नाही. हे काही शौकीन किंवा अहंमन्य लोकांचे काम नव्हे. परंपरागत पूर्वानुकूलग्रह किंवा त्यांच्या लोकप्रिय विकृतींपुढे अशा व्यक्ती चटकन मान तुकवितात; आणि आपण त्यायोगे बौद्धिक बंधनांत पडतो याची त्यांस जाणीवही असत नाही.

मौलिक दर्जाच्या दृष्टीने हे अगदी किमान पातळीवरचे होत. टीका विषयाच्या सांगोपांग ज्ञानावाचून कोणीही टीकाकार कधीही प्रभावी झाला नाही. अर्ध-विकसित राष्ट्रांतील तरुण समाजशास्त्रज्ञांना उभ्या चढणीचा मार्ग दाखवीत आहे. या मार्गाने जायचे म्हणजे खऱ्या विद्वत्तेसाठी लागणारे भगीरथ प्रयत्न आणि सर्व तात्त्विक ज्ञानाची पूर्ण तयारी यांची गरज लागेल.

सक्षम बंडखोर होण्याऐवजी परंपरांशी जुळते घेणे कितीतरी सुलभ असते.

भाग २ रा

आर्थिक विषमता, सार्वजनिक सदसद्विवेकबुद्धी आणि आर्थिक सिद्धांत

प्रकरण ९ वे

समतेचा सिद्धांत आणि त्यापासून सुटका

आपल्या परंपरागत आर्थिक सिद्धांताने, अस्तित्वात असलेल्या आंतरराष्ट्रीय व प्रादेशिक विषमतांच्या महत्त्वाच्या वस्तुस्थितीबद्दल फारच थोडा विचार केलेला आहे ही गोष्ट मी या पुस्तकाच्या पहिल्या प्रकरणात दाखवून दिली. हे असे का झाले याच्या स्पष्टीकरणार्थ या पुस्तकाचा उर्वरीत भाग वापरण्यात येईल. समाजातील व्यक्तीव्यक्तीत व सामाजिक गटात असलेल्या सर्वसाधारण विषमतांच्या समस्येचाच, अर्थात वर उल्लेख केलेल्या विषमता ही एक बाजू आहे.

पाश्चिमात्य संस्कृतीमधील मूलगामी विचार

श्रीमंत देशांच्या लहानशा गटात आता परिणामकारक लोकशाही अस्तित्वात आहे, आणि अगदी अलिकडच्या दशकांतच त्यांनी देशांतर्गत प्रादेशिक व सामाजिक गटातील विषमता कमी करण्याच्या दूरगामी धोरणांना प्रारंभ केला आहे. आर्थिक विकास, राजकीय लोकशाही व आर्थिक समाजनिष्ठ धोरणे यांच्यात महत्त्वाचे संबंध असतात; त्यांची चर्चा मी ४ थ्या प्रकरणात केली आहे.

मात्र, ह्या देशांत खऱ्या अर्थाने राजकीय लोकशाही प्रस्थापित होण्यापूर्वी, किंवा, त्यांनी आधुनिक समतानिष्ठ धोरणांचा स्वीकार करण्यापूर्वी, म्हणजे प्रारंभापासूनच, ह्या देशतील प्रचलित आर्थिक व सामाजिक सिद्धांत अतिशय समतावादी होते, या वस्तुस्थितीवर मला चर्चेतील आताच्या भागात भर द्यावयाचा आहे. ह्या सिद्धांतांच्या मुळाशी अतिशय मूलगामी धोरणाची गृहीततत्त्वे होती, आणि ती पाश्चिमात्य संस्कृती या नावाने ओळखल्या जाणाऱ्या, सर्वसामान्य संस्कृतीच्या पार्श्वभूमीवर विकसित झालेल्या तत्त्वज्ञानामधून प्रत्यक्षपणे निर्माण झालेली आहेत.[१]

नैसर्गिक नियमाच्या तत्त्वज्ञानामधून मालमत्तेच्या हक्कांच्या बाबतीत श्रमिकांच्या नैतिक श्रेष्ठत्वाबद्दलचा सिद्धांत उगम पावला. तो प्रतिपादन करतो की, फक्त श्रमिकच "संपत्तीचे निर्माते" आहेत. आधुनिक प्रतिपादनात हा विचार लॉकच्या तत्त्वज्ञानातून आला; "वास्तविक मूल्या"च्या आद्य सिद्धांतात तो साकार झाला

आणि त्याने "उत्पादनाचा खरा घटक" श्रमिकच असतात असे मत ग्राह्य मानले.[२]

नैसर्गिक नियमाच्या तत्त्वज्ञानामधूनच "सर्व माणसे जन्मत: समान असतात" हा विचार पुढे आला. प्रारंभी या सिद्धांताचा, समाजात सर्वांना समान हक्क असतात, असा नैतिक अर्थ लावण्यात येत असे. यातील सत्य स्वयंसिद्ध आहे, असे मानण्यात येत असे; आणि नैसर्गिक समाजातील समाजसंबंधांचा विशुद्ध मनाने विचार करणाऱ्यांना ते समजून येते, त्यासाठी दुसरा कोणताही आधार लागत नाही, कारण त्या समाजातील संबंध अनैसर्गिक व अन्यायी संस्थासंघटनांमुळे विकृत झाले नव्हते, असे समजले जात असे. सर्वांची नैसर्गिक गुणवत्ता समान नसली तरी हे तत्त्व बरोबर आहे, असे मानले जाई. एखाद्याला कमी नैसर्गिक देणगी मिळाली असली तरी त्याच्या हक्कावर गदा येऊ नये, असे मत ह्या सिद्धांताने मांडले.

लॉकच्या वेळेपासून व पुढे, नैसर्गिक नियमाच्या तत्त्वज्ञानात त्याला समानधर्मी अशा निसर्गवादी सिद्धांताचा समावेश करण्यात आला, आणि समान हक्कांच्या सिद्धांताला अधिक पुष्टी मिळाली; कारण निसर्गवादी सिद्धांताने व्यक्तीव्यक्ती-मधील जन्मजात कार्यक्षमता व स्वाभाविक प्रवृत्ती यांतील असमानता किमान मर्यादेत आणली. लॉक हा फ्रेंच व इंग्रजी ज्ञान-युगाच्या तत्त्वज्ञानाचा चैतन्यदाता असून, त्याच्या मताप्रमाणे, नवजात बालक हे "कोऱ्या करकरीत पाटी"सारखे असते आणि तिच्यावर पुढे "संवेदना" ठसा उमटवितात— संवेदना म्हणजे आधुनिक भाषेत संपूर्ण जीवनानुभव. अशा रीतीने परिस्थितीला सर्वश्रेष्ठ ठरविण्यात आले; आणि त्या युगाच्या बुद्धिवादी आशावादाचा पाया हाच होता.

पुढे नैसर्गिक गुणवत्तेतील व्यक्तिगत विभिन्नता अधिक प्रमाणावर मान्य करण्यात येऊ लागली, तरीदेखील हा सिद्धांत लोक-गटांच्या तुलनेसाठी मानला जाऊ लागला. आपल्याला माहीतच आहे की, नैसर्गिक गुणवत्तेच्या बाबतीतील मानवी समानते-बद्दलचा नैसर्गिक सिद्धांताचा गाभा अचूक असल्याचे गेल्या अर्धशतकातील संशोधनाने शास्त्रीय पद्धतीने सिद्ध केले, आणि त्यायोगे समाजशास्त्रामधील परिस्थितीच्या महत्त्वाबद्दलच्या दृष्टिकोनाचे समर्थन झाले; समाज-सुधारणांबद्दलच्या तर्कशुद्ध क्रांतिकारक तत्त्वज्ञानाचा पाया अशा रीतीने घातला गेला.

आपल्या प्रतिपादनाच्या सध्याच्या चर्चेत मात्र ह्या मुद्यावर भर द्यायचा आहे की, नैसर्गिक समतेच्या तत्त्वाने नैतिक समतेच्या तत्त्वाला बळकटी आणली तरी ते त्यासाठी तर्कशास्त्रदृष्ट्या आवश्यक गृहीततत्त्व नाही; त्याचप्रमाणे नैतिकवादी तत्त्व निसर्ग-वादी तत्त्वामधून तर्कशुद्ध अनुमान म्हणून काढता येत नाही. ह्या पुस्तकात मी जेव्हा समतेच्या सिद्धांताचा संदर्भ देतो तेव्हा सर्व मानवांना समान हक्क असल्याबद्दलचे नैतिकवादी तत्त्वामधील विधान माझ्या मनात असते.

उपयुक्ततावादी तत्त्ववेत्त्यांनी "सर्वांच्या कल्याणा"ची जुनी कल्पना अधिक विकसित केली. त्यांनी नैसर्गिक नियमाच्या तत्त्वज्ञानात अंतर्भूत असलेल्या सुखवादी

मानसशास्त्राचा स्वीकार केला, आणि "आनंद" व "दुःख" मोजण्याचा अनुभवजन्य पाया देण्याच्या हेतूने त्याचा विस्तार केला; ह्या सुखदुःखांची गणिताला धरून बेरीज केली म्हणजे "सर्वांचे कल्याण" तयार होते, असे मत त्यांनी मांडले. ही बेरीज कमाल मर्यादेपर्यंत वाढविण्याच्या सयुक्तिक धोरणाचे ध्येय संघटित समाजाने ठेवावे, असे उपयुक्ततावाद्यांचे मुख्य प्रतिपादन होते. पिढ्यानुपिढ्या चालत आलेल्या तत्त्वज्ञानाच्या परंपरेतून आर्थिक सिद्धांताची शाखा निघाली; ह्या परंपरेने, "सर्वांचे कल्याण" मोजताना, प्रत्येक मानवी व्यक्ती दुसऱ्या प्रत्येक व्यक्तीशी समान असते, हे कधीच विवाद्य मानले नाही, आणि आजही तसे मानले जात नाही.

एकूण उत्पन्न वाढले म्हणजे उत्पन्नाच्या प्रत्येक एकांकाची "सीमांत उपयुक्तता" कमी होते, हा विचारही सुखवादी मानसशास्त्रामधून निघाला. तो बेन्थाम व जेम्स मिल यांच्यापूर्वीच मान्यता पावला होता; संपत्ती व उत्पन्न यांच्यात समता उत्पन्न केल्यास त्यामुळे समाजाचे कल्याण होते, ह्या तत्त्वासाठी वरील विचारातून सर्व-साधारण पुरावा मिळतो, असे त्याचा विस्तार करून बेन्थाम व जेम्स मिल यांनी मांडले.

जगातील परिस्थिती कशी असावी याबद्दलच्या आपल्या इच्छांना समतेचा सिद्धांत अनुरूप आहे, म्हणून ध्येयाची अभिव्यक्ती या नात्याने आपल्या भावना त्याला संपूर्ण पाठिंबा देऊ शकतात; पाश्चिमात्य संस्कृतीच्या नैतिक महत्त्वाकांक्षेचा पाया असलेल्या ह्या मूल्यगणनेशी संपूर्ण निष्ठा विदित करण्याची या पुस्तकाच्या लेखकाला मुभा असावी. ह्या पुस्तकात मी दोन मुख्य मूल्यांकित प्रमेये मांडली आहेत; समान संधी हे त्यातील एक असून, राजकीय लोकशाहीची स्पृहा हे दुसरे आहे. परंतु, "सिद्धांत" या नात्याने विचार केला असता, हा समतेचा सिद्धांत केवळ पोकळ अध्यात्मवाद असून त्याचा वस्तुस्थितीशी काहीही संबंध नाही; कारण वर उदाहरणे देऊन दाखविल्याप्रमाणे, वास्तविक घटनांच्या प्रमेयावरून तर्कशुद्ध अनुमान म्हणून हे ध्येय "सिद्ध" होत नाही.

अतिशय मूलगामी समता ध्येयाचे हे निरनिराळे प्रवाह असून, ते निरनिराळ्या अनेक मार्गांनी "सिद्ध" करण्यात येतात; त्यांच्या विशिष्ट सैद्धांतिक व्युत्पत्तीनुसार[3] त्यांचे काहीसे भिन्न तर्कनिष्ठ आशय असतात—हे सर्व प्रवाह ज्ञान-युगाच्या कालखंडात एकत्र आले; आणि तेव्हापासून ते पाश्चिमात्य जगाच्या राजकीय सद्सद्विवेकबुद्धीचा प्रमुख भाग बनले. परंतु ह्या प्रवाहांची उगमस्थाने मानवजातीच्या फार प्राचीन इतिहासात शोधली पाहिजेत. सर्व श्रेष्ठ धर्म व तत्त्वज्ञाने, सामान्यपणे समतावादीच राहिली आहेत. मानवी व्यक्तीच्या प्रतिष्ठेचा आणि तिला समान संधीचा मूलभूत हक्क असल्याचा हा तेजस्वी ध्येयवादी साक्षात्कार कसा निर्माण झाला, आणि उघड विषमतेच्या व जुलुमांच्या असंख्य शतकांमध्ये त्याने स्वसामर्थ्य जतन केले, हे का व कसे घडले ही अद्यापही बव्हंशी अनिर्णित सामाजिक समस्या आहे.

समतेच्या सिद्धांताला "पुरावे" देण्यासाठी, आणि त्याला खोटे तर्कशुद्ध समर्थन पुरविण्यासाठी लागू करण्यात आलेले विचार व मुद्दे, यांनी आद्य आर्थिक सिद्धांताची पाया-भरणी केली; ह्या आर्थिक सिद्धांताची ज्ञान-युगात रचना झाली आणि एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या अर्ध-शतकात तो क्रमशः पूर्णत्वाला नेण्यात आला. नट विकसेल यांनी , अर्थव्यवस्थेवरील व्याख्यानांच्या प्रस्तावनेत निदर्शनास आणले आहे की :[४]

"आर्थिक घडामोडींचा गंभीरपणाने व साकल्याने आपण विचार करू लागताच, आणि सर्वांच्या कल्याणाच्या परिस्थितीचा शोध घेऊ लागताच, कामगारांच्या हिता-बद्दलचे विचार पुढे आलेच पाहिजेत; आणि सर्वांना समान हक्क असले पाहिजेत ही घोषणा त्यांच्या अगदी जवळची असते. म्हणून, राजकीय अर्थशास्त्राची खुद्द कल्पनाच, किंवा त्याच्या नावात अभिप्रेत असलेल्या अर्थाच्या शास्त्राचे अस्तित्व हा संपूर्णपणे क्रांतिकारक कार्यक्रम आहे."

अशा रीतीने, समतेच्या सिद्धांताने स्वतःला पाश्चिमात्य अर्थशास्त्रीय विचारांच्या तळाशी दृढतेने जखडून टाकले आहे. आणि म्हणून सर्वसामान्य पातळीवर, तो सनातनी व जहाल मतवादी, उदारमतवादी व समाजवादी यांच्यातील दुवा होता, आणि आजही आहे. सामान्यपणे ते स्वतःचे कार्य कशा रीतीने पुढे मांडतात आणि त्याचे कसे समर्थन करतात याची पद्धत तो ठरवितो.

आधुनिक अर्थशास्त्रीय कल्पना, प्रारंभी ज्या साच्यात त्या बसविण्यात आल्या त्याच्या बाहेर कधीच गेल्या नाहीत या घटनेशी वरील मुद्याचा संबंध आहे: नैसर्गिक नियमाचे व उपयुक्ततावादाचे तत्त्वज्ञान आणि त्यात अंतर्भूत असलेले सुखवादी मानसशास्त्र हा तो साचा आहे. आर्थिक सिद्धांतासंबंधी अलिकडे प्रसिद्ध झालेल्या कोणत्याही क्रमिक पुस्तकातील ग्राह्य गृहीततत्त्वांचे विश्लेषण केले असता हे सिद्ध करता येईल.

वैचारिक शक्ती

मी आधीच सूचित केले आहे की, समतेचा सिद्धांत हा केवळ पुस्तकांतून व व्याख्यानातून मांडला गेलेला अमूर्त नियम नाही. जीवंत आदर्शाची ती एक अभिव्यक्तीही आहे आणि म्हणून सामाजिक वस्तुस्थितीचा तो एक भाग आहे : लोक ज्याला नैतिकदृष्टया अचूक मानतात असे ते मूल्यमापन आहे. यामुळे समतेचा सिद्धांत किंवा त्याने व्यक्त केलेले ध्येय समाजातील वैचारीक शक्ती बनली, आणि काही प्रमाणात तिने मानवी प्रयत्नांवर प्रभाव पाडला, याबद्दल आपण उपकृत आहोत. अनेक शतके या सिद्धांताने सतत एकाच दिशेला समाजाला आकर्षित केले आहे: आर्थिक समान संधीच्या दिशेला.

समृद्ध देशांत अलिकडे राष्ट्रीय एकात्मतेच्या दिशेने प्रगती आणि समान संधीचे

तत्त्व प्रत्यक्षात उतरविण्याच्या दृष्टीने झालेली वाटचाल यांचे स्पष्टीकरण करताना हे प्रदीर्घ काळापासूनचे आकर्षण लक्षात घेतले पाहिजे. आता अत्यंत गरीब देशांत घडत असलेल्या "महान जागृती"त अर्थातच पाश्चिमात्य संस्कृतीमधील समतेच्या आदर्शाचे प्रतिबिंब दिसते. एका दृष्टीने या घटनेचा अर्थ असा आहे की, श्रीमंत देशांतील हे जुने परंपरागत ध्येय आता अर्धविकसित देशांमधून झपाट्याने व परिणामकारक रीतीने प्रसारीत केले जात आहे; आणि तेथील लोकांना दारिद्र्याविरुद्ध बंड करण्यास स्फूर्ति देत आहे—त्यांचे दारिद्र्य हा केवळ त्यांचा दोष नाही असा स्पष्ट गर्भितार्थ ह्या त्यांच्या बंडात आहे.

मूलभूत तत्त्वज्ञानांना आधारभूत असलेला आणि लोकांच्या प्रत्यक्ष प्रवृत्तीमधून प्रतिबिंबित होणारा समतेचा हा जहाल सिद्धांत या जगात शतकानुशतकांची एक असंगतीच होय. कारण, समग्र विषमता, आणि ह्या विषमता टिकविण्यात ज्यांचे ज्यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत अशा मालमत्ताधाऱ्यांची सत्ता हे या जगाचे वैशिष्ट्य आहे. म्हणूनच, समाजाने इतकी आर्थिक विषमता सर्व काळी सहन केली ही गोष्ट आश्चर्यकारक नाही, तर, समतेच्या सिद्धांतामधून व्यक्त होणाऱ्या उच्च श्रेणीच्या ध्येयासाठी युगानुयुगे लोकांनी आपल्या मनातील गाभाऱ्यात जागा राखून ठेवली, ही गोष्ट खरोखरीच आश्चर्यकारक आहे, यावर मला भर द्यावयाचा आहे.

पाश्चिमात्य देशांपैकी प्रत्येक देशातही एका बाजूला सामाजिक वास्तवता व त्यात समाविष्ट असलेली माणसांची दैनंदिन वर्तणूक, आणि दुसऱ्या बाजूला अमूर्त स्वरूपात मान्यता पावलेला हा मूलगामी समतेचा सिद्धांत, या दोहोंत सदासर्वदा भेद राहिला आहे. अठराव्या शतकाच्या अखेरीपासून एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभा-पर्यंतच्या काळात, प्रगत देशातील साहित्यात समतेचे तत्त्व अत्यंत स्पष्टपणे मांडण्यात आले आणि त्यावर खास भर देण्यात आला; त्यावेळी त्या देशात प्रांताप्रांतांत व निरनिराळ्या सामाजिक गटांत भीषण आर्थिक विषमता अस्तित्वात होती.

त्या काळात, विषमता कमी करण्याच्या हेतूने सुधारणांची धोरणे स्वीकारून फारच नगण्य कार्य केले गेले. अर्थशास्त्रज्ञांनी तेव्हा प्रत्यक्षपणे मांडलेली बहुतेक धोरणे, त्या देशात नंतरच्या काळात जे साध्य करण्यात आले त्या दृष्टिकोनातून पाहिल्यास, मुळीच जहाल नव्हती. ह्या काळातील साहित्यात व सार्वजनिक चर्चेत समतेच्या तत्त्वाला अत्यंत श्रेष्ठ स्थान होते; त्या तत्त्वाच्या दृष्टीने विचार केल्यास त्या काळातील अर्थशास्त्रज्ञांनी मांडलेली धोरणे अर्थातच फार मवाळ होती.

जन्मजात विभिन्नतेवरील विश्वास :

आर्थिक स्वास्थ्याच्या भिन्न पातळीवर असलेल्या लोकांच्या निरनिराळ्या गटांमध्ये जन्मजात विभिन्नता असते, असा जुन्या काळापासून चालत आलेला प्रतिगामी विश्वासही, जहाल समतेच्या तत्त्वाच्या जोडीने विचित्रपणाने सह-अस्तित्व टिकवून

होता; ही वस्तुस्थिती आपण लक्षात घेतली तरच वरील नैतिक परिस्थितीचे आपल्याला पूर्णपणे आकलन होईल. माणसांना समान हक्क असतात हे नीतिवादी समतेचे तत्त्व, माणसांना निसर्गाने समान गुणदान केलेले असते, ह्या पूर्वपक्षावर शुद्ध तर्कशास्त्राच्या दृष्टीने अवलंबून नसते, ह्या मुद्यावर मी पूर्वी भर दिलेलाच आहे. परंतु, हे दुसरे विधानही जर सत्य मानले तर पहिल्यावर श्रद्धा ठेवणे आणि समाज-सुधारणांच्या मार्गाने त्याला प्रत्यक्षात उतरविणेही खात्रीने अधिक सोपे जाते.

समाजसुधारणांसंबंधीच्या सर्व चर्चा अखेरीस निसर्ग व संस्कार यांच्या तौलनिक महत्त्वाबद्दलच्या विवाद्य प्रश्नावर येऊन ठेपतात. गतकालीन पिढीमधील स्विडनचे राजशास्त्रज्ञ रुडॉल्फ जेलेन यांनी एकदा पुढील विधान करण्याचे धाडस केले : परिस्थिती चोर तयार करते असा विश्वास ठेवण्याकडे जहाल माणसाची प्रवृत्ती असते, तर चोर परिस्थिती शोधून काढीत असतो असा संशय सनातन्यांना निश्चितपणे येतो. समाजातील अपूर्णतेचा दोष व जबाबदारी परिस्थितीवर असते आणि परिस्थिती बदलता येते, असे जहालांचे मत असते. म्हणून त्यांच्या मताप्रमाणे, व्यक्ती व त्यामुळे समाज यांत समाजसुधारणांमुळे प्रगती करता येते.

उलट, सनातन्यांच्या मताप्रमाणे, मानवी स्वभावामुळे व्यक्ती व समाज तयार होतात, परिस्थितीमुळे होत नाहीत. मानवी स्वभाव बदलता येत नाही. हेच सुधारणां-बद्दल सनातन्यांना वाटणाऱ्या अविश्वासाचे कारण व स्पष्टीकरण आहे. म्हणून त्यांचा कल "जैसे थे" चे धोरण घेण्याकडे किंवा काहीच न करण्याकडे असतो.

मी वर निदर्शनास आणल्याप्रमाणे, ज्ञानयुगाच्या (एन्‌लायटन्‌मेंट) काल-खंडातील तत्त्वज्ञानांनी आर्थिक सिद्धांताचा पाया रचला; त्यांनी मानवी स्वभावातील भिन्नतेचे मूल्य कमी ठरविले. समाजसंस्थांमध्ये बदल करून माणूस व समाज यांच्यात सुधारणा घडवून आणता येतात, असे प्रतिपादन केले. परंतु जन्मजात भिन्नतेवरचा विश्वासही टिकून होता आणि ही भिन्नता केवळ व्यक्तीव्यक्तींतच नव्हे तर सामाजिक गटागटातही असते असा समज कायम होता. ज्ञानयुगातील ऐहिक बुद्धिवादाने नैसर्गिक अनुक्रमात सुजाण मानवाचा अंतर्भाव केला आणि एका विशिष्ट बाबतीत मानवी स्वभावाला खास महत्त्व दिले; माणसाच्या निरनिराळ्या जाती असू शकतात असे परिणामावरून कारणाची उत्पत्ती लावण्याच्या पद्धतीने अनुमान काढले. अठराव्या शतकात प्रथमच "वंश" हा शब्द व त्याची कल्पना जन्माला आली, आणि त्यामुळे, उदाहरणार्थ, निग्रोंच्या गुलामगिरीचे समर्थन वांशिक कनिष्ठपणाच्या युक्तिवादाने करण्याची शक्यता निर्माण झाली; पूर्वी त्यासाठी ते मूर्तिपूजक आहेत म्हणून त्यांची गुलामगिरी समर्थनीय आहे असा अध्यात्मवादी युक्तिवाद करण्यात येत असे. पुढे, उत्क्रांतीमुळे समाजगटात जन्मजात फरक का अपेक्षित असतात याचे तर्कशुद्ध स्पष्टी-करण डार्विनच्या, सर्वांत धडधाकट असतील तेच टिकून रहातात, ह्या सिद्धांताने दिले.

परंतु, एकंदरीने, सर्वसामान्य नियमानुसार माणसांना निसर्गाकडून समान गुण

मिळतात, ह्या निसर्गवादी समतेच्या गृहीततत्त्वाला समाजशास्त्रे व विशेषत: अर्थ-शास्त्र दृढपणे चिकटून राहिली; त्यामुळे त्यांना परिस्थितीनुरूप मानव व समाज बनतो हा दृष्टिकोनही उचलून धरता आला, आणि मी वर नोंद केल्याप्रमाणे, बुद्धिमत्ता, इतर बौद्धिक कार्यक्षमता व प्रवृत्ती यांच्या बाबतीतील समाजातील गटागटात असलेल्या भिन्नतेसंबंधी अलिकडील काही दशकांत झालेल्या संशोधनाने सामाजिक व आर्थिक सिद्धांताच्या ह्या मूलभूत गृहीततत्त्वाला अधिकच बळकटी आणली आहे. सामाजिक गटात फार मोठे व पद्धतशीर फरक असतात हा विरोधी समज मात्र सामान्य जनमनात जीवंतपणे टिकून राहिला—विद्वत्तापूर्ण व्यासंगापासून दूर असतानाच्या काळात तत्त्वज्ञानी व सैद्धांतिक यांच्याही मनात तो पुष्कळदा वसत असे. खरे पहाता मी आताच म्हटल्याप्रमाणे, वांशिक भिन्नतेसंबंधीची आधुनिक तीव्र आस्था काही थोड्या शतकांपूर्वीच निर्माण झालेली आहे, परंतु आर्थिक, सामाजिक व धार्मिक भिन्नतेला जनमनात नेहमीच महत्त्वाचे स्थान मिळालेले आहे. गरीब वर्गाला बौद्धिक व नैतिक गुणदान कमी असते असे समजण्यात येई.

आणि सामान्य लोक-त्यांना जे स्वत:चे अनुभव वाटत त्यावर, आणि ज्यावरून ते निष्कर्ष काढीत त्या त्यांच्या दैनंदिन निरीक्षणावर त्यांची मते आधारीत असत. आरोग्य, शिक्षण व प्रशिक्षण, चालीरीति, नीतिमत्ता व सर्वसाधारण संस्कृती इत्यादी बाबतीमध्ये, भिन्न सामाजिक थरांत असलेले फरक वस्तुत: आजच्यापेक्षा तेव्हा पुष्कळच जास्त होते; आणि त्यांचे प्रतिबिंब उत्पादनक्षमतेमध्येही पडत असे.

अशा निरीक्षणावरून काढलेल्या निष्कर्षांना प्रत्युत्तर म्हणून तत्त्वज्ञ व अर्थ-शास्त्रज्ञ सर्वसाधारण युक्तिवाद करीत असत—तो असा की, हे फरकही पूर्वीच्या आर्थिक विषमतांचे परिणाम असतात. परंतु हे स्पष्टीकरण पुरेसे आहे असा विश्वास ठेवणे सामान्य माणसाला कठीण वाटत असे. आणि विद्वानांच्या मनातही घोळणारा संशय असे की काही काहीं फरक खरोखरीच जन्मजात असतात; कधी कधी ह्या संशयाचे स्वरूप अधिकच मोठे असे.

आर्थिक सिद्धांतातील पलायनवाद

आर्थिक सिद्धांताच्या क्षेत्राकडे पुन्हा वळले असता तेथे आपणाला विचित्र विरोधा-भास आढळतो. एका बाजूला, अति-जहाल समतेचा सिद्धांत "सिद्ध" झालेली, आणि तर्कशास्त्राच्या सहाय्याने तीक्ष्ण व स्पष्ट मर्मभेदी असे "वस्तुनिष्ठ" मूल्याचे हत्त्यार बनलेली सामाजिक विचारांची शाखा म्हणजे आर्थिक सिद्धांत होता. दुसऱ्या बाजूला आर्थिक सिद्धांताच्या रचनेच्या मुळाशी समतेचे तत्त्वज्ञान ठामपणे आहेच असे मानून, प्रारंभापासूनचा, समतेचा प्रश्न काढण्याचे टाळण्याची प्रवृत्ती अर्थिक सिद्धांत दाखवित होता.

सिद्ध करण्यात आल्यानंतर समतेच्या, सिद्धांताला, खालच्या थरातील अनिश्चत

कप्प्यात, सर्वसाधारण विधानात, जखडून ठेवण्यात येऊ लागले आणि दुर्गम गूढवादाने त्याला अलग पाडण्यात आले-आणि इतर सर्व बाबतींत मात्र आर्थिक सिद्धांताचा विकास अशा प्रकारे करण्यात आला की, व्यावहारिक धोरणात्मक हस्तक्षेपासाठी पूर्वपक्ष म्हणून समतेच्या सिद्धांताचा उपयोग होईल अशा प्रकारे आर्थिक समस्या मांडण्याचे अर्थशास्त्र शक्यतो टाळू लागले.

विनिमयासह उत्पादनाचे क्षेत्र, आणि वाटपाचे क्षेत्र, यांना संपूर्णपणे विभक्त पाडून ही टाळाटाळ जॉन स्टुअर्ट मिलच्या काळापासून साधण्यात आली हे आपल्याला ठाऊकच आहे. उत्पादनाच्या क्षेत्रात नैसर्गिक नियमांचे अधिराज्य असते आणि धोरणात्मक हस्तक्षेपांमुळे उत्पादनात अडथळे येतील; उलट उत्पन्न व संपत्ती यांचे वाटप हे धोरणांचे क्षेत्र असून तेथे समतेच्या सिद्धांताला अचूक ठरण्यास कायदेशीर वाव असतो—अशी मांडणी करण्यात आली.

मिलने हे तर्कशुद्ध रीतीने मांडलेले नाही आणि तसा त्याचा उद्देशही नव्हता; तरी त्याच्या वेळेपासून व त्यानंतर शंभर वर्षे, अर्थशास्त्रज्ञांनी हीच क्लृप्ती योजून त्यांचे विश्लेषण फक्त उत्पादन व विनिमय यांवर केंद्रित केले; त्याच वेळी उत्पन्न व संपत्ती यांचे विभाजन आणि त्यांच्या पुनर्विभाजनाच्या सुधारणांची आवश्यकता याबाबतीत सर्वसाधारणपणे हात राखून विधाने केली.

आर्थिक विश्लेषणातील ह्या पद्धतीच्या प्रवृत्तीचे स्पष्टीकरश, अर्थातच असे प्रतिपादन करून करता येते की, अर्थशास्त्रज्ञांना समता व विषमता यांबद्दलच्या समस्यांपेक्षा इतर दुसऱ्या समस्यांविषयी मुख्यत्वेकरून आस्था होती. त्यांना उत्पादन व व्यापार यांबद्दल आस्था होती. स्वतंत्र शास्त्रांच्या अध्ययनात संशोधनाची दिशा शास्त्रज्ञाच्या वैयक्तिक जिज्ञासेवर सोपवावी, आणि विद्याभ्यासाच्या ह्या स्वातंत्र्याच्या तत्त्वाबद्दल मी प्रश्न उपस्थित करणार नाही. परंतु, उत्पादनाच्या प्रश्नावर लक्ष केंद्रित करण्यासाठी अर्थशास्त्रीय विश्लेषणात उत्पादनाचे क्षेत्र व विभाजनाचे क्षेत्र यांतील फरकाचा उपयोग करण्यात येतो आणि हा फरक तर्कशास्त्राच्या दृष्टीने असमर्थनीय आहे, असे माझे मत आहे.[५] एका दृष्टीने, आपल्या अनेक सिद्धांतांत न्यूनता रहाण्याचे हेच मुख्य कारण आहे.

ह्या खेरीज, आणि अधिक मूलभूतपणे, आणखी एका प्रश्नाचे स्पष्टीकरण व्हावयाचे राहून गेले आहे; अर्थशास्त्रज्ञांच्या कितीतरी पिढ्यांच्या आकांक्षांचा संकलित परिणाम म्हणून अर्थशास्त्र निर्माण झाले; असे हे अर्थशास्त्र विशिष्ट दिशेनेच का वाढत गेले आणि उत्पन्न व संपत्ती यांच्या विभाजनाच्या समस्या टाळल्या जातील अशाच दिशेने त्याची वाटचाल का झाली ?—हाच तो प्रश्न.

माल्थसचे महत्त्व

रिकार्डोने त्याच्या काळात संपत्तीच्या विभाजनाचे प्रश्न टाळण्याचा प्रयत्न केला

नाही. उलट, श्रम, भांडवल व जमीन ह्या तीन उत्पादनघटकांच्या किंमती स्पष्ट करणे—म्हणजेच उत्पन्नाची विभागणी करणे—हे राजकीय अर्थशास्त्राचे मुख्य कार्य आहे, असे त्याने घोषित केले. निरनिराळ्या आर्थिक वर्गांतील हितसंघर्षावर त्याने भर दिला: यांपैकी कोणत्याही एका वर्गाला दुसऱ्या वर्गाच्या किंवा दुसऱ्या दोन्ही वर्गांच्या हिताला धक्का लावल्याशिवाय सामाजिक उत्पादनाचा अधिक मोठा हिस्सा मिळवता येणार नाही, हे मत त्याने मांडले; बदल व बदलांमधील आंतर-संबंध यांच्या न बदलणाऱ्या अमूर्त कल्पना मांडून आर्थिक वर्गातील हितसंघर्षावर त्याने अत्याधिकच भर दिला.

उपयुक्ततावादाच्या तत्त्वज्ञानविषयक गृहीततत्त्वांवर रिकार्डोचा संपूर्ण विश्वास होता; त्यांचा व वरील आर्थिक सिद्धांताचा संयोग करून रिकार्डोने मोठ्या प्रमाणावरील पुनर्विभाजनाच्या सुधारणांच्या बाजूने मत मांडावयास पाहिजे होते; तसे मत त्याच्या काळातील व तदनंतरही अनेक जहाल लेखकांनी खरोखरीच मांडले. परंतु रिकार्डो मात्र एकंदरीने उत्पन्नाच्या विभाजनाच्या बाबतीतही " जैसे थे " या तत्त्वालाच चिकटून राहिला; आर्थिक सिद्धांतातील आद्य धोरणाचा पुरस्कार करणारे लेखकही त्याच मार्गाने गेले.

रिकार्डोच्या नैसर्गिक वेतनाच्या सिद्धांताशी ह्याचा संबंध जोडला पाहिजे. हा सिद्धांतही माल्थसच्या लोकसंख्येच्या नियमावरून काढण्यात आला होता. माल्थसने मांडलेले विचार पूर्वीही व्यक्त झालेले होते पण त्याने त्यांचा विस्तार केला आणि त्यांच्यावर जोर दिला. युरोपमध्ये एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी त्यांचा प्रसार झाला व त्यांचा प्रभाव वाढला; कारण, फ्रेंच व अमेरिकन क्रांत्यांची प्रतिक्रिया म्हणून आर्थिक पुराणमतवादाचा पाया बळकट करण्यासाठी तेव्हा चालू झालेल्या सर्वसाधारण चळवळीचा तो एक भाग होता.[६]

उच्चतर जीवनमानासाठी, समजा अधिक शिक्षणामुळे, महत्त्वाकांक्षा निर्माण झाल्यास, सर्व परिस्थिती बदलेल हा मुद्दा निदर्शनास आणल्याशिवाय माल्थस व रिकार्डो राहिले नाहीत. परंतु बहुतेक सैद्धांतिक चर्चांमधून, त्यांनी त्यांच्या मताप्रमाणे अनुभवसिद्ध ठरलेले अनुमान वापरले; ते असे: उपजीविकेच्या साधनांच्या उत्पादनखर्चानुसार ठरणारी वेतनाची समतोल पातळी असते. कामगारांच्या वेतनामधून विकत घेता येणाऱ्या वस्तू व सुखसोई यांनी बनणारे त्यांचे जीवनमान स्थिर मानण्यात येई. त्यांना अधिक वेतन दिले, अधिक गरिबीनिवारक भत्ता दिला, किंवा गरिबांचा हिस्सा वाढविण्याच्या हेतूने कोणत्याही प्रकारचे " कृत्रिम " हस्तक्षेप केले, तर परिणामी फक्त त्यांच्या पुनरुत्पादनाचा वेग वाढतो. भांडवल निर्मिती कमी होते, कारण नफा कमी झालेला असतो. कामगारांचा भाग वाढल्यानंतर तो जमीनदारांकडे जातो कारण लोकसंख्येच्या वाढीमुळे खंड वाढतो; म्हणून कामगारांच्या भागवाढीमुळे नफा कमी होण्याची क्रिया वेगाने होते. जीवनोपयोगी वस्तूंच्या रूपात विचार करता वेतन

पूर्वस्थितीवर येते. अशा रीतीने, कामगारांच्या जीवनमानाची पातळी उंचावण्याच्या हेतूने केलेला कोणताही हस्तक्षेप कामगारांच्या प्रजननाच्या आग्रहामुळे अयशस्वीच होणार. गरीब गरिबच रहातील, फक्त श्रीमंत कमी श्रीमंत होतील . . . असा रिकार्डोचा युक्तिवाद होता.

. . . रिकार्डोचे म्हणणे चूक असो की बरोबर असो, आपल्याला सध्या त्याची खरी मते काय होती हे पहावयाचे आहे. कामगारांचे भाग्य शोचनीय असले तरी अपरिहार्य आहे, असे रिकार्डोला वाटत असावे याची अनेक उदाहरणे त्याच्या लेखनात सूचित झालेली आढळतात. मालमत्ताधारी वर्गांना मिळणाऱ्या मूल्यांनी सामाजिक उपयुक्ततेच्या वस्तू, किंवा त्याचा मोठा हिस्सा दर्शविला जात असे, असे मानण्यात येई. काही काळ, त्यातील काही भाग श्रीमंतांकडून काढून गरिबांना देणे शक्य होते. परंतु, अखेरीस गरीब त्यांच्या पूर्वीच्या खालच्या पातळीवर जातील, आणि एकंदरीत परिस्थिती अधिकच वाईट होईल. कारण काही प्रमाणात श्रीमंत गरीब झालेले असतील, असा युक्तिवाद होता.[७]

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर जॉन स्टुअर्ट मिलने " राजकीय अर्थशास्त्राची तत्त्वे, आणि सामाजिक तत्त्वज्ञानात त्यांपैकी काहींची योजना " (प्रिन्सिपल्स ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी वुइथ सम् ऑफ देअर ॲप्लिकेशन्स टु सोशल फिलॉसफी) हा ग्रंथ लिहिला, तेव्हा फार मोठा बदल घडून आला होता; आणि त्यामुळे संपत्तो-विभाजनाच्या क्षेत्रातील " जैसे थे "च्या सनातनी उद्देशामधील आधार नष्ट झाले होते: पुर्नविभाजनाच्या सुधारणा निरुपयोगी ठरविणाऱ्या माल्थसच्या लोकसंख्येच्या नियमाला परिणामकारक व शक्यतेतील प्रतिकार करण्याचे साधन म्हणून कुटुंब नियोजन दृष्टिपथात आले होते. आणि त्यानंतरच्या दशकात, बऱ्याच काळापासून अस्तित्वात असलेल्या मृत्यूच्या वेगातील मंदगतीबरोबर जननाच्या वेगातील मंदगतीही येऊन पोहोचली.

समतेच्या सिद्धांताला धरून जास्ती जहाल धोरणाचे निष्कर्ष काढण्यास तयार नसलेल्या अर्थशास्त्रज्ञांना त्यानंतर रिकार्डोच्या नैसर्गिक वेतनाच्या सिद्धांताचा आधार घेता येईना. त्या परिस्थितीत त्यांनी, मी पूर्वीच्या भागात उल्लेखिलेल्या मिलच्या वैशिष्टयपूर्ण विचारांचा अधिकाधिक उपयोग करण्यास प्रारंभ केला. त्यामुळे त्यांना उत्पादनाच्या व व्यापाराच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करून विभाजनाबद्दल केवळ सर्वसामान्य हात राखून विधाने करणे शक्य झाले.

आता, दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर आणि " महान जागृतीं "च्या प्रभावाखाली आर्थिक विश्लेषणाचे क्षेत्र वाढले आहे आणि त्यात परिणामकारक रीतीने अर्ध-विकसित देशांचा समावेश होऊ लागला आहे; यावेळी माल्थसचा लोकसंख्येचा सिद्धांत पुन्हा प्रसंगोचित ठरत आहे. अर्ध-विकसित देशांतील लोकसंख्येचा मोठा विभाग माल्थसप्रणीत उपजीविकेच्या पातळीवरचे जीवन जगत आहे; हे स्पष्ट आहे.

आणि तेथे उत्पन्नाच्या पातळीमधील कोणत्याही संभाव्य सुधारणा लोकसंख्यावाढीच्या पुरात गडप होण्याचा धोका आहे. गरीब देशांच्या जीवनमानाची परिस्थिती सुधारण्यासाठी काहीही भरीव करण्याच्या सयुक्तिकपणाबद्दल शंका घेण्याचा मोह त्यामुळे श्रीमंत देशांना फारच तीव्रतेने पडणारच: त्यांना सैद्धांतिक आधारावर "ज्याचा-तो"चे धोरण योग्य वाटण्याचा संभव आहे. रिकार्डोच्या नैसर्गिक वेतनाच्या सिद्धांताला सदृश असा तर्कनिष्ठ पाया समतेच्या सिद्धांताला निर्बळ करण्यासाठी रचता येणे शक्य आहे.

परंतु, आजच्या जगात अशा नकारात्मक वृत्ती सैद्धांतिक पातळीवर व सर्वसाधारण तत्त्वांमध्ये धारण करणे राजकीय कारणांसाठी अधिकाधिक कठीण होते. तरीसुद्धा लोकसंख्येबद्दलच्या चिंतेमध्ये भयाण वास्तवता आहे. आणि ज्यांना समतेचे ध्येय गंभीरपणाने जतन करावयाचे आहे त्यांना जननाचा वेग कमी व्हावा अशी आशा व प्रार्थना करावी लागते, आणि अर्ध-विकसित देशांच्या आर्थिक विकासाच्या नियोजनांचा भाग म्हणून कुटुंब नियोजनाच्या उपाययोजनांच्या जोराच्या प्रसाराची मागणी करावी लागते.

तडजोडीची कारणे

लोकसंख्येचा प्रश्न बाजूला ठेवला तरी, समतेचा सिद्धांत एकदम व तडकाफडकी प्रत्यक्षात उतरविणे अवांछनीय आहे, आणि तसे केल्यास अनर्थकारक परिणाम होतील, असे वाटण्यास स्पष्ट कारणे आहेत. निरनिराळ्या सामाजिक थरांतील लोकांत अस्तित्वात असलेल्या विषमतांवर ती सर्व आधारलेली आहेत.

प्रथमपासूनच सुज्ञ मानवतावादी बुद्धिवादाच्या परंपरेमध्ये आर्थिक सिद्धांताचा विकास झालेला आहे, आणि निरनिराळ्या मानवी गटांत जन्मजात विभिन्नता असते अशा प्रतिगामी विश्वासाला त्याने केव्हाही बौद्धिक दृष्टीने थारा दिलेला नाही. निरनिराळ्या राष्ट्रांमध्ये आणि राष्ट्रांतर्गत निरनिराळ्या आर्थिक वर्गांमध्ये अस्तित्वात असलेल्या विभिन्नता परिस्थितीने आणि विशेषत: आधीच्या आर्थिक विषमतांनी निर्माण केल्या आहेत. तरीसुद्धा, कारण कोणतेही असले तरी, ह्या भिन्नता आणि विशेषत: उत्पादनक्षमतेमधील फरक आर्थिक विषमतांचे सतत अस्तित्व टिकवून धरतात, ही गोष्ट स्पष्ट आहे. अधिक समतेसाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केल्यास, किंवा अकस्मात बदल घडवून आणल्यास संस्थात्मक जीवनाचे सातत्य उध्वस्त होईल.

विघटना आणि मालांच्या व सुखसोयींच्या उत्पादनात घट हे त्याचे ताबडतोबीचे परिणाम होतील. हे टाळण्याचे उद्दिष्ट लक्षात ठेवूनच आल्फ्रेड मार्शलनी समारोप करताना म्हटले आहे की :[८]

". . . समाजजीवनाच्या आदर्श परिस्थितीला शोभून न दिसणारेही हक्क

रद्द करताना किंवा बदलताना जबाबदार माणसांनी म्हणूनच काळजीपूर्वक व प्रायोगिक पद्धतीने आरंभ केला पाहिजे."

सयुक्तिक समतानिष्ठ धोरण ही अपरिहार्यपणे दीर्घ कालावधी व्यापणारी सामाजिक प्रक्रिया आहे; विशेषत: क्रमश: सुधारणा घडविण्याच्या मार्गाने शांतता-मय बदलाची स्पृहा अभिप्रेत असेल तर निश्चितच तिला अधिक काळ लागणार. सुधारणा घडवून आणण्याच्या बाजूने निर्णय घेण्यात आल्यानंतरही, उत्पादनातील घट टाळावयाची असेल तर प्रदीर्घ काळपर्यंत मोठ्या प्रमाणावरील विषमता अस्तित्वात रहाणारच. हाच प्रश्न शंभराहून अधिक वर्षे आर्थिक सिद्धांतात चर्चिला जात आहे— न बदलणाऱ्या समतोलाच्या पार्श्वभूमीवर त्याची मुख्यत: चर्चा होते तो भाग निराळा; समान वाटप आणि अधिक उत्पादनक्षमता यांच्यामधील विरोधाबद्दलची ही समस्या आहे.

मार्शलने प्रतिपादन केले आहे की:[९]

"संपत्तीची अधिक समान विभागणी स्पृहणीय आहे हे मान्य केल्यानंतरही पुढील प्रश्न उपस्थित होतो: मालमत्तेच्या संबंधात बदल केल्यामुळे किंवा खाजगी उद्योगधंद्यांवर नियंत्रण बसविल्यामुळे एकूण संपत्तीमध्ये घट होण्याचा संभव असतानाही तसे करणे समर्थनीय आहे का?"

सर्व मोठ्या अर्थशास्त्रज्ञांनी समतेच्या ध्येयाला नेहमीच उचलून धरले आहे यावर मार्शलने भर दिला आहे.[१०]

"आधुनिक अर्थशास्त्राचे बहुतेक शिल्पकार सौम्य व दयाळू स्वभावाचे होते, त्यांना मानवतेबद्दलच्या उत्साहाने भारले होते, ही वस्तुस्थिती आहे. स्वत:साठी संपत्ती मिळविण्यासाठी त्यांची धडपड नव्हती; लोकांमध्ये विस्तृत प्रमाणावर संपत्ती विखुरली जावी अशी त्यांची इच्छा होती . . . सर्व व्यक्तिगत प्रयत्नांचे व सार्वजनिक धोरणाचे अंतिम ध्येय समस्तांचे कल्याण हे असावे, या तत्त्वावर निरपवाद-पणे सर्वांची श्रद्धा होती . . . अर्थशास्त्राच्या ह्या महान रचनाकारांनी मालमत्तेच्या हक्कांबद्दल हक्क म्हणून आदर दाखविलेला नाही . . ."

मार्शलच्या मताप्रमाणे, "अर्थशास्त्रज्ञाला कल्पनाशक्ती असावी लागते" .म्हणजे त्याला स्वत:च्या ध्येयांचा विकास करता येतो."[११]

"परंतु, भविष्यकाळाचे आकलन ध्येयाच्या प्रतिपादनामुळे दृष्टीआड होऊ नये म्हणून त्याला सर्वाधिक खबरदारी व संयम असावा लागतो . . . (आधुनिक अर्थशास्त्राचे संस्थापक) धिम्म्या वृत्तीचे वाटत असत, कारण अनोळखी मार्गाने भरधाव जाण्याचा आग्रह धरण्याची जबाबदारी त्यांनी स्वीकारली नाही . . . कदाचित त्यांनी आवश्यकतेपेक्षा अधिक खबरदारी घेतली असेल; कारण त्या काळातील सर्वांत द्रष्टया माणसांचा दृष्टिपथ सद्यकालीन बहुतेक सुशिक्षितांच्या दृष्टिपथापेक्षा काही बाबतींत तोकडा होता" . . .

मार्शलनी दिलेला भर अचूक आहे : समतेच्या ध्येयाला अनुरूप अशी समाज-सुधारणांबद्दलची दृष्टी थोर अर्थशास्त्रज्ञांना नव्हती, आणि म्हणून, त्यांच्या विचारांवर समर्पक कारणांबरोबरच, केवळ दिखाऊ समर्पक कारणांचाही प्रभाव होता– आर्थिक विषमता, निदान काही काळपर्यंत तरी, का सहन करावी यात याबद्दलची त्यांची कारणे ही दुसऱ्या प्रकारातली होती; त्यामुळे समतेच्या प्रयत्नांचा प्रतिकार करणे श्रीमंत वर्गांना काहीसे सोपे झाले आणि विशेषतः सदसद्विवेकबुद्धीची टोचणी न लागता त्यांना तसे करता येऊ लागले.

समानताकरणाचे गतिशास्त्र

वर दिलेल्या मार्शलच्या अवतरणातील दृष्टांताप्रमाणे आणखी एक वस्तुस्थितीचा घटक लक्षात येतो, तो हा की, उत्पन्नाच्या व संपत्तीच्या पुनर्विभाजनाचा प्रश्न म्हणून समतेची समस्या साध्या स्थितिनिष्ठ (स्टॅटिक) रूपाने मांडण्यात आली; अधिक समान वाटप व उत्पादनक्षमतेची घटलेली पातळी यांमधून एकाची निवड करण्याची ती समस्या होती. त्यामुळे समानताकरणाच्या दिशेने काहीही करण्याचे आकर्षण कमी होण्यास मदत झाली. प्रत्येकाच्या उत्पन्नाचा हिस्सा एकूण उत्पादनाच्या राशीमधून मिळत असतो आणि तिच्या रूपात असणारी आर्थिक प्रगती समानता-करणाने धोक्यात येणार होती. अशा मांडणीमुळे, पुनर्विभागणीच्या सुधारणा टाळणे गरिबांच्याही हिताचे होते (कारण त्यांच्यामुळे उत्पादनाला अडथळा येणार होता), यावर विश्वास ठेवणे सोपे झाले. मात्र हा दृष्टिकोन संपूर्णपणे स्थितिनिष्ठ आहे. गेल्या अर्ध-शतकात श्रीमंत देश समान-संधीच्या दिशेने फार पुढे गेले आहेत, त्यांच्या अनुभवावरून धडा घेतल्यास आपण उलट गतिनिष्ठ सिद्धांताप्रत पोहोचतो; तो असा: आर्थिक प्रगतीला उत्तेजन मिळण्यासाठी व ती टिकवून धरण्यासाठी, त्याचप्रमाणे सामाजिक लोकशाहीचा अंगीकार करण्यासाठी अधिक समान-संधीचे ध्येय साध्य करणे आवश्यक असते. यावरून पुढील उपसिद्धांत निघतो; पुनर्विभागणीच्या सुधारणा व आर्थिक प्रगती हे चक्राकार कार्यकारणभावाने परस्परांना सहाय्य करणारे दोन प्रकारचे सामाजिक बदल प्रगतीशील सामाजाची वैशिष्टये असतात; अशा प्रगती-शील समाजात सुस्थितीतील लोकांना फारसा त्याग करावयास न लागताही गरिबांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणता येते; आणि उच्च उत्पन्नासहीत सर्व गटांची पातळी उंचावणे हे पुष्कळदा त्याच्याशी सुसंगत तर असतेच पण आवश्यकही असते.

परंतु हा गतिमान सिद्धांत आता पश्चातज्ञान म्हणूनच पुढे येत आहे. आर्थिक सिद्धांतात, किंबहुना अगदी अलिकडच्या काळापर्यंत, पुनर्विभागणीच्या सुधारणांच्या लोकप्रिय व राजकीय प्रतिपादनातही, त्याने फारशी कामगिरी केलेली नाही. सामाजिक न्यायाच्या उद्देशानेच मुख्यतः सुधारणा सतत घडवून आणण्यात आल्या; याचा अर्थ

असा होता की, अधिक सुस्थितीमधील वर्गांना स्वतःचे रहाणीमान कमी करण्यास मान्यता देऊन, सुधारणांसाठी खर्च करावा लागला. आणि म्हणून, "अन्याय न करता आणि प्रगतीच्या पुढारीपणाच्या शक्ती कमी वेगवान न करता हे कोठपर्यंत करता येईल ?" असा प्रश्न उपस्थित करता येत होता आणि तो सतत केला जात होता.[१२] आपल्या स्मरणात आहे त्याप्रमाणे, अगदी अलिकडील काळापर्यंत, आपल्या प्रगत व ज्ञानी देशातही पुढील प्रश्न विचारला जात असे: कमी उत्पन्न असलेल्या गटांना अत्यावश्यक गरजा व आर्थिक अनिश्चितता यांच्या विवंचनेतून मुक्त केल्यास, त्यांची श्रम करण्याची व बचत करण्याची इच्छा कमी होणार नाही का ?

इतर स्पर्धक मूल्यमापने

याशिवाय, उत्पादनाचा प्रश्न बाजूला ठेवला तरी, मूल्यमापनाच्या क्षेत्रात समतेचे ध्येय फक्त सर्वसाधारण पातळीवरच प्रभावी आहे आणि त्या क्षेत्रातही ते एकमेव मूल्यमापन नाही. दैनंदिन मानवी जीवनातील निश्चित स्वरूपाच्या निवडीशी अधिक निकटचे संबंध असलेल्या खास प्रश्नांच्या बाबतीत समतेचे ध्येय पुष्कळदा हरवून जाते, कारण तेथे अनेक इतर मूल्यमापने असतात आणि त्यांचा समतेच्या ध्येयाशी संघर्ष येतो. वास्तविक मन:प्रवृत्ती नेहमी मिश्र असतात, आणि मानवी वर्तणूक नेहमी नैतिक तडजोडीची असते.[१३]

अधिक सुस्थितीतल्या लोकांना मालमत्तेच्या हिताचे संरक्षण करावयाचे असते, ही मूलभूत वस्तुस्थिती आहे. आणि म्हणून, समतेच्या ध्येयाबरोबर स्पर्धा करणाऱ्या कोणत्याही संभाव्य मूल्यमापनाच्या बाबतीत, आणि समतेचे ध्येय निर्बळ बनविण्याकडे कल असलेल्या श्रद्धांच्या बाबतीत ते संधीसाधूपणाने संवेदनाशील असतात. त्यामुळे, गरीब व श्रीमंत यांच्यातील गुणांत जन्मजात भेद असतात, या विश्वासाला भावनात्मक पाठिंबा मिळतो. समतेच्या ध्येयापासून कोणतेही व्यावहारिक निष्कर्ष काढण्यास प्रत्यवाय करणाऱ्या सर्व युक्तिवादांचे आवाहन त्यामुळे सबळ बनते; उदाहरणार्थ, उत्पादन व पुनर्विभाजनाच्या सुधारणा यांत विरोध असल्याच्या गतिहीन सिद्धांताचे बळ वाढते.

यानंतरही, सर्वसाधारण समतेच्या ध्येयाच्या प्रभावाचे विस्मरण होऊ देऊ नये असा माझा आग्रह आहे, याचा अर्थ असा नव्हे की, लोक त्यांच्या मताप्रमाणे स्वहिताचे संरक्षण करण्याचे मुख्यतः प्रयत्न करतात हे मी अमान्य करतो; इतकेच नव्हे तर ते स्वकृतीचे उत्कृष्ट सद्सद्विवेकबुद्धीने समर्थन करता येईल अशा रीतीने वस्तुस्थितीबद्दलच्या विचारांना वळण देण्यात बहुधा यशस्वी होतात, हेही मला मान्य आहे. परंतु इतके सर्व मान्य केल्यानंतर, औदार्याच्या उत्कट मनोभावनाही खऱ्या असतात, आणि त्यांचाही प्रभाव पडतो ह्या महत्त्वाच्या वस्तुस्थितीवर मला जोर दिलाच पाहिजे; हा प्रभाव मर्यादित असतो व कधी कधी अजिबात नगण्य

ठरतो हे खरे असले तरी माझा वरील आग्रह कायम आहे.

अज्ञानाची उपयुक्तता

समतेचे ध्येय व आत्यंतिक विषमतेचे गुणविशेष असलेली सामाजिक वास्तविकता यांत जेव्हा नाटचपूर्ण तफावत असते तेव्हा तडजोडवादी विचार व जीवन नित्याचे बनते असे निरीक्षणाअंती आढळून येते; अशा वेळी अधिक सुस्थितीतील लोक समतेच्या समस्येपासून मनाने दूर रहाण्याचे अधिकाधिक प्रयत्न करताना दिसतात.

प्रथमत: गरिबांचे दारिद्रच व दु:ख यांबद्दल अज्ञानी रहाण्याचे त्यांनी प्रयत्न केले आहेत. स्वदेशातील समाजाच्या कनिष्ठ वर्गाच्या जीवनरहाणीबद्दलही त्यांची हीच वृत्ती होती. अज्ञान क्वचितच लक्ष्यवेधी नसते, उलट ते नेहमीच अत्यंत संधीसाधूपणाचे असते.[१४] प्रत्येक देशात मानसशास्त्रीय व सैद्धांतिक पद्धतींचे बांध असतात, आणि ते संपन्न वर्गांना संकोच वाटेल अशा सामाजिक वस्तुस्थितीच्या ज्ञानापासून त्यांना अलिप्त ठेवतात.

मात्र, ज्ञान दूर ठेवणारे हे बांध सर्वत्र राजकीय लोकशाहीच्या प्रस्थापनेनंतर हळूहळू कोसळून पडले आहेत. समाज-सुधारणांच्या प्रयत्नात ही सदैव महत्त्वाची अवस्था ठरली आहे. खुद्द गरीब वर्गांनी व त्यांच्या संघटनांनी अधिक बोलके होऊन ह्या संकोचजनक ज्ञानाचा प्रसार केला आहे, आणि त्यांच्या उद्देशांची तरफदारी करण्यासाठी व त्याकरता झगडण्यासाठी लोकशाहीच्या छत्राखाली त्यांनी निरनिराळ्या प्रकारचे दबाव आणणारे गट तयार केले आहेत.

अशाच रीतीने, अर्ध-विकसित देशांबद्दलचे घोर अज्ञान श्रीमंत देशांतील लोकांना सोईस्कर व प्रसंगोचित होते.आशियात कोठेलरी झालेल्या लक्षावधी लोकांच्या प्रासंगिक उपासमारीला वस्तुस्थितीच्या आकलनाचा भाग न बनविता, तिचे अमूर्त ज्ञान करून घेण्यास त्यांनी स्वत:ला शिकविले; त्यात ते कसे यशस्वी झाले याचे सविस्तर विश्लेषण करणे हितावह ठरेल.

समतेच्या ध्येयाला समाजातील सैद्धांतिक शक्ती बनविण्याचा भावनात्मक किंवा नैतिक पाया म्हणून मी लोकांच्या प्रत्यक्षात अस्तित्वात असलेल्या सहानुभूतीच्या खऱ्या प्रवृत्तींचा वर उल्लेख केला आहे; प्रसंगोचित अज्ञानाच्या दाट धुक्याच्या संरक्षणाखाली ह्या प्रवृत्ती, त्यांच्या सहानुभूतीच्या लक्ष्यापासून जितक्या दूर जातात, तितकी त्यांची तीव्रता कमी होते, असे समजले पाहिजे. राष्ट्रीय सीमेच्या बाहेर रहाणाऱ्या लोकांबद्दल आणि विशेषत: इतर वंश, धर्म व संस्कृतीच्या, दूर रहाणाऱ्या लोकांबद्दल ही तीव्रता सहजगत्या जवळजवळ शून्यावर जाते.

अलिकडच्या दशकात श्रीमंत देशांत निर्माण झालेला एकात्मतेकडील आणि संधीच्या अधिक समानतेच्या सिद्धीकडील कल संकुचितपणे राष्ट्रवादी राहिला आहे. पुन्हा एकदा अल्फ्रेड मार्शल यांना मी उद्धृत करणार आहे; आपल्या अर्थ-

शास्त्राच्या ह्या महान तत्त्वविवेचकाचे मन सदसद्‌विवेकबुद्धीच्या प्रश्नासंबंधी नेहमी संवेदनाक्षम होते; पहिल्या महायुद्धानंतर[१५] प्रसिद्ध झालेल्या "इंडस्ट्री अँड ट्रेड" (उद्योगधंदे व व्यापार) ह्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत त्यांनी ही परिस्थिती प्रामाणिकपणे मांडली आहे; ते म्हणतात :

". . . राष्ट्रातील निरनिराळ्या नागरिकांच्या ऐक्याच्या कल्पनेशी राष्ट्रीय व्यापाराची कल्पना संबद्ध झालेली आहे. . . .

"पूर्वेतिहासात सादृष्य नसलेली परिस्थिती झपाट्याने निर्माण होत आहे, परंतु ही परिस्थिती तद्‌पूर्वीच्या परिस्थितीपेक्षा अधिक स्वाभाविक आहे—या परिस्थितीत सुसंस्कृत राष्ट्रातील निरनिराळ्या औद्योगिक थरांतील संबंध परंपरेपेक्षा समर्पकतेवर आधारले जात आहेत. . . .

. . . " (ग्रेट ब्रिटन) व प्रत्येक पाश्चिमात्य देश स्वदेशातील सर्व जनतेच्या जीवनाचा दर्जा उंचावण्यासाठी राष्ट्रीय संपत्तीचा अधिक मोठ्या प्रमाणावर खर्च करू शकेल, हे आता स्पष्ट दिसत आहे. असे करणे केवळ राष्ट्रीय कर्तव्य नसून आंतरराष्ट्रीय कर्तव्य आहे, असे समजण्याचे दिवस येतील: परंतु अद्याप ते दृष्टिपथात आलेले नाहीत. सध्याच्या व उगवत्या पिढीच्या व्यावहारिक हिताच्या दृष्टीने, प्रत्येक देशाने, मुख्यत: आपली साधनसामुग्री वापरली पाहिजे, आणि स्वत:चा भार स्वत: उचलला पाहिजे."

अशा आत्मसंतुष्टपणाच्या भावनेने श्रीमंत देशांना आता आंतरराष्ट्रीय विषमतेचे प्रश्न हाताळता येत नाहीत, याचे कारण तेथील लोक आता मार्शल व त्यांचे समकालीन यांच्यापेक्षा जगभरच्या बांधवांबद्दल अधिक दयाळू वृत्तीचे झाले आहेत असे नाही. जे घडले आहे ते असे : अतिदूरच्या लोकांची विपन्नता श्रीमंत देशांच्या लोकांच्या पदरात टाकण्यात आली असून तिने सुरक्षिततेला धोका निर्माण केला आहे.

समतेच्या लढ्यातील नवीन अवस्था

मी पहिल्या प्रकरणात म्हटले आहे की, अर्ध-विकसित जगातील प्रत्यक्ष आर्थिक परिस्थितीची जाणीव आता श्रीमंत देशांतील लोकांत स्वत: घुसत असून ती त्यांना साक्षात्कारी व संकोचकारक वाटते. खुद्द अर्ध-विकसित देशांत वाढत्या प्रमाणावर होणारे उठावच प्रथमत: व मुख्यत: आपल्या मनांतील संधीसाधूपणाच्या अज्ञानाचे बांध उध्वस्त करणारी क्रियाशील शक्ती आहे.

ह्यांपैकी बहुतेक देशांचे नवप्राप्त राजकीय स्वातंत्र्य आणि त्यांच्या सरकारांना विविध आंतरराष्ट्रीय मंडळांची मत-अजमावण्यासाठी असलेली सहजप्राप्यता यांमुळे ह्या संकोचकारक ज्ञानाच्या प्रसाराचे साधन तयार झाले आहे; वास्तविक हे काम जागतिक लोकशाहीने करावयास पाहिजे पण ती अस्तित्वातच नाही. जागतिक इतिहासाच्या सध्याच्या अवस्थेत आंतरराष्ट्रीय संघटनांचे सर्वांत महत्त्वाचे कार्य,

हक्कविहीन राष्ट्रे स्वतःचा असंतोष व्यक्त करण्यासाठी जेथे एकत्र येऊ शकतील, असे व्यासपीठ तयार करणे, हे आहे असा माझा विश्वास आहे.

अर्ध-विकसित देशांतील लोक जोपर्यंत पराधीन व शांत होते तोपर्यंत त्यांची दुःखे, संधीसाधू अज्ञानाच्या अलग पाडणाऱ्या भिंतीच्या सहाय्याने श्रीमंत देशांतील लोकांचे लक्ष न जाईल अशा रीतीने दूर ठेवता येत होती. समतेसाठी चाललेल्या युगानुयुगांच्या लढ्यात आता नवी अवस्था निर्माण झाली आहे; जिच्यात अखेरीस संपूर्ण जगाचा अंतर्भाव होईल अशी ही अवस्था असून ती महान जागृती युगाबरोबर सुरू झाली आहे.

मी पूर्वीच नमूद केले आहे की, एका दृष्टीने, श्रीमंत देशांच्या समान संधीच्या परंपरागत ध्येयाचा अर्ध-विकसित देशांतील जनतेत विजयशाली प्रसार म्हणजेच महान जागृतीचे युग होय. श्रीमंत राष्ट्रांनीच जागतिक क्रांतीची बीजे पेरली आहेत. आणि संस्कृतीची शक्ती व ऐक्य इतके सामर्थ्यशाली आहे की, आता जरी त्या देशांनी प्रयत्न केले तरी त्यांना ह्या प्रसाराचे सातत्य तोडता येणार नाही. त्यांनी काहीही केले तरी ते समताच शिकवणार आणि समतेचाच प्रसार करणार.

राष्ट्रे सर्वतुच्छक बनण्याइतकी दिमाखखोर नसतात : त्यांची धोरणे जेव्हा अत्यंत संधीसाधूपणाची असतात तेव्हादेखील ती त्यांचे ध्येयाच्या भाषेतच समर्थन करतात, आणि ते ती सद्भावनेने करतात. मालमत्ताधारी वर्गाच्या हिताला ध्येयस्वरूप बनवून मोठेपणा देण्याचे प्रयत्न म्हणजे वास्तवविषयक विश्वासांना काही अंशी विकृत करण्यासारखे असते: अशा प्रकारच्या असमंजसपणालाच आपण असयुक्तिकाचे समर्थन म्हणतो; परंतु सामाजिक शक्ती म्हणून ध्येयाचे सामर्थ्य किती मोठे असते याची जाणीव या प्रयत्नात दिसते.

संधीसाधूपणाच्या अज्ञानाचे बांध फोडून काढण्यात गरीब देशांना यश मिळाल्या-नंतर, पाश्चिमात्य संस्कृतीच्या मांडणीत त्यांना समतेच्या ध्येयाचा पाठिंबा मिळेल कारण बरोबर काय आणि चूक काय यांबद्दलच्या लोकांच्या भावनेत या ध्येयाला मानसिक व नैतिक आधार आहे; अशीच घटना पूर्वीच्या काळी, आता श्रीमंत असलेल्या देशांत, त्यांच्या गरीब प्रदेशांच्या व खालच्या सामाजिक वर्गांच्या बाबतीत घडली आहे. हा पाठिंबा नजिकच्या काळात मिळेल किंवा नाही, तो पुरेसा जोरदार असेल किंवा नाही, आणि श्रीमंत देशांत प्रत्यक्षपणे जे घडले त्याचा दृष्टांत देण्यास योग्य अशा प्रकारे जागतिक क्रांतीला संथ व शांततामय क्रांतीच्या प्रक्रियेकडे वळविता येईल किंवा नाही हा फार मोठा प्रश्न आहे; भविष्यकाळ त्याचे गंभीर उत्तर देईल.

वरच्या श्रेणीवरील समानताकरण

राष्ट्रे, वांशिक व धार्मिक गट, व व्यक्ती यांच्यात समान संधीचे तत्त्व जागतिक प्रमाणावर अधिकाधिक वाढत्या श्रेणीने जेव्हा प्रत्यक्षात उतरेल तेव्हा "कल्याणकारी

जग" निर्माण होण्याकडे प्रगती होईल; हा विकास पूर्वी श्रीमंत देशांत झालेल्या राष्ट्रीय "कल्याणकारी राज्य" निर्मितीशी समांतर असेल; आणि तो प्रारंभी सुस्थितीत असलेल्यांनाही निश्चितपणे हितावह ठरेल. राष्ट्रांप्रमाणेच व्यापक जगातही ही प्रक्रिया केवळ सामाजिक न्यायाच्या उन्नतीसाठीच नव्हे तर सर्वसाधारण उत्पादनाची पातळी वाढविण्यासाठीही पूर्व-अट असेल.

गरज आहे ती मुख्यत: संपत्तीचे व उत्पन्नाचे पुनर्विभाजन करण्याची नाही. सयुक्तिक आंतरराष्ट्रीय समानतेच्या कार्यक्रमाचा, राष्ट्रीय कार्यक्रमाप्रमाणेच, मदत हा खरोखरीच फार लहान भाग होऊ शकतो. अर्ध-विकसित देशांच्या विकासासाठी सुचविण्यात आलेल्या भांडवल मदतीच्या योजनांपैकी कोणत्याच योजनेत, श्रीमंत देशांतील दरमाणशी राष्ट्रीय उत्पन्नाच्या वार्षिक वाढीतील अंशमात्र देण्यापलीकडे अधिक काहीच सुचविलेले नाही; म्हणजेच खऱ्या त्यागाचा विचार त्यात अभिप्रेत नाही असा अर्थ स्पष्ट होतो. त्याचप्रमाणे, ज्यांनी मदतीच्या योजनांचा पुरस्कार केला त्या सर्वांनी, श्रीमंत देशांनीं गुंतवणूक म्हणून मदत देणे त्यांच्या स्वत:च्या फायद्याचे ठरेल, यावर अढळ विश्वास ठेवलेला आहे. देशादेशांमध्ये संपूर्ण उत्पन्नाचे समतानिष्ठ पुनर्वाटप अशक्य आहे, आणि मला वाटते की ते महत्त्वाचे उद्दिष्ट नाही.

त्यापेक्षा, जगात संधींची समानता निर्माण करण्यासाठी, सुधारणा कितीतरी जास्त महत्त्वाच्या आहेत; सौदा करण्याच्या बलिष्ठ स्थानावर असलेले श्रीमंत देश ज्या रीतीने गरीब देशांबरोबर व्यापारधंदा करतात किंवा करण्याचे टाळतात, तिच्यात सुधारणा झाल्या पाहिजेत.[१६] गरीब देशांच्या निर्यात-उत्पादनाची बाजारपेठ, त्यांच्या आयातीच्या मालाच्या खरेदीची बाजारपेठ आणि भांडवलाच्या संघटनेची बाजारपेठ यांच्या संबंधीच्या सुधारणांचा मी विचार करीत आहे.

अत्यंत उदार मदतीच्या योजनांपेक्षा अर्ध-विकसित देशांना फार जास्त सहाय्य करतील अशा या क्षेत्रात एकमताच्या कृतीसाठी अनेक योजना आंतरराष्ट्रीय संघटनांच्या कार्यक्रम-पत्रिकेवर आहेत, किंवा होत्या; या योजनांमुळे श्रीमंत देशांना फार मोठा खर्चही करावा लागणार नव्हता; अनेक योजनांची धोरणे तर अखेरीस श्रीमंत देशांच्या दीर्घकालीन हिताची ठरणारी होती. परंतु ह्या मार्गावर प्रगती अत्यंत संथपणे झाली आहे, आणि आता तर ती संपूर्णपणे स्थगित झाल्यासारखी दिसते, हे मी ५व्या प्रकरणात निदर्शनास आणले आहे. ह्या क्षेत्रात श्रीमंत देशांनी अधिकाधिक वाढत्या प्रमाणावर नकारात्मक भूमिका का घेतली याच्या संचयी राजकीय प्रक्रियेची काही कारणे मी ६व्या प्रकरणात सूचित केली आहेत.

परंतु मी निराश होणार नाही. कोणत्याही परिस्थितीत दैववादाकडे जाण्याचा हक्क आपल्याला नाही. प्रवृत्ती बदलू शकतात. आणि प्रवृत्ती ह्या लोकांच्या मतावर आधारलेल्या असल्यामुळे खऱ्या ज्ञानाच्या वाढीलाही कमी महत्त्व नाही. श्रीमंत देशांतील बुद्धिवादी पुढारीपणात व तेथील लोकांत, त्या देशांच्या समजूतदारपणाने

पडते न घेण्याच्या प्रवृत्तीत अंतर्भूत असलेल्या धोक्याची जाणीव प्रसार पावण्याची शक्यताही वर्ज केलेली नाही.

समाजशास्त्रातील वस्तुसंशोधन (फॅक्ट फाइंडिंग)

अडचणीत टाकणाऱ्या ज्ञानाच्या प्रसाराच्या ह्या राजकीय प्रवृत्तीच्या महत्त्वावर मी भर दिला आहे. ह्या प्रयत्नात समाजशास्त्रज्ञ कोणती कामगिरी करीत आहेत याबद्दल स्वाभाविकपणेच विचारणा केली पाहिजे.

चुकीच्या व संधीसाधूपणाच्या लोकप्रिय मतामध्ये सुधारणा घडवून आणण्याच्या कार्यात समाजशास्त्रज्ञ ही महान शक्ती ठरली असली पाहिजे अशी अपेक्षा असण्याचा संभव आहे. सर्व आधुनिक अर्थ-शास्त्रीय व सामाजिक सिद्धांत परंपरागत समतेच्या सिद्धांतावर आधारलेले असल्यामुळे, त्यानंतरच्या पिढ्यांतील समाजशास्त्रज्ञांनी अस्तित्वात असलेल्या आर्थिक विषमता उघडकीस आणण्याचे प्रयत्न करावयास पाहिजे होते आणि त्या का अस्तित्वात आल्या याचे स्पष्टीकरण द्यावयास पाहिजे होते. अगदी आपल्या वेळेपर्यंतच्या समाजशास्त्रज्ञांपर्यंत बहुतेक सर्व समाजशास्त्रज्ञ समाजसुधारणांविषयी त्यांना आस्था असल्यामुळेच प्रथम अर्थशास्त्राच्या अभ्यासाकडे वळले आहेत, हे आपल्याला माहीत असल्यामुळे त्यांच्याकडून ही अपेक्षा करणे अधिकच स्वाभाविक ठरते.[१७]

संधीसाधू अज्ञानात समाजशास्त्रज्ञ फार राहू शकणार नाहीत, निदान ज्या क्षेत्रात ते विशेष अभ्यास करीत होते त्यात तरी राहू शकणार नाहीत, अशीही त्यांच्याकडून अपेक्षा होती. विशिष्ट काळातील समाजाच्या गैरसमजुतींचा त्यांना वाटा मिळाला असेल, किंवा मार्शल ज्याला दृष्टीचा कमकुवतपणा म्हणतात तो त्यांच्यात असेल, त्यांचीही काही बाबतींत डोळेझाक झाली असेल हे मान्य केल्यानंतरही, केव्हा ना केव्हा निःस्वार्थी संशोधनाच्या क्षेत्रात प्रवेश केल्याशिवाय ते कसे राहू शकले हे समजणे कठीण आहे.

आणि संधीसाधूपणाने दूषित झालेले विचार घेऊन त्यांनी अभ्यासाला प्रारंभ केला असला तरी त्यांच्या विश्लेषणाला वस्तुस्थितिनिष्ठ घटनांचे व तर्कांचे बंधन होते. म्हणूनच, अर्धशतकापूर्वी, प्रायोगिक मानसशास्त्रज्ञांनी जेव्हा बुद्धिमत्तेचे मापन करण्यास प्रारंभ केला तेव्हा लोकांच्या निरनिराळ्या गटांत जन्मजात गुणांच्या बाबतीत विभिन्नता असते ह्या त्यांच्या समकालीनांच्या प्रतिगामी मताशी ते प्रत्यक्षपणे सहमत होते. आणि म्हणून, गरीब व श्रीमंत, गोरे व निग्रो, स्त्रिया व पुरुष यांच्या बुद्धिमत्तेत मोठी सरासरी तफावत असेल असे ते गृहीत धरीत होते. परंतु ही तफावत मोजण्याचा त्यांनी जितका अधिक प्रयत्न केला आणि तसे करण्याच्या पद्धती त्यांनी जितक्या अधिक उत्कृष्ट बनविल्या तितक्या त्यांना कमी विभिन्नता आढळून आल्या; शास्त्रीय महत्कार्याचा हा एक महान विजय आहे.

"जो शोधतो त्याला सापडते," ह्या बायबलमधील सूत्रात अगाध ज्ञान आहे. परंतु शास्त्रीय सत्य-दर्शनाच्या अभ्यासात मानशास्त्रज्ञ ज्याच्या शोधात निघाले होते ते त्यांना सापडले नाही. त्यांना काढावयाची होती ती अनुमाने त्यांना काढता आली नाहीत. त्यांच्या गृहीततत्त्वांना विरोधी असलेले निष्कर्ष निघाले आणि त्यांना त्यांची गृहीततत्त्वे बदलावी लागली. मानवजातीच्या भिन्न गटांतील गुणधर्मात जन्मजात विभिन्नता असते ह्या गृहीततत्त्वाचे शास्त्रीय संशोधनाने खंडन केले; ह्या प्रतिगामी गृहीततत्त्वावरील विश्वासामुळे समतेच्या ध्येयाचा समतोल नष्ट होत होता याचा निर्देश मी वर केलाच आहे.

गेल्या काही दशकांत निश्चित स्वरूपाची, विश्लेषण केलेली व सुव्यवस्थित मांडणी केलेली गृहीततत्त्वे फार मोठ्या प्रमाणावर वाढली, आणि अडचणीत टाकणाऱ्या ज्ञानापासून लोकांना संरक्षण देणाऱ्या संधीसाधू अज्ञानाच्या भिंती फोडून काढण्याच्या प्रक्रियेवर त्यांचा फार मोठा प्रभाव पडला ही गोष्ट निःसंशय; अशा रीतीने लोकांच्या जागतिक दृष्टिकोनात वाढती सयुक्तिकता निर्माण करणारी ती शक्ती बनली. प्रत्येक देशात, वेळोवेळी, व्यक्तिगत समाजशास्त्रज्ञांनी, विशिष्ट प्रश्नावर जनतेची सदसद्विवेकशक्ती जागृत करण्याचे धाडस केलेले आहे; परिणामी तोपर्यंत सर्वमान्य व स्वास्थ्यदायी असलेल्या अज्ञानात कायम स्वरूपाचा बदल घडल्याची नोंद झाली आहे.

परंतु, बहुधा, सत्य घटनांचे संकलनकार या नात्यानेदेखील, समाजशास्त्रज्ञ राजकीय घडामोडींच्या पश्चातच कार्य करताना दिसतात, त्यांच्या प्रारंभापूर्वी दिसत नाहीत. अर्ध-विकसित देशांच्या समस्यांबद्दल सार्वजनिक चिंता निर्माण झाल्यामुळे त्यांचा अभ्यास तीव्रतेने होऊ लागला नाही, आणि संशोधनामुळे तर अशी चिंता मुळीच निर्माण झाली नाही. उलट, आपल्या संशोधनाला हे नवे वळण अर्ध-विकसित देशांच्या समस्यांना राजकीय वजन प्राप्त करून देणाऱ्या घटनांच्या दबावामुळे लागले आणि त्यातूनच त्याला स्फूर्ति मिळाली.

परंतु कोणत्याही कारणामुळे, एकदा विषमतेचा प्रश्न सार्वजनिक चर्चेसाठी पुढे आला म्हणजे समाजशास्त्राचे संशोधन परिश्रमपूर्वक पुढे जाईल आणि एक प्रकारे कार्यपूर्ती करण्याचे काम करील : अडचणीत टाकणाऱ्या ज्ञानापासून लोकांचे संरक्षण करणाऱ्या संधीसाधू अज्ञानाच्या भिंती मोडून काढण्याचे कार्य ते सातत्याने करीत राहील. अर्ध-विकसित देशांतील दारिद्र्य व दुःख यांच्याबद्दलच्या जाणिवेच्या बाबतीत असेच झपाट्याने वाढत्या प्रमाणावर आता प्रत्यक्षपणे घडत आहे. परंपरागत समतेचा सिद्धांत ह्या प्रक्रियेला सतत शक्ती व प्रोत्साहन देईल.

सिद्धांताची पारंपारिकता

अशा रीतीने, समाजशास्त्रातील सत्यसंशोधन संपूर्णपणे नवीन क्षितिजांचा

शोध घेत नाही, पण प्रस्थापित ध्येयाशी विरोधी असल्यामुळे अडचणीच्या वाटणाऱ्या सामाजिक वस्तुस्थितीची जाणीव करून देणाऱ्या स्वतंत्रपणे सुरू झालेल्या प्रत्येक आंदोलनाला ते बळकटी आणते; मात्र आपण ज्यांना सिद्धांत म्हणतो त्या विचारांच्या व सामान्य नियमांच्या प्रचंड रचनेच्या बाबतीत तसे म्हणता येणार नाही, असे मला वाटते.

सर्वसाधारणपणे सिद्धांत अधिक सनातनी व पारंपारिक कल दाखवितात. नवी क्षितिजे खुली करण्याच्या दिशेने ते स्वतंत्रपणे वाटचाल करण्यात बहुधा अयशस्वी होतातच; उलट वस्तु-संशोधन करण्याच्या कार्यासहीत इतर समाजशक्तींनी दृष्टि-क्षेपात आणलेल्या क्षितिजांकडे ते आपल्याला पाहू देत नाहीत. वस्तु-संशोधनाची मीमांसा अधिक धिटाई व कल्पकता का दाखवीत नाही याचे प्रमुख स्पष्टीकरण सिद्धांताच्या ह्या पारंपारिकपणात आहे—परंपरागतवादामुळेच सिद्धांत नियमितपणे राजकीय घडामोडींच्या पाठीमागून जातात आणि फारच क्वचित त्यांना त्यांचा आधी अंदाज बांधता येतो.

बहुतेक सर्व सैद्धांतिक विचारांतील आणि विशेषत: आर्थिक क्षेत्रातील परंपरा-वादाच्या प्रभावाची सर्वसाधारणपणे आपल्यावर छाप पडली आहे. ह्या बंधनाची आपल्याला जाणीव नसते; पण कमीअधिक प्रमाणात आपण सर्व, प्राचीन काळापासून चालत आलेल्या सर्वसाधारण विचारांच्या किंवा वैचारिक ढाच्याच्या प्रभावाखाली असतो. कोणे एके काळी ह्या विचारांची सूत्रबद्ध विचारसरणी होती; परंतु आता त्यांपैकी काही विचारप्रवाह अमान्य झालेले असले आणि काहींचे प्रत्यक्षात खंडन झालेले असले तरी त्यांचे अस्तित्व अमूर्त पूर्वानुकूलग्रहांच्या स्वरूपात अजूनही कायम आहे, आणि आपल्या विचार करण्याच्या पद्धतींवर त्यांचा बराच प्रभाव पडतो. अर्थशास्त्रीय सिद्धांतात नवीन भर घालणारा अभ्यासकही बहुधा एका कोणत्यातरी वैचारिक आघाडीवर असतो, त्या ठिकाणी तो अपवादात्मक बुद्धिमत्ता व इच्छाशक्ती वापरून परंपरागत पूर्वानुकूलग्रहांवर विजय मिळविण्यात यशस्वी होतो; इतर बाबतींत मात्र तो परंपरावादीच असतो.[१८]

ह्या सिद्धांतांच्या परंपरेत व पूर्वानुकूलग्रहात आपली विश्लेषणाची साधने तयार झाली आहेत. समस्यांबद्दल विशिष्ट दृष्टिकोन स्वीकारण्याच्या आणि परिस्थितीकडे विशिष्ट दृष्टीने पहाण्याच्या स्वरूपात आपण त्यांची आपल्या कामावर छाप पाडतो. त्यावरूनच आपण कोणते प्रश्न उपस्थित करू व कसे उपस्थित करू हे व्यापक अर्थाने निश्चित होते. म्हणून त्याच्यामुळे आपल्या कल्पनाशक्तीला प्रतिबंध होतो; आणि मी आता म्हटल्याप्रमाणे, कल्पकतेतील ह्या अपेक्षाभंगाचा पुन्हा आपल्या सत्य-संशोधनावर परिणाम होतो.

परंतु, अर्थशास्त्रातील हे परंपरागत व प्रभावी पूर्वानुकूल ग्रह अमूर्त व अनिश्चित असतात; त्यामुळे शास्त्रीय कुशाग्रता व विद्वत्ता मोठ्या प्रमाणावर दाखविण्यासाठी

आणि शोधकता व वादविवादासाठी बराचसा वाव रहातो. ह्या परंपरेत आपण "शुद्ध शास्त्रीय" अशा बौद्धिक मेहनतीत खास आनंद मानतो; "शुद्ध शास्त्रीय" म्हणजे त्यांना महत्त्वाचा व ताबडतोबीचा व्यावहारिक अर्थ नसतो.

हे सर्व पूर्वानुकूलग्रह पूर्णांशाने मूल्यनिष्ठ असतात; त्यांच्यापैकी अनेक स्वसमर्थनाच्या निकडीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी उपयोगी पडतात असे आपल्याला आढळून येईल. त्यामुळे आपल्या बौद्धिक मेहनतीवर त्यांचा प्रभाव वाढतो, आणि स्पष्ट मौलिक विधाने मांडून आपण कामाला सुरवात केली नाही तर ते आपल्या तीव्र जाणिवेतून व विवेचक दृष्टीतून निसटतात.

सनातनीपणाची वास्तवता

पुढील प्रकरणात मी ह्या पूर्वानुकूलग्रहांचे संक्षिप्त विश्लेषण करणार आहे; आपण ज्या मानसिक वातावरणात काम करतो ते सामान्यत: अनियंत्रितपणे निश्चित करण्याचे काम हे पूर्वानुकूलग्रह करीत असतात. त्यांच्या तर्कशुद्ध आंतरसंबंधावर आणि आर्थिक सिद्धांताच्या इतिहासदत्त तात्त्विक मूलाधाराशी असलेल्या त्यांच्या संबंधावर मी मुख्यत: लक्ष केंद्रित करणार आहे.

हे प्रकरण पूर्ण करण्यापूर्वी मला मुद्दा स्पष्ट करावयाचा आहे तो असा: आर्थिक प्रश्नासंबंधीचे आपले विचार ज्या मर्यादेपर्यंत ह्या जुन्या व सामर्थ्यशाली पूर्वानुकूलग्रहांच्या प्रभावाखाली असतील तोपर्यंत समतेच्या प्रश्नापासून आपले लक्ष सतत दूर जाईल. त्यानंतर, बाजारपेठेच्या नैसर्गिक शक्तींना मुक्त वाव दिल्यास सर्वांचे समाधान होईल असे परिणाम घडतील, या विचारांच्या दिशेने आपले सर्व व्यावहारिक व राजकीय निष्कर्ष निघू लागतील; वरील विचारांचा अर्थ अर्थातच असा आहे की, समतेच्या तत्त्वाचा विसर पडण्यास हरकत नाही.

अशा रीतीने, हे सिद्धांत व पूर्वानुकूलग्रह राजकीय दृष्टीने सनातनी दूषित दृष्टीचे प्रतिनिधित्व करतात आणि विशेषत: उत्पन्न व संपत्तीच्या विभागणीच्या प्रश्नावर त्यांची दृष्टी तशी आहे. समतेच्या ध्येयाच्या दृष्टिकोनातून सामाजिक वस्तुस्थितीचे अध्ययन व्हावे असा आग्रह धरणारे अनेक जहाल लेखक होते. परंतु आर्थिक सिद्धांताच्या विकासाची दिशा मुख्यत: ह्या प्रश्नापासून लक्ष दूर ठेवू इच्छिणाऱ्या लेखकांकडून ठरविली गेली.

याचे स्पष्टीकरण देता येते. आद्यअर्थशास्त्रज्ञांच्या विचारांना निश्चितपणे अध्यात्मवादाचा व अंतिम हेतुवादाचा पाया होता, आणि समकालीन अर्थशास्त्रज्ञांच्या विचारांनाही तो काही मर्यादेपर्यंत आहेच; हा पाया कायम असेपर्यंत, ऐतिहासिक निवडीचे अनियंत्रित पण परिणामकारक तत्त्व प्रभावशाली होते; हे तत्त्व "सनातनीपणाच्या वास्तवते"वर आधारलेले होते असा उल्लेख मी वर केला आहे.[१९] सनातनी प्रवृत्तीचे लेखक आपण अनुभव घेतो अशा समाजाला आदर्श मानण्याच्या

विचारांनी सामाजिक वास्तविकतेचे विश्लेषण करून, तिचे कार्यकारणभावाच्या भाषेत उत्कृष्ट स्पष्टीकरण देऊ शकत. सनातनी विचारसरणीचे हे सैद्धांतिक श्रेष्ठत्व अर्थातच संपूर्णपणे दैववादी आहे. अधिक प्रगतिकारक राजकीय मूल्यमापनापेक्षा सनातनी राजकीय मूल्यमापन "सत्य" किंवा "अधिक सत्य" आहे असा त्याचा मुळीच अर्थ नाही.[२०]

त्याचप्रमाणे, तत्त्वज्ञानात्मक व अंतिम हेतुवादाची विचारसरणी मूल्यमापनाला वस्तुनिष्ठता देण्याचा प्रयत्न करते परंतु तो यशस्वी होऊ शकत नाही; ही त्या विचारसरणीची मूलभूत तर्कदुष्टता आहे; आणि तत्त्वज्ञांना व सिद्धांतकारांना ती सतत 'जैसे थे'च्या कोणत्या ना कोणत्यातरी अर्थाच्या दृष्य सोपेपणाचा आसरा घ्यावयास लावते; याची उदाहरणे मी पुढील प्रकरणात देणार आहे. हे सिद्धांत मान्य केल्यामुळे अनेक गैरसोईचे प्रश्न निकालात निघतात, परंतु हे सिद्धांत त्याज्य ठरविले तर असे प्रश्न ताबडतोब डोके वर काढतात.

तर्कशास्त्रदृष्टीने आर्थिक सिद्धांताच्या सनातनी अर्थविपर्यासाची ही कारणे आहेत. निराळ्या दृष्टिकोनातून, समाजज्ञानाच्या दृष्टिकोनातून, ह्या प्रश्नाकडे पाहिले असता, त्या काळातील सर्वांत समृद्ध देशाच्या म्हणजे ग्रेट ब्रिटनच्या सामाजिक पार्श्वभूमीवरच जवळजवळ आपले सर्व अर्थशास्त्र निर्माण झाले, असे आढळून येते. त्यानंतर, अगदी अलिकडील काळापर्यंत, परस्परांतील वाढता व्यापार व भांडवल तसेच कामगार यांच्या जोरदार उलाढाली होत असतानाच्या परिस्थितीत जे देश आर्थिकदृष्टचा जलद प्रगती करीत होते अशा देशातील सिद्धांतकारांनीच अर्थशास्त्राचा निरपवादपणे विकास केला. आणि ह्या देशांमध्ये, अर्थशास्त्राच्या उदयासहीत सर्व उच्च संस्कृती आर्थिक भरभराटीच्या भागांत सकेंद्रित झाली होती.

ह्या घटना, दृष्टिकोनाच्या निवडीत निश्चितपणे महत्त्वाच्या ठरलेल्या आहेत आणि त्यायोगे आर्थिक सिद्धांताबद्दलचा दृष्टिकोन ठरविण्यातही महत्त्वाच्या ठरल्या आहेत. आर्थिक सिद्धांताचा जेथे जन्म झाला तेथील लोकांचे हित व आकांक्षा यांचे काही मर्यादेपर्यंत समर्थन करण्यासाठी त्याचा आहे त्या स्वरूपात विकास झाला, असे मला सुचवायचे आहे.

आर्थिक सिद्धांतामधील समतेच्या गृहीततत्त्वांसंबंधीच्या पलायनवादी प्रवृत्ती ह्या दृष्टीने त्यांच्याकडे पाहिल्यास त्यांचे आकलन होते. विशेषतः अर्ध-विकसित देशांचे वैशिष्टचपूर्ण प्रश्न दूरवरच्या अंधुक धुक्यात अस्पष्ट राहिले याबद्दल तर पुष्कळच कमी आश्चर्य वाटले पाहिजे—अगदी अलिकडे मात्र अर्ध-विकसित देशांत रहाणाऱ्या लोकांनी राजकीय व सांस्कृतिक उठाव करून आपल्या समस्या जोरदारपणे जगापुढे आणल्या आहेत; तोपर्यंत त्या आर्थिक सिद्धांताच्या कक्षेत फार दूर होत्या. हे सर्व अगदी आकलनीय आहे; फक्त त्यासाठी आपण आर्थिक विकासाच्या ह्या मुख्य प्रवाहापासून दूर होऊन, त्याच्या विकासाकडे समाज-इतिहासाचा एक

भाग म्हणून पाहिले पाहिजे, आणि त्याचे स्पष्टीकरण इतिहासातील इतर सर्व घडामोडींप्रमाणेच कारण व परिणाम यांच्या दृष्टीने दिले पाहिजे.

याच्या विरोधी असलेली घटना म्हणजे, समतेच्या सिद्धांताचे सतत व स्पष्ट अस्तित्व आणि त्याचे तौलनिक सामर्थ्य. ही घटना खरोखरीच अधिक गूढ आहे, आणि सध्याच्या संदर्भात तिचे स्पष्टीकरण देण्याच्या मी स्थितीत नाही, पण तिचे अस्तित्व स्वतंत्रपणे मान्य करतो. हा उच्च आदर्श कोठून आला ? आणि आर्थिक सिद्धांताचा व आपल्या संपूर्ण संस्कृतीचा तो सतत आधार कसा बनून राहिला आहे ?

समतेच्या सिद्धांतामधून व्यावहारिक धोरणाचे निष्कर्ष न काढण्याची खास खबरदारी आर्थिक सिद्धांत सतत घेत असतो, आणि समतेच्या सिद्धांताला अमूर्त विचारांच्या कप्प्यात अलग पाडण्यासाठी सैद्धांतिक रचनेची गुंतागुंतीची संपूर्ण पद्धत उभारण्यात येते—म्हणजेच एका प्रकारे ह्या आदर्शाचे सार्वभौमत्व मागच्या दाराने कबूल केले जाते. एका अर्थाने, आर्थिक सिद्धांताचा पाया असलेल्या ह्या क्रांति-कारक आदर्शापासून त्याचे संरक्षण करण्याच्या गरजेमधूनच संपूर्ण आर्थिक सिद्धांताची रचना निश्चित झाली आहे.

संदर्भ टिपा

१. ह्या दुसऱ्या भागात पुढे येणाऱ्या चर्चेच्या संबंधात लेखकाचे, "आर्थिक सिद्धांताच्या विकासातील राजकीय तत्त्व" (दि पोलिटिकल एलेमेंट इन् दि डेव्हेलपमेंट ऑफ इकॉनॉमिक थिअरी), रूटलेज व केगन पॉल, लंडन १९५३, हे पुस्तक पहावे. तसेच पुढील प्रकाशने पहावीत: "समाजसिद्धांत व समाजधोरण यांतील संबंध" (दि रिलेशन बिटवीन सोशल थिअरी अँड सोशल पॉलिसी), ब्रिटिश जर्नल ऑफ सोशिऑलॉजी, सप्टेंबर १९५३ चा अंक, पा. २११ व पुढे. आणि प्रसिद्धीच्या मार्गावर असलेले: "समाजसिद्धांतातील मूल्ये"-पद्धतशीरपणासंबंधीचे निवडक निबंध" (व्हॅल्यू इन सोशल थिअरी—ए सिलेक्शन ऑफ एसेज् इन् मेथडॉलजी), ले. गन्नर मिरदाल. संपादक पॉल स्ट्रीटन, रूटलेज व केगन पॉल, लंडन, १९५७.

२. "आर्थिक सिद्धांताच्या विकासातील राजकीय तत्त्व" (द पोलिटिकल एलेमेंट इन द डेव्हलपमेंट ऑफ एकॉनॉमिक थिअरी), पान ६४ व पुढे.

३. नैसर्गिक नियमाच्या युक्तिवादातून सर्वांना समान संधी मिळाली पाहिजे ही मागणी पुढे आली; नैसर्गिक गुणवत्ता सारखी नसेल तर उत्पन्न व संपत्तीत काही विषमता रहातील असे त्याने मान्य केले. तत्त्वाच्या दृष्टीने सुखवादी उपयुक्ततता-वाद याच्या पुढे गेला आणि त्याने उत्पन्न व संपत्तीत समता पाहिजे अशी मागणी केली. (पुढे एजवर्थसारख्या उपयुक्ततावाद्यांनी सुख भोगण्याची जन्मजात क्षमता लक्षात घेतली व ती सर्वांत सारखी नसल्यामुळे गुंतागुंत निर्माण केली.) सर्वच

समाज समतेच्या अवस्थेपासून फार दूर असल्यामुळे हे तार्किक भेद फारसे महत्त्वाचे नाहीत. व्यावहारिक मागणी नेहमी अधिक समतेकडे समाजाला नेतील अशा समाजसुधारणांसाठी असते, आणि समान संधीच्या नैसर्गिक नियमाच्या ध्येयाला उपयुक्ततावाद्यांचा सबळ पाठिंबा आहे.

४. "लेक्चर्स ऑन पोलिटिकल इकॉनॉमी—जनरल थिअरी" (राजकीय अर्थ शास्त्रावरील व्याख्याने—सर्वसाधारण सिद्धांत, रूटलेज), खंड १ला, लंडन, १९३४, पा. ४, या इंग्रजी भाषांतरातून उद्धृत.

५. "आर्थिक सिद्धांताच्या विकासातील राजकीय तत्त्व" (दि पोलिटिकल एलेमेंट इन् दि डेव्हेलपमेंट ऑफ इकॉनॉमिक थिअरी), पान १२९ व पुढे.

६. "दि पोलिटिकल एलेमेंट इन् द डेव्हेलपमेंट ऑफ एकॉनॉमिक थिअरी" पान ११८.

७. उपरनिर्दिष्ट पुस्तक पान ११६ ते ११९. हा मुद्दा तर्कशुद्धपणे पुढे नेला तर वाटपात 'ज्याचा तो' ह्या धोरणाचेच केवळ नव्हे तर श्रीमंतांचे संरक्षण केले पाहिजे असा निष्कर्ष निघाला असता. परंतु रिकार्डोचे हृदय—व त्याची मूलभूत तात्त्विक बैठकही गरिबांच्या बाजूला असल्यामुळे, "ज्याचा तो"चे तत्त्व तडजोड म्हणून पुढे आले. वर उल्लेख केलेले पुस्तक पहा, पान ११९ व पुढे.

८. "अर्थशास्त्राची मूलतत्त्वे" (प्रिन्सिपल्स ऑफ इकॉनॉमिक्स), ७वी आवृत्ती, मॅकमिलन, लंडन, १९१६, पान ४८.

९. पूर्वोक्त पुस्तक, पान ४१.

१०. तेच पुस्तक, पान ४७ व पुढे.

११. वरील पुस्तक, पान ४६ व पुढे.

१२. वरील पुस्तक, पान ४१.

१३. विभिन्न मूल्यांच्या नैतिक तडजोडीमधून मानवी वर्तन तयार होते, त्याची सर्वसामान्य पातळी व अंशमान सदोदित बदलते असते आणि कित्येक प्रसंगी ही उंची सद्सद्विवेकबुद्धीच्या पातळीपर्यंत पोहोचते ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. त्याचा अर्थ असा की, समाजमानसशास्त्रज्ञ "प्रवृत्ती" हा जो शब्द वापरतात, आणि "देशातील व परदेशातील पोलिश शेतकरी" (दि पोलिश पेझंट ॲट होम ॲंड ॲब्रॉड) या पुस्तकाच्या पद्धतशीर पुरवणीत डब्ल्यू. आय. थॉमस यांनी जो निश्चित अर्थाने वापरला, तो वस्तुस्थितीबद्दलचा स्पष्टपणे भ्रम आहे. कारण त्यांनी तो एकसंध समजून वापरला आहे. लेखकाचे "अमेरिकेतील एक विरोधाभास: निग्रोंचा प्रश्न व आधुनिक लोकशाही" (अमेरिकन डायलेमा: दि नीग्रो प्रॉब्लेम ॲंड अमेरिकन डेमोक्रसी) हे पुस्तक पहावे. पुरवणी १ "मूल्यमापन व श्रद्धा यांवरील पद्धतशीर टिपण".

१४. अमेरिकेतील विरोधाभास (ॲन अमेरिकन डायलेमा), पा. ४० व पुढे १०२९.

१५. मॅकमिलन, लंडन, १९१९, पा. ४ व पुढे.

१६. पहा—"मदत व व्यापार" (एड ॲंड ट्रेड), द अमेरिकन स्कॉलर, वासंतिक अंक, १९५७.

१७. मी पूर्वी दिलेले मार्शल यांचे उतारे पहावेत: महान परंपरेला अनुसरून अर्थशास्त्रज्ञांच्या नैतिक प्रवृत्तीचे वैशिष्टय सांगण्याच्या दृष्टीने ते सत्य आहेत, असे

मला वाटते. केंब्रिज येथील मार्शल ग्रंथसंग्रहालयात एक लहानसे तैलचित्र आहे; ते आल्फ्रेड मार्शल यांच्या मालकीचे होते; त्यात एक अर्धवस्त्रांकित, सुहृदय व सहानुभूतीपूर्ण तरुण माणूस चित्रांकित केलेला आहे. असे सांगतात की, मार्शल हे चित्र सदोदित त्यांच्या मेजाजवळ ठेवीत असत–गरीब वर्गाची परिस्थिती सुधारणे हा आर्थिक विषयावरील सर्व लेखनाचा अंतिम उद्देश असावा, याचे सदोदित स्मरण रहावे हा त्यांचा हे चित्र नजरेसमोर ठेवण्यातील हेतू होता.

१८. या संदर्भात कीन्सबद्दलच्या आख्याईकात भर घालण्याची मी परवानगी घेतो. "सर्वसाधारण सिद्धांत" (जनरल थिअरी) या पुस्तकाच्या प्रकाशनानंतर कीन्सनी स्टॉकहोमला भेट दिली आणि अर्थशास्त्रज्ञांच्या मंडळात व्याख्यान दिले; हे मंडळ नट विकसेल जेव्हा पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस लंडनहून स्टॉकहोमला निर्वासित प्राध्यापक म्हणून आले त्यावेळी त्यांच्या भोवती तयार झाले होते. किन्सच्या भेटीच्या वेळी विकसेल यांचा मृत्यू होऊन सुमारे दहा वर्षे लोटली होती.

"अर्थशास्त्रातील पाखंडमत" हा विषय कीन्स यांनी व्याख्यानासाठी निवडला होता आणि त्यात आश्चर्य करण्यासारखे काहीच नव्हते. त्यांच्या भाषणानंतर आमच्या मंडळातील तरुण सभासदांनी एकामागून एक भाषणे केली आणि त्यांनी ह्या किंवा त्या मुद्यावर कीन्स फार पुराणमतवादी असल्याची त्यांच्यावर टीका केली. पाखंडमताचा पुरस्कर्ता ह्या त्यांच्या आवडत्या भूमिकेत उभ्या असलेल्या कीन्सना चिडविण्याचा तो योजनाबद्ध डाव होता की तसे सहज घडले हे आजदेखील मी सांगू शकणार नाही.

कीन्सनी हसून त्यांच्या स्पष्टवक्त्या टीकाकारांना उत्तरे दिली, आणि असे ध्वनीत केले की, त्यांच्यावर करण्यात आलेला पुराणमतवादाचा आरोप अतिशयोक्तीपूर्ण असला तरी ती एक चुणचुणीत व मनोरंजक कल्पना होती; पुढे मात्र त्यांची भूमिका स्वतःकडे घेतलेल्या तरुणांच्या गटाला चर्चेत उत्तरे देताना जेव्हा त्यांना स्वसमर्थनासाठी संरक्षणाची कास धरावी लागली तेव्हा त्यांनी थोडासा सहज समजण्यासारखा चिडखोरपणा दाखविला.

१९ "दि पोलिटिकल एलेमेंट इन् द डेव्हलपमेंट ऑफ एकॉनॉमिक थिअरी," पान ३१ व पुढे.

२०. राजकीय क्षेत्रातील अशा व इतर असयुक्तिक प्रभावांपासून आपल्या विचारांना बंधमुक्त करण्याचा मार्ग मूल्यांकित प्रमेये घेऊन विचार करणे हा आहे. त्यानंतर, सनातनी निष्कर्ष, किंवा इतर कोणतेही निष्कर्ष शुद्ध सिद्धांतामधून निष्पन्न होत नाहीत, तर विशिष्ट दृष्टिकोनातून वास्तवाचा अभ्यास केल्यामुळे, असा दृष्टिकोन सिद्धांतापासून स्वतंत्रपणे मान्य केल्यामुळे निष्पन्न होतात, असे दिसून येईल.

प्रकरण १० वे

आर्थिक सिद्धांताचे सनातनी पूर्वानुकूलग्रह आणि मूलभूत तत्त्वज्ञानातील त्यांचा पाया

समतेच्या सिद्धांतावरील उतारा

नैसर्गिक नियमाच्या व उपयुक्ततावादाच्या तत्त्वज्ञानांनी आर्थिक सिद्धांतात समतेच्या तत्त्वाचे अतिजहाल स्वरूपात बीजारोपण केले; पण त्याबरोबरच त्यांनी त्यावरचे उतारेही तयार केले : समतेचे तत्त्व संपूर्णपणे निरुपद्रवी बनेल अशा प्रकारच्या तत्त्वांचा पूर्ण संच त्यांनी तयार केला. ही तत्त्वे एका विवक्षित आशयाची भिन्न रूपांतरे आहेत: तो आशय असा की, अनेक बाबतींत अपवाद असल्याचे जमेस धरले तरी, बाजारपेठेच्या शक्तींना मुक्त वाव दिल्यास, एकंदरीत सर्वांना समाधान मिळेल अशी परिस्थिती तयार होईल; म्हणजेच अभिप्रेत अर्थ असा की समतेचे तत्त्व विसरण्यास हरकत नाही.

आमची तत्त्वज्ञाने व सिद्धांत जोपर्यंत अतिभौतिक आहेत तोपर्यंत अशा उपयुक्त तार्किक चमत्कारांची त्यांच्याकडून अपेक्षा करता येते. लोक नैतिक तडजोडीचे जीवन स्वतःच्या आवडीमुळे जगत नाहीत तर जवळजवळ निरुपायामुळे त्याचा स्वीकार करतात आणि त्यामुळे पुष्कळसा तार्किक गोंधळ त्यांच्यात असतो; अशा परिस्थितीत, धर्माप्रमाणेच तत्त्वज्ञान व सिद्धांत यांच्यापासून ते आदर्शावरील उताऱ्याचीच मागणी करतात. उलट, विचारांत व भावनांत खरोखरी विसंगती असते, तिच्या ऐवजी सुसंगतीचा आभास निर्माण करण्यास मदत करण्याचे सामर्थ्य अतिभौतिक कल्पनांत असते, आणि संधीसाधू हितसंबंधांचे मानसशास्त्रीय समर्थन करण्याचे सामर्थ्य त्यांत असते; आपल्या विचारसरणीमधून अतिभौतिकवाद काढून टाकणे इतके बिकट का ठरले आहे याचे स्पष्टीकरण या दोन कारणांत मिळते. अतिभौतिकवाद उपयुक्त असतो: तो आपली स्वसमर्थनाची गरज भागवितो.

कालक्रमाने अतिभौतिक सिद्धांतांचे मी, ज्यांना पूर्वानुकूलग्रह म्हटले आहे त्यांच्यात

रूपांतर झाले. संधीसाधू हितसंबंधामुळे समतेच्या सिद्धांतापासून पलायन करण्याची लोकांना गरज होती, तिच्यावरच ह्या अमूर्त कल्पनांचे अस्तित्वात रहाण्याचे आणि प्रभाव कायम टिकविण्याचे सामर्थ्य आधारलेले होते. त्याचप्रमाणे, अद्यापही पारंपारिक आर्थिक सिद्धांताची सर्वसाधारण घडण घडवीत असलेल्या तत्त्वज्ञानात, एके काळी या कल्पना खोलवर रुजल्या होत्या आणि म्हणूनच तर्कशुद्ध टीकेचा त्या प्रतिकार करू शकतात.

हितसंबंधांची सुसंगती

हितसंबंध सुसंवादी असतात हा आर्थिक सिद्धांतातील मूलभूत पूर्वानुकूलग्रह आहे. जीवनाच्या सोडतीत ज्यांच्या नशिबाने शुभ क्रमांक काढला आहे त्यांना हा विचार सुखविणारा आहे.

सुमारे दोनशे वर्षांपूर्वी, पहिल्या सर्वसाधारण आर्थिक सिद्धांताचा पाया नैसर्गिक नियमाच्या तत्त्वज्ञानाने घातला, त्याला हा विचार ही स्पष्टपणे ज्ञात असलेली धारणा होती.

त्यानंतर आर्थिक सिद्धांताचा तात्त्विक पाया म्हणून उपयुक्ततावादाचे तत्त्वज्ञान कार्य करू लागले; त्यात हितसंबंधांचे सुसंवादित्व असते हे गृहीततत्त्व अधिक दूरान्वयाची बाब झाली, आणि ते पुष्कळदा अव्यक्त गृहीततत्त्वात लपविण्यात येऊ लागले, आणि केव्हा केव्हा सर्वसाधारण तत्त्वांच्या पातळीवर स्पष्टपणे त्याचा त्याग करण्यात आला; उदाहरणार्थ बेंथामकडून. आणि इंग्लंडमधील अनेक आद्य अर्थशास्त्रज्ञांची सैद्धांतिक विचारसरणी हितसंबंधांत संघर्ष असतो ह्या जाणिवेवर आधारली गेली; उदाहरणार्थ, रिकार्डोचा विभाजनाचा सिद्धांत.

परंतु, अखेरीस, उपयुक्ततावादावर आधारलेल्या आर्थिक विचारसरणीतदेखील हितसंबंधांच्या सुसंवादाची कल्पना व्यावहारिक व राजकीय निष्कर्षात घुसली आणि ती तिचा मुख्य पूर्वानुकूलग्रह बनली. कारण, उपयुक्ततावाद्यांना सुख-दुःखाच्या संवेदनांच्या सुखापेक्षक यंत्रणेच्या द्वारे प्रत्यक्ष वर्तणूक व नैतिक वर्तणूक या दोन्हींचे स्पष्टीकरण करण्याच्या प्रयत्नासाठी ती आवश्यक व आनुशंगिक होती.

"कसे आहे" व "कसे असावे" याची मुळात एकरूपता साधण्याचाही तो प्रयत्न होता; आणि, नैसर्गिक नियमाच्या तत्त्वज्ञानात मानण्यात आले आहे त्याप्रमाणे, अशी एकरूपता समाजातील हितसंबंधातही सुसंवाद गृहीत धरते: प्रत्यक्षपणे ज्ञात झालेली उपयुक्तता व नैतिक दृष्टीने उपयुक्तता यांमध्ये प्रत्यक्ष जीवनात तफावत पडते ती केवळ "योगायोगाने झालेले चुकीचे मापन असते," असें स्पष्टीकरण त्यांनी केले; उद्धृत केलेला वाक्यांश बेंथामचा आहे. हितसंबंधांच्या सुसंवादाचे गृहीततत्त्व सोडून दिल्यास, उपयुक्ततावादाच्या प्रत्यक्षानुभवावर आधारलेल्या तत्त्वज्ञानाला वस्तुनिष्ठेचा दावा सोडून द्यावा लागेल.[१]

ज्या धोरणामुळे "अधिकात अधिक", "सर्वांचे कल्याण" होईल ती धोरणे प्रत्यक्षानुभवाने ठरविण्याची उपयुक्ततावाद्यांची घोषित पद्धत म्हणजे सुख-दुःखांची सामाजिक मोजणी करणे, ही होती; परंतु व्यवहारात त्यांना ही मोजणी करता येईना; आणि म्हणून त्यांनी सुसंवादाचे गृहीततत्त्व ज्ञानशास्त्राच्या पातळीवरून निरनिराळ्या प्रासंगिक राजकीय प्रश्नांच्या संबंधात व्यावहारिक चर्चेच्या पातळीवर आणले.[२] कारण, व्यक्तीव्यक्तींमधील हितसंबंधांची एकवाक्यता गृहीत धरता आली तर तिचे निश्चित मोजमाप करावे लागणार नाही, आणि संपूर्ण समाजाचे हितसंबंध शोधून काढण्यासाठी त्यांची गोळाबेरीज करावी लागणार नाही, असे त्यांना वाटले; शिवाय मोजणीवर अवलंबून नसलेली सर्वाधिक सुखसंबंधाची परिस्थिती स्वतंत्रपणेच त्यांनी सांगितली होती. परंतु ह्या पातळीवर हे गृहीततत्त्व निरनिराळ्या युक्तिवादांतील अभिप्रेत दुवा म्हणून झाकले गेले होते व हल्लीही तसेच असते.

परस्परांशी निकट संबंधित असलेल्या ह्या दोन तत्त्वज्ञानांमधून आपले सर्व आधुनिक आर्थिक व सामाजिक सिद्धांत निघाले आहेत. ह्या दोन्ही तत्त्वज्ञानांत, राज्यसत्तेच्या "हस्तक्षेपा"च्या प्रभावाखाली काम करणाऱ्या संस्थांच्या कार्यामुळे हितसंबंधांचा नैसर्गिक सुसंवाद प्रत्यक्षात अस्तित्वात येत नाही, यावर भर दिलेला आहे. समाजाला हितसंबंधांच्या नैसर्गिक सुसंवादाकडे वळविण्यासाठी संस्थांमध्ये कोणते व किती बदल आधी घडवून आणावे लागतील, ह्या प्रश्नावर दोनशे वर्षांपर्यंत जहाल व जुन्या वळणाच्या लेखकांत चर्चा चालली होती, असे चर्चेची मध्यवर्ती कल्पना शोधून काढल्यास आढळून येते.[३] या सर्वसाधारण विधानाला मार्क्सदेखील अपवाद नाही; समाज एका अवस्थेमधून दुसऱ्या अवस्थेकडे जात असतानाच्या गतिशील प्रक्रियेवर त्याने लक्ष केंद्रित केले होते. समाजाच्या अंतिम अवस्थेवर केलेले नव्हते, तरीदेखील वरील निष्कर्ष मार्क्सलाही लागू होतो.

परंतु, आर्थिक सिद्धांताच्या विकासाची दिशा मुख्यतः जुन्या परंपरावादी लेखकांनीच ठरविली. ९व्या प्रकरणाच्या अखेरीस मी उल्लेख केल्याप्रमाणे, ते सनातनी होते ह्या योगायोगामुळे त्यांच्या सिद्धांताचे भवितव्य यशस्वी ठरले. कारण ते सुसंवादाच्या नैसर्गिक स्थितीबद्दल आस्था बाळगून होते, असा त्याचा अर्थ होता. सुसंवादाची ती नैसर्गिक स्थिती, त्यांच्या मताने, त्यांना दिसणाऱ्या जगासारखीच पुष्कळशी होती. सामाजिक वस्तुस्थितीचे अंतिम हेतुवादाच्या दृष्टीने त्यांनी विश्लेषण केले आणि ते सहजपणे मान्य झाले; कारण त्यात प्रस्थापित "जैसे थे" परिस्थितीचे प्रतिबिंब होते. यालाच मी "सनातनीपणाचा वास्तववाद" म्हटले आहे.

आज आपल्याला जे जग दिसते, किंवा त्यात शुद्धीकरणाच्या काही सुधारणा घडवून आणल्यानंतर ते जसे होईल त्यात हितसंबंधांचा स्वाभाविक सुसंवाद आहे किंवा असेल असा दृढ विश्वास आपल्याला मुळीच वाटत नाही; पूर्वीच्या तत्त्ववेत्त्यांना तो वाटत असे. परंतु, अपेक्षित परिणामांबद्दल आपण आपली धोरणात्मक

मते ज्या पद्धतीने तयार करतो व हेतूपूर्वक मांडतो त्यांची काळजीपूर्वक पहाणी केली, किंवा निवडणुकीच्या मोहिमेत वृत्तपत्रांत येणारे प्रमुख लेख, राजकीय पक्षांचे कार्यक्रम व भाषणे यांचे तशाच रीतीने पृथक्करण केले, किंवा संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेतील चर्चेचे विश्लेषण केले, आणि शिवाय आपल्या आर्थिक सिद्धांतांची पहाणी केली व ते ज्या पद्धतीने आर्थिक समस्यांचा विचार करतात त्याचे स्पष्टीकरण शोधले, आणि त्यातून आपल्या विचारपद्धतीचा विस्तृत ढाचा समजून येईल इतकी अलिप्तता ठेवण्यात आपल्याला यश मिळाले तर आपल्या विचारसरणीवर हितसंसंबंधांच्या सुसंवादाच्या ह्या जुन्या सिद्धांताने किती दृढ पकड कायम ठेवली आहे, हे आपल्याला समजून येईल आणि आश्चर्य वाटेल.

"जैसे थे" चे तत्त्व

दुसरा एक, थोडासा निराळा पण हितसंबंधांच्या सुसंवादाच्या तत्त्वाशी निकट संबंध असलेला पूर्वानुकूलग्रह आहे; तो म्हणजे सरकार-विरोधी किंबहुना "संघटना-विरोधी" पूर्वग्रह. सर्वसाधारणपणे "जैसे थे"ची प्रवृत्ती म्हणून तो ओळखला जातो.

नैसर्गिक नियमाच्या व उपयुक्ततावाद्यांच्या तत्त्वज्ञानांत अणुमय व्यक्तिवाद जाणूनबुजून गृहीततत्त्व म्हणून स्वीकारण्यात आला होता; राज्यसत्तेला व इतर सामुदायिक संघटनांना सजीव स्वरूप आणि वास्तविकपणे मर्यादित प्रमाणात का होईना पण, हितप्रवणता, हक्क व कर्तव्य असलेले व्यक्तिमत्त्व, बहाल करण्याच्या पूर्वीच्या व तत्कालीन तत्त्वज्ञानांविरुद्ध बंड म्हणून त्यांनी ह्या गृहीततत्त्वावर भर दिला. अशा रीतीने नैसर्गिक हक्कांच्या तत्त्वज्ञानात सुखवादी तत्त्वज्ञानाचे मानसशास्त्र आधीच अभिप्रेत धरण्यात आले होते; व्यक्तीव्यक्तींच्या हितांची बेरीज करून "सर्वांच्या कल्याणा"ची गणना करण्याच्या प्रयत्नांचा आधार म्हणून त्या मानसशास्त्राचा इंद्रियानुभवी उपयुक्ततावाद्यांनी विस्तार केला. ही गणना आणखी एका पुढील टप्प्याच्या गृहीततत्त्वावर आधारण्यात आली—किंवा त्याच्याशी जुळण्यासाठी ती ठाकठीक करण्यात आली; समाजातील हितसंबंधांत सुसंवाद असतो हे ते गृहीततत्त्व; यामधूनच मी ज्याचा उल्लेख केला आहे तो खास राजकीय पूर्वग्रह निर्माण होतो.[४]

नैसर्गिक नियमाच्या तत्त्वज्ञानाचे प्रारंभीचे प्रतिपादक असलेल्या फिजियोक्रॅटस् या विशिष्ट विचारसरणीच्या अर्थशास्त्रज्ञांच्या दृष्टीने "जैसे थे"चा पूर्वग्रह कार्यक्रमबद्ध होता; वैयक्तिक हितसंबंधाची "नैसर्गिक व्यवस्था" पूर्णत्वाने अस्तित्वात न येण्याचे मुख्य कारण त्यांच्या मते राज्यसंस्थेचा व इतर सामुदायिक संघटनांचा हस्तक्षेप हे होते. मी ४थ्या प्रकरणात निर्देशित केल्याप्रमाणे, त्यांच्या काळातील राज्यसत्ता व तिच्या संघटित हितसंबंधी उप-संस्था, आपली आधुनिक "कल्याणकारी राज्यसंस्था" ज्याकडे वाटचाल करीत आहे त्या प्रकारच्या नव्हत्या; उलट अत्यंत

सर्वसाधारणपणे ज्यांचे वर्णन " जुलुमी राज्यसत्ता " असे करता येईल अशा होत्या.

फिजियोक्रॅटस्‌पेक्षा बेंथॅमचा आरंभ निराळा होता; नैसर्गिक नियमाच्या गृहीत-तत्त्वात अभिप्रेत असलेल्या ज्ञानपूर्व अध्यात्मवादाचा त्याने कडक शब्दांत धिक्कार केला आणि अनुभवजन्य रीतीने सिद्ध झालेल्या संवेदनांवरच आपले तत्त्वज्ञान आधारलेले असून, त्यांतूनच सार्वजनिक नीतिमत्ता व कायदे, म्हणजे सरकारचे हस्तक्षेप, यांचे नियम काढण्यात आले आहेत असे त्याने प्रतिपादन केले. सत्य परिस्थितीच्या अवलोकनावरच संपूर्णपणे विसंबून राहून नैतिक व राजकीय मते प्रस्थापित करण्याच्या कोणत्याही प्रयत्नांचा जो परिणाम होतो तोच बेंथॅमच्या प्रयत्नांचा आर्थिक क्षेत्रातील विचारांवर झाला; आधी निर्देश केलेल्या कारणांमुळे वैयक्तिक हितसंबंधांच्या सुसंवादाच्या तत्त्वाकडे तो पुन्हा घसरला. त्या तत्त्वात अविभाज्यपणे शासनसंस्थांविरोधी व संघटनाविरोधी पूर्वग्रह आहे. विशेषत: प्रत्यक्षात अस्तित्वात असलेल्या समाजासारखाच आदर्श समाज असेल अशी कल्पना करून त्याच्या विश्लेषणावर लक्ष केंद्रित केल्यास परिस्थिती यापेक्षा निराळी निर्माण होत नाही; आणि एकंदरीने बेंथॅमचा दृष्टिकोन तसाच होता; बेंथॅमचे अनुयायी असलेल्या सर्व लेखकांचा निश्चितपणे असाच दृष्टिकोन होता आणि " सनातनीपणाच्या वास्तववादा "मुळे आर्थिक सिद्धांताच्या विकासाची मुख्य दिशा त्यांच्याच विचारांमुळे ठरली गेली.

मार्क्सला मात्र त्याच्या आजूबाजूला दिसणारा समाज कधीच आदर्श वाटला नाही. सभोवतालच्या भांडवलदारी समाजातील, आंतरविरोधांचे त्याने विश्लेषण केले. तो जर्मन अभ्यासक व विशेषत: हेगेलचा विद्यार्थी असल्यामुळे स्थिर समतोलाच्या कल्पनेने त्याच्या मनाला कधीच जखडले नाही; चक्राकार व रचनात्मक बदलांच्या अभ्यासात पुष्कळ कल्पकता दाखविण्यास त्याला त्यामुळे नि:संशय मदत झाली. त्याने हितसंबंधांच्या सुसंवादाच्या तत्त्वावर कडाडून हल्ला चढविला. त्याने सर्व इतिहास हा वर्गलढ्यांचा अनुक्रम असून उत्पादन-साधनातील बदलांमुळे त्याच्या अवस्था बदलत असतात अशा दृष्टिकोनातून इतिहासाकडे पहाण्याचा प्रयत्न केला; सत्ताधारी वर्गाचे जुलूम करण्याचे हत्यार म्हणजे राज्यसंस्था असे त्याने तिचे निदान केले. हे सर्व असले तरी, अखेरीस कामगार-क्रांतीनंतर राज्यसंस्था " नष्ट होऊन ", " मुक्त समाज " निर्माण होईल अशा गोड अराजकवादी स्वप्नात मार्क्सच्या तत्वज्ञानाचा शेवट झाला. त्याच्या विधानांच्या अचूक स्पष्टीकरणाचा विवाद्य मुद्दा बाजूला ठेवला तरी, मार्क्सने क्रांतीनंतर पार पाडावयाच्या संघटित आर्थिक धोरणांच्या पद्धतीबद्दल सविस्तर विचार केला नाही ही गोष्ट महत्त्वाची आहे; सध्या समाजवादाचे खरे तत्त्व म्हणून मान्यता पावलेल्या " आर्थिक नियोजना "च्या कल्पनेला त्याच्या विचारांत फारसे महत्त्वाचे स्थान नव्हते.

ज्ञानयुगाच्या प्रारंभानंतरच्या काळात, आर्थिक सिद्धांताचा जो विकास झाला, त्याच्या संपूर्ण परंपरेत सिद्धांताच्या पातळीवर, व्यक्तिवादाची स्वयंपूर्णता, आणि

व्यवहारात राज्यसंस्थाविरोधी व संघटनांविरोधी पूर्वग्रह होते. या पूर्वग्रहापासून आपल्या समाजव्यवस्थेचे व सामाजिक तत्त्वज्ञानाचे टीकाकार किंवा अन्य कोणीही दूर राहू शकले नाहीत. आधुनिक सैद्धांतिकांना सर्व प्रकारची साधनसामुग्री उपलब्ध असूनही त्यांच्याजवळ बेंथॅम किंवा मार्क्स यांच्यासारखी क्रांतिकारक बौद्धिक इच्छा अगर सामर्थ्य नव्हते. त्यामुळे त्यांना परंपरेने चालत आलेल्या सिद्धांतांचा अलिप्त राहून विचार करता आला नाही, अगर स्वतःच्या नव्या रचना करण्याचेही धाडस झाले नाही; आधुनिक विचारसरणीचा विकास मुख्यतः अशा सैद्धांतिकांनीच केला आहे. आणि म्हणून वर उल्लेख केलेल्या पूर्वानुकूलग्रहांच्या सीमांमध्येच अलिकडील आर्थिक विचारसरणी अडकून राहिली आहे याबद्दल आपल्याला आश्चर्य वाटावयास नको.

आपल्या संशोधनाची साधनसामुग्री वाढल्यामुळे आपल्याला सामाजिक व राजकीय संस्थेबद्दलचे अनुभवजन्य ज्ञान अतिशय वाढविता आले आहे; परंतु वालरस, जेव्हन्स व एजवर्थ यांच्यानंतर, दूरवरच्या कोनाकोपऱ्यात अर्थशास्त्राच्या इकॉनॉमेट्रिक्स शाखेचा प्रसार होत असताना सर्वसाधारण आर्थिक सिद्धांत जुन्या पूर्वानुकूलग्रहांना धरूनच राहिले. सर्वसाधारण आर्थिक सिद्धांतांचा अनुभवजन्य संशोधनापेक्षा धोरणाच्या आदेशांशी अधिक संबंध असल्यामुळे याला विशेषच महत्त्व आहे. दरम्यानच्या काळात, संस्थांच्या अनुभवजन्य अभ्यासाने सिद्धांताशी मिळते घेण्याची प्रवृत्ती दाखविली आहे; किंवा ते आश्चर्य वाटेल इतके भोंगळ राहिले आहेत; कारण सध्याचे वातावरण बौद्धिक दृष्टीने मूलभूतपणे पूर्वानुकूलग्रहांचे आहे.

मुक्त व्यापाराचे तत्त्व

मी आता ज्याचा उल्लेख करणार आहे ते मुक्त व्यापाराचे तत्त्व आर्थिक सिद्धांतातील तिसरा मुख्य पूर्वानुकूलग्रह आहे; ते बहुधा सैद्धांतिक विश्लेषणाचा निष्कर्ष म्हणून मांडण्यात येते; मात्र वास्तविकपणे ज्यातून संपूर्ण विश्लेषणाला आकार प्राप्त झाला असा हा साचा आहे. हितसंबंधांच्या सुसंवादाच्या गृहीततत्त्वाचा तो निश्चित स्वरूपाचा उपसिद्धांत आहे. आणि त्या गृहीततत्त्वात अंतर्भूत असलेला राज्यसंस्था-विरोधी प्रतिकूल ग्रह तो व्यक्त करतो. ह्या सर्व सामान्य कल्पना परस्परांत गुंतलेल्या आहेत; विचारांच्या ज्या प्रभावी रचनेचे स्वरूप स्पष्ट करण्याचा मी येथे प्रयत्न करीत आहे तिचेच ते निरनिराळ्या प्रकारांनी स्वीकारण्यात आलेले पर्याय आहेत.

हस्तक्षेप न करण्याच्या सर्वसाधारण धोरणाचे कट्टर विरोधकही मुक्त व्यापा-राच्या तत्त्वाच्या आकर्षणापासून बहुधा अलिप्त होऊ शकत नाहीत, हे त्याच्या व्यावहारिक विजयाचे द्योतक आहे.[५] अशा रीतीने, उत्पादनात हस्तक्षेप न करण्याचा अगर मुक्त व्यापाराचा हेतू केवळ साध्य साधण्याचा मार्ग असा न मांडला जाता, खास परिस्थितीत मुक्त व्यापाराच्या तत्त्वाला अपवाद का करण्यात यावेत याची कारणे

सांगण्यासाठी केला जातो.

आंतरराष्ट्रीय व्यापार व व्यापारी धोरण यांच्या सिद्धांताला संदर्भ देणाऱ्या अटी दाखविण्यासाठी तर मुक्त व्यापाराच्या तत्त्वाला मान्यता देण्यात आलीच आहे, पण शिवाय अधिक व्यापक स्वरूपात, राष्ट्राच्या आर्थिक जीवनातील सरकारी किंवा सामूहिक हस्तक्षेपासंबंधीच्या सर्व चर्चांमध्येही त्याला मान्यता देण्यात आली आहे. हस्तक्षेप करण्याची बाजू मांडणाऱ्यांवरच पुरावा देण्याची जबाबदारी असते, असे समजले जाते.

तर्कशास्त्राच्या दृष्टीने हे खरोखरीच काहीसे आश्चर्यकारक आहे. सिद्धांत म्हणून मुक्त व्यापाराचे तत्त्व समर्थनीय नाही.[६] हे तत्त्व काही बाबतीत सयुक्तिक आहे असे चर्चेसाठी मान्य केले तरी, सिद्धांतकारांच्या विश्लेषणानंतर ते व्यवहारात ज्या स्वरूपात मांडण्यात येते त्यात अनेक अमूर्त गृहीततत्त्वे व राखीव कल्पना असतात. तेव्हा, भरीव कृतीसाठी मांडण्यात आलेल्या सर्वसाधारण व्यावहारिक गृहीततत्त्वात जर अमूर्त गृहीततत्त्वे व राखीव कल्पना असल्यामुळे ते मर्यादित झाले तर त्याचा अर्थ तरी काय ? असा प्रश्न उपस्थित होतो.[७]

त्यातील एक गृहीततत्त्व तर विशेषच ढोबळ आहे; ते म्हणजे मुक्त स्पर्धेचे. मुक्त स्पर्धा होऊ शकेल अशी परिस्थिती कधीच अस्तित्वात नव्हती; आणि समाजातील वास्तविक कल तिच्यापासून अधिकच दूर जाण्याचा आहे. विशिष्ट देशातील विशिष्ट धोरणात्मक उपायांमुळे, मुक्त स्पर्धेच्या काल्पनिक परिस्थितीच्या आपण अधिक सन्निध जाऊ की तिच्यापासून अधिक दूर जाऊ, याचा निर्णय करणेही सर्वसाधारण-पणे शक्य नसते.

तेव्हा, शुद्ध तर्कशास्त्राच्या दृष्टीने विचार करता नकर्तेपणाच्या धोरणाला संशयाचा फायदा का देण्यात यावा ? मुक्त व्यापाराच्या तत्त्वाला परिस्थिती तयार करणारी एकमेव कल्पना म्हणून का वाव देण्यात यावा ? हस्तक्षेप, अपवाद म्हणून समर्थनीय आहेत का—या निकषावर का पडताळले जावेत ? आपण मांडलेली वस्तु-स्थिती सत्य व आपली विचारसरणी अचूक आहे की नाही, याबद्दल आपण नेहमी-प्रमाणेच, साध्य व साधनांच्या दृष्टिकोनातून काळजी घ्यावी, हाच नियम का स्वीकारला जाऊ नये ? हे प्रश्न मी तीस वर्षांपूर्वी उपस्थित केले, आणि त्यानंतर केलेल्या अभ्यासामुळे व आलेल्या अनुभवांमुळे माझ्या ह्या साक्षेपी विचारांना दुजोराच मिळाला आहे.

समतोलाची कल्पना

आर्थिक सिद्धांताच्या पारंपारिक तत्त्वांच्या व पूर्वग्रहांच्या पद्धतीमधील अखेरचा दुवा म्हणजे स्थिर समतोलाची कल्पना होय. पहिल्या प्रकरणात मी, आर्थिक पद्धती-मधील सर्व घटकांचे सार्वत्रिक परस्परावलंबन सरळ रीतीने समजण्यासाठी व

निदर्शनास आणण्यासाठी स्थिर समतोलाची कल्पना हे एक सोईस्कर साधन आहे, आणि अनेक आर्थिक चर्चांमध्ये ती जवळजवळ अत्यावश्यक तार्किक पायरी आहे, अशी त्या कल्पनेची जमेची बाजू मांडली होती.

परंतु, इतर दुसऱ्या काही गृहीततत्त्वांच्या बरोबरच, स्थिर समतोलाच्या गृहीत-तत्त्वालाही आणखी एक कार्य पार पाडावयाचे असते; ते ह्या प्रकरणात विश्लेषण केलेल्या तत्त्वांना व पूर्वानुकूलग्रहांना अभिव्यक्ती देण्याचे आणि तर्कशुद्ध "पुरावा" देण्याचे आवश्यक साधन म्हणून कार्य करते; उदाहरणार्थ मुक्त व्यापाराच्या तत्त्वाला. अशा रीतीने, आपल्या पारंपारिक आर्थिक सिद्धांताच्या आध्यात्मिक चौकटीत, स्थिर समतोलाच्या तत्त्वाने अंतिम हेतुवादाचे महत्त्व टिकवून धरले आहे; समाजस्थितीचे विश्लेषण करण्यासाठी वापरण्यात येणारे निवडक सैद्धांतिक हत्यार हा त्याचा साधा व तांत्रिक हेतू तर आहेच.

गेल्या दोनशे वर्षांतील आपल्या सर्व आर्थिक व सामाजिक विचारात स्थिर समतोलाची कल्पना भरून राहिलेली आहे, आणि तिने अगदी आजतागायत, फक्त अर्थशास्त्रातीलच नव्हे तर सर्वच समाजशास्त्रातील मुख्य विचार निश्चित केले आहेत. मी मांडलेल्या विचारावरून, समतोलाच्या अवस्थेला विधायक मूल्यात्मक अर्थ देण्याची उत्सुकता का असते हे समजून येते; अशीच उत्सुकता दोनशे वर्षांपूर्वी नैसर्गिक सुव्यवस्थेच्या कल्पनेच्या बाबतीत होती आणि ती कल्पना हे स्थिर समतोलाच्या दृष्टिकोनातून एक खास उदाहरण होते. त्याचप्रमाणे, अस्थिर-समतोलाची कल्पना, किंवा "अव्यवस्था", "दुर्व्यवस्था", "सामाजिक मागासलेपणा" व "अरिष्टे" यांना विघातक मूल्यात्मक अर्थ देण्याची उत्सुकता का होती, हे समजून येते–निरनिराळ्या समाजशास्त्रीय विचारांत वापरल्या जाणाऱ्या काही समानार्थी शब्दांचाच मी वर उल्लेख केला आहे.

वास्तविकता समतोलात नसते असे सर्वसाधारणपणे गृहीत धरण्यात येत होते. परंतु तरीसुद्धा तत्त्व असे सांगते की समतोलाला "वास्तविकता वस्तुतः" होतीच; कारण कोणताही अडथळा आला तरी समतोलाच्या अवस्थेकडेच जाण्याचा सर्व खऱ्या वास्तविकतेचा कल असतो. वस्तुतः समतोलाची ही अवस्था त्याच वेळी खऱ्या वास्तविकतेबद्दल मूल्यात्मक निवाडा करण्याचा नियम म्हणून वापरता येत होती. फिजियोक्रॅट्स् आणि आद्य अर्थशास्त्रज्ञ यांची विचारसरणी हीच होती; आणि नव्या अर्थशास्त्रज्ञांच्या सर्वसाधारण समतोलाच्या सिद्धांतात ह्या कल्पनेचे अत्यंत व्यापक-पणाने विस्तृत केलेले सुधारलेले रूप प्रगट झाले आहे.

परंतु, नट् विकसेल म्हणत असत की, सैद्धांतिक विश्लेषणासाठी वापरता येतील असे समतोलाचे अनेक संभाव्य पर्यायी विचार आहेत. आरंभीच्या अर्थशास्त्रज्ञांनी आर्थिक समतोलाच्या विश्लेषणात वापरलेला त्यातील एक प्रकारपुढीलप्रमाणे होता: लोंबणारा लंबक किंवा एखाद्या भांड्यातील चेंडू एकदा समतोलाच्या अवस्थेत गेला

व त्याला पुन्हा हालविला नाही तर ज्या प्रकारच्या समतोलाचे उदाहरण मिळते ते परिस्थिती स्थिर रहाते असे दर्शविते.

गुळगुळीत पृष्ठभागावर लंबवर्तुळाकार वस्तू फिरविली—तर दुसऱ्या एका प्रकारच्या समतोलाचे उदाहरण मिळते; ती वस्तू कोठेही थांबेल; किंवा घर्षणाचा संपूर्णपणे अभाव असेल तर ती पहिल्याच वेगाने व पहिल्याच दिशेकडे घरंगळत राहील, आणि त्याची ती हालचाल हाच त्याचा समतोल असेल.

समतोलाचा तिसरा प्रकार समतुल्य शक्तींची "अस्थिर अवस्था" हा होऊ शकतो; आपण पेन्सिल एका टोकावर उभी करू शकलो तर ती अशा स्थितीत रहाते; तिला आपण धक्का दिला तर मात्र तिच्या समतुल्य शक्तींचा तोल ढासळून ती ह्या अवस्थेपासून ढळेल व तिच्यात वाढती गती निर्माण होईल.

गेल्या दोन पिढ्यांत, वास्तविकपणे, अर्थशास्त्रातील बहुतेक सैद्धांतिक विकास पारंपारिक स्थिर समतोलाच्या कल्पनेला सोडून झालेला आहे. कीन्सच्या व कीन्स-नंतरच्या विश्लेषणाच्या मोठ्या भागाचे हेच वैशिष्ट्य आहे; त्यांची सर्वसाधारण सैद्धांतिक चौकट मात्र निराळी आहे. बाजारपेठेच्या दरापेक्षा व्याजाचा "नैसर्गिक" दर भिन्न असतानाच्या परिस्थितीचे विकसेलने केलेले संचयी व वाढत्या प्रक्रियेचे आर्थिक समतोलापासून दूर जाण्याचे विश्लेषण हे त्याचे आणखी एक उदाहरण आहे आणि ते आधीचे आहे.

याहीपूर्वी, मार्शलचा बाह्य काटकसरीचा सिद्धांत, आणि वास्तविकपणे त्याही पूर्वीचे वाढत्या फायद्यासंबंधीचे विश्लेषण, स्थिर समतोलाच्या कल्पनेच्या वर्चस्वा-खालील क्षेत्राच्या पुष्कळच बाहेर जाऊन पोहोचले होते. प्रारंभीच्या ग्रंथकारांनीही, अल्पमुदतीच्या समतोलाच्या सिद्धांताशिवाय, दीर्घमुदतीच्या आर्थिक विकासाचेही विश्लेषण केले होते-खरे म्हणजे नव-आद्य ग्रंथकारांपेक्षा त्यांनी ते अधिक केलेले होते; आणि त्याचा एक भाग समतोलाच्या विश्लेषणाच्या चौकटीच्या पुष्कळच बाहेर गेला होता. अर्ध-विकसित देशांच्या आर्थिक विकासासंबंधी सध्या उत्साहवर्धक चर्चा चालू आहे, त्या चर्चेत विकसनशील नमुन्यांच्या आदर्श (मॉडेल) रचनेच्या प्रश्नांचाही समावेश असतो; आणि ही चर्चाही पुष्कळदा स्थिर समतोलाच्या दृष्टिकोनाच्या चौकटीच्या बाहेर जाते.

अलिकडील दशकात गतिशील आर्थिक सिद्धांताची रचना करण्याच्या पद्धतशीर प्रयत्नांसाठी पुष्कळच श्रम खर्ची पडले आहेत. या नव्या दृष्टिकोनाने, स्थिर समतो-तोलाच्या कल्पनेला, तर्कशुद्ध विश्लेषणाने सापेक्ष बनविले आणि तिला तिचे योग्य स्थान प्राप्त करून दिले; ही कल्पना म्हणजे अनिश्चित, जवळजवळ अपरिपक्व आणि बहुधा अवास्तव सैद्धांतिक गृहीततत्त्व आहे हे त्याने स्पष्ट केले.

परंतु, स्थिर समतोलाची कल्पना आपल्या परंपरेत केवळ सैद्धांतिक गृहीततत्त्वच नाही; तो एक दृढमूल झालेला दणकट पूर्वग्रह आहे; आणि टीकेचे महाप्रहार सोसूनही

त्याने आपल्या सैद्धांतिक दृष्टिकोनावरील प्रभाव टिकवून धरला आहे याचे स्पष्टीकरण हेच आहे; आणि तो प्रभाव इतका मोठा आहे की त्याची पूर्ण जाणीव करून घेणेही आपल्याला सोईस्कर वाटत नाही. विशेषत: आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांताची प्रचंड व प्रभावी रचना बहुतांशी दुराग्रहाने समतोलाच्या सिद्धांताचीच राहिली आहे. याची अधिक चर्चा मी पुढील प्रकरणात करणार आहे; मुख्यत: याच कारणासाठी आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत अर्धविकास व विकास आणि आंतरराष्ट्रीय विषमता यांच्या खऱ्या सिद्धांताचा पाया होऊ शकत नाही.

स्थिर समतोलाची कल्पना आता सिद्धांत म्हणून सुसंगतपणे स्वीकारली जात नाही; तरीदेखील आपल्या सैद्धांतिक दृष्टिकोनाला मार्गदर्शन करणारा शास्त्रीय पूर्वग्रह म्हणून तिचे स्थान कायम राहिले आहे. हितसंबंधांचा सुसंवाद, शासनविरोधी व "संघटना-विरोधी" कल आणि मुक्त व्यापाराचे गृहीततत्त्व हे वर उल्लेख केलेले आर्थिक सिद्धांतातील सर्व महत्त्वाचे पूर्वानुकूलग्रह या कल्पनेत अंतर्भूत असून त्यांच्याकडून तिला स्फूर्ति मिळालेली आहे.

विचाररहीत क्षेत्र

आर्थिक सिद्धांताचा पाया म्हणून मानण्यात आलेल्या समतेच्या तत्त्वावरील उतारा, असे मी आर्थिक सिद्धांतातील ह्या पूर्वग्रहांचे स्वरूप असल्याचे म्हटले आहे. तर्कशुद्ध रीतीने कोणतीही तडजोड होऊ शकत नाही : समतेचे तत्त्व दडपून टाकल्यामुळे संघर्ष लपला जातो. ह्या सर्वसाधारण नियमाचे उदाहरण म्हणून, आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराची चर्चा करणाऱ्या पुढील प्रकरणाचा परिचय म्हणून मी काही त्रोटक भाष्ये करणार आहे; परराष्ट्रीय देशांच्या हितसंबंधांच्या बाबतीत इंग्लंडमधील आद्य अर्थशास्त्रज्ञांनी जे विचारहीन क्षेत्र वाढीस लावले त्याबाबतीतील ही भाष्ये आहेत.

नैसर्गिक नियमाच्या व उपयुक्ततावाद्यांच्या तत्त्वज्ञानात, त्याचप्रमाणे समतेच्या तत्त्वातील महत्त्वाच्या विचारात असे प्रतिपादन होते की, सर्वसाधारण कल्याणाची गणना करताना प्रत्येकाला एक म्हणून मोजावे, आणि कोणालाही एकापेक्षा कमी अगर अधिक मानण्यात येऊ नये. हे तत्त्व आणि तत्त्वज्ञानांच्या आणि अर्थशास्त्रज्ञांच्या आशाआकांक्षा मिळत्याजुळत्या आहेत. ह्या अर्थशास्त्राचा विकास १८व्या शतकाच्या अखेरीस आणि १९व्या शतकाच्या प्रारंभी झाला; आणि हे अर्थशास्त्र व वर उल्लेखिलेले तत्त्वज्ञान यांना सामान्य तत्त्वज्ञान व सिद्धांत बनण्याची महत्त्वाकांक्षा होती. ह्या कालखंडातील ग्रंथकारांचा आपल्या विचारसरणीवर राष्ट्रीय मर्यादा पडू न देण्याचा निश्चय होता आणि तशी त्यांची बौद्धिक महत्त्वाकांक्षा होती; त्या कालखंडाची हीच प्रतिष्ठा होती आणि तिच्यामुळेच त्याला ज्ञान-युग म्हटले जाते. त्यांच्या पूर्वी जे विचार व्यक्त करण्यात आले होते त्यांपैकी बहुतेकांपेक्षा ते निराळे

ठरण्याचे कारणही हेच होते.

ह्या विचारसरणीचा स्वाभाविकपणेच एक अर्थ असा होतो की सर्व पृथ्वीवरील मानवजातीचे हित–म्हणजे मूलतः त्यांची "सुख-दुःखे"–हा आर्थिक सिद्धांताचा चिंत्य-विषय असला पाहिजे. मानवजातीच्या एखाद्या विशिष्ट शाखेच्या सभासदांच्या हितापुरतीच आर्थिक सिद्धांताची कळकळ मर्यादित रहावी हे आर्थिक सिद्धांताच्या तात्त्विक पायाशी तर्कशास्त्रदृष्टया सुसंगत ठरणार नाही. तत्त्वाच्या दृष्टीने हे स्वयंसिद्ध आहे आणि ते स्वयंसिद्ध आहे अशा दृष्टीनेच त्याकडे पाहिले गेले. महान आद्य अर्थशास्त्रज्ञांच्या परंपरेतील कोणीही ही गोष्ट स्पष्टपणे अमान्य केली नाही. अर्थशास्त्रातील आपल्या अत्यंत मोघम विचारांना व घोषणांना त्याने गेली दोनशे वर्षे विश्वबंधुत्वाचा सुगंध बहाल केला आहे.

परंतु, आंतरराष्ट्रीय संबंधविषयक प्रश्नांत मात्र, प्रथमपासूनच समतेचा सिद्धांत व्यवहारात चमत्कारिक रीतीने संपूर्णपणे पुसून टाकण्यात आला; शुद्ध राष्ट्रीय प्रश्नांच्या बाबतीत तो कधीही इतक्या मोठ्या प्रमाणावर पुसला गेला नव्हता. हा हेतू साध्य करण्यासाठी एक प्रकारचे संधीसाधूपणाचे दृष्टिहीन स्थान निर्माण करण्यात आले. प्राध्यापक लिओनेल रॉबिन्स यांनी अचूकपणे दाखवून दिल्याप्रमाणे,[८] उर्वरीत जगाच्या कल्याणासाठी ब्रिटनने त्याग करावा अशी शिफारस इंग्रजी आद्य अर्थ-शास्त्रज्ञांनी केल्याचे उदाहरण दाखविणे कठीण आहे. उदाहरणार्थ, जेव्हा त्यांनी मुक्त व्यापाराची सर्वसाधारण धोरण म्हणून शिफारस केली, तेव्हा मुक्त व्यापार जगाच्या हिताचा आहे म्हणून केली नाही; तर तो त्यांच्या स्वतःच्या देशाला हितावह होईल म्हणून केली.

इंग्रजी आद्य अर्थशास्त्रज्ञांनी आंतरराष्ट्रीय आर्थिक प्रश्नांचा विचार करताना, आपल्या विश्लेषणाचे उच्च नैतिक व राजकीय मार्गदर्शक तत्त्व म्हणून मानव-जातीच्या कल्याणाची कल्पना स्वीकारली नाही; तर त्यांनी ब्रिटिश राष्ट्राच्या कल्याणाच्या दृष्टीने हे विश्लेषण केले, ह्या महत्त्वाच्या मुद्यावर मला भर द्यावयाचा आहे. मात्र, त्यांच्या मूलभूत तत्त्वज्ञानाच्या व अमूर्त मूल्य विचारांच्या दृष्टीने मानव-जातीचे कल्याण हीच अधिक तर्कशुद्ध कल्पना ठरली असती. उलट संकुचित (राष्ट्रीय) कल्याणाच्या निकषाचा स्वीकार करताना त्यांनी स्वतःच्या स्पष्ट मूलभूत तत्त्वांच्या विरुद्ध वर्तन केले. या मुद्यावरील त्यांचे लेखन इतके पलायनवादी स्वरूपाचे का असते हे यावरून समजून येते.

मानसशास्त्रीय स्वसमर्थनाचे साधन या दृष्टीने मुक्त व्यापाराच्या तत्त्वाचा, या ठिकाणी अत्यंत सर्वसाधारण पातळीवर, उपयोग झाल्याचे उदाहरण पहावयास मिळते. ग्रेट ब्रिटनप्रमाणेच इतर सर्व राष्ट्रांनाही मुक्त व्यापार हितावह ठरेल असे सर्वसाधारण सिद्धांत म्हणून गृहीत धरता येते, आणि त्याला अनेक अपवाद असल्याचे मान्य केले तरी त्यांचा सर्वसाधारण सिद्धांतावर परिणाम होत नाही; म्हणून संकुचित

कल्याणाचा निकष स्वीकारल्यामुळे कोणाचेही अनहित होत नाही, असा निष्कर्ष काढता येतो. मात्र, पुढे विश्लेषण करताना, कोणाचे कल्याण वांछनीय मानण्यात आले आहे याबद्दल फार स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता नाही, असे समजणे सोपे जाते. अशा रीतीने, आद्य अर्थशास्त्रज्ञांना त्यांच्या विचारांत अस्तित्वात असलेल्या विचारहीन क्षेत्राची कबुली स्वतःला व वाचकांना देण्याचे टाळता आले; मुक्त व्यापाराच्या तत्त्वामुळे तसे करणे त्यांना अधिक शक्य झाले.

विकसित देशांमध्ये हा सिद्धांत घडविला जात होता; तेथे सार्वजनिक सदसद्-विवेकबुद्धीच्या दृष्टीने, म्हणजे अधिक सखोल भावनात्मक पातळीवर, ह्या विचारहीन क्षेत्राचा संबंध अर्थातच परदेशी लोकांबद्दलच्या परंपरागत उदासीनतेशी आहे; गेल्या प्रकरणात त्यावर मी भाष्य केले आहे; आणि ज्ञानयुगातील किंवा तदनंतरच्या मोघम विचारसरणीने तिच्यात फारसा बदल घडवून आणलेला नाही.

संदर्भ टिपा

१. "दि पोलिटिकल एलेमेंट इन दि डेव्हलपमेंट ऑफ एकॉनॉमिक थिअरी", पा. ४४, ४८ इ.

२. वर उल्लेख केलेले पुस्तक, पान ४३ व पुढे.

३. वरील पुस्तक पान ७१ व पुढे, आणि १०६ व पुढे.

४. सध्याचे विपुल, "कल्याणकारी अर्थशास्त्र"ही अभिन्नपणे याच आधुनिक मंत्राने भारावलेले आहे; ते व्यक्तिगत मानसशास्त्राच्या सहाय्याने आध्यात्मिक ध्येयाप्रत जाऊन पोहोचण्याची खटपट करते; हे ध्येय पूर्वानुकूलग्रहांनी आधीच निश्चित केलेले असते; विशेषतः तर्कशास्त्र दृष्टीने अंतर्भूत असलेल्या सुसंवादी हितसंबंधाने ते ठरविलेले असते; कारण ते नसेल तर कल्याणकारी विचारांची वस्तुनिष्ठता नष्ट होऊन जाईल; वर आलेला उल्लेख पहावा.

५. "दि पोलिटिकल एलेमेंट इन् दि डेव्हेलपमेंट ऑफ एकॉनॉमिक थिअरी", पृष्ठे १०४ व पुढे.

६. उपरोक्त ग्रंथ, पान १२९ व पुढे.

७. वरील पुस्तक पान १३४ व पुढे.

८. "आर्थिक धोरणांचा सिद्धांत" (दि थिअरी ऑफ इकॉनॉमिक पॉलिसी), मॅकमिलन, लंडन, १९५२, पा. ९ व पुढे.

प्रकरण ११ वे

आंतरराष्ट्रीय व्यापार आणि विषमतेची समस्या यांच्या सिद्धांतावरील एक टिपण

उत्पादनसाधनांच्या किंमतींचे समानीकरण

आंतरराष्ट्रीय आर्थिक विषमतेची वस्तुस्थिती कशी निर्माण झाली आणि तिची प्रवृत्ती वाढत जाण्याकडे का आहे, ह्या प्रश्नाचे कार्यकारणभावाच्या दृष्टीने स्पष्टीकरण आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांताच्या अध्ययनातून मिळणार नाही; मग ते अध्ययन कितीही सखोल असो. उलट, त्या सिद्धांतावरून कोणीही अशी अपेक्षा करावी की आंतरराष्ट्रीय विषमता आहेत तितक्या मोठ्या असता कामा नयेत, आणि त्या वाढण्याऐवजी कमी झाल्या पाहिजेत.

स्वीडनचे अर्थशास्त्रज्ञ ख्रिस्तवासी फोक हिलगर्ड[1] राष्ट्र-संघाच्या आर्थिक सचिवालयाचे सभासद असताना त्यांनी "आंतरराष्ट्रीय व्यापाराचे जाळे" या व संबंधित विषयावरील विचारात महत्त्वाची भर टाकली; त्यांनी तयार केलेले प्रबंध आता मूलग्रामी अभ्यासग्रंथ मानले जातात. अशाच एका प्रबंधात त्यांनी म्हटले आहे: "आधुनिक दळणवळण व व्यापार यांपासून सिद्धांतानुसार जे फायदे मिळावयास पाहिजेत ते पुष्कळशा अर्ध-विकसित देशांना मिळत नाहीत; आजच्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीमधील ही सर्वांत मोठी प्रासंगिक वस्तुस्थिती असून ती सहजासहजी दूर करता येणार नाही."

युरोपमधील कामगारांनी व भांडवलाने प्रचंड प्रमाणावर प्रवेश करून समशीतोष्ण प्रदेशातील सपाट भूमी "गोऱ्यांचा प्रदेश" म्हणून बनविली, आणि तेथे जलद व टिकावू आर्थिक विकास आणि जीवनमानाची चढती पातळी अस्तित्वात आली, ह्या वस्तुस्थितीचा हिलगर्ड वरील उताऱ्यात संदर्भ देत आहेत. ते पुढे म्हणतात, "परंतु, मोकळ्या जागा हळूहळू भरून निघाल्या तरी त्यामुळे जेथे कामगारांची संख्या सर्वांत भरपूर आहे अशा आशियातील अतिदाट लोकवस्तीच्या प्रदेशातील लोकसंख्येचा भार कमी झाला नाही." गेल्या २५ वर्षांत उत्पादनाच्या घटकांचे (उत्पादन साधनांचे) मोठ्या प्रमाणावरील स्थलांतर जवळजवळ बंद पडले आहे. परंतु, जेव्हा

असे स्थलांतर होत होते त्या कालखंडातही ते समानतेची शक्ती म्हणून कार्यक्षम ठरले नाही, हा हिलगर्ड यांचा मुद्दा आहे.

परंतु, आद्य अर्थशास्त्रज्ञांच्या सिद्धांतानुसार कामगारांचे व भांडवलाचे देशा-देशांमधील स्थलांतर घटक-किमतींच्या परिणामी उत्पन्नाच्या समानीकरणाच्या विकासासाठी आवश्यक नाही, हे आपण लक्षात ठेवूया. वस्तुत: उत्पादनाचे सर्व घटक अचल असतात ह्या अमूर्त गृहीततत्त्वावरच मुख्यत: आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत विकसित करण्यात आलेला होता. आद्य अर्थशास्त्रज्ञांच्या मांडणीतच असे अंतर्भूत होते की, केवळ किमतींचे संबंधच नव्हेत तर निरनिराळ्या देशांतील घटक किमती (म्हणजे उत्पादन साधनांचा खर्च) क्रमश: व काही प्रमाणात, समान होण्याची प्रक्रिया व्यापारामुळे सुरू होते. मात्र मांडणी करताना त्यांनी तुलनात्मक किमतींचा नियम फक्त एका घटकाच्या द्वारे–म्हणजे श्रमशक्तीवर–आधारून मांडला; आणि श्रमशक्तीच्या भिन्न भिन्न "प्रती" असतात असा फरक त्यांनी मान्य केला; ह्या मांडणीमुळे चर्चेचा जोर वेगळ्या दिशेला वळला.

एलि एफ्. हेकश्वर[२] यांनी, उत्पादन साधनांच्या वा घटकांच्या किंमतीवर होणारे व्यापाराच्या समानीकरणाचे परिणाम, हा प्रबंध लिहिला आहे; आणि बर्टिल ओहलिन यांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराचे स्पष्टीकरण लोसानच्या अर्थशास्त्रीय विचारसरणीच्या पद्धतीने सर्वसाधारण समतोलाच्या सिद्धांताच्या आधाराने केले आहे; त्यात आंतरराष्ट्रीय व्यापारासंबंधीच्या आद्य अर्थशास्त्रज्ञांच्या प्रतिपादनाचे पुर्निवेदन आहे आणि हेकश्वरांच्या घटक-किमतींच्या समानीकरणाच्या विचारांचा अधिक विकास आहे; ह्या दोन्ही लेखनांमध्ये घटकांच्या स्थलांतराची जागा स्पष्टपणे व्यापाराने घेतली आहे किंवा तो स्थलांतराचा पर्याय मानण्यात आला आहे. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या समतुल्य व समानीकरणाच्या परिणामांवर अधिक भर देण्याची दक्षता हा या नव्या दृष्टिकोनाचा प्रातिनिधिक गुण दिसतो. निरनिराळ्या प्रदेशांत व देशांत व्यापारामुळे स्थानसीमित झालेल्या नैसर्गिक व मानवी साधन–सामुग्रीशी औद्योगिक हालचाली जुळवून घेतील; परिणामी श्रमशक्ती व भांडवल यांचा सापेक्ष तुटवडा सर्वत्र कमी असमान होईल–अशी अपेक्षा त्यात व्यक्त करण्यात आली आहे.

तिच्या आधारावर युद्धोत्तर काळात अर्थतज्ञांमध्ये खुमासदार चर्चा झाली आहे; ते वैशिष्टयपूर्ण, अमूर्त व स्थिर परिस्थितीत चर्चा करीत होते; आणि त्यांनी या चर्चेत, आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे निरनिराळ्या देशांत घटक-किमतींच्या समानीकरणासाठी निर्माण होणाऱ्या प्रवृत्तीच्या सापेक्ष परिणामकारकतेचा विस्तारपूर्वक विचार केला आहे.[३]

अशा रीतीने अलिकडच्या दशकांत आपल्याला पुढील विचित्र स्थिती पहावयास मिळते; आंतरराष्ट्रीय विषमता वाढत आहेत, आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात

अलिकडे त्या अधिकाधिक मोठ्या प्रमाणावर तीव्र व्यावहारिक चिंता निर्माण करीत आहेत; परंतु त्याच वेळी, निरनिराळ्या देशांत घटक-किंमती व उत्पन्न यांच्यात क्रमश: समानीकरण घडवून आणण्याच्या प्रवृत्तीचा प्रारंभ व्यापारामुळे होतो, ही कल्पना अधिकाधिक जोरदारपणे मांडण्याच्या दिशेने आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांताचा विकास होत आहे.

पहिल्या महायुद्धापूर्वी अस्तित्वात असलेली बहुविध व्यापारी-पद्धत मोडून पडली, आणि ह्या बदलामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार व चलन यांवर वाढते निर्बंध आले–अर्थात हा बदल निर्बंधांचे कारण व परिणाम दोन्ही होता–हा, आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत वास्तविक परिस्थितीचे स्पष्टीकरण करण्यास का अपुरा आहे याचा खुलासा होऊ शकत नाही. कारण, हिलगर्ट यांनी दाखवून दिल्याप्रमाणे, १९१४ पूर्वीच्या काळातही, आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत आणि आंतरराष्ट्रीय विषमतांची वस्तुस्थिती समोरासमोर मांडल्या असता त्यांच्यातही असाच विरोध दिसून येई.

वस्तुस्थितीचे स्पष्टीकरण करण्यास असमर्थ ठरलेला सिद्धांत

निरनिराळ्या देशांत प्रचंड आर्थिक विषमता का व कशा अस्तित्वात आल्या आणि त्यांची वाढत जाण्याकडे का प्रवृत्ती आहे, याचे स्पष्टीकरण देण्यासाठी वापरता येईल अशा सयुक्तिक गृहीततत्त्वांच्या पद्धतीचा प्रातिनिधिक नमुना अगर तर्कशुद्ध कार्यतंत्र आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांतात मिळत नाही, असे म्हणणे म्हणजे एक अपुरेसे विधान करण्यासारखे आहे. उलट, ह्या सिद्धांताला निराळेच वळण देण्यात आले आहे–आणि सांगण्यास नवल वाटते की–अलिकडच्या काळात, अधिकच मोठ्या प्रमाणावर, तो खऱ्या परिस्थितीपेक्षा आणि विकास-प्रवृत्तीपेक्षा विपर्यस्त परिस्थिती व प्रवृत्ती दर्शवीत आहे.

अशा परिस्थितीत, आंतरराष्ट्रीय विषमतांची वस्तुस्थिती आणि विकास व अर्ध-विकास यांच्या समस्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांताशी जोडण्याच्या प्रयत्नांचा साहित्यात अभाव असावा, याचे आपल्याला आश्चर्य वाटू नये. मी वर उल्लेख केलेल्या प्रबंधात हिलगर्टनी नुसती ही समस्या उपस्थित जरी केली असती तरी तेवढ्यामुळेही त्यांना नवीन विचार मांडल्याचा मान मिळविता आला असता.

आद्य अर्थशास्त्रज्ञांच्या महान सैद्धांतिक परंपरेचे आपल्या पिढीतील सर्वश्रेष्ठ भाष्यकार प्राध्यापक जेकब विनेर हे आहेत; त्यांनी ब्राझिलमध्ये दिलेल्या व्याख्यानांना –"आंतरराष्ट्रीय व्यापार आणि आर्थिक विकास"[४] असे प्रक्षोभक शीर्षक दिले होते; परंतु त्यांनी हा प्रश्न उपस्थित केलाच नाही. खरे म्हणजे, त्यांनी अर्ध-विकसित देशांच्या आर्थिक विकासाचा हा प्रश्न अखेरच्या प्रकरणात स्वतंत्र चर्चेसाठी निवडला आहे; त्यात ते दारिद्र्याबद्दल बरीचशी मनोवेधक निरीक्षणे व सूचना करतात–त्या जराशा विस्कळीत स्वरूपात आहेत. याच प्रकरणात त्यांनी निरनिराळ्या

आंतरराष्ट्रीय संबंधांचाही उल्लेख केला आहे; मोठ्या प्रमाणावर परकीय भांडवल अर्ध-विकसित देशांना बहुधा का मिळू शकणार नाही याची त्यांनी कारणे दिली आहेत; व्यापाराच्या अटीबद्दल सर्वसाधारणपणे प्रतिकूल पूर्वग्रह रहाणार नाही असे आश्वासन, जरा अधिकच घाईने अर्ध-विकसित देशांना दिले आहे; आणि त्यांनी अर्थव्यवस्था नीट ठेवली तर–हे नीट ध्यानात ठेवले पाहिजे–त्यांच्या निर्यात किंमतीमधील प्रचंड चढउतार रोखता येण्याची शक्यता दाखवून दिली आहे.

परंतु या प्रबंधात आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत फारच तुरळकपणे आढळतो; आणि तोही अत्यंत सर्वसाधारण स्वरूपाच्या विधानात असून तो बराचसा लपलेला व विशोभित वाटतो.[५] पहिल्या पाच प्रकरणांत त्यांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या क्षेत्रातील अनेक समस्यांबद्दलचे त्यांचे बहुतांशी सनातनी असलेले विचार अत्यंत प्रसन्न व वाचनीय पद्धतीने मांडले आहेत; परंतु पुस्तकाच्या शीर्षकावरून वाचकाला ज्या विषयाच्या चर्चेची अपेक्षा वाटते त्याबद्दल–म्हणजे व्यापार व विकास यांच्यातील संबंधाबद्दल–त्यांनी आश्चर्य वाटण्याइतके थोडे विचार व्यक्त केले आहेत; आणि तेदेखील बौद्धिक टोमण्यांच्या स्वरूपात पुस्तकभर विखुरलेले आहेत.

अवास्तविक गृहीततत्त्वे

आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत आणि आर्थिक जीवनाची वस्तुस्थिती यांची अशी विचित्र फारकत का व्हावी याबद्दलच्या स्पष्टीकरणाचा प्रश्न उपस्थित करणे उपयुक्त आहे.

अर्थशास्त्राच्या कोणत्याही विभागापेक्षा ह्या सिद्धांताने अधिक मोठ्या प्रमाणावर आद्य अर्थशास्त्रज्ञांची परंपरा प्रामाणिकपणे पाळली आहे, हे याचे निःसंशयपणाने मुख्य स्पष्टीकरण आहे. आंतरराष्ट्रीय समतेच्या समस्येसंबंधी त्यांचा अंधत्वाचा दृष्टिकोन कसा आहे, याचा उल्लेख मी पूर्वी केलाच आहे. परंपरागत सिद्धांत, आणि मुक्त व्यापाराचे तत्त्व, "जैसे थे"चा पूर्वग्रह, व हितसंबंधांच्या सुसंवादाची कल्पना–हे पूर्वानुकूल ग्रह, तसेच ह्या सैद्धांतिक रचनेस पायाभूत असलेली स्थितिवादी गृहीततत्त्वांची विचारसरणी यांना अर्थशास्त्राच्या इतर कोणत्याही विभागापेक्षा आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांतात अधिक मोकळा वाव देण्यात आला आहे.

अशा रीतीने, आर्थिक विषमतांची महान व वाढती वस्तुस्थिती आणि विकास व अर्धविकास यांची गतिशील प्रक्रिया आकलन करण्यासाठी, आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांताचा, आणि खरे म्हणजे सर्वसाधारणपणे आर्थिक सिद्धांताचाही, कधीही विकास करण्यात आलेला नाही. उत्पादनघटकांच्या सापेक्ष कमतरतेमधील मोठा फरक आणि जीवनमानातील व सांस्कृतिक परंपरेतील महान भेद यांना अनुरूप असे उत्पादन-तंत्रात आणि मुख्य म्हणजे खुद्द उत्पादनाच्या कार्यात महान भेद असतात; त्यांच्याशी संबंधित असलेल्या समस्यांवर खरे पहाता आर्थिक सिद्धांताने कधीही

लक्ष केंद्रित केले नाही.

त्याचप्रमाणे, अर्थशास्त्रातील इतर कोणत्याही शाखेपेक्षा, स्थिर समतोलाच्या गृहीततत्त्वाचा प्रभाव आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांतावर अधिक पडला आहे. कोणताही बदल घडला असता प्रतिक्रिया म्हणून विरुद्ध दिशेचे दुय्यम बदल घडून येतात असा विश्वास ह्या गृहीततत्त्वात अभिप्रेत आहे. ह्या व इतर अशाच अनेक गृहीततत्त्वांप्रमाणे, निरनिराळ्या देशांत व प्रदेशांत अधिक मोठ्या प्रमाणावर आर्थिक समता घडवून आणण्याच्या आर्थिक प्रक्रियेतील घटक म्हणून व्यापाराचे कार्य चालते.[६] ह्या गृहीततत्त्वाच्या उलट व अधिक वास्तववादी असलेल्या गृहीततत्त्वानुसार, म्हणजेच चक्राकार कार्यकारणभावामुळे आर्थिक प्रक्रिया पुष्कळदा संचयी असतात ह्या गृहीततत्त्वानुसार, आपण पूर्वी पाहिल्याप्रमाणे, आंतरराष्ट्रीय व्यापाराचे कार्य उलट स्वरूपाचे असते. म्हणजे, अविकसित देशांत नियमितपणे प्रसारीत परिणाम कमकुवत असतात त्यावेळी, आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या माध्यमातून बाजारपेठांच्या शक्ती अधिक मोठ्या प्रमाणावर विषमता निर्माण करण्यात परिणत होतात.

स्थिर समतोलाच्या गृहीततत्त्वाच्या जोडीला आणखी एक दुसरी कल्पना मिळतीजुळती आहे; आंतरराष्ट्रीय विषमतांची वस्तुस्थिती आणि अर्ध-विकास व विकास यासंबंधीच्या गतिमान समस्या यांची ती फारकत करते; "आर्थिक" घटक आणि "बिन-आर्थिक" घटक यांच्यात फरक असतो, ही ती कल्पना. परंतु, उत्पादन-घटकांचे गुणधर्म या नावाने आद्य अर्थशास्त्रज्ञ ज्यांचे वर्णन करतात त्यांच्याशी बिन-आर्थिक घटकांचा पुष्कळच संबंध असतो; आणि म्हणूनच निरनिराळ्या शाखांतील उत्पादनाच्या "परिणामकारकते"शी त्यांचा फार संबंध असतो.

बिन-आर्थिक घटकांच्या महत्त्वाकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप आद्य अर्थशास्त्रज्ञां-वर करता येणार नाही. आद्य अर्थशास्त्रज्ञांच्या परंपरेतील सर्वांत मोठा आधुनिक लेखक म्हणून मी वर विनर यांचा उल्लेख केला आहे; त्यांनी हेकश्वर व ओहलिन यांच्यावर ह्या घटकांकडे दुर्लक्ष केल्याबद्दल टीका करून पुढे म्हटले आहे:[७]

"अधिक भांडवल, किंवा अधिक जमीन, किंवा अधिक कोळशाच्या खाणी, यांच्या-मुळेच केवळ आर्थिक सुधारणा होत नाहीत; तर व्यवस्थापनाच्या परिणामकारकतेची वाढ आणि चांगले शिक्षण, चांगले आरोग्य, अधिक हेतुपरायणता व चांगली राजकीय व सामाजिक संघटना यांच्या सहाय्याने अधिक शारीरिक कष्ट यांचीही त्यासाठी आवश्यकता असते, हे अर्थशास्त्रज्ञांनी ओळखण्याची व सांगण्याची त्यांच्यावर जबाब-दारी असते. तसे करण्यास ते कचरले तर, मानवी शक्तीच्या बाहेर असलेल्या भौगोलिक परिस्थितीवर किंवा त्या अर्थव्यवस्थेत अंतर्भूत नसलेल्या घटकांवर, राष्ट्रीय दारिद्र्याचा दोष त्यांनी संपूर्णपणे टाकल्यासारखे होईल; आणि राष्ट्रीय दारिद्र्यास मुख्यतः जबाबदार असू शकणाऱ्या अंतर्गत मानवी, सामाजिक, राजकीय व नैतिक घटनांकडे दुर्लक्ष केल्याचा दोष त्यांच्या पदरी येईल."

उत्पादन घटकांच्या "गुणवत्ते"च्या ह्या क्षेत्रातच आणि परिणामी निरनिराळ्या उत्पादन विभागांच्या "परिणामकारककते"तच निःसंशयपणे सैद्धांतिक स्पष्टीकरणाचा मुख्य गाभा शोधला पाहिजे; देशादेशांतील विकासात विषमता का निर्माण झाल्या आहेत आणि आंतरराष्ट्रीय व्यापार, समता निर्माण करणारी शक्ती म्हणून का कार्यक्षम राहू शकला नाही, याचे सैद्धांतिक स्पष्टीकरण वरील विभागातच शोधावे लागेल. परंतु एकाच, अमूर्त व अस्पष्ट कल्पनेत ह्या सर्वांना एकत्र करणे, आणि ह्या एकत्रित घटकांना घनिष्ट व स्थिर अस्तित्व असल्याचे मानणे म्हणजेच त्यांना विश्लेषणातून दूर ठेवणे होय; किंवा बिन-आर्थिक घटकांबरोबर त्यांचे आंतरसंबंध प्रस्थापित करून सैद्धांतिक स्पष्टीकरण शोधण्याचे टाळणे होय. आणि, ह्या एकत्रित गठ्ठ्यातील एकेक घटकाचा मधून मधून निर्देश करणे अगर त्यांच्यातील बदलांचा संदर्भ देणे म्हणजे पद्धतशीर स्पष्टीकरण देणे नव्हे, किंवा आर्थिक विकास व आर्थिक सिद्धांत यांचा दुवा जुळविणे नव्हे; जर्मन ऐतिहासिक विचारसरणीच्या सारासार भेद न करणाऱ्या "सर्व समावेशक" पद्धतीकडे परत जाण्याचाच तो प्रकार आहे; आणि खास करून विनरना तर तो मुळीच पसंत पडणार नाही.

घटकांच्या विशिष्ट गटाला "आर्थिक घटक" असे नाव देणे आणि बाकीच्यांना विश्लेषणामधून वगळणे ही कार्यपद्धती स्थिर समतोलाच्या दृष्टिकोनाशी अत्यंत जुळणारी आहे. कारण, आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत ज्या "बिन आर्थिक घटकां"ना बहुधा गृहीत व स्थिर म्हणून स्वीकारतो त्यांच्या क्षेत्रातच समतोलाचा सिद्धांत सर्वाधिक अवास्तविक ठरतो; आणि त्याऐवजी तेथे चक्राकार कार्यकारणभावाचा नियम लागू पडतो.[८]

विकास व अर्धविकास यासंबंधीच्या चर्चेवरील परिणाम

आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत आणि त्यात अंतर्भूत असलेले सैद्धांतिक पूर्वानुकूल ग्रह यांचा—काही प्रमाणात व पुष्कळशा ध्वनितार्थाने—अलिकडच्या काळातील आर्थिक अर्धविकास व विकासाच्या चर्चेवर प्रभाव पडला आहे.

आंतरराष्ट्रीय आर्थिक विषमतांचे अस्तित्व आणि त्यांची वाढत जाण्याकडे असलेली प्रवृत्ती ह्या घटना या सिद्धांताच्या दृष्टीने गैरसोईच्या आहेत. ह्या घटनांकडे या सिद्धांताने दुर्लक्ष केले असून असेही सूचित केले आहे की आंतरराष्ट्रीय व्यापाराचे समाजीकरणाच्या दिशेने परिणाम होतात. वस्तुस्थिती व सिद्धांत यांच्यामधील ह्या विसंगतीवर बहुधा भर दिला जात नाही. त्याचप्रमाणे अर्ध-विकास व विकाससंबंधीच्या चर्चेतही विषमता व त्यांची वाढत जाण्याची प्रवृत्ती यांच्या स्पष्टीकरणाची समस्या ही मुख्य समस्या म्हणून मांडण्याचाही सुसंगत प्रयत्न झालेला नाही. आज ह्या घटना आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या वाढत्या तणतणीमुळे प्रामुख्याने पुढे आल्या आहेत, तरी देखील अर्ध-विकसित देशांच्या समस्यांच्या इतर बाजूंकडे चर्चेचा ओघ

वळविण्याचा स्पष्ट कल दिसून येतो; आंतरराष्ट्रीय आर्थिक विषमतांशी संबंधित असलेल्या समस्यांकडे तो वळविला जात नाही.

त्याचप्रमाणे, आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांतात अंतर्भूत असलेल्या ह्या प्रवृत्तीला उद्‌बोधकरीत्या समांतर अशी प्रवृत्ती, विकसित देशांत अर्ध-विकसित देशांच्या व्यापारासंबंधी चालणाऱ्या चर्चांमधून दिसून येते. व्यापार व चलन यासंबंधी अर्ध-विकसित देशांनी हस्तक्षेप करू नये असा सल्ला अर्ध-विकसित देशांना पुष्कळदा दिला जातो; शिवाय, विकसित देशांच्या धोरणांच्या सहाय्याने अर्ध-विकसित देशांच्या व्यापारी धोरणांवर दबाव आणला जातो; ह्या दोन्ही गोष्टी आंतरराष्ट्रीय आर्थिक विषमतांच्या गतिशीलतेची विशेष दखल न घेता ठरविण्यात येतात.

इतकेच नव्हे तर, अर्ध-विकसित देशांना देण्यात येणारा बराचसा सल्ला आणि त्यांच्यावर आणण्यात येणारा दबाव यांचे समर्थन आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांताच्या द्वारे करण्यात येते; आणि हा सिद्धांत ह्या देशांच्या दृष्टीने अवास्तविक असलेल्या गृहीततत्त्वांवर आधारलेला असतो. आंतरराष्ट्रीय नाणे निधी, आता अकार्यक्षम झालेली आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना व तिचा अवशेष असलेली ‘गाट’ (GAAT) ही संघटना—ह्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या क्षेत्रातील संघटनांचा, मी वर उल्लेखिलेल्या आर्थिक सिद्धांताच्या पूर्वानुकूलग्रहांच्या वैचारिक सूत्रांनी परिपूर्ण राहाण्याकडे सतत कल असतो, आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांतावर ह्या वैचारिक सूत्रांचा विशेष करून गाढ प्रभाव पडलेला आढळतो.

अर्ध-विकसित देशांना देण्यात येणाऱ्या आंतरराष्ट्रीय धोरणाविषयींच्या आदेशासंबंधातील आपल्या अनेक बौद्धिक प्रयत्नांत एक पद्धतशीर प्रतिकूल ग्रह क्रियाशील असतो; स्थिर समतोलाच्या दृष्टिकोनाला पुष्कळदा प्राधान्य देण्याच्या वस्तुस्थितीवर आणि शिवाय, हितसंबंधांचा सुसंवाद, ‘जैसे थे’ व मुक्त व्यापार ह्या टिकावू सनातनी पूर्वानुकूलग्रहांशी, स्थिर समतोलाचा सिद्धांत वैचारिक दृष्टया बांधलेला आहे. या वस्तुस्थितीवर आपला प्रतिकूलग्रह आधारलेला असतो. तो अंतिम हेतुवादाने परिपूर्ण आणि हेतुनिष्ठ म्हणून गर्भित मूल्यांनी भरलेला असतो. आणि धोरणात्मक दृष्टीने पूर्णपणे स्वच्छंद असल्याच्या संपूर्ण जाणिवेतून निवडलेले सैद्धांतिक साधन ते क्वचितच असते.

७व्या प्रकरणात मी नमूद केल्याप्रमाणे, अर्ध-विकसित देशांना आर्थिक विकासासाठी सर्वांगीण सरकारी नियोजनाची आत्यंतिक गरज आहे हे आता सर्वसाधारणपणे सर्वांना मान्य झाले आहे; केवळ त्या देशांतच नव्हे तर सर्व अर्थतज्ञांना व विकसित देशांच्या राजकीय प्रतिनिधींनाही हे मान्य आहे. सरकारी आर्थिक नियोजन आणि नियोजन अंमलात आणण्यासाठी मोठ्या प्रमाणावरील सरकारी हस्तक्षेप ह्या गोष्टी आवश्यक आहेत असे समजले जाते; कारण आर्थिक गतिशून्यता मोडून काढावयाची

असते आणि तसे करण्यासाठी काहीच केले नाही तर ती नष्ट होणार नाही. परंतु ह्या राजकीय गरजेस नाईलाजानेच मान्यता दिली जाते हे उघड आहे. ह्या सर्वसाधारण धोरणाची जेव्हा अंमलबजावणी करण्याची वेळ येते तेव्हा 'जैसे थे'च्या धोरणाचा स्वीकार करण्याच्या बाजूचे सर्व प्रकारचे युक्तिवाद डोके वर काढतात. ही गोष्ट विशेषत: परदेशी व्यापार व हुंडणावळ यांच्या क्षेत्रांत फारच खरी ठरते, कारण तेथे विकसित देशांचा 'जैसे थे'ची स्थिती टिकविण्यातील हितसंबंध धोक्यात येतो.

त्यावेळी, परंपरागत सैद्धांतिक गुणधर्मासह स्थिर समतोलाचा दृष्टिकोन सोईस्कर रीतीने व संधीसाधुपणाने उपयोगी पडतो. कारण, संचयी परिणाम घडविणाऱ्या चक्राकार कार्यकारणभावाचे समाजविकासातील प्राधान्य ओळखणाऱ्या वास्तववादी दृष्टिकोनातून अर्ध-विकसित देशांतील आर्थिक विकासासाठी सरकारी नियोजन व मोठ्या प्रमाणावरील सरकारी हस्तक्षेप यांच्या बाजूचे युक्तिवाद पुढे येतात; उलट समतोलाच्या दृष्टिकोनामधील सैद्धांतिक गुणधर्मामुळे त्यातून 'ज्याचा तो' च्या निष्कर्षाला अनुकूल युक्तिवाद निघतात.

हे सर्व सांगितल्यावरही , अर्ध-विकसित देशांच्या आर्थिक समस्यांसंबंधी मोठ्या व वाढत्या प्रमाणावर लिहिल्या जात असलेल्या साहित्यात सर्वसाधारणपणे आर्थिक सिद्धांताकडे, आणि विशेषत: आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांताकडे, फारच थोडे लक्ष दिले गेले आहे, ही गोष्ट आग्रहाने सांगितली पाहिजे. सध्याच्या अवस्थेत ह्या साहित्याला बरेचसे अ-सैद्धांतिक वळण मिळालेले आहे. त्यातल्यात्यात त्यातले जे उत्तम साहित्य आहे ते ठाशीव वस्तुस्थितीशी व व्यावहारिक प्रश्नांशी निगडीत राहूनच सबळ होण्याचा प्रयत्न करते.

या क्षेत्रातील बहुतेक लेखक सैद्धांतिक चौकट आवश्यक असल्याची इच्छा व्यक्त करतात खरी, परंतु तसे होण्याच्या शक्यतेबद्दल त्यांना शंका वाटते. कधी कधी ही शंका इतकी बळावलेली असते की, आर्थिक अर्ध-विकास व विकास यासंबंधीचा सर्व-साधारण सिद्धांत आपण कधी काळी तयार करू शकू याबद्दलच त्यांच्या मनात संपूर्ण अविश्वास असतो.

मूर्तिभंजनाविरुद्ध आघाडी

आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत ही एक व्यापक, विचार-पद्धती असून जर ती मान्य नसेल, तर संपूर्णपणे अव्हेरिली पाहिजे, अशाच थाटात मी आतापर्यंत आंतर-राष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांताचा उल्लेख केला आहे. परंतु, माझ्या शास्त्रीय सनातनी-वृत्तीच्या सुदैवाने वस्तुस्थिती तशी नाही. ज्या वैचारिक पद्धतीवर मी टीका केली आहे ती वस्तुत: अनेक खास प्रमेयांचे उगमस्थान आहे; त्यांपैकी बहुतेकांना नवे वळण देऊन, निराळयाच गृहीततत्त्वांवर आधारलेल्या दुसऱ्या पद्धतीमध्ये त्यांना नीट बसविता येईल.

सैद्धांतिकांच्या अनेक पिढ्यांच्या परिश्रमाने आर्थिक प्रमेयांचा हा खजिना सतत वाढत गेला आहे. कार्ल मेन्जरनी एकदा आग्रहपूर्वक प्रतिपादन केले होते की, स्वतःच्या विचारांबद्दल विचार करण्याइतकी फुरसत ज्यांनी मिळविली नाही, अगर त्यांच्या तर्कशुद्ध पायाबद्दल शंका उपस्थित करण्यासाठी जे थांबले नाहीत अशा विद्वानांकडून आपल्या शास्त्राचा डोलारा उभारला गेला आहे. याच अर्थाने, नट् विकसेल यांनी चांगल्या अर्थशास्त्रज्ञाचे लक्षण सांगताना म्हटले आहे की, त्याने स्वतः वापरलेल्या पद्धतींच्या व गृहीततत्त्वांच्या तो पुष्कळच पलीकडे जातो. वर मी अर्थशास्त्राच्या मुळाशी असलेल्या अध्यात्मवादी कल्पना व संधीसाधू पूर्वानुकूलग्रहांचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे; त्यांच्या आधारावर, आद्य अर्थशास्त्रकारापासून सर्व पिढ्यांतील अर्थशास्त्रज्ञांनी जगाविषयीचे आपले वास्तव ज्ञान सतत वाढविले आहे.

या संचित ज्ञानाचे विवरण या प्रसंगी करण्याचा माझा उद्देश नव्हता; तर ज्याच्या खरेपणावर माझा विश्वास आहे त्याचे प्रात्यक्षिक घडविण्याचा व स्पष्टीकरण करण्याचा माझा हेतू होता. ते सत्य हे की, आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत, किंबहुना सर्वसाधारण आर्थिक सिद्धांतच, महान व वाढत्या आर्थिक विषमतांची व अर्ध-विकास व विकासाच्या गतिमान प्रक्रियेची वस्तुस्थिती आकलन करण्यासाठी कधीच विकसित करण्यात आलेला नाही, आणि समतेच्या समस्यांशी संबंधित असलेल्या प्रश्नांची योग्य रीतीने चर्चा करण्यास आर्थिक सिद्धांत तत्परता दाखवीत नाही याबद्दलची स्पष्टीकरणे उजेडात आणली पाहिजेत; तरच सध्याच्या ह्या प्रतिबंधातून आर्थिक सिद्धांताला मुक्त करता येईल.

ह्या प्रश्नांना तोंड देताना सिद्धांत आता असहाय्य वाटतो. याचा अर्थ असा नव्हे की, ज्या ठिकाणी आर्थिक विषमता इतक्या तीव्र नाहीत त्या परिस्थितीत तो यशस्वीपणे लागू करता येणार नाही. स्वाभाविक सामाजिक प्रक्रियांचा अभ्यास करण्यासाठी स्थिर समतोलाचे गृहीततत्त्व अवास्तव आहे, असे मी प्रतिपादन केले आहे; परंतु ते तत्त्व सुद्धा काही प्रश्नांचा अभ्यास करताना, विशेषतः अल्पमुदतीच्या काळाच्या संदर्भात, कधी उपयुक्त ठरू शकेल.

आणि, मी वर म्हटले आहे त्याप्रमाणे, ह्या महान रचनेत विटांप्रमाणे वापरण्यात येणाऱ्या खास प्रमेयाचा नमुना (model) मला मन्य नसला तरी दुसऱ्या कोणत्या तरी रचनेत तो उपयुक्त ठरू शकेल. खरोखरीच, अशी पुष्कळच प्रमेये आहेत की जी सध्याच्या रचनेत योग्य रीतीने बसत नाहीत, परंतु नव्या रचनांत ती फारच छान बसतील. "बाल-उद्योगधंद्यां"च्या विकासासंबंधीचा युक्तिवाद आणि आद्य अर्थशास्त्रज्ञांनी विचारात घेतलेल्या दुसऱ्या अनेक सवलती त्यांच्या काळातील व्यावहारिक प्रश्नांच्या चर्चेत मांडण्यात आलेल्या आहेत; त्यांत अर्ध-विकसित देशांच्या प्रश्नांकडे पहाण्याच्या अधिक वास्तववादी दृष्टिकोनाबद्दल थोडक्यात सूचना आहेत.

अलिकडील दशकांत, आंतरराष्ट्रीय व्यापारातील घडामोडींशी आर्थिक

अरिष्टाच्या सिद्धांताच्या चौकटीत विश्लेषण करण्यात आलेल्या संचयी प्रक्रियांचा संबंध जोडण्यासाठी पुष्कळ प्रयत्न करण्यात आले आहेत. "डॉलर्सचा तुटवडा" ह्या प्रश्नाभोवतीची पुष्कळशी चर्चाही बरीच अपारंपारिक स्वरूपाची आहे; त्याप्रमाणे, मागणी-पुरवठ्याच्या स्थितिस्थापकत्वातील आंतरराष्ट्रीय व्यापाराचे व चलनाचे महत्त्व—त्यातून कधी कधी "कायम असमतोला"चा विचार निर्माण होतो, त्याच्यासंबंधीची चर्चाही अशीच अपारंपारिक स्वरूपाची आहे.

जर आपण कधीकाळी आर्थिक अर्धविकास व विकासासंबंधीचा सर्वसाधारण सिद्धांत मांडण्याच्या परिस्थितीत आलो तर, आपल्या सर्वसाधारण आर्थिक सिद्धांतात त्याला समाविष्ट करून घेण्याचे कठीण पण आवश्यक कार्य आपल्याला नंतर करावे लागेल; विशेषत: तो सिद्धांत आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत एकमेकाशी सुसंगत करावे लागतील. कारण तार्किक दृष्टीने असंबद्ध आणि खरोखरीच परस्परविरोधी सिद्धांत मान्य करणे ही समाधानकारक स्थिती मुळीच नाही.

ह्या समन्वय घडवून आणण्यासाठी, एका बाजूला, सर्वसाधारण आर्थिक सिद्धांतात पुष्कळच तडजोडी व बदल करावे लागतील. हे बदल जागतिक अर्थव्यवस्थेबद्दलच्या आपल्या दृष्टीमधील प्रगतीचे प्रतिबिंब असतील; आणि, आर्थिक विषमता आणि अर्धविकास व विकासासंबंधीच्या गतिमान प्रक्रियांच्या वस्तुस्थितीशी संबंधित दीर्घकालीन प्रश्नांच्या व्यासंगी अभ्यासामधून ही दृष्टी निर्माण झालेली असेल.

दुसऱ्या बाजूला, जेव्हा अर्ध-विकास व विकासाचा सिद्धांत तयार होईल तेव्हा, मी पहिल्या भागात प्रयत्न करून मांडणी केल्याप्रमाणे, व्यापक रचनात्मक विचारसमुच्चय, अधिक अनुभवजन्य माहिती, यांच्यामधूनच केवळ त्याची उभारणी होणार नाही: आज आपल्या सर्वसाधारण सिद्धांताच्या व्यापक चौकटीत अंतर्भूत असलेल्या अनेक परिचित युक्तिवादांना व प्रमेयांना शोधून काढून, इमारतीचे दगड म्हणून ती वापरण्यात येतील; आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांताचाही त्यात समावेश असेल; तो नव्या रचनेमध्ये योग्य रीतीने बसेल असे त्यात फेरफार करण्यात आलेले असतील. सर्वसाधारणपणे सर्वच समाजशास्त्रांप्रमाणेच अर्थशास्त्रातही जुने विचार क्वचितच संपूर्णपणे टाकून देण्यात येतात, आणि कोणतेच विचार संपूर्णपणे नवीन व स्वयंकल्पित नसतात.

जगातील राजकीय परिस्थिती बदलली आहे; ह्या बदललेल्या राजकीय परिस्थितीत अत्यंत नव्या व भिन्न समस्यांवर लक्ष केंद्रित करण्याची सक्ती अभिप्रेत आहे; अगदी अलिकडच्या काळापर्यंत निष्क्रियपणे गुलाम व मूक ठेवण्यात आलेल्या राष्ट्रांतून अनेकांचे (जागतिक राजकीय) रंगभूमीवर आगमन झाले आहे; या सर्वांमुळे समाजशास्त्रातही क्रांतीचा प्रारंभ होणे अपरिहार्य आहे. त्यामुळे आपली क्षितिजे रुंदावतील आणि आपल्या विचारसरणीची दिशा मूलभूतपणे बदलेल. ह्या महान प्रक्रियेतून अधिक वास्तववादी व सुसंबद्ध आर्थिक सिद्धांतही उदयास आला पाहिजे.

संदर्भ टिपा

१. "लोकसंख्या व साधनसामुग्री यांच्या जागतिक विभागणीतील विषमता दूर करण्याच्या कामात आंतरराष्ट्रीय व्यापाराचा उपयोग व मर्यादा" (युजेस अँड लिमिटेशन्स ऑफ इंटरनॅशनल ट्रेड इन ओव्हरकमिंग इनइक्वॉलिटिज इन वर्ल्ड डिस्ट्रिब्यूशन ऑफ पॉप्यूलेशन अँड रिसोर्सीस), जागतिक लोकसंख्या परिषद, रोम, १९५४, अप्रसिद्ध.

२. इलि एफ्. हेकश्चर, "उत्पन्नाच्या विभाजनावरील परराष्ट्रीय व्यापाराचे परिणाम"-आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांतासंबंधी वाचनीय ग्रंथ (द इफेक्ट ऑफ फॉरेन ट्रेड ऑन दि डिस्ट्रिब्यूशन ऑफ इन्कम–रिडींग्ज इन दि थिअरी ऑफ इंटरनॅशनल ट्रेड), अमेरिकन एकॉनॉमिक ॲसोसिएशनच्या समितीने तयार केलेले निवडक निबंध, एलन अँड अनविन, लंडन, १९५०. (१९१९ मध्ये मूळ स्विडीश भाषेत प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाचा अनुवाद. बर्टिन ओहलिन यांनी लिहिलेले "आंतरराष्ट्रीय व आंतरविभागीय व्यापार.") हॉवर्ड विद्यापीठ मुद्रणालय, केंब्रिज, १९३३.

३. घटक किंमतींच्या समानीकरणावर आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे होणारे परिणाम, या समस्येवरील चर्चा अलिकडे प्रा. पॉल ए. सॅम्युएलसन यांनी सुरू केली; त्यांनी या विषयीचे दोन लेख एकॉनॉमिक जर्नलच्या १९४८ व १९४९च्या अंकात लिहिले. अधिक सविस्तर संदर्भासाठी स्वेन्ड लॉरसेन यांच्या अमेरिकन एकॉनॉमिक रिव्ह्यूतील (१९५५, पान ५४० व पुढे), "आंतरराष्ट्रीय व्यापाराची उत्पादन कार्ये व सिद्धांत" हा लेख पहावा. (संदर्भ ग्रंथः प्रॉडक्शन फंक्शन्स अँड थिअरी ऑफ इंटरनॅशनल ट्रेड).

४. क्लॅरेंडन प्रेस, ऑक्सफर्ड, १९५३.

५. उदाहरणार्थ, त्यांनी म्हटले आहे की, "प्रामुख्याने शेतीप्रधान असलेल्या देशात लोकसंख्येची वेगाने वाढ झाली आणि त्याच प्रमाणात शेती-उत्पादनाला वाढती मागणी आली नाही, तर, मुक्त-बाजारपेठेच्या परिस्थितीत देशाचे औद्योगीकरण करणाऱ्या शक्ती स्वयंस्फूर्तीने पुढे येतील, कारण शेती-उत्पादन कमी पैसे देणारे झालेले असेल" (पहा, पान ११३). परंतु जगाच्या अर्ध-विकसित भागात जे खरोखरीच घडले आहे आणि घडत आहे त्याचे हे वर्णन अगदी चुकीचे आहे.

"मुक्त बाजारपेठेची परिस्थिती स्वयंस्फूर्तीने अशा शक्तींना क्रियाशील बनविते," की ज्यांचा निर्माण कल उद्योगधंदे व शेती यांच्यात समतोल निर्माण करण्याकडे असतो, ही कल्पना समतोलाच्या गृहीततत्त्वानुसार विचार करण्यातून निघालेली आहे, आणि विशिष्ट मुद्यावर ही विचारसरणी संपूर्णपणे चुकीची आहे. खरे म्हणजे, लोकसंख्येची वाढ व तिचा शेतीवरील भार यांमुळे शेतीत काम करणाऱ्या मजुरांची उत्पादनक्षमता शून्यावर आली तर औद्योगीकरणासाठी कामगार उपलब्ध होणार नाहीत–तौलनिकदृष्टीने फारच अधिक वेतन मिळाले तरच कामगार मिळतील. उद्योगधंद्यातील खर्च व किंमती खऱ्या संधीच्या (किंवा स्थलांतराच्या) काळातील खर्चाच्या निदर्शक नसतात. शिवाय, उद्योगधंद्यात नफा होण्यासारखा असला तरी संधीचा फायदा घेणारे उद्योगपती तेथे नसतात; किंवा जे असतात त्यांना नफा मिळविण्याचे कसब नसते. अधिक मूलभूतपणे मांडावयाचे तर, आद्य अर्थशास्त्रज्ञांना वाटत होते त्याप्रमाणे, नफा हाच काही मानवी वर्तणुकीचा सार्वत्रिक हेतू नसतो.

सातत्याने उत्पादनासाठी प्रयत्न केल्यामुळे आणि दीर्घ मुदतीसाठी भांडवल-गुंतवणूक केल्यानंतर मिळणाऱ्या नफ्याबद्दल अर्ध-विकसित देशांत फारसे कौतुक नसते. "मुक्त बाजारपेठेच्या परिस्थिती"त आपण पुष्कळ तर्कशुद्ध अर्थाचा समावेश केलेला आहे, असे उत्तर विनरना देता येईल; परंतु मुद्दा असा आहे की, हे गृहीततत्त्व संपूर्णपणे अवास्तव आहे. अर्ध-विकसित देशांतील खऱ्या, सांस्कृतिक, सामाजिक, मानसिक व आर्थिक परिस्थितीत ह्या गृहीततत्त्वाचा निश्चित अर्थ काय? ह्या प्रश्नाचे उत्तर देण्यातच आलेले नाही; आणि ह्या प्रश्नाचे उत्तर जर दिले नाही—आणि मला वाटते की ते देता येणार नाही—तर ही विचारसरणी अर्थशून्य रहाते आणि तिच्याप्रमाणे वस्तुस्थितीसंबंधीची अनुमाने काढली तर ती चुकतात. विनरना हे बहुधा मान्य असावे, कारण, मी निर्देश केल्याप्रमाणे, अर्ध-विकसित देशांच्या विकासाच्या प्रश्नांच्या चर्चेत त्यांच्या पुस्तकात कोणत्याही सिद्धांताचा सुसंबद्ध वापर त्यांनी केलेला नाही.

६. समतोलाचे गृहीततत्त्व आणि ते ज्याचे प्रतीक आहे तो सैद्धांतिक दृष्टिकोन अवास्तव आहे ह्या नकारार्थी स्वरूपातील टीका, मी मागील प्रकरणात मांडल्याप्रमाणे, मुळीच अभिनव नाही. त्याचप्रमाणे, आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सिद्धांत, आर्थिक सिद्धांतातील दुसऱ्या कोणत्याही भागापेक्षा, अधिक भक्कमपणाने, समतोलाचा सिद्धांत राहिलेला आहे, ही गोष्टही निर्देशित करण्यात आलेली आहे. प्रा. जोन डब्ल्यू. विलियमस् यांनी आर्थिक धोरण व सिद्धांत यांच्यातील संबंधाबद्दल नेहमीच्या व्यग्रतेने विचार करताना, सध्याच्या काळातील एक सर्वांत मोठा विरोधाभास पुढीलप्रमाणे सांगितला आहे: "१९१४ पासून जगात प्रचंड व जवळजवळ, सतत अस्वस्थता आहे; परंतु आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांतात मात्र समतोलाच्या प्रवृत्तीवरच भर देण्यात येत आहे" ("बदलत्या जगातील आर्थिक स्थैर्य," ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९५३, पान २४). (पुढे पान २९वर त्यांनी म्हटले आहे)—"अगदी अलिकडील काळापर्यंत तरी, सिद्धांतातील मुख्य प्रवाहपतन, समतोलाच्या प्रवृत्तींवर भर देण्याकडे अधिक वाढलेले दिसते; आद्य अर्थशास्त्रज्ञांच्या विश्लेषणात दुरुस्ती करताना, किंवा आधुनिक मूल्याच्या सिद्धांतामधून, किंवा अधिक देश व विक्रेय वस्तूंचा समावेश करताना हीच प्रवृत्ती आढळते. . . . तथाकथित "आधुनिक" किंवा केन्सवादी दृष्टिकोनाने आंतरराष्ट्रीय व्यापाराची देवाणघेवाण उत्पन्नाच्या आधारावर होत असल्याचे विश्लेषण करून हा भर आणखीनच जोरदार केला आहे.

७. वरील ग्रंथ, पान १६.

८. "आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिद्धांताचा पुनर्विचार" हा महत्त्वाचा प्रबंध १९२९ मध्ये विलियमस् यांनी लिहिला; त्यात त्यांनी पुढील मुद्दे मांडले आहेत: "विचार सोपा करण्याच्या हेतूने, ज्या गोष्टींवर अभ्यासासाठी आपण लक्ष केंद्रित केले पाहिजे त्याच गोष्टी निश्चित असल्याचे आद्य अर्थशास्त्रज्ञ मानतात; आपल्याला आंतरराष्ट्रीय व्यापाराचे परिणाम व कारणे, जर त्यांच्या विश्लेषणातून कोणतीही महत्त्वाची सत्यघटना सुटणार नाही इतक्या व्यापकतेने शोधून काढावयाची असतील तर आपण ह्याच गोष्टींचा अभ्यास केला पाहिजे. आणि ते पुढे लिहितात, "राष्ट्रांचा, मिळकतीचा, किंमतींचा व सुस्थितीचा सध्याचा दर्जा शोधून काढण्याच्या दृष्टीने,

नवीन साधनसामुग्री व उत्पादन शक्तींचा आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराचा संबंध अधिक महत्त्वाचा असतो; आद्य अर्थशास्त्रज्ञ त्यासाठी सर्व थरांतील मूल्यांचे विश्लेषण करीत असत आणि ते करताना उत्पादन घटकांची, अस्तित्वात असलेली व कामावर असलेली संख्याच फक्त विचारात घेत" (एकॉनॉमिक जर्नल, १९२९, पा. १९५ व पुढे). घटकांचे गुणधर्म निश्चित असल्याचे गृहीत धरण्यातील चूक प्रथम उजेडात आणण्याचा मान अर्थशास्त्राच्या इतिहासात, अर्थातच, फ्रेडरिक लिस्ट यांच्याकडे जातो. लिस्ट यांनी अमेरिकेत फार मोठा प्रभाव पाडला होता हे ध्यानात घेणे उद्बोधक आहे. त्यावेळी अमेरिकाही "अर्ध-विकसित" राष्ट्र होते; मात्र, आज आपण ज्यांना अर्ध-विकसित देश म्हणतो त्यांच्यापेक्षा अमेरिकेतील दरडोई उत्पन्नाची पातळी फार उच्च होती, म्हणून वरील विधान थोड्या निराळ्या अर्थाने खरे आहे.

प्रकरण १२ वे

सर्व शास्त्रांचा तर्कशुद्ध गाभा

नैतिक व बौद्धिक विसंगतींमधील संबंध

आंतरराष्ट्रीय आर्थिक विषमतांची वस्तुस्थिती, त्यांची वाढत जाण्याकडे असलेली प्रवृत्ती आणि श्रीमंत राष्ट्रांतील सार्वजनिक सद्सद्विवेकबुद्धी आणि त्या देशांच्या सांस्कृतिक पार्श्वभूमीत तयार झालेला आर्थिक सिद्धांत ही समोरासमोर आली आहेत; आणि नैतिक व बौद्धिक क्षेत्रांतील विसंगती उजेडात आणल्या जात आहेत.

यांपैकी नैतिक बेबनाव हा निःसंशय मूलभूत आहे. या राष्ट्रांत, एका बाजूला, मूल्यमापनाच्या सामान्य पातळीवर, इतिहासात फार पूर्वकाळापासून परंपरेने चालत आलेल्या सर्वमान्य ध्येयाशी निष्ठा असते; प्रत्येक व्यक्तीला समान संधी मिळणे हा तिचा हक्क असतो, मग त्या व्यक्तीचा वंश वा वर्ण, धर्म वा श्रद्धा, सामाजिक स्थान वा राष्ट्रीयत्व कोणतेही असो. दुसऱ्या बाजूला, दैनंदिन जीवनात व्यक्ती म्हणून अगर नागरिक म्हणूनही, ह्या महान नैतिक तत्त्वाचे अगदी दूरान्वयाने का होईना, पूर्ण म्हणता येण्यासारखे परिणाम स्वीकारण्यास लोक तयार नसतात.

आर्थिक सिद्धांत हा संपूर्ण संस्कृतीचा केवळ एक भाग होय. बौद्धिक समर्थनाच्या संधीसाधू गरजांना उपयोगी पडेल अशा रीतीने तो तयार होत असतो. मनातील नैतिक विसंगतीबरोबर शक्य तितक्या सुखासमाधानाने राहाण्यासाठी, तेथील लोकांना, ह्या नैतिक विसंगतीपासून लक्ष दुसरीकडे वेधील अशा आर्थिक सिद्धांताची गरज असते.

अशा गरजेमधून आर्थिक सिद्धांतामधील तात्त्विक पूर्वानुकूलग्रहांची टिकून रहाण्याची शक्ती वाढते; आर्थिक सिद्धांताच्या स्वतःच्याच मूलभूत समता तत्त्वावरील उतारा म्हणून ह्या पुर्वानुकूलग्रहांना साधन-मूल्य असते; आणि, स्थिर समतोलाचा दृष्टिकोन व "बिन-आर्थिक" घटकांचे विभक्तीकरण अशा प्रकारच्या, ते पूर्वानुकूल-ग्रह "सिद्ध करणाऱ्या", युक्तिवादांचीही टिकून रहाण्याची ताकद वाढते. आर्थिक सिद्धांतातील ह्या प्रवृत्ती तर्कशुद्ध रीतीने परस्परसंबंधित आहेत, आणि ज्यांच्यामधून

आर्थिक सिद्धांताची शाखा निघाली त्या नैसर्गिक हक्कांच्या व उपयुक्ततावादाच्या तत्त्वज्ञानाशीही त्या संबंधित आहेत; ह्या प्रवृत्तींचा संकलित परिणाम, शक्यतो सिद्धांताला सत्य घटनांपासून व कार्यकारणसंबंधापासून अलिप्त ठेवण्यात झाला आहे व होत आहे. परंतु ह्या घटनांचे व संबंधाचे पृथक्करण केल्यास प्रदेशाप्रदेशांतील व देशादेशांतील आर्थिक विषमतांवर आणि म्हणून मूलभूत नैतिक विसंवादावर लक्ष केंद्रित होईल.

अशा परिस्थितीत, अर्ध-विकसित देशांच्या समस्यांसंबंधीच्या मोठ्या प्रमाणावर वाढत्या साहित्यातील आपण अवलोकिलेले असैद्धांतिक वळण ही ह्या प्रश्नाचा तळमळीने विचार करणाऱ्या समाज-शास्त्रज्ञांची योग्य प्रतिक्रिया आहे. सर्वसाधारण सिद्धांताचा आधार न घेणे, हे पूर्वग्रहदूषित व चुकीच्या सिद्धांताचा आधार घेण्यापेक्षा अधिक सोईस्कर वाटते.

सिद्धांताची तर्कनिष्ठ आवश्यकता आणि तो वस्तुस्थितीशी जुळवून घेण्याची गरज

परंतु, शास्त्रीय कामासाठी सिद्धांत परिहार्यतेने आवश्यक असतो, असे म्हटलेच पाहिजे. संशोधनातून शोधून काढलेल्या गोष्टींना अर्थ प्राप्त करून देण्यासाठी त्यांचे संघटन करावे म्हणूनच केवळ सिद्धांताची आवश्यकता असत नाही; तर अधिक मूलभूतपणे, कोणते प्रश्न विचारावेत हे ठरविण्यासाठीही त्याची आवश्यकता असते. शास्त्रीय ज्ञान आपोआप निष्पन्न होत नाही; म्हणजे अननुभवामधून अनुभवजन्य संशोधनाने ते प्राप्त होत नाही; तर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे म्हणूनच ते पुढे येते; आणि अशा उत्तरांसाठी मांडणी केलेल्या समस्यांची तर्कशुद्ध रीतीने संबंध जुळविलेली यंत्रणा गृहीत धरलेली असते.

म्हणून, सत्यस्थितीच्या अनुभवनिष्ठ निरीक्षणाच्या आधीच सिद्धांत असावयास पाहिजे; तो नेहमीच 'अनुभवपूर्व' असला पाहिजे. सिद्धांताच्या चौकटीत दुजोरा मिळाल्यानंतर व गुंफल्या गेल्यानंतरच सत्य घटनांना अर्थ प्राप्त होतो. खरे म्हणजे, शास्त्रीय ज्ञानाचा भाग म्हणून सत्य घटनांना अशा चौकटीच्या बाहेर अस्तित्वच नसते. उत्तरे मिळण्यासाठी प्रश्न विचारले पाहिजेत, आणि संपूर्ण सामाजिक वस्तु-स्थितीचे आकलन करून घेण्याच्या तर्कशुद्ध दृष्टीने सुसंबद्ध यत्नांचा हे प्रश्न हा भाग असला पाहिजे, तरच ते अर्थपूर्ण ठरतील. तर्कशास्त्राच्या दृष्टीने असैद्धांतिक दृष्टिकोनच अतर्क्य आहे.

म्हणून, समाजसत्य शोधून काढण्याच्या प्रत्येक पद्धतशीर यत्नांच्या मागे व त्याचे नियमन करण्यासाठी कोणता ना कोणता सिद्धांत असावाच लागतो; अत्यावश्यक सत्य घटना कोणत्या आणि त्यांच्यातील कार्यकारणसंबंध काय आहेत यासंबंधीचा तो दृष्टांत असतो. संशोधनाचे मार्गदर्शन निश्चित करणारा हा सिद्धांत स्पष्ट करावा

लागतो. उपस्थित केलेले विशिष्ट प्रश्न का विचारण्यात आले आणि संशोधित माहिती विशिष्ट तऱ्हेने का एकत्रित करण्यात आली याची न सांगितलेली कारणे— अशा स्वरूपात सिद्धांत अस्पष्ट ठेवण्यात येतो; आणि त्यामुळे टीका टाळता येते हाच त्यातील धोका असतो.

तेव्हा, सिद्धांत जर 'अनुभवपूर्व' असेल, तर दुसऱ्या बाजूला, तथ्ये (Facts) सर्वश्रेष्ठ असतात, हे शास्त्राचे पहिले तत्त्व होय. दुसऱ्या शद्बांत सांगावयाचे तर, सिद्धांत हे केवळ एक गृहीततत्त्व असते. जेव्हा सत्यघटनांचे निरीक्षण सिद्धांताशी जुळत नाही, म्हणजे जेव्हा संशोधनासाठी वापरलेल्या सिद्धांताच्या चौकटीत ते अर्थपूर्ण ठरत नाहीत, तेव्हा तो सिद्धांत टाकून द्यावा लागतो आणि त्याऐवजी अधिक जुळेल असा सिद्धांत स्वीकारावा लागतो.

अशा रीतीने सिद्धांत आणि तथ्ये शोधण्याचे संशोधन एकमेकांशी सतत जुळवून घ्यावे लागते; मात्र तथ्ये निर्णायक असतात ह्या तत्त्वावर ही जुळणी करावी लागते. सिद्धांत केवळ गृहीततत्त्व असल्यामुळे, त्याच्या खरेपणाचा निकष, घटनांचे निरीक्षण अर्थपूर्ण सुसंगत ज्ञान-प्रणालीत करण्यातील त्याची उपयुक्तता, हाच होऊ शकतो. आणि म्हणून प्रयोग आणि चुका ह्या प्रक्रियेतूनच शास्त्रीय प्रगती होण्याची अपेक्षा करता येते.

आपल्या नैतिक क्षेत्रात, नैतिक टीका ही अनुरूप तर्कशुद्ध प्रक्रिया आहे; आपल्या नैतिक मूल्यमापनात सुसंगती असावी या अनुमानावर ती आधारलेली आहे आणि आपल्या भावनादेखील तशीच अपेक्षा करतात; या भावना खऱ्या असतात कारण बुद्धिवाद हा आपल्या संस्कृतीचा भाग आहे. मूल्यमापन सामाजिक वस्तुस्थितीबद्दलचे असते, आणि म्हणून ह्या वस्तुस्थितीसंबंधीच्या आंतर-संबंधात, लोकांच्या तिच्या-विषयीच्या श्रद्धांचा तर्कशुद्ध रीतीने समावेश होतो; त्यामुळे, सिद्धांत सत्यस्थितीला जुळतील अशा रीतीने दुरुस्त करण्याच्या प्रक्रियेत लोकसमुदायाच्या नैतिक कल्पनांना स्पष्टता, प्रामाणिकपणा व सुसंगती प्राप्त करून देण्याचे महत्त्वाचे कार्यही होत असते; त्यामुळे सार्वजनिक सद्सद्विवेकबुद्धी शुद्ध व समर्थ होते.

माणसांना बुद्धिनिष्ठ व्हावयाचे असते. शास्त्रीय दृष्टीने होणाऱ्या सत्यान्वेषणामुळे त्यांच्या श्रद्धा दुरुस्त होतात आणि त्यांचा प्रभाव नैतिक मूल्यांवर पडतो. "बुद्धिनिष्ठ सुसंस्कृत समाजात नैतिक मूल्यांनी श्रद्धा प्रभावित होतात, इतकेच नव्हे तर, नैतिक मूल्येही श्रद्धांवर अवलंबून असतात."[१]

सत्यनिष्ठ सिद्धांताची साधनसामुग्री

अशा रीतीने, वास्तवासाठी व अर्थपूर्णतेसाठी शास्त्रीय संशोधनाला मोठ्या "अनुभवपूर्ण" तत्त्वावर अवलंबून रहावे लागते; महत्त्वाची तथ्ये आणि कार्यकारणसंबंध कोणते असतील याबद्दलच्या निरीक्षणशक्तीवर अवलंबून रहावे

लागते. नंतर हा 'अनुभवपूर्व' सिद्धांत संशोधनाच्या क्रमात अभ्यासित वस्तुस्थितीशी अधिक जुळेल अशा रीतीने दुरुस्त होतो. परंतु प्रथमत: असा अनुभवपूर्व सिद्धांत कशावरून काढला जातो ? त्याचे उगमस्थान कोणते ?

स्वत:च्या कल्पनेतून तो काढणे म्हणजे अवास्तवाकडे व अर्थशून्यतेकडे जाणाऱ्या असंख्य मार्गांतून एकाची निवड करण्यासारखे होय. सैद्धांतिकाच्या वैयक्तिक कल्पना सम-संभवनीय नसतात. तशा त्या असत्या तर कदाचित योगायोगाने महत्त्वाच्या विचारावर त्याचे लक्ष जाऊन, त्यामुळे तो वास्तवाचे दर्शन घडवून आणणारे प्रश्न विचारण्याची आणि अर्थपूर्ण अनुमाने काढण्याची शक्यता तरी निर्माण झाली असती. कारण त्याची इच्छा असो वा नसो, तो परंपरागत सिद्धांताच्या दबावाखाली असतो; आणि १०व्या प्रकरणात मी चर्चिलेल्या पूर्वानुकूलग्रहांच्या प्रसाराचे काम करण्याकडे ह्या सिद्धांताचा कल असतो.

सैद्धांतिक जितका अधिक "शुद्ध" तितका त्याच्यावरील परंपरागत पूर्वानुकूल-ग्रहांचा प्रभाव अधिक. "कल्याणकारी अर्थशास्त्रा"चा दृष्टिकोन अवास्तविक आणि खरे म्हणजे तर्कदुष्ट असल्याचे पूर्वीच निर्णायक रीतीने सिद्ध झाले असताही, अलिकडील काही दशकांत त्याकरिता जे सैद्धांतिक परिश्रम करण्यात आले आहेत—ते ह्या मुद्याचे उत्तम प्रतीक आहेत.

माझा पुढचा मुद्दा असा आहे : जे खरोखरीच आवश्यक आहे आणि अनेक निर-निराळ्या सिद्धांतांपैकी एकाची निवड करण्यासाठी अटळ आहे त्याचे योग्य आमूलाग्र ज्ञान मिळण्याकरता बोजड व परिश्रमपूर्वक रीतीने सर्वांगीण व सखोल अनुभवजन्य समाजशास्त्रांचे संशोधन करण्याशिवाय दुसरा सयुक्तिक मार्ग नाही. समाज-इति-हासाच्या व समाज-ज्ञानाच्या निकट संबंधाच्या पायावरच फक्त आपल्याला "नमुन्यांचा नमुना" (model of the models) सर्वसाधारणपणे रचता येण्याची आशा आहे; तो नंतर आपल्याला अमूर्त सिद्धांतात वास्तविकता व अर्थपूर्णता आणण्यासाठी मार्गदर्शक म्हणून वापरता येईल.

ह्या मूलभूत अनुभवजन्य संशोधनात सर्व क्षेत्रांतील सामाजिक सत्ये व संबंध समाविष्ट करून घ्यावी लागतील. तिसऱ्या प्रकरणात मी नमूद केले आहे की, शास्त्रीय ज्ञानाची स्वतंत्र व सीमित समाजशास्त्रात केली जाणारी परंपरागत विभागणी वस्तुस्थितीला धरून नाही: निश्चित समस्या कधीही केवळ आर्थिक, सामाजिक, मानसशास्त्रीय किंवा राजकीय नसतात. फक्त "आर्थिक" बदलत्या घटकांपैकी एकावर आधारलेला अर्ध-विकास व विकासासंबंधीचा सिद्धांत तर्कशास्त्राच्या दृष्टीने अवास्तविकच ठरतो आणि म्हणूनच तो अर्थपूर्ण नसतो.

अमूर्त सिद्धांताची रचना करण्यापूर्वीचे आणि सिद्धांत वास्तव व अर्थपूर्ण बनण्या-साठी आवश्यक असलेले हे सर्वांगीण समाजशास्त्रीय संशोधन, मी उल्लेखिलेल्या बलिष्ट पूर्वानुकूलग्रहांपासून शक्यतो, मुक्त असावे. ते साध्य करण्याची सर्वसाधारण

पद्धत, स्पष्ट मूल्यांकित विधानांची मांडणी करणे, ही असावी; आणि ही विधानेही सयुक्तिक व अर्थपूर्ण असल्याची प्रथम परीक्षा केलेली असावी.

मात्र ह्या सर्वांगीण संशोधनाने, प्रथमपासूनच आणि प्रारंभानंतर सतत, निरीक्षणाला मार्गदर्शन करण्यासाठी व समर्पक प्रश्न उपस्थित करण्यासाठी गृहीत-तत्त्वाची मांडणी केली पाहिजे. संशोधनाला सिद्धांताची गरज असते. मी वर म्हटल्याप्रमाणे, व्यवस्था आणणाऱ्या तत्त्वाखेरीज अनुभवाधिष्ठित ज्ञान एकत्रित करता येत नाही आणि पद्धतशीर रीतीने मांडता येत नाही; म्हणजे आवश्यक तथ्ये व संबंध यांच्यासंबंधी पूर्ण ज्ञान असल्याखेरीज ते करता येत नाही. खरे म्हणजे, अनुभवाधिष्ठित संशोधनासाठी किमान सिद्धांताची आवश्यकता असते; आणि ती ते स्वतःच्या पायावरच उभारू शकतात असा माझा आग्रह आहे.

सर्व शास्त्रांचा मध्यवर्ती गाभा

सर्व शास्त्रांचा मध्यवर्ती गाभा असा असतो : त्याची विचारसूत्रे "अनुभवपूर्व" गृहीततत्त्वे असतात; परंतु ह्या "अनुभवपूर्व" गृहीततत्त्वांसाठी अनुभवजन्य आधार शोधून काढण्याची त्याने सतत महत्त्वाकांक्षा बाळगली पाहिजे. अर्ध-विकास व विकासासंबंधीचा सिद्धांत जर कधी काळी प्रतिपादन करता आला, तर परंपरानिष्ठ पूर्वग्रहापासून स्वतंत्र होऊन जमविलेल्या, नानाविध सामाजिक बदलांच्या विस्तृत व निवडक अनुभवाधिष्ठित ज्ञानावर तो आधारावा लागेल. तरच तो, संशोधनाची सैद्धांतिक दिशा ठरविण्यास आवश्यक असलेल्या धीट व सुलभ प्रमेयांचा पाया घालू शकेल. परंतु निवड व संकलन यांच्या तत्त्वांशिवाय, म्हणजेच सिद्धांताच्या दृष्टीशिवाय अनुभवाधिष्ठित ज्ञान जमविताच येणार नाही.

तेव्हा पूर्णांशाने जे कधीच साध्य होणार नाही ते साध्य करण्याचा आपण सतत प्रयत्न करीत आहोत, आणि त्यामुळे तात्पुरते आडाखे बांधीत आहोत; परंतु ते मात्र अधिक चांगले किंवा अधिक वाईट असू शकतात. सध्याच्या परिस्थितीत, कधी कधी गृहीत धरले जाते त्याप्रमाणे, आपले कार्य केवळ सिद्धांताच्या "रिकाम्या पेटाऱ्यांत" वास्तवाबद्दलचे अनुभवाधिष्ठित ज्ञान भरण्याचे नाही; ते कार्य सापेक्षतेने सोपे आहे. आपल्या सिद्धांताचे पेटारे रिकामे आहेत कारण वास्तवतेला सामावून घेण्यासारखी त्यांची बांधणी करण्यात आलेली नाही. आपल्याला नव्या सिद्धांतांची जरुरी आहे; आणि ते कितीही अमूर्त असले तरी ते वास्तवाला अधिक धरून असल्यास त्या अर्थाने अधिक वास्तववादी असतील.

दरम्यानच्या काळात, अर्धविकास व विकासाच्या क्षेत्रांतील आपल्या पांगापांग झालेल्या प्रयत्नांत आदर्शाबद्दलची स्पष्ट कल्पना मनात ठेवली जाईल आणि आपल्या सर्व संशोधनात त्याला मार्गदर्शकाची भूमिका दिली जाईल, असा मला विश्वास वाटतो; हीच आपल्या कार्यातील शिस्त-निर्मितीची शक्ती आहे. प्रारंभी आपण,

पूर्वग्रहदूषित व अपुऱ्या पूर्वानुकूलग्रहांच्या तावडीतून स्वत:ची मुक्तता करून घेतली पाहिजे; आणि आपल्या अभ्यास-परंपरेत जड भाराप्रमाणे वाहून आणलेल्या अवास्तविक व अर्थहीन सैद्धांतिक दृष्टिकोनापासूनही आपण आपल्याला मुक्त करून घेतले पाहिजे.

संदर्भ टिपा

१. "अमेरिकेचा यक्षप्रश्न" (अमेरिकन डॉयलेमा), प्र. १४वे, पृ. १०२८ व पुढे.

भाषांतरात वापरलेल्या काही प्रमुख पर्यायी शब्दांचा संग्रह

१. प्रकरण १ले

मेकॅनिझम : कार्यतंत्र. व्हॅल्यू प्रिमायसेस : मूल्यांकित गृहीततत्त्वे. अॅसमशन : गृहीततत्त्व. स्टॅग्नेशन : गतिहीनता. इन्हेरिटेड थिअरॉटिकल अॅप्रोच : परंपरागत सैद्धांतिक दृष्टिकोन. प्रीडिलेक्शन : पूर्वानुकूलग्रह. स्टेबल इक्विलीब्रिअम : स्थिरसमतोल. टेलिऑलॉजिक : अंतिम हेतुवाद. कॉजल रिलेशन्स : कार्यकारणभावाचे संबंध.

२. प्रकरण २रे

सर्क्युलर अँड क्युमुलेटिव्ह कॉजेशन : चक्राकार व संचयी कार्यकारणभाव. हायपोथिसिस : प्रमेय. लेसे फेअर : ज्याचे त्याने पाहून घ्यावे.

३. प्रकरण ३रे

प्ले ऑफ मार्केट फोर्सेस : बाजारपेठेच्या शक्तींच्या क्रियाप्रतिक्रिया. बॅक वॉश इफेक्टस : प्रत्याघाती परिणाम. स्प्रेड इफेक्टस : प्रसारीत परिणाम. एक्सपांडिग, स्टॅग्नेटिंग अँड रिग्रेसिंग लोकॅलिटीज : भरभराटीचे, गतिशून्यतेचे व परागतीचे प्रदेश. बिझिनेस सायकल : तेजीमंदीचे चक्र किंवा आर्थिक अरिष्ट. नेट मायग्रेशन : निव्वळ स्थलांतर.

४. प्रकरण ४थे

क्रिएटेड हार्मनी : निर्मित सुसंवाद. प्राइस सिस्टीम : भावयंत्रणा.

५. प्रकरण ५वे

कॅपिटल मूव्हमेंट : भांडवलाचे स्थानांतर. मायग्रेशन : स्थलांतर. एन्फोर्सड बायलॅटरॅलिझम : सक्तीचा उभयपक्षवाद. मेट्रॉपोलिटन कंट्री : महानागरी देश. प्रिव्हिलेज्ड ग्रूप्स : कृपापात्र गट.

६. प्रकरण ६वे

अंडरप्रिव्हिलेज्ड नेशन्स : हक्कविहीन राष्ट्रे.

७. प्रकरण ७वे

सुपर प्लॅनिंग : वरिष्ठ पातळीवरचे नियोजन. इन्डुसड प्रोसेस : प्रवृत्त केलेली प्रक्रिया. ऑपॉर्च्युनिटी कॉस्ट : प्रासंगिक खर्च. गाट : व्यापार व वहातूक

मंडळ. डू अट् डेस : द्यावे तसे घ्यावे.

८. प्रकरण ८वे

जनरल थिअरी : सर्वसाधारण सिद्धांत. रेलेव्हंट व्हरायबल्स : संबद्ध बदलते घटक. रॅशनलायझेशन नीड्स : समर्थनाची गरज. नॉर्मेटिव्ह अँड टेलिऑलॉजिकल : तात्त्विक व विश्वाचा अंतिम हेतू सांगणारे. ऑब्जेक्टिफाईड व्हॅल्यूएशन्स : वस्तुरूप मूल्ये.

९. प्रकरण ९वे

रॅडिकल टेनेट्स : मूलगामी विचार. इक्वलायझेशन पॉलिसिज : समतानिष्ठ धोरणे. इगॅलिटेरियन : समतावादी. फिलॉसॉफी ऑफ नॅचरल लॉ : नैसर्गिक नियमाचे तत्त्वज्ञान. क्लासिकल थिअरी ऑफ "रिअल व्हॅल्यू" : "वास्तविक मूल्या"चा आद्य सिद्धांत. एव्हिडंट ट्रूथ : स्वयंसिद्ध सत्य. युटिलिटरिअन फिलॉसॉफी: उपयुक्ततावादाचे तत्त्वज्ञान. एक्स्चेंज: विनिमय. डिस्ट्रिब्युशन ऑफ इन्कम अँड वेल्थ : उत्पन्न व संपत्ती यांचे विभाजन. डायनॅमिक्स ऑफ इक्वलायझेशन : समानताकरणाचे गतिशास्त्र. स्टॅटिक : स्थितिनिष्ठ. अदर काँपिटिंग व्हॅल्यूएशन्स : इतर स्पर्धक मूल्यमापने. हेरेसिज : पाखंडी मते. क्लासिकल एकॉनॉमिस्ट : आद्य अर्थशास्त्रज्ञ.

१०. प्रकरण १०वे

अँनेकडोट : उतारा. हार्मनी ऑफ इंटरेस्टस : हितसंबंधांचा सुसंवाद. ब्लाइंड स्पॉट : विचारविहीन क्षेत्र.

११. प्रकरण ११वे

फॅक्टर प्राइस इक्वलायझेशन : उत्पादन साधनांच्या किमतींचे समानीकरण, किंवा घटक किमतींचे समानीकरण.

१२. प्रकरण १२ वे

अ प्राआरी: अनुभवपूर्व. इंपिरिकल ऑबझर्व्हेशन : अनुभवनिष्ठ निरीक्षण. रॅशनल : बुद्धिनिष्ठ. ॲबस्टॅाक्ट : अमूर्त.

संदर्भ ग्रंथांची व इतर साहित्याची सूची

प्रकरण १ले

१. पब्लिकेशन्स ऑफ द युनायटेड नेशन्स अँड द सेक्रेटरिएटस ऑफ द थ्री रिजनल एकॉनॉमिक कमिशन्स.

२. अंडरडेव्हलप्ड कंट्रीज अँड द प्रीइंडस्ट्रिअल फेज इन द अॅडव्हॉन्सड कंट्रीज— ले. सायमन कुझनेत्स (प्रबंध).

३. ऑन इन्टरनॅशनल एकॉनॉमी—अॅपेंडिक्स—मेथॉडॉलॉजिकल नोट ऑन द कॉन्सेप्टस अँड द व्हॅल्यू प्रीमायसेस.

प्रकरण २रे

४. द कॉस्ट ऑफ सिकनेस अँड द प्राइस ऑफ हेल्थ–ले. सी. इ. ए. विन्स्लो.
५. एकॉनॉमिक आस्पेक्टस ऑफ हेल्थ–ले. गन्नर मिरदाल.
६. सम आस्पेक्टस ऑफ कॅपिटल ॲक्युम्युलेशन इन अंडरडेव्हलप्ड कंट्रीज–ले. रॅग्नर नर्कसे.
७. प्रॉब्लेम्स ऑफ कॅपिटल फॉर्मेशन इन अंडरडेव्हलप्ड कंट्रीज–ले. रॅग्नर नर्कसे.
८. ॲन अमेरिकन डायलेमा : द निग्रो प्रॉब्लेम अँड मॉडर्न डेमॉक्रसी–ले. गन्नर मिरदाल.
९. द टेक ऑफ इन टू सस्टेंन्ड ग्रोथ–ले. डब्ल्यू. डब्ल्यू. रोस्तोव (निबंध.)
१०. ब्राऊन अमेरिका : द स्टोरी ऑफ ए न्यू रेस–ले. एडविन आर. अ एम्ब्री.

प्रकरण ३ रे

११. इंटरनॅशनल ट्रेड ॲंड एकॉनॉमिक डेव्हलपमेंट–ले. प्रो. जेकब वायनेर.
१२. प्राब्लेम्स ऑफ रिजनल डेव्हलपमेंट अँड इंडस्ट्रिअल लोकेशन इन युरोप–एकॉनॉमिक सर्व्हे ऑफ युरोप इन १९५४.
१३. ग्रोथ अँड स्टॅग्नेशन इन द युरोपियन एकॉनॉमी, युनायटेड नेशन्स एकॉनॉमिक कमिशन फॉर युरोप, १९५४–ले. प्रो. इंगवार सेनिलसन.

प्रकरण ४ थे

१४. डेमॉक्रटिक व्हॅल्यूज–फेबियन ट्रॅक नं. २८२–ले.अनुरिन बेव्हिन.

प्रकरण ७ वे

१५. युनायटेड नेशन्स एकॉनॉमिक कमिशन फॉर लॅटिन अमेरिका–ॲनालिसिस अँड प्रोजेक्शन्स ऑफ एकॉनॉमिक डेव्हलपमेंट ॲन इन्ट्रोडक्शन टू द टेक्निक ऑफ प्रोग्रॅमिंग.
१६. नॅचरल व्हॅल्यूज–ले. व्हान विझर.

प्रकरण ९ वे

१७. द पोलिटिकल एलेमेंट इन द डेव्हलपमेंट ऑफ एकॉनॉमिक थिअरी–ले. गन्नर मिरदाल.
१८. एसेज ऑन मेथॉडॉलॉजी–ले. गन्नर मिरदाल.
१९. लेक्चर्स ऑन पोलिटिकल एकॉनॉमी–ले. नट विकसेल.
२०. प्रिन्सिपल्स ऑफ २०. प्रिन्सिपल्स ऑफ एकॉनॉमिक्स–ले. अल्फ्रेड मार्शल.
२१. पोलिश पेझंट अँड ॲट होम अँड ॲब्रोड–ले. डब्ल्यू. आय. थॉमस.
२२. इंडस्ट्री अँड ट्रेड–ले. अल्फ्रेड मार्शल.
२३. एड अँड ट्रेड–द अमेरिकन स्कॉलर, स्पिग १९५७.

प्रकरण ११ वे

२४. युजेस अँड लिमिटेशन्स ऑफ इंटरनॅशनल ट्रेड इन ओव्हरकमिंग इनइक्वॉलिटीज इन वर्ल्ड डिस्ट्रिब्यूशन ऑफ पॉप्युलेशन अँड रिसोर्सेस–ले. फोक हिलगर्ट.

२५. रिडींगज इन द थिअरी ऑफ इंटरनॅशनल ट्रेड–ले. इलि एफ्. हेकश्चर.
२६. प्रॉडक्शन फंकशन्स अँड द थिअरी ऑफ इंटर नॅशनल ट्रेड–ले. खेंद लॉरसेन.
२७. इंटरनॅशनल ट्रेड अँड एकॉनॉमिक डेव्हलपमेंट–ले. प्रो. जेकब वायनेर.
२८. एकॉनॉमिक स्टॅबिलिटी इन ए चेंजिंग वर्ल्ड–ले. प्रो. जोन डब्ल्यू. विलियम्स.
२९. द थिअरी ऑफ इंटरनॅशनल ट्रेड रीकन्सिडर्ड–ले. प्रो. जोन डब्ल्यू विलियम्स.

महाराष्ट्र राज्य साहित्य-संस्कृति मंडळाच्या भाषांतर योजनेखालील प्रकाशने

(६) **'माताजी'** (स्वामी निखिलानंद लिखित 'Holy Mother' चा अनुवाद), श्री. वि. य. कुळकर्णी, पृष्ठे ८+३२०, मूल्य रु. ५.२५.

(७) **'अभिनय साधना'** (स्तानिस्लाव्स्की लिखित 'An Acto Prepares' चा अनुवाद—रशियन), श्री. के. नारायण काळे, पृष्ठे ७+३६८, मूल्य रु. ११.००.

(८) **'सामाजिक करार'** (रूसोच्या 'Social Contract' चा अनुवाद), श्री. व. भ. कर्णिक.

(९) **'संगीत व कल्पकता'** (कोपलँड लिखित 'Music and Imagination' चा अनुवाद), श्री. श्री. ह. देशपांडे.

(१०) **'स्वातंत्र्याविषयी'** (जे. एस. मिल लिखित 'On Liberty' चा अनुवाद), श्री. व. भ. कर्णिक.

वेष्टन छपाई : शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई